# अक्षरवेल

विद्याधर गोखले

खंड ५



खंड ५

# अष्टपैलू

▪

निवडक राजकीय
अग्रलेख

विद्याधर गोखले

मा न स न्मा न प्र का श न

मानसन्मान ॥ ३० वा ॥
अष्टपैलू : खंड ५ : निवडक राजकीय अग्रलेख
लेखक : विद्याधर गोखले
■
प्रकाशक-मुद्रक :
रवींद्र कुलकर्णी
मानसन्मान प्रकाशन
४/४० चंद्रप्रकाश, कर्वे रस्ता, पुणे ४११००४
■
© सर्व हक्क सुरक्षित
■
मुखपृष्ठ :
चंद्रमोहन कुलकर्णी
■
सजावट :
'रचना' पुणे
■
प्रथमावृत्ती :
१ ऑगस्ट १९९३
॥ लोकमान्य टिळक पुण्यतिथी ॥
■
टाइपसेटिंग :
प्रमोद प्रिंटर्स
प्रमोद वि. बापट
११२०, सदाशिव पेठ, पुणे ३०
■
मुद्रणस्थळ :
स्मिता प्रिंटर्स
प्रमोद वि. बापट
१०१९, सदाशिव पेठ, पुणे ३०.
■
**मूल्य ऐंशी रुपये**

स्वातंत्र्यवीर सावरकर स्मारकादी
अनेक सार्वजनिक कार्यांचे आधार
ज्येष्ठ पत्रकार **श्री. जयंतराव टिळक** यांना
सप्रेम –

**– विद्याधर गोखले**

# ॐ नमोजी आद्या ! २८ मे १९८३

ॐ नमोजी आद्या ।
घे ओवियांच्या नैवेद्या ।
दे राष्ट्र-संजीवन-विद्या ।
राष्ट्र-रूपा ॥

वीरा ! तूंची गणेशू ।
आर्य-संस्कृती-प्रकाशू ।
हातीं लखलखे परशू ।
देशभक्तीचा ॥

तुझिया हातीं अंकुशू ।
तो विज्ञान-निष्ठा-उन्मेषू ।
वेदान्ताचा महारसू ।
मोदक मिरवे ॥

एके हाती दंतू ।
जो स्वभावता खंडितू ।
तो भ्रांत-मत-संकेतू ।
भ्रमिष्टांचा ॥

हिंदु-समाज-उद्धरण ।
पारतंत्र्याचे निखंदन ।
विज्ञान-देवाचे पूजन ।
खंडन दुष्ट रूढींचे— ॥

राजकारणाचे हिंदूकरण ।
हिंदुजगाचे सैनिकीकरण ।
ऐशा राष्ट्रीय व्रतांचे उद्बोधन ।
केलेसी विनायका ! ॥

'जो क्रियावान तोची पंडित ।'
ही सदुक्ती केलीस सार्थ ।
चंदनापरीस देशार्थ ।
झिजलासी ॥

अगा ! कृतिशूरा उदारा ।
समर्थ श्रेष्ठ क्रांतिकारा ।
तुझ्या ध्येयाचा ध्रुवतारा ।
कधीही ढळला नाही ॥

अगा ! पांडित्य- महासागरा ।
परमोज्ज्वल इतिहासकारा ।
हिंदुतेच्या स्मृतिकारा ।
चरित्र तुझे अद्भुत ॥

येता तातडीची घडी ।
इंग्रजांवर करण्या कडी ।
मारिली सागरांत उडी ।
निर्भयतेने रणमर्दा ॥

झाली प्रदीर्घ जन्मठेप-शिक्षा ।
तरी न सोडिली दिव्य-दीक्षा ।
जणूं सुवर्णाची अग्नि-परीक्षा ।
घेतली दैवाने ॥

अशाच परीक्षांनी दारूण ।
उजळलें तव चारित्र्य-सुवर्ण ।
तयाचाच मुकुट जाण ।
रुचला हिंद-देवीला ॥

सूर्य न पराजित मेघ-डंबरे ।
तशीच आपदा-घनांधकारे ।
तुझी न लोपली कार्य-मंदिरे ।
तेजस्वी प्रकाशमंत ॥

अंदमानच्या अंधेरीत ।
निर्मिलें अमर साहित्य ।
शुद्धि-संघटना-कार्यात ।
यशस्वी झालास तू ॥

असो नासिक-पुण्य पत्तन ।
शत्रू-राजधानी लंडन ।
किंवा भयप्रद अंदमान ।
वीरव्रत न सोडिले ॥

रत्नागिरींत स्थानबद्ध ।
असताही तू वीर प्रबुद्ध ।
अंध-श्रद्धांशी तुवां युद्ध ।
अखंड केले ॥

जातिभेद-उच्छेदन— ।
करूनी समता-संस्थापन ।
झालासी गा मूर्तिमान ।
'पतित पावन-मंदिर' ! ॥

इटालीचा रामदास 'मॅझिनी' ।
तैसाच तू महाराष्ट्र-भुवनी ।
शुद्ध राष्ट्रीयतेची संजीवनी ।
दिधली तू भारतीयां ॥

तुझी तेजोमय लेखणी-वाणी ।
जैसी चैतन्य-मंदाकिनी ।
कीं शिवरायाची भवानी— ।
तलवार ती ॥

तरीही तू साहित्यिकां ।
सांगितले की 'लेखणी टाका ।
बंदुका उचला' प्रसंग बाका ।
राष्ट्रावरी येताची ॥

कारण जेव्हा जेव्हा राष्ट्र ।
होते शस्त्र-बळें संरक्षित ।
तेव्हाच शास्त्रे संवर्धित ।
होती सुज्ञहो ! निश्चये ॥

'स्वातंत्र्य-समरा'चा तू लेखक ।
युद्धशास्त्राचा अभ्यासक ।
अनेक क्रांतिवीरांते प्रेरक ।
झालासी तू ॥

गो-मातेस नव्हे, नरसिंहास— ।
पूजावे, शौर्यशील होण्यास ।
मानबिंदू न मानावे पशूस ।
नरोत्तम हो ! ॥

ऐशा पथ्यकारक स्पष्टोक्ती ।
वदलास तू कुशाग्र-मती ।
लोकेषणेस्तव लोक स्तुती ।
मानिली निंद्य ॥

'अगा गो-क्षीर जरि जाहले ।
तरि पथ्यासी नाही घेतले ।
विष होवोनिया दिधले ।
विषम-ज्वरीं— ॥

तेवी अहिंसा 'भाई भाई वाद' ।
करिती दुर्बळांचा उच्छेद ।"
हे कथिलें त्वां सिंहनाद ।
करोनिया ॥

जैशा जाति-भेदाच्या भिंती ।
तैसीच सद्गुण-विकृती ।
राष्ट्राते निश्चये करिती ।
खंड-विखंडित ॥

ऐसे तुझे परखड विचार ।
तैसाच होता तव आचार ।
उक्ति-कृतीतील अंतर ।
कोठेही ना जीवनी ॥

'देशाचे होईल विभाजन' ।
'आसाम-समस्या अति दारूण' ।
ऐसे भावी भय-सूचन ।
द्रष्टेपणाने केले तू ॥

परी 'नळी फुंकिली सोनारे ।
इकडून तिकडून गेले वारे ।'
तैसे तव द्रष्टेपणाचे इशारे— ।
वाया गेले या देशी ॥

परंतु आता यापुढे तरी ।
सावधान व्हावे सत्वरी ।
ऐसी सद्बुद्धी देवो हरी ।
तुझिया पुण्यप्रभावे ॥

आसिंधु-सिंधु-पर्यंत ।
हा भारत-देश विख्यात ।
तया पितृभू-पुण्यभू नितांत— ।
मानतसे जो— ॥

त्यालाच मानावे हिंदू ।
(इतर ते दुग्ध-कुंभी विष-बिंदू !) ।
ह्या व्याख्येचा आनंदू ।
काय वर्णावा ? ॥

बोलले श्रद्धानंद सन्मती ।
'ह्या व्याख्येत मंत्र-शक्ती ।
जणू वैदिक ऋषींची स्फूर्ती ।
सामावली दिसे ॥'

एक भाषा, एक देश ।
एक लिपी, एक आवेश ।
भिन्नतेतही अधिवास ।
असो राष्ट्रीय ऐक्याचा ॥

शस्त्रास्त्र-सज्ज भारत व्हावा ।
देश-शत्रूंचा न चालो कावा ।
वैभवाचा वर्षाव व्हावा ।
लोकसत्ताक भारती ॥

हे तुझे स्वप्न साकार ।
आज ना उद्या पूर्ण होणार ।
कारण, हुतात्म्यांचे रुधिर ।
कधी न वाया जातसे ॥

'लोकमान्यां'च्या शिष्योत्तमा ।
तुजला द्यावी कोणती उपमा ? ।
हारिले तुवां नैराश्य-तमा ।
हिंदु भूमीच्या ॥

आज तुझा जन्मशताब्दि-दिन ! ।
आत्मा तुझा पुण्य-पावन ।
आजला देवा आशीर्वचन ।
विजीगिषू युवकातें ॥

## *श्री. विद्याधर गोखले ह्यांचे अग्रलेख*

स्वातंत्र्यानंतर 'संपादक' ह्या स्थानाची महती वाढली, जबाबदारीही वाढली ! टिळक-आगरकरांचा वसा घेतलेले त्यामानाने कमीच ! पण ह्या द्वयांप्रमाणेच श्री. गोखले शिक्षकही होते– 'शहाणे करून सोडावे सकळ जन' हे व्रत सांभाळणारे.

ह्या कालखंडात राजकीय लेखांना वेगळे महत्त्व आहे. पंडित नेहरूंसारखा मोहरा पडद्याआड गेला आहे; चिनी आक्रमणाने प्रतिमा मलीन झाली आहे; अशा पार्श्वभूमीवर सार्वत्रिक तीन महत्त्वाच्या निवडणुका झाल्या आहेत.

मूल्यांचे संदर्भ बदलत आहेत. देशभक्त (दे.-भ.) ची देशभक्षक (दे.-भ.), अशी अपूर्व वाटचाल सुरू झाली आहे; 'कथनी और करनी'मध्ये तफावत वाढते आहे; पक्ष फुटणे-उगवणे-आयाराम-गयारामांची नवी नामावली– भ्रष्टाचाराचे उदंड पीक, बुद्धिमंतांची अगतिक उदासीनता तर तथाकथित विचारवंतांचा वावदूकपणा; औद्योगिक व पाश्चात्य संस्कृतीचे समाजावरचे परिणाम,राजकीय अस्थैर्य,प्रचंड दिवाळखोरी– एवं च नाना प्रकारांनी, शतमुखांनी अधःपात ! तरीही जनतेची संपादकांकडून परखडपणाची सदैव अपेक्षा ! संपादकांचा जनतेइतकाच नेत्यांशी,उद्योगपतींशी वाढता संपर्क !

राजकारणाचा रंगमंच वेगाने फिरतो आहे, भलेभले चक्रावले आहेत, अशा काळातले हे अग्रलेख बरंच काही सांगून जातात.

विसाव्या शतकातल्या शेवटच्या दशकात विचार करायला लावतील अशा अग्रलेखांचा हा संग्रह !

**श्री. म. जोशी**
संपादक

*विनंती विशेष,*

'अष्टपैलू'चे पाच खंड प्रसिद्ध होताना केवळ कालक्रमानुसार न घेता विषयसमूहाने घेतले आहेत. मर्यादित पृष्ठसंख्या नसती तर प्रत्येक खंडात आणखी १५-२० लेख आले असते.

कविवर्य ग. दि. माडगूळकर व स्वा. सावरकर ह्यांना वंदना देणारे लेख मुद्दाम दोन वेगळ्या खंडात भेटीस आणले आहेत.

अल्पमुदतीत दर्जेदार छपाई करून देणाऱ्या 'प्रमोद प्रिंटर्स' व 'स्मिता प्रिंटर्स'च्या सर्वच सहकाऱ्यांना शतशः धन्यवाद.

चिकित्सक आणि रसिक दोन्ही वाचकांना पुरेपूर आनंद होईल ही खात्री– पाचही खंड त्यांच्या हाती देताना !

लोकमान्य पुण्यतिथी
१ ऑगस्ट १९९३

**श्री. म. जोशी**
लेखक-प्रकाशकाच्या वतीने

# अनुक्रम


१. एस.एम. ह्यांचा निवडणूक-बोध / १
२. म.स.काँ : बिनबुडाचा नवा पक्ष ! / ५
३. जो जे वांछील, तो ते बोलो ! / ९
४. रा.स्व.संघाला दारे बंद ! / १२
५. पत्याचा बंगला कोसळला ! / १६
६. राजनारायण वि. जोहर ? / १९
७. सिने-सिताऱ्यांचा पक्ष ! / २२
८. चारित्र्यवंतांचा शोध ! / २५
९. शोचनीय शोक-प्रदर्शन ! / २८
१०. इंदिरा-अंतुले-सनसनाटी ! / ३१
११. डांग्यांचे इंदिरा-भोजन ! / ३५
१२. नहाटा-कृत 'गर्वहरण' ! / ३८
१३. समाज-शारदे ! रडू नकोस ! / ४१
१४. देवरस ! तुम्हीदेखील ? / ४५
१५. विसरा आणि क्षमा करा ? / ४९
१६. संघ-सभेचा निर्णय / ५२
१७. इंदिराजींचे डोळे ! / ५७
१८. दार उघड, बया दार उघड ! / ६०
१९. धन्य धन्य संत इंदिराजी ! / ६५
२०. म्हणे विसरून जा ! / ६७
२१. 'मी जादुगारिणी नाही' / ७१
२२. दिल्ली-शरणता / ७४
२३. इंदिराजींची अंगठी ! / ७७
२४. इंदिराजींचा उपदेश ! / ८०
२५. सरकारी वृत्तपत्राचे स्वागत ! / ८३
२६. 'दाराशुकोह-शिष्यवृत्ती' द्या ! / ८८

२७. प्रतिष्ठान व अधिष्ठान ! / ९२
२८. अंतुल्यांची उन्मत्त नीति-संहिता ! / ९५
२९. अभिनंदनीय निर्णय / १००
३०. ही ईश्वराची कृपा / १०४
३१. चीनचा 'स्फोटक' पवित्रा / १०७
३२. भवानी तलवार कोठे आहे ? / ११०
३३. राज्यकर्ते आणि वारांगना / ११४
३४. सत्तानल शमवाया...! / ११८
३५. तिकीट-वाहिनी झिंदाबाद ! / १२०
३६. दंगल-पीडित भागात सिताऱ्यांची सेना ? / १२३
३७. प्रतिकात्मक त्याग ! / १२५
३८. आमचे विद्वान वकील / १२८
३९. 'नाही मी बोलत आता !' / १३१
४०. नामदारांचे बंगले ! / १३४
४१. संत आणि राजकारण ! / १३७
४२. देशहिताची दयाळू सक्ती ! / १४०
४३. गरजेचे राजकारण ! / १४३
४४. नर्तिके ! गर्व करू नकोस ! / १४६
४५. 'मरणान्तानि वैराणि ? ?' / १४९
४६. रा.स्व.संघाचे अग्निदिव्य ! / १५२
४७. चव्हाणांचा 'संघ-फोबिया' / १५५
४८. पाहिजे, फटाकडी पाहिजे ! / १५८
४९. सौभद्र आणि 'दळभद्र' / १६२

---

संपादन करताना कालानुक्रम न घेता, विषयसमुच्चय लक्षात घेतला आहे.

॥ १ ॥

# एस. एम. ह्यांचा निवडणूक-बोध !

## 'बंडखोर तितुका मेळवावा । जनता-पक्ष वाढवावा'

*८ जून १९७८*

जनता पक्ष जेव्हा आकारास आला, तेव्हा 'ही परस्परविरोधी विचारांच्या पक्षांची खिचडी आहे, एके काळी पराभूत झालेल्या बड्या आघाडीची सुधारून वाढविलेली नवी आवृत्ती आहे, आणि 'इंदिरा-हटाव, काँग्रेस हटाव', हेच तिचे नकारात्मक ध्येय आहे,' असा प्रचार सत्ताबाज काँग्रेसजन करीत होते. तथापि, सत्तेचे सिंहासन बळकावण्यासाठी कोणताही विधि-निषेध न बाळगता कोणत्याही पक्षाशी शय्यासोबत करणाऱ्या काँग्रेसवाल्यांच्या ह्या प्रचाराचा विशेष परिणाम जन-मानसावर झाला नाही. 'जनता पक्ष हा हुकूमशाहीचा पाडाव करून लोकशाही नि स्वातंत्र्य ह्यांना प्रतिष्ठा आणणारा नि लोकशाही मार्गाने भारतात सर्वांगीण क्रांती करू इच्छिणारा पक्ष आहे,' हा जनता पक्षाचा दावा जनताजनार्दनाने मानला आणि त्याला भरघोस यश दिले. केवळ सत्ता-संपादनार्थ काँग्रेसला विरोध एवढेच जनता पक्षाचे नकारार्थी— (निगेटिव्ह) — ध्येयधोरण आहे, असे लोकांना वाटले असते तर एवढे देदीप्यमान यश जनता पक्षाला कदापि लाभले नसते. म्हणूनच, 'सत्ता-संपादनाखेरीज अन्य कोणतेही उद्दिष्ट नसलेला, अतएव काँग्रेसचीच नवी कार्बन कॉपी बनलेला पक्ष, अशी आपली प्रतिमा होऊ न देण्याची खबरदारी जबाबदार जनता-नेत्यांनी घेतली पाहिजे. केंद्राप्रमाणेच राज्या-राज्यांतही काँग्रेसला सत्ताभ्रष्ट करणे हे साधन आहे, साध्य नव्हे, ह्याची जाणीव जराही पुसट होऊ नये.

तथापि, उत्तर भारतात विधानसभांच्या निवडणुकांच्या वेळी जे वर्तन काही

जनता-धुरीणांकडून घडले त्यावरून, आणि आता महाराष्ट्रात काँग्रेसी बंडखोरांच्या (?) स्वागताचा जो उल्हास जनता पक्षात ओसंडून चालला आहे त्यावरून, उपर्युक्त साध्यसाधन-विवेक लुप्त तर होणार नाही ना, अशी शंका मनास चाटून जाते. मुंबईत नुकत्याच झालेल्या जनतापक्षीय कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात आणि परवाच झालेल्या 'जनजागृती-दिना'च्या स्पर्धेत एस. एम. जोशी, पन्नालाल सुराणा इत्यादी जनता-धुरीणांनी, काँग्रेसमधील सत्तालंपट बंडखोरांच्या स्वागतार्थ ज्या शब्द-सुमनांच्या पायघड्या पसरल्या आहेत, त्या आम्हास चिंताजनक वाटतात. ह्याचा अर्थ, महाराष्ट्रात काँग्रेसला सत्ताभ्रष्ट करण्यासाठी जनता पक्षाने सारे बळ एकवटू नये, असा नाही. किंबहुना, जी सर्वांगीण लोकशाहीवादी क्रांती जनता पक्ष घडवू इच्छितो, तिच्या पूर्तीसाठी आणि केंद्रीय जनता पक्षाच्या प्रगतिपथावरील अडथळे दूर करण्यासाठी उत्तर भारताप्रमाणेच दक्षिण भारतातही, विशेषतः महाराष्ट्रात, जनता पक्ष विधानसभेत यशस्वी होणे ही कालोचित क्रमप्राप्त निकड आहे, असेच आमचे मत आहे. केंद्रशासन नि राज्य सरकारे ह्यांत सुसंवाद निर्माण होण्यासाठी राज्या-राज्यात जनता पक्षाचे बळ वाढलेच पाहिजे, त्याच्या यशाचे ध्वज डौलात फडफडलेच पाहिजेत !. . .

पण ते 'येन केन प्रकारेण' नव्हे; साधनापुढे साध्याचा बळी देऊन नव्हे; तत्त्वशून्य सत्तालोलुपांशी शय्यामैत्री करून तर नव्हेच नव्हे ! पण गेल्या काही दिवसांत काय झाले ? महाराष्ट्रातील जनता पक्षीय तरुण कार्यकर्त्यांची नाराजी अवमानून, 'लीडर' मंडळींनी काँग्रेसी बंडखोरांचे केलेले हार्दिक सुस्वागत— किंबहुना, अनुनयन ! इकडे 'जनता पक्षाचा अर्थसंकल्प खासगी भांडवलदारांचा अनुनय करणारा आहे' अशी टीका मार्क्सवादी कम्युनिस्ट करीत असतानाच, 'वसंतदादा-गटाच्या धनिकधार्जिण्या धोरणाविरुद्ध बंडखोरांनी दंड थोपटले आहेत' असा अभूतपूर्व साक्षात्कार पन्नालाल सुराणा ह्यांना झाला ! ह्या 'दंड थोपट्या'वर पन्नालालजी खूप होऊन त्यांनी बंडखोरांचे स्वागत केले, तर एस. एम. जोशी ह्यांनी जनता पक्षांत बिनशर्त प्रवेश करणाऱ्या 'शांकरपंथीय' बंडखोरांना देखील 'गुणवत्ता नि मतदारांवरील प्रभाव' पाहून तिकिट देण्याचे आश्वासन दिले !. . . वाहवा, काय पण ह्या बंडवाल्यांची दंडथोपटू बहादुरी नि काय ह्यांची गुणवत्ता ! वसंतदादा धनिक-धार्जिणे, तर हे कोण ? आणीबाणीत कामगारांचा आवाज बंद करण्यात आला होता आणि विशिष्ट उद्योगसमूहांचे उखळ पांढरे होत होते, असा जनता पक्षाचाच आरोप नव्हता काय ? तो जर खरा असेल तर आणीबाणीत इंदिरा-दरबारी पाणी भरणारे हे महाभाग धनिकसत्ता-विरोधी कसे ? वसंतदादा पाटलांचा सत्तारूढ गट हा इंदिरा-हुकूमशाहीपुढे लोटांगण घालणाऱ्या यशवंतरावांच्या तालावर चालतो, असे सुराणांचे म्हणणे. पण ते खरे मानले तरी, केवळ

वसंतदादांना विरोध एवढीच 'गुणवत्ता' अंगी असलेले शंकरराव चव्हाण, पी. के. सावंत प्रभृती महाभाग एकदम लोकशाहीनिष्ठ कसे काय ठरतात? वसंतदादा जर यशवंतरावांच्या तंत्राने चालतात म्हणून निंदनीय, तर प्रत्यक्ष इंदिरा-हुकूमशाहीच्या तंत्राने बेछूट वागलेले हे सत्तेचे सोकाजीराव कसे काय वंदनीय ठरतात? खरी गोष्ट अशी आहे की, ह्या बंडखोर काँग्रेसजनांच्या घटस्फोटाला कोणतेही तात्त्विक अधिष्ठान नाही. नेतृत्वपदाच्या स्पर्धेत वसंतदादांच्या गटाऐवजी हे महाभाग यशस्वी झाले असते तर ते मंत्रालयातील आपल्या खुर्च्यांच उबवीत राहिले असते. वसंतदादांनी देऊ केलेले मंत्रीपद नाकारणारा पिळदार निष्ठा-गावकर ह्यांच्यात एखादाच ! बाकीच्यांची बंडखोरीची कथा म्हणजे 'किस्सा कुर्सी का !' आजही ह्यांच्यातील काहीजण शे. का. पक्षाशी चुंबाचुंबी करीत आहेत, तर काही जनता पक्षाशी सोयरीक जोडू पाहत आहेत. जे विधानसभेची जास्तीत जास्त तिकिटे देतील त्यांच्याच गळयात हे बंडखोर माळ घालतील, असा संभव आहे. आणि आपला सत्तासंपादनाचा हेतू अपेक्षेनुसार साध्य होणार नसेल तर हे घटस्फोटित काँग्रेसजन वेगळीच राहुटी उभारतील !

अशी वस्तुस्थिती असतानाही एस. एम. आदी जनतानेते स्वागताची तोरणे बांधीत आहेत. का? तर आगामी विधानसभा निवडणुकीत काँग्रेसचा पराभव करून ती मोडून काढण्यासाठी ! पण हे साध्य साधण्यासाठी फोडा-फोडीचे साधन वापरण्यात साधनांची शुचिता ती काय राहिली? महात्माजींचा मार्ग तो कोठे उरला? कोणे एकेकाळी काँग्रेसवाले सत्तेचे आमिष दाखवून विरोधीपक्षीय मुखंडांना काँग्रेसवासी करीत असत. ह्यामुळेच विरोधी पक्षाची निकोप वाढ काँग्रेस होऊ देत नाही, असा योग्य आरोप तिच्यावर होत असे. तशाच आरोपाला पात्र होण्याने जनता पक्षाची प्रतिमा कलंकित होणार नाही काय? आणि प्रतिमा डागाळली तर विधानसभा निवडणुकीत विजय कसा मिळेल?. . . यदाकदाचित अशा डावपेचाने विजय मिळविला तरी तो चिरस्थायी कसा होईल?

लोकशाहीवाद्यांनी एकत्रित यावे, हे पन्नालाल सुराणांचे आवाहन स्वागतार्हच आहे. पण 'आणीबाणीविरोधकांना इतर देशात गोळयाच घातल्या गेल्या असत्या' असे उद्गार काढणाऱ्या शंकरराव चव्हाणांच्या नेतृत्वाखालील बंडखोरीची जातकुळी लोकशाहीवादीच आहे, ह्याची ग्वाही कोण देऊ शकेल? आजही जसा वसंतदादा-गटाने तसाच ह्या बंडखोर गटानेही इंदिरा गांधींच्या नेतृत्वाविरुद्ध 'ब्र' उच्चारलेला नाही, हे एस. एम. ह्यांच्या ध्यानी कसे येत नाही?. . . कसे यावे? ते तर चक्कच सांगतात की, 'आता प्रत्येकाचा हेतू तपासत बसणे योग्य नाही. ह्यापूर्वीच आमच्याबरोबर का आला नाहीत, असं ह्या बंडखोरांना विचारण्याची वा त्यांना दूषण देण्याची ही वेळ नव्हे !'

*बंडखोर तेतुका मेळवावा । जनता पक्ष वाढवावा ।*
*निवडणूक-गड जिंकावा । कोणत्याही रीतीने ।।–*

हाच त्यांच्या धोरणांचा इत्यर्थ दिसतो. हा 'निवडणूकबोध' व्यवहारात कदाचित तात्पुरता यशोदायी झाला तरी, त्यामुळे जनता पक्षाचे शाश्वत सामर्थ्य कितपत वाढेल, ह्याचा विचार झाला पाहिजे.

□

॥ २ ॥

## म. स. काँ : बिनबुडाचा नवा पक्ष !

*५ जुलै १९७७*

महाराष्ट्रातील काँग्रेस-पक्षांतर्गत नेतृत्व-स्पर्धेत दारुण अपयश नशिबी आलेल्या पराभूत मंडळींच्या, — (त्यातही कोणतेच सत्तास्थान हाती न उरलेल्या वैफल्यग्रस्तांच्या)— मानगुटीवर बंडखोरीचे भूत सवार होणे क्रमप्राप्तच होते. सुमारे ३ महिन्यांच्या दीर्घ नैराश्यज्वरातून, ह्या असंतुष्ट काँग्रेसजनांच्या बंडखोरीचा जन्म होणे साहजिकच होते. अखेर तसेच झाले. शंकरराव चव्हाण, पी. के. सावंत, विखे पाटील इत्यादींच्या पुढाकाराखाली २५ बंडखोरांनी 'महाराष्ट्र समाजवादी काँग्रेस' नावाचा नवा पक्ष स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. आणखी किती नाराजेश्वर ह्या पक्षात सामील होतात, हे आता पाहावयाचे ! आम्ही पूर्वी अनेकदा म्हटल्याप्रमाणे, ह्या बंडखोरांच्या बंडखोरीला कोणतेही निश्चित तात्त्विक अधिष्ठान नाही. बहुतांशी वैयक्तिक महत्त्वाकांक्षा, सत्तालोलुपता, पूर्वग्रह, पराजयातून आलेले कडवट वैफल्य ह्यातूनच हा नवा पक्ष उद्भवला असल्याने, वस्तुतः त्याला 'गट' हेच नाव अधिक शोभेल. जर ह्या नव्या 'पक्षा'ला काही निश्चित तत्त्वांचे पंख निष्ठापूर्वक जडलेले असते, तर आमदार-निवासांतील 'कॅनव्हासिंग' नि शे. का. पक्ष-जनता पक्ष इत्यादींशी चुंबाचुंबी करण्यात इतका कालापव्यय त्याने केला नसता ! तत्त्वनिष्ठ मंडळी एखाद्या मंगल कार्यासाठी असा दीर्घसूत्रीपणा करीत नसतात. 'कबिरा खडा बझार में' ह्या निर्भय धडाडीने ते, संख्येचा विचार न करता, उभे राहतात आणि 'जो घर फूंके आपना, चले हमारे साथ' असे सर्वस्व-त्यागाचे आवाहन करतात ! स्वतंत्र राहिल्याने निवडणुकीत अधिक यश मिळेल की जनता पक्षांत घुसल्याने सत्तेच्या अधिक खुर्च्या हस्तगत होतील, ह्याचा घोळ घालीत बसण्याचे तत्त्वनिष्ठांना कारण नसते.

म्हणूनच हा तथाकथित नवा पक्ष निवडणुकीच्या पावसाळ्यातील छत्री तर ठरणार नाही ना, अशी रास्त शंका येते.

ते कसेही असो, आता महाराष्ट्राच्या राजकीय आखाड्यात हा 'महाराष्ट्र समाजवादी काँग्रेस' ह्या भारदस्त नावाचा नवा 'पक्ष' दंड थोपटून उभा राहिला आहे खरा. ह्या पक्षातील मंडळींनी जेव्हा बंडखोरीचा पहिला बिगुल फुंकला, त्या वेळी वसंतदादा पाटील लगबगीने धावत जाऊन त्यांना विनविते झाले, 'नका हो नका, काँग्रेस सोडून जाऊ नका.' पण आम्ही तेव्हाच म्हटले होते– 'त्यांना सुखेनैव जाऊ द्या, नवे घर बांधू द्या. त्यांच्या काँग्रेस-त्यागाने फारसे काही बिघडणार नाही. उलटपक्षी महाराष्ट्रातील काँग्रेस पक्ष अधिक एकजिनसी होईल. अंतर्गत कलहापायी, भाऊबंदकीपायी होणारा शक्तिपात टळेल !' आजही आमचे तेच मत आहे. वसंतदादांची विनवणी, यशवंतरावांची शिष्टाई, इतकेच नव्हे, तर इंदिरादेवींची इच्छादेखील अवमानून स्थापन झालेल्या ह्या नव्या पक्षाचे- किंबहुना गटाचे– आम्ही स्वागत करतो. स्वागत अशासाठी की आता ह्या तथाकथित बंडखोरांना आपल्या कल्पनेप्रमाणे 'गरिबांची सेवा' करून स्वतंत्र कर्तृत्व दाखविण्याचा मार्ग बिलकुल मोकळा होईल ! त्यांच्या मानेवर कोणत्याही 'शुगर सिंडिकेट'चे जू नाही की पाठीवर सूडबुद्धीचा आसूड नाही ! अलग चूल मांडल्यामुळे, आपल्या मर्जीप्रमाणे 'समाजवादी' स्वयंपाक करण्याची वाट त्यांना मोकळी झाली. धुसफूस नि आदळ-आपट करीत संसार रेटण्यापेक्षा चक्क घटस्फोट श्रेयस्कर !

घटस्फोट घेतल्यानंतर हे बंडखोर शे. का. पक्षाशी आणि त्याहीपेक्षा जनता पक्षाशी सोयरीक करण्याची दाट शक्यता होती. कारण साधुवर्य एस. एम. जोशी नि पन्नालालजी सुराणा ह्यांनी त्यांच्यासाठी कमानी उभारल्या होत्या, पायघड्या घातल्या होत्या ! 'धनिक-धार्जिण्या' वसंतदादा गटाविरुद्ध दंड थोपटणारे हे महाभाग गरीब-धार्जिणे बनल्याचा त्यांना साक्षात्कार झाला होता ! परंतु, जनता पक्षातील शेकडो कार्यकर्त्यांचा ह्या तत्त्वशून्य अनुनयाला, तसेच बंडखोरांच्या घूसखोरीला प्रखर विरोध होता. आणि ह्या घटस्फोटितांच्याही हे लवकरच लक्षात आले की 'जनता पक्षात जाऊनही आपणास अपेक्षेप्रमाणे तिकिटे मिळणार नाहीत, मंत्रिपदे मिळण्याचा संभव तर अगदीच नगण्य ! किंबहुना, जनता पक्षात आपल्याला बहुसंख्यांचा विरोधच असल्याने, दुय्यम दर्जाचे नागरिकत्वच नशिबी येईल.'. . . मग साहजिकच, ना काँग्रेसरूपी घराचा ना जनतारूपी घाटाचा, अशी विचित्र परिस्थिती, त्यांच्यापुढे उभी राहिली. ते वैतागून उद्गारले असतील–

*Unfit for Mosque, unfit for convent-cell*
*What stuff we are made of, God alone can tell!*
*No hopes of Heaven have we, no fear of hell!*

सारांश, 'अन्फिट फॉर काँग्रेस, अन्फिट फॉर जनता सेल' अशी गत झाल्यानंतरच प्रस्तुत बंडखोरांनी सरतेशेवटी काँग्रेसला रामराम ठोकून स्वतःचा 'म. स. कॉं.'पक्ष स्थापन केला. तथापि, अगतिकत्वातून निर्माण झालेल्या ह्या पक्षातील मंडळींच्या दूषित भूतकालाकडे लक्ष न देता, आता काही तत्त्वशुद्ध क्रिया त्याच्याकडून व्हावी, 'समाजवाद', 'गरिबांची सेवा' हे केवळ परवलीचे शब्द न ठरता ती ह्या पक्षांची अचल मूल्ये व्हावीत, असे शुभचिंतन आम्ही करतो !

ज्या बैठकीत ह्या नव्या पक्षाची घोषणा झाली तीत शंकरराव चव्हाणांचे 'मार्गदर्शनपर' भाषण अपेक्षितच होते. सध्याच्या दादा-शासनावर त्यांनी टीकास्त्र सोडले : 'गरिबांच्या हितासाठी आम्ही घेतलेले निर्णय धडाधड बदलले जात आहेत— धनिकांच्या नि भांडवलदारांच्या हितासाठी !' बाळासाहेब विखेपाटलांनीही 'धरणांच्या जागा बदलणे, विजेचे दर वाढविणे, नागरी कमाल जमीन कायद्यात सवलती देणे, सिंचनासाठी उपलब्ध पाण्यापैकी दोन तृतीयांश पाणी बागायती पिकास देणे' इत्यादी 'धनिक-धार्जिण्या' कृत्यांची यादी पेश केली. ह्या सर्व विषयांचा परामर्श घेणे येथे स्थलाभावी शक्य नसले तरी, आम्ही वेळोवेळी ह्या विषयावर साधक-बाधक विचार प्रकट केलेच आहेत. सध्याच्या शासनाच्या या काही निर्णयांबाबत, अगर जुन्या निर्णयातील फेरबदलाबद्दल, काही मतभेद व्यक्त करूनही आम्ही हे सांगू इच्छितो की शंकररावांच्या आणीबाणी-शासनातील कैक निर्णय व्यवहार्यतेच्या कसोटीवर टिकणारे नव्हते. आणि ते बदलताच धनिक-धार्जिणेपणाचा प्रमाद घडला असेही होत नाही. पण हा सारा विवेक ह्या शंकरराव, पी. के. विखे आदी मंडळींना कोणी सांगावा ? तीन महिन्यांपूर्वी जो काँग्रेस पक्ष त्यांना पुरोगामी नि शोषित-हित-रक्षक वाटत होता, तोच आता 'प्रतिगामी' वाटू लागला आहे ! अवघ्या ३ महिन्यांत केवढा हा चमत्कार घडला ! पण त्याहूनही मोठा चमत्कार हा की जी मंडळी काल-परवापर्यंत जनता-नेत्यांशी लगट करत होती, जनता पक्षात सामील होण्याचा विचार करीत होती, तीच आता जनता पक्षालाही प्रतिगामी मानत आहेत ! ह्या नव्या पक्षाचे 'शंकरा'चार्य आपल्या भाषणात उद्गारले की, "काँग्रेस पक्ष व जनता पक्ष हे दोन्ही तसे प्रतिगामीच आहेत. गरिबांसाठी काही करावे, असे दोन्ही पक्षांना वाटत नाही !"

आणि आमचे साधेभोळे एसेम ह्या अशा 'पुरोगामी' मंडळींना जनता-पक्षात घेण्यासाठी स्वागताची तोरणे बांधीत होते ! 'जनता-पक्ष जनसंघाच्या आहारी गेलेला प्रतिगामी पक्ष आहे' अशी ज्यांची एकूण धारणा, त्या इंदिरादेवींच्या परमभक्तांना आलिंगन देण्यासाठी दोन्ही बाहू पसरून उत्सुक होते ! ह्याबद्दल जनता-कार्यकर्त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली तेव्हा एसेम मोठ्या शेखीने म्हणाले होते, "मला संतकारण

करावयाचे नाही, राजकारण साधावयाचे आहे !.". . पण बरे झाले, जनता पक्षाला काँग्रेसप्रमाणेच प्रतिगामी ठरवून, शंकररावांनी एसेम् ह्यांची शेखी उतरवली, भ्रमनिरास केला ! आत्ताच कोठे हा शांकर-पंथ समाजवादाचा बिल्ला लावून जन्माला आला आहे. आत येत्या निवडणुकांच्या हंगामात तो कितपत पुरोगामी तत्त्वनिष्ठा दाखवितो, अथवा कितपत सौदेबाजी करतो, हेच आता पाहावयाचे. निवडणुकीचे घोडा-मैदान फारसे दूर नाही !

□

॥ ३ ॥

# जो जे वांछील, तो ते बोलो !

*१८ एप्रिल १९७९*

इंदिरा गांधींच्या हुकूमशाहीचा अंधार दूर करून, जनता पक्षाने जनशक्तीच्या बळावर 'दुसऱ्या स्वातंत्र्या'ची प्रभात भारताच्या क्षितिजावर आणली, ही ह्या पक्षाची चिरस्मरणीय कामगिरी होय. पण ह्या प्रभातकाळाच्या प्रकाशातच, लोकशाही स्वातंत्र्याचा दुरुपयोगही नजरेस पडू लागला, ही खेदाची गोष्ट आहे. लोकशाहीत विचाराचे, उच्चाराचे नि आचाराचे स्वातंत्र्य असतेच, पण त्यालाही शिस्तीच्या संकेतांच्या काही मर्यादा असतात, ह्या सत्याचा पार विसर जनता-धुरीणांना पडलेला दिसतो. पक्षांतर्गत व्यासपीठावर मनःपूत मतभेद निर्भीडपणे व्यक्त व्हावेत, पक्षाच्या मंत्रिमंडळांतही प्रामाणिक मतभिन्नता सडेतोडपणे व्यक्त व्हावी, हरेक प्रश्नाचा भरपूर साधकबाधक विचार व्हावा, हे लोकशाहीत अभिप्रेतच आहे. पण एकदा हे निर्भीड विचार-मंथन झाल्यावर (अथवा झाल्याविना) मतामतांचा गलबला चव्हाट्यावर येऊ नये, एका मंत्र्याचे तोंड पूर्वेकडे तर दुसऱ्याचे पश्चिमेकडे, एका पक्षनेत्याने 'रामाय स्वस्ति' म्हणताच दुसऱ्याने 'रावणाय स्वस्ति' अशी आरोळी ठोकू नये, हीच सुबुद्ध जनतेची अपेक्षा होती आणि आहे. पण ह्या अपेक्षेचा भंग जनताधुरंधरांकडून वारंवार होत आहे.

आमचे ज्येष्ठ साहित्यिक सुहृद श्री. पु.ल. देशपांडे ह्यांनी इचलकरंजी साहित्य-संमेलनाच्या व्यासपीठावरून पसायदान मागताना म्हटले होते 'जो जे वांछील तो ते लिहो !' . . . साहित्यिकांच्या त्या 'वांछे'ला प्रकाशन-व्यवहाराच्या स्वाभाविक मर्यादा पडतातच. कारण, लेखकाचे वाट्टेल ते मनमानेल ते लिखाण शहाणे प्रकाशक प्रसिद्ध करतीलच असे नाही ! पण नेत्यांच्या निरंकुश बोलण्याच्या इच्छेला अशा व्यावहारिक

अडचणींची मर्यादा नाही. म्हणूनच कैक जनता राज्यकर्त्यांनी आणि नेत्यांनी (पु.लं. च्या संदेशात जरासा फरक करून–) परमेश्वराकडे पुढील पसायदान मागितलेले दिसते :

*इंदिराजींचे तिमिर जावो ।*
*बेशिस्तीचा समीर वाहो ।*
*जो जे वांछील तो ते बोलो ।*
*मंत्री-जात ॥ (किंवा, नेतृ-जात)*

म्हणजे इंदिरा गांधींचे हुकूमशाहीचे तिमिर हटविण्याच्या एका मुद्द्यावर जनता-धुरिणांचे एकमत ! पण बेशिस्त हटविण्याबाबत एकमत नाही. उलटपक्षी 'स्वातंत्र्या'च्या नावावर बेशिस्तीचे वारे वाहावेत आणि मंत्र्यांनी अथवा नेत्यांनी जे मनात वा तोंडात येईल ते बेधडक बोलावे, असा जनता पक्षाचा खाक्या होऊन बसला आहे. आपल्याच पक्षाच्या प्रधान मंत्र्यांचे वा मंत्र्यांचे बोलणे, आपणच जाहीररीत्या कसे खोडावे; चार भिंतीआडील मतभिन्नता चव्हाट्यावर कशी मांडावी; परस्परांतील विसंवाद, अंतिम निर्णय होण्यापूर्वीच, का वेशीवर टांगावा; इत्यादी घरंदाज प्रश्न जणू काही जनता-मंत्र्यांना वा पुढाऱ्यांना, बेबंद भाषणबाजीपासून परावृत्त करूच शकत नाहीत !

पंतप्रधान मोरारजी देसाई ह्यांनी राष्ट्रीयीकरणाला प्रतिकूल असे निवेदन करताच, लगेच दुसऱ्या दिवशी त्यांच्याच मंत्रिमंडळातील जॉर्ज फर्नांडिस पुनश्च 'टाटा स्टील प्लान्ट'चे राष्ट्रीयीकरण करण्याची बात बोलतात ! 'राष्ट्राच्या मूलभूत उद्योगधंद्याच्या विकासात बड्या उद्योगसमूहांना महत्त्वाची भूमिका बजावता येईल,' ह्या जनता-जाहीरनाम्याच्या आधारे काही मंत्री सिमेंट, रासायनिक खते इत्यादी धंद्याचे राष्ट्रीयीकरण अयोग्य असल्याचे प्रतिपादन करतात, तर परकीय बहुराष्ट्रीय कंपन्यांचे सहकार्य घेण्यास अनमान न करणारे– (ओरिसात स्वतःचे औद्योगिक साम्राज्य स्थापणारे)– बिजू पटनाईक, स्वदेशीय बड्या उद्योगसमूहांवर आसूड ओढून त्यांचे सरसहा राष्ट्रीयीकरण करू चाहतात ! चरणसिंगांचे 'किसान बजेट' जाहीर होताच, 'बरीच भाववाढ होईल' असे भाकित मोहन धारिया करतात, तर खुद्द जनता सरकारचा अर्थ-विभाग 'फार तर १ टक्क्याने भाववाढ होईल' असा निराधार आशावाद व्यक्त करतो ! ३१ मार्च रोजी पुणे-मुक्कामी पंतप्रधान मोरारजी धर्म-स्वातंत्र्य विधेयकाचे समर्थन करतात, तर त्याच पुण्याला दुसऱ्या दिवशी त्यांचे सहकारी मोहन धारिया ह्या विधेयकाबाबत तीव्र नापसंती व्यक्त करून 'ह्या विधेयकातील तरतुदींचा अल्पसंख्यांक जातींना दबविण्यासाठी दुरुपयोग होण्याचा संभव आहे' अशी शंका प्रकट करतात ! सध्या कोळशाचा जबरदस्त तुटवडा आहे. अशा वेळी रेल्वेमंत्री 'कोळसा वाहून नेण्याला भरपूर वाघिणी आहेत' असे शुभवर्तमान सांगतात, तर खाणकाम मंत्री पुरेशा वाघिणी

मिळत नसल्याची शिकायत करतात !

जे मंत्र्यांचे तेच जनता-नेत्यांचे. त्यांचा परस्परांशी मेळ क्वचितच बसतो. श्री. राजनारायण-मधु लिमये ह्यांना रा. स्व संघ ही सर्वांत मोठी डोकेदुखी वाटते, तर नानाजी देशमुख निर्वाळा देतात की 'रा. स्व. संघ हा आता जनता पक्षापुढे प्रश्न राहिला नाही !' आणि चंद्रशेखर सांगतात नवीन राजकीय पुनर्रचनेत रा. स्व. संघीयांचाही समावेश होऊ शकेल ! जनता-पक्षातील भूतपूर्व भालोद-गटाचे काही महाभाग 'केंद्रात नि राज्यात समविचारांचे प्रामाणिक संयुक्तदल (ऑनेस्ट कोॲलिशन)' हा घटकवादावरील अक्सीर इलाज सुचवितात, तर पक्षाचे सरचिटणीस हेगडे हा इलाज साफ नाकारून बजावतात— "सध्याच्या जडणघडणीत काहीही बदल करणे हा १९७७ साली आपणास निवडून देणाऱ्या मतदारांचा विश्वासभंग ठरेल. 'आम्ही एकजूट राखू' ही महात्मा गांधींच्या समाधीपुढे जयप्रकाशांच्या साक्षीने जी शपथ घेतली तिचा तो अपमान ठरेल !"

आता बोला. अशा परस्परभिन्न मत-मतांतराच्या सार्वजनिक प्रदर्शनामुळे सामान्य पक्षकार्यकर्त्यांची नि जनतेची अवस्था काय होत असेल? येत्या १ मेपासून मुंबई जनता-पक्ष 'जनसंपर्क-सप्ताह' पाळणार आहे असे कळते. मुंबईचे अध्यक्ष श्री. राम नाईक ह्यांची ही योजना स्तुत्य आहे. पण जेव्हा ह्या योजनेनुसार कार्यकर्ते घरोघर जातील तेव्हा त्यांना लोक हेच सांगतील की, 'आम्हास चरणसिंग-बजेटाने जेवढा खेद होत नसेल, तेवढा तुमच्या पुढाऱ्यांच्या ह्या बेशिस्त बेदिलीने होतो !'

□

॥ ४ ॥

## रा. स्व. संघाला दारे बंद !

*३१ जुलै १९७९*

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही लक्षावधी तरुणांची शिस्तबद्ध देशव्यापी संघटना. तिचे स्वयंसेवक शिस्तशीर विधायक कार्ये (उदाहरणार्थ, वनवासी विभागातील आश्रम व गोपालन केंद्रे चालविणे, आंध्र वादळग्रस्तांना मदत इत्यादी) करण्याविषयी विख्यात, हे निदान मध्यमवर्गीय महाराष्ट्रीयांना सांगावयास नको. आम्ही ह्याच स्तंभातून ह्या संघटनेच्या सेवाभावी वृत्तीचे कौतुक केले असले तरी, तिच्यावर जे मध्ययुगीन संस्कृतीचे सावट पसरले आहे, त्याबद्दल प्रतिकूल टीकाही केली आहे. तिच्यात आधुनिक विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन निर्माण व्हावा आणि ही प्रचंड युवाशक्ती 'लोकशाही समाजवादी नि धर्मातीत' नवभारत निर्माण करण्याच्या कार्याकडेच वळावी, केवळ सांस्कृतिक-सामाजिक राष्ट्रीय कार्यातच ती रत राहावी, ह्या दृष्टीने तिला कटु पण पथ्यकर हितोपदेश करण्याचे कर्तव्य आम्ही अनेकदा केले आहे. पण राजकारणी मंडळींचे तसे नाही. आणीबाणीपूर्व बिहार नि गुजरात-विद्यार्थी-आंदोलनात आणि नंतर आणीबाणीविरोधी सत्याग्रहात ह्या संघटनेचा फार मोठा सहयोग लाभताच कित्येकांचे संघाबाबत हृदय-परिवर्तन झाले. इतरांचे राहोच, आजचे रा. स्व. संघाचे कठोर नि कडवट टीकाकार मधु लिमयेदेखील तेव्हा गहिवरले ! जनता पक्षातील अनेक जनसंघेतर पुढाऱ्यांनी सार्वत्रिक निवडणूकप्रचारात इंदिरा गांधींच्या संघविरोधी भाषणांचा समाचार घेताना छातीठोकपणे सांगितले की तो संघ आता उरला नाही. संघात खूपच बदल झालाय. कशावरून ? तर संघाचे दरवाजे भारतनिष्ठ मुसलमानांना नि ख्रिश्चनांना उघडे झाले आहेत-होत आहेत, ह्यावरून ! म्हणजे औषधापुरता तरी एखादा मुसलमान

व्यासपीठावर दिसणे ही 'सेक्युलॅरिझम'ची निशाणी ! काहींनी अलीकडेच सुचविले आहे की 'हिंदु राष्ट्रीयत्व' ही उपाधी रा. स्व. संघाने काढून टाकावी, म्हणजे संघ सर्वधर्मसमभावी होईल !. . . आमची 'सेक्युलॅरिझम'ची कल्पना अशी उथळ नि तांत्रिक नसल्यामुळे आम्हाला ह्या राजकारणी महाभागांच्या सूचनांविषयी हसू येते.

## सोय पाहिली-प्रश्न काढला

आणि आणीबाणीच्या काळात रा. स्व. संघाला 'देशभक्ती'ची सर्टिफिकिटे देणारेच जेव्हा 'रा. स्व. संघाशी दुवा असणे (Link असणे) हे महान पाप आहे' असे जनता पक्षाच्या स्थापनेनंतर सुमारे दीड वर्षानंतर ओरडू लागले, तेव्हा तर ह्या मंडळींच्या हास्यास्पदतेचा कळस झाला. जनता-पक्षांतर्गत जनसंघीय हा रा. स्व. संघाचा सदस्य असता कामा नये, ही मागणी पक्ष-बांधणीच्या दृष्टीने जरूर विचारात घेण्याजोगती होती. पण ती प्रारंभीच— जनता पक्ष आकारास येत असतानाच— करावयास हवी होती. ती तशी करण्यात आली नाही. इतकेच नव्हे, तर हा द्विसदस्यत्वाचा प्रश्न जेव्हा प्रारंभी उपस्थित करण्यात आला, तेव्हा राजनारायण ह्यांनीच तो पुढे ढकलला, असे चंद्रशेखरांचे म्हणणे आहे. चंद्रशेखर ह्यांनी अलीकडेच असेही जाहीर केले होते की जनता पक्ष फोडण्यासाठीच आता द्विसदस्यत्वाच्या राईचा पर्वत ही तथाकथित पुरोगामी मंडळी करीत आहेत. माजी जनसंघीयांच्या आर. एस. एस. संबंधाबाबत श्री. मधु लिमये नि राजनारायण इत्यादींनी एवढा गहजब करण्याबद्दल अच्युतराव पटवर्धनांनीदेखील आपली नापसंती अलीकडेच व्यक्त केली होती. ह्याच महिन्याच्या ९ तारखेला प्रसिद्ध झालेल्या ह्या लेखात रा. स्व. संघीयांच्या शिस्तशीर देशभक्तीचे कौतुक करून, अच्युतराव पटवर्धनांनी त्यांना सामाजिक सुधारणेचे— विशेषतः दलितवर्गीयांच्या सेवेचे— अग्रदूत बनण्याचा उपदेश केला आहे. पण राजकारणी महाभाग करतात तसे आरोप केलेले नाहीत. . . परंतु लोकनायक जयप्रकाश काय अथवा अच्युतराव पटवर्धन काय, खुर्चीवादापासून शतयोजने दूर ! त्यांना विचारतो कोण ? जनता पक्षांतर्गत सत्तासंघर्षासाठी 'द्विसदस्यत्वा'चा प्रश्न जेव्हा सोयीस्कर वाटला तेव्हा राजनारायणादी मंडळींनी तो उकरून काढला, भारतीय लोकदलाचे सदस्य आणि काही भडक माथ्याचे समाजवादी (मधु दंडवते इत्यादी विचारी समाजवादी नव्हे) ह्यांनी जनता-पक्षाच्या साऱ्या अपयशाचे खापर ह्या द्विसदस्यत्वावरच फोडले. आपले नाकर्तेपण नि बेशिस्त बंडखोरी झाकण्यासाठी रा. स्व. संघाला बलिदानाचा बकरा (स्केप गोट) करणे त्यांना सोयीचे होते. खरी गोष्ट अगदी उघड आहे की रा. स्व. संघाची फौज पाठीशी असली तर पक्षांतर्गत निवडणुकांत जनसंघ गटच प्रभुत्व गाजवील नि अखेर जनता सरकारही तोच कबजात घेईल हीच भीती, ह्या

गदारोळामागे होती. आणि म्हणूनच इंदिरा गांधींचा फॅसिझम परवडला पण आर. एस. एस.चा फॅसिझम नको, असे ही मंडळी म्हणू लागली. एके काळी आर. एस. एस.च्या मांडीला मांडी लावून, एकाच आघाडीच्या पंक्तीत जेवलेले हे भांडकुदळ 'भाईबंद' आर. एस. एस. वर बंदी घालण्याची भाषा बोलू लागले. जनता-पक्षातील हे राजकीय चातुर्वर्ण्य होते ! महाराची सावलीही अंगावर पडावयास नको असे म्हणणाऱ्या सनातनी भटजी नि हे जनता पक्षीय आर. एस. एस. विरोधक ह्यांच्यात तत्त्वतः काहीच फरक उरला नव्हता आणि नाही !

### फुटीर-फर्जंद परतले नाहीत

पण जनसंघ-खासदारांनीही 'रा. स्व. संघ' संबंध हा आपला 'प्रेस्टिज पॉइंट' (प्रतिष्ठेचा प्रश्न) केला. त्यांचा दावा असा की, 'आर. एस. एस. ही सांस्कृतिक संघटना आहे. राजकीय वा जातीय पक्ष नव्हे. रा. स्व. संघाशी संबंध असलेले अटलबिहारी वाजपेयी अथवा लालकृष्ण अडवानी यांचे एक तरी 'अन्-सेक्यूलर' जातीय कृत्य दाखवून द्या. आर. एस. एस. नि माजी जनसंघ ह्या उभयतांचे सदस्य असलेल्या जनता पक्षीय सदस्यांनी जातीय कृत्ये केलीच असतील, तर ती साधार सिद्ध करा. नेहरूंचेच परराष्ट्र धोरण पुढे चालविणाऱ्या नि इस्लामी अरब राष्ट्रांना मोरारजींहून अधिक जवळचे स्नेही वाटणाऱ्या अटलजींचेच धोरण पूर्वाश्रमीचे जनसंघीय चालवत आहेत. मग उगाच गदारोळ का ?' असे ते विचारत राहिले. पण असा न संपणारा वाद करीत राहण्यापेक्षा जनता-पक्ष-अभंगत्वासाठी तसेच फुटीरांना निमित्त न देण्याच्या व्यावहारिक शहाणपणासाठी रा. स्व. संघाचे सदस्यत्व त्यांनी सोडण्यास काय हरकत होती ? त्यांच्याशिवाय रा. स्व. संघाचे 'सांस्कृतिक सेवाकार्य' काय मोठेसे अडणार होते, अडणार आहे ?– अखेर जेव्हा जनता-पक्षातील बंडखोरी शिगेला पोहोचली नि 'बुडत्या जहाजातील निष्ठाशून्य खलाशी' बाहेर पडून तो पक्ष सत्ताभ्रष्ट होण्याची आफत ओढवली तेव्हाच 'जो जनसंघाचा खासदार-आमदार-पदाधिकारी असणार नाही' ह्या कलमाला (फॉर्म्युल्याला) पूर्वाश्रमी जनसंघीयांनी अनुकूलता दाखविली. पण ज्यांनी आधीच इंदिरा गांधींशी संगनमत करण्यापर्यंत मजल मारली होती ते फुटीर-फर्जंद माघारी वळण्यास तयार नव्हते. 'द्विसदस्यत्व' सोडण्याचा हा निर्णय, पूर ओसरून गेल्यानंतर पूल उभारण्यासारखा अथवा आग लागल्यावर विहीर खणण्यासारखा ठरला !

### नवे उपकलम

पण आता (हातातून सत्ता गेल्यावरदेखील) ह्याच दिशेने जनता पक्षाने पाऊल

उचलून सर्वधर्मसमभाव न मानणाऱ्यांना जनता पक्षाचे दरवाजे बंद केले आहेत हे बरे झाले. जनता पक्षाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीने आपल्या घटनेच्या पाचव्या कलमाला नवे उपकलम जोडले आहे की— 'ज्याचा 'धर्माधिष्ठित राज्य' ह्या कल्पनेवर विश्वास आहे अशा कोणत्याही माणसाला वा संस्थेला जनता पक्षाचे सदस्यत्व दिले जाणार नाही. मग ते धर्माधिष्ठित राज्य इस्लामी असो वा हिंदू असो.' — पण ह्या कलमात रा. स्व. संघाचा अथवा कोणत्याही संघटनेचा नामोल्लेख नाही. तरीही ह्या उपकलमाचा रोख रा. स्व. संघाच्या स्वयंसेवकांवर आहे असे मानले जात आहे. ठीक आहे. त्यायोगे जनता-पक्षातील 'द्विसदस्यत्वाचा प्रश्न कायमचा मिटून, तो पक्ष कलहमुक्त होणार असेल, तर ती इतरांनाही आनंदाचीच गोष्ट वाटेल. . . पण जर रा. स्व. संघाने आम्ही धर्माधिष्ठित राज्याचे पुरस्कर्ते नाहीच असे जाहीर केले तर? 'हिंदू' ही आमच्या दृष्टीने जातीय वा धार्मिक संकल्पना नसून, 'जो जो भारतनिष्ठ तो तो हिंदू' अशी राष्ट्रीय कल्पना आहे, ही सावरकरवादी भूमिका मांडली तर? आजही तुरळक का होईना पण 'हिंदू ख्रिश्चन', 'हिंदू मुसलमान', 'हिंदू शिख', 'हिंदू बौद्ध' संघात आहेत आणि सर्व धर्माच्या भारतीय संस्कृतिनिष्ठांना आमची दारे उघडी आहेत असे म्हटले तर?— ह्या प्रश्नांना उपर्युक्त उपकलम काय उत्तर देणार?

□

## ॥ ५ ॥ पत्त्याचा बंगला कोसळला !

*२१ ऑगस्ट १९७९*

'दिल्लीशाही खुर्चीचा खेळ' हे उपहासदर्शक नाव आमच्या सत्तालोलुप राजकारण्यांच्या पुण्याईने ज्याला प्राप्त झाले, त्या सत्तांतर नाटकाचा पहिला अंक फुटीरतेच्या नांदीने सुरू होऊन, श्री. मोरारजी देसाईप्रणीत जनता सरकारच्या पाडावाने समाप्त झाला होता. आणि दुसरा अंक दि. २८ जुलै रोजी चौधरी चरणसिंगांच्या शपथविधीने सुरू झाला. त्या वेळी झाले-गेलेले वैतागजनक नि तत्त्वशून्य प्रकार विसरून, अराजक-सदृश परिस्थितीच्या खाईत लोटणारे अस्थैर्य दूर व्हावे ह्या हेतूने, आम्ही चरणसिंगांच्या संमिश्र सरकारचे अभीष्टचिंतन केले होते. 'खुर्चीच्या खेळा'चा हा दुसरा अंक तरी 'वैताग'रसापासून मुक्त व्हावा, कोणाच्याही आरवण्याने का होईना राजकीय-आर्थिक सुस्थितीचा सूर्य उगवावा नि देशातील नैराश्याचा अंधार दूर व्हावा, अशीच सामान्य जनतेप्रमाणे आमची मनोधारणा होती— आणि आहे. पण नुसत्या सदिच्छेने— त्यातही तुम्हा-आम्हा दुर्बलांच्या सदिच्छेने- काय होते ? भारतीय राजकीय क्षेत्रच इतके दोषसंकुल झाले आहे, तत्त्वनिष्ठ ध्येयधोरणांचा इतका ऱ्हास झाला आहे आणि बडीबडी धेंडे वैयक्तिक स्वार्थाला तत्त्वज्ञानाचा मुलामा फासण्यात इतकी तरबेज झाली आहेत की, येथे कशाचाही भरोसा देता येत नाही. म्हणूनच, उघड-उघड संधिसाधू फुटीरता नि सत्तालंपट हातमिळवणी ह्या दोन वाळूच्या खांबांवर उभे राहिलेले चरणसिंग सरकार किती काळ टिकते ह्याविषयी शंकाच होती. इंदिरा गांधींनी चरणसिंगांच्या चरणांखालील सतरंजी ओढून घेताच हे सरकार कोसळेल, अशी शंका आम्ही त्याच वेळी व्यक्त केली होती.

## 'काळजीवाहूं'चा खटाटोप !

अर्थात, चरणसिंग नि त्यांचे साथीदार ह्यांनाही ह्याची कल्पना होतीच. म्हणून तर हे सरकार स्वतःच्या अस्तित्वाची 'काळजी वाहणारे' ह्या अर्थाने पहिल्या मंचकारोहणापासूनच 'काळजीवाहू' बनले होते. अवघे चोवीस दिवस काटेरी मुकुट मस्तकावर मिरवू शकलेले हे सरकार ! त्याने आपली मुळातच कमकुवत असलेली बाजू भक्कम करण्यासाठी जे काही करता येणे शक्य होते ते केले. ज्यांना स्व-पक्षात विरोध आहे अशांनाही मंत्रिमंडळात घेतले, खन्नांसारख्या बाणेदार न्यायमूर्तींना मंत्रिमंडळात गोवण्याचा प्रयत्न केला, अण्णाद्रमुकचा फौजफाटा मिळावा म्हणून अगदी चार दिवसांपूर्वी त्या गटाचेही दोन मंत्री दावणीस बांधले ! आपण 'पुरोगामी' आहोत, कामगार कर्मचाऱ्यांचे कैवारी आहोत, हे शाबीत करून, जनतेचा असंतोष शमविण्यासाठी रिझर्व बँकेतील आस्ते काम नि सी.डी. एस. हप्त्याचे वितरण ह्याबाबतचे अध्यादेश रद्द केले. कम्युनिस्ट मार्क्सवादी इत्यादी डाव्यांचे ह्या वटहुकूम-रद्दीने समाधान करण्याचा प्रयत्न केला. 'अणुबाँबला अणुबॉम्बनेच उत्तर' अशी लोकप्रिय घोषणाही चौधरी-चरणसिंगांनी केली ! परंतु एवढे पुरेसे नव्हते. हे सरकार टिकण्यासाठी इंदिरा काँग्रेसचा भक्कम पाठिंबा जरुरी असल्यामुळे चरणदूत राजनारायण ह्यांनी संजय गांधींशी गुप्त मसलत चालूच ठेवली, आणि इंदिरा गांधींमध्ये खूपच परिवर्तन झाल्याचे प्रमाणपत्रही बहाल करण्यात आले ! इतकेच नव्हे, तर 'फ्रेंच पेट्रोलियम कंपनी'च्या संदर्भातील भ्रष्टाचाराबाबतचा इंदिरा गांधींवरील खटलाही मागे घेण्यात आला !

## लाजिरवाणे

पण हा सारा पत्त्यांचा बंगला इंदिरा गांधींच्या एका फुंकरीने खाली कोसळला ! विश्वासदर्शक ठरावाला तोंड देण्याचे धैर्य न दाखवता— हरत असतानाही आपली तात्त्विक भूमिका खंबीरपणे मांडून वाग्‌युद्ध न छेडता— चौधरी-चरणसिंगांनी लोकसभा-भवनाऐवजी राष्ट्रपती-भवनाकडे धाव घेऊन आपला मंत्रिमंडळासह राजीनामा दिला !. . . ही दोन्ही सरकारे (मुरारजींचे नि चरणसिंगांचे) खाली पाडण्याचे श्रेय इंदिरा काँग्रेसने घेतले. ह्या राजकीय पत्त्याच्या खेळात इंदिराजी 'हुकमाची राणी' ठरल्या ! आणि चरणसिंगादी मंडळी 'सत्तेचे गुलाम !' इंदिरा गांधींवर न्यूरेम्बर्ग पद्धतीची न्यायालयीन कारवाई व्हावी, अशी एके काळी सिंहगर्जना करणारे चरणसिंग आणि त्यांचे राजनारायणादी हस्तक ग्रामसिंहाप्रमाणे इंदिराचरणी लोळण घेते झाले, ह्याहून इंदिराजींच्या डावपेच-कुशलतेचे आणि ह्या शरणसिंगांच्या सत्ता-लाचारीचे लाजिरवाणे

दृश्य ते कोणते ?. . . आणि ही लाचारीही फलद्रूप झाली नाही ती नाहीच. कारण, इंदिराजींनी ह्या जनता-फुटिरांना जो पाठिंबा सरकार बनविताना दिला होता, तो त्या दयाळू देवता म्हणून नव्हे ! जनता पक्षाला नि मोरारजींना फजित करण्यासाठीच तो पाठिंबा होता. आणि अशाच प्रकारच्या राजकारणी हिशेबाने, ह्या संयुक्त सरकारला हास्यास्पद करण्यासाठी त्यांनी पाठिंबा काढून घेतला आहे. जे स्वतःच्या बळावर उभे राहत नाहीत आणि भिक्षेची झोळी पसरतात, त्यांच्या नशिबी अखेर अशीच मानखंडना लिहिलेली असते !

*लत्ताच भिकाऱ्यांच्या*
*लिहिली सदा कपाळी !*

**बाबूजींना बोलवा**

चरणसिंग तर फजित झालेच, पण 'असंगाशी संग' ह्या न्यायाने स्वर्णसिंग काँग्रेसमधील जुन्या जाणत्या अनुभवी मंडळींचीदेखील केविलवाणी अवस्था झाली आहे. फुटरोद्योग-शिरोमणी चरणसिंगांच्या प्रश्नावरून खुद्द स्वर्णसिंग-काँग्रेसमध्येदेखील वादंग निर्माण झाले, कटुता निर्माण झाली. पण एवढे करूनच चरणसिंगांचा आत्माराम थंडगार झालेला दिसत नाही ! ह्या महाशयांनी जाताजाता राष्ट्रपतींना मध्यावधी निवडणुकांचा अनाहूत सल्ला दिला. जो स्वतः वस्तुतः अल्पमतात असूनही, आपले तथाकथित बहुमत लोकसभेत सिद्ध न करता चोवीस दिवस पंतप्रधानकीची छत्रचामरे मिरविता झाला, त्याला राष्ट्रपतींना कोणताही सल्ला देण्याचा नैतिक अधिकारच काय ? विधवेने कुंकवाची उठाठेव करावी, असेच हे हास्यास्पद कृत्य नाही काय ? परंतु चरणसिंगांनी काहीही सल्ला दिला, तरी राष्ट्रपतींनी आपला निर्णय विचारपूर्वकच घोषित केला पाहिजे. लोकसभेतील सर्वांत मोठी सदस्यसंख्या असलेल्या जनता पक्षाच्या नेत्याला— श्री. जगजीवनराम ह्यांना— बहुमताने मंत्रिमंडळ बनविण्याची संधी राष्ट्रपतींनी दिली पाहिजे. ही संधी देऊनही बाबूजींचे सरकार आकारास येऊ शकत नाही वा स्थिर राहू शकत नाही, ह्याची निर्विवाद खात्री पटल्यावरच मध्यावधी निवडणुकांचा पर्याय देशापुढे ठेवणे इष्ट होईल. मध्यावधी निवडणूक हा अखेरचा उपाय आहे. तो अगदी अपरिहार्य असेल तरच अवलंबिला पाहिजे. ह्या निवडणुकांनी देशावर अफाट आर्थिक बोजा पडणार आहे. सध्याचा 'मतामतांचा गलबला' शांत होऊन विविध पक्षांची ध्येयधोरणे अगदी सुस्पष्ट झाल्याशिवाय मध्यावधी निवडणुकांचे उद्दिष्टही सफल होणार नाही. म्हणूनच आम्हाला आशा आहे की, राष्ट्रपती श्री. नीलम संजीव रेड्डी कोणत्याही राजकीय दडपणाला बळी न पडता जगजीवनराम ह्यांना नवे स्थिर सरकार बनविण्यासाठी पाचारण करतील.

□

॥ ६ ॥

# राजनारायण वि. जोहर ?

*२ सप्टेंबर १९७९*

नाटक-सिनेमांतील नट नि राजकीय तमाशातील खट (म्हणजे आपले लीडर-लोक हो !) ह्यांच्यात खूपच साम्य असते. रंगभूमीवरील वा सिनेमासेटवरील, 'काळोख-योजने'चे किंवा धूसर प्रकाशाचे काही क्षण वगळता, नट नेहमी प्रकाशात असतो आणि प्रसिद्धीच्या प्रकाशझोताची तर त्याला तीव्र तमन्ना असते ! नेत्याचे तरी काय ? कधी निवडणुकीत आपटी खाल्ली वा (त्रिदंडी) राजकारण संन्यासाची पाळी आली म्हणजे नेता तात्पुरता अंधारात पडतो, पण येनकेन प्रकारेण तो प्रसिद्धीच्या नि सत्तेच्या प्रकाशात येतोच ! वृत्तपत्रांत आपल्या सुमार वा रटाळ कामाचीदेखील किमान 'कॉलम'भर तरी प्रशंसा यावी (आणि तीही आपल्या रुबाबदार फोटोसह !) अशी नटाची इच्छाच नव्हे, तर कधी कधी खटपटही असते. आमदार-नामदार-खासदार इत्यादींची इच्छा अशाच प्रकारची असते. आपल्या रटाळ, रूक्ष व्याख्यानांचे नि पत्रकार परिषदांचे सविस्तर वृत्तान्त—

> *"सुंदर ते ध्यान, देताना भाषण,*
> *अथवा पाषाण— बसविता*

अशा फोटोंसह छापून यावेत, असाच राजकारणी मंडळींचा खटाटोप असतो ! म्हणूनच नट काय किंवा नेता काय, पत्रकारांशी मैत्रीचे संबंध ठेवून असतो. पण जर का त्याने विरुद्ध टीका केली अथवा प्रसिद्धी नाही दिली, तर तो त्या पत्रकाराला 'बेअक्कल— बायस्ड, बास्टर्ड' अशा शिव्या द्यायलाही मागेपुढे पाहत नाही— (चुकले, जरा मागे-पुढे पाहूनच तो पत्रकारांवर टीका करतो !) वृत्तपत्रांच्या मालकांकडे कागाळ्या करून पत्रकारांना

वठणीवर आणू पाहणारे जसे काही 'प्रेशर' बहाद्दर नट असतात, तसेच नेतेही असतात. . . नट काय अथवा नेता काय, दोघेही तात्पुरत्या भूमिका घेऊन वावरतात, भूमिका बदलतातदेखील ! दोघेही 'मेकप'च्या मायावी दुनियेत वावरत असतात. खोटे हसणे, खोटे रडणे इत्यादी खोटेपणांत– अभिनयकलेत– निपुण असल्याखेरीज उभयतांचा निभाव लागत नाही. दोघांनाही हशा नि टाळ्या घेण्याचे व्यसन असते. जेवढी गर्दी अधिक तेवढा त्यांना अधिक चेव चढतो !

## जोहर ह्यांचे पत्रक

नटांचे व नेत्यांचे हे साम्य लक्षात घेतल्यास राजकारण्यांना नट व्हावेसे वाटणे अथवा नटाला राजकारणात प्रवेश करून अधिक 'ग्लॅमर' मिळविण्याची हाव सुटणे, अस्वाभाविक नव्हे. नाट्याचार्य देवल त्या जुन्या काळी म्हणाले खरे की, 'नट तो होईल का नृप कधी ?' पण ह्या नव्या लोकशाही जमान्याने त्यांची शंका खोटी ठरविली आहे. मुख्यमंत्री एम.जी. रामचंद्रन् ह्यांनी नट राज्यकर्ता होऊ शकतो, राजकीय पुढारी होऊ शकतो, हे सिद्ध केले आहे. मग हिंदी चित्रपटसृष्टीतील सुप्रसिद्ध विनोदमूर्ती आय. एस. जोहर ह्यांना निवडणूक-युद्धात उतरून राजनारायणांवर मात करण्याची तमन्ना बेताब करू लागली, तर नवल कसले ? त्यांनी एका (विनोदी) पत्रकात म्हटले आहे, 'आगामी मध्यावधी निवडणुकीत जनता-एस.चे अध्यक्ष श्री. राजनारायण यांच्याविरुद्ध कोणत्याही मतदारसंघातून आपण उभे राहू इच्छितो ! श्री. राजनारायण ह्यांनी भारतीय राजकारणाचे एका महान विनोदात रूपांतर केले आहे. म्हणूनच त्यांच्या मतदारसंघाला 'विदूषक-मतदारसंघ' असे नाव देणे इष्ट होईल ! मी त्या मतदारसंघातून नक्कीच निवडून येईन. दाढी वाढवणे, दाढी काढणे इत्यादी विदुषकी चाळे मी अधिक चांगले करू शकेन ! दाढी नि चमनगोटाच काय पण 'बगलके बाल'ही मी साफ करीन !. . .'

## खल-विदूषक !

आय. एस. जोहर ह्यांची ही जिद्द कौतुकास्पद नाही, असे कोण म्हणेल ? पण आचरटाचार्य राजनारायणांवर ते मात करू शकतील, ही कल्पना फोल आहे. एकटे जोहरच नव्हे, तर फिल्मी दुनियेतील जॉनी वॉकर, मेहमूद, भगवान, मुक्री, असरानी, राजेंद्रनाथ, पेण्टल इत्यादी डझनभर 'कॉमिक' नट मैदानात उतरले, तरी राजनारायणांचा पराभव करणे अशक्य आहे. का ? तर राजनारायण हे नुसते विदूषक नाहीत-केवळ चक्रमपणे वागून बोलून 'हसविण्याचा धंदा' करणारे नाहीत ! नुसता 'हसविण्याचा धंदा' एवढेच क्वॉलिफिकेशन पुरे असते, तर हे हिंदी चित्रपटातील विदूषक कशाला हवे होते ?

खुद्द यशवंतराव चव्हाणांनी ज्यांना चिरडीवर येऊन 'विदूषक' ही पदवी दिली ते आपले लाडके साहित्य-पुरुषोत्तम पु.ल. देशपांडे राजनारायणांना चारी मोंढे चीत करण्यास पुरेसे होते. पण महत्त्वाची गोष्ट ही आहे की, श्री. राजनारायण हे निर्भेळ विदूषक नसून 'खल-विदूषक' आहेत, कॉमिक व्हिलन आहेत ! जनता पक्षाच्या पंचरंगी लाक्षागृहाला दुहीची आग लावू शकणारे, बड्या बड्या पुढाऱ्यांचे चारित्र्यहनन करू शकणारे, राष्ट्रपतिभवनाला घेरावो घालण्याची कुटिल योजना आखू शकणारे, चरणसिंगाचे सरकार येन केन प्रकारे स्थापन करण्यासाठी संजय गांधींना गुपचूप मिठ्या मारणारे, इंदिरा गांधी आता खूपच बदलल्या असल्याची भलावण करणारे, जग्वारखरेदीतील तथाकथित भ्रष्टाचाराचे पिस्तूल रोखू शकणारे, अलीगढच्या जातीय दंगलीत तेल ओतून दुसऱ्यांच्या नावाने शंख करणारे राजनारायण वरवर विनोदी भासले, तरी अंतर्यामी खलनायक आहेत ! म्हणूनच ह्या नट लोकांना त्यांच्याशी सामना करणे मुश्किल आहे. निदान अभिनयाच्या बाबतीत तरी 'व्हिलन' (खलपुरुष) नि 'बफून' (विदुषक) ह्या दोन्ही भूमिका उत्तम करू शकणारे ओम प्रकाश, धुमाळ, प्राण नि जीवन हेच त्यांच्याविरुद्ध थोडा तरी टिकाव धरू शकतील— त्यातही मूळचा 'व्हिलन'च्या कामाविषयी विख्यात असलेला आणि व्हिक्टोरिया नं. २०३ मध्ये लाजवाब विनोदी भूमिका करणारा प्राणच. . . छे, छे. तोही बोलून चालून नटच ! राजनारायणांची प्रत्यक्ष जीवनातील 'कॉमिक व्हिलन'ची भूमिका कोणालाच जुळणार नसल्याने, 'प्राण'चेही प्राण निवडणूक-युद्धात कंठाशी येतील !

— कारण राजनारायणांचे साम्य चक्रम, आचरट, विनोदी पण मुख्यतः कपट-कारस्थानी असलेल्या मृच्छकटिकांतील 'शकारा'शी आहे ! म्हणूनच आम्हास वाटते की आय. एस. जोहर ह्यांनी विनोदातही वृथा दर्पोक्ती करू नये !

□

## ॥७॥ सिने-सिताऱ्यांचा पक्ष !

*२३ सप्टेंबर १९७९*

जेव्हा राजकीय क्षेत्रात निर्नायकी होते, 'मता-मतांचा गलबला, कोणी न पुसे कोणाला' अशी शोचनीय अवस्था निर्माण होते, त्या वेळी कोण पुढे सरसावेल ह्याचा काही नेम नसतो. मोगल सल्तनतीच्या अखेरच्या दिवसांत हे असे झाले होते, उत्तरपेशवाईत असेच घडले होते. जेव्हा कर्तव्यभ्रष्ट नेतृत्व खुर्चीवादाच्या हीन चिखलात लोळण घेते, क्षुद्र वैयक्तिक स्वार्थाच्या शेणात आकांक्षाचे बंगले बांधते तेव्हा दुसरे काय होणार? नको नको ती माणसे राजकारणाच्या क्षेत्रात उतरतात. आपल्या स्वाभाविक मर्यादा ओलांडून नट-नर्तक नेते बनू पाहतात. सध्या आपल्या भारत देशात हे असेच काहीसे घडू पाहत आहे. — कोणीही गोमाजी-तिमाजी जर राजकारणावर बोलू शकतो, कोणीही झेड. पी. पातळीवरचा भडकसिंग जर 'सोशॅलिझम डेमॉक्रसी - सेक्युलॅरिझम'वर (ह्या शब्दांचे स्पेलिंग ठाऊक नसतानादेखील—) लेक्चरे झोडू धजतो, तर आमच्या फिल्मी फर्जंदांनीच काय घोडे मारले? त्यांनाही ह्या निवडणूक-मोसमात जर कंठ फुटला आणि त्यांनी आपल्या व्यवसायाच्या वतीने एक 'राष्ट्रीय पार्टी' स्थापन केली तर काय बिघडले? माळरानावर वाळवी लागल्याने महावृक्ष कोसळून पडतात— (आणि नवीन महावृक्ष निर्माण होण्याची शक्यताच दिसत नाही) तेव्हा—

*'निरस्त पादपे देशे*
*एरण्डोऽपि द्रुमायते'*

ह्या न्यायाने एरण्डाची झाडेही माना उंचावू लागली, तर आश्चर्य कसले? सवंग लोकप्रियता, प्रसिद्धिलोलुपता इत्यादी गुणांत राजकीय नेत्यांशी खूपच साम्य असलेल्या

आमच्या फिल्मी चांदोबांनी, येत्या मुदतपूर्व निवडणुकांसाठी, आपली अखिल भारतीय पार्टी स्थापन केली, हे आजच्या जमान्याला शोभेसेच आहे.

ह्या फिल्मी-सिताऱ्यांच्या पक्षात सर्वच फिल्मी मंडळी समाविष्ट नाहीत. रामानंद सागर, ताराचंद बडजात्या, श्रीराम बोहरा, गुलशन, राय, आय, एस. जोहर, आत्माराम, प्रकाश मेहरा, अमृत खन्ना, विजय आनंद, देव आनंद इत्यादी अनेक मंडळी ह्या पार्टीत आली असली, तरी कैक नामवंत फिल्मी 'हिरो' नि 'हिरॉइनी' ह्या पार्टीच्या झेंड्याखाली अद्यापि जमा झाल्याचे दिसत नाही. उदाहरणार्थ, तो अमिताभ बच्चन कोठे आहे ? ती हेमामालिनी कोठे आहे ? ती झीनत अमान कोठे आहे ? परंतु कोणी कुठेही असो, पार्टी तर स्थापन झाली. 'पार्टी म्हटली की दारूच्या बाटल्या' हे फिल्मी दुनियेत ठरलेलेच असते ! पण ही निवडणूक पार्टी ! तिला कैफ आणणाऱ्या मदिरेपेक्षा धुंदी चढविणारा 'मॅनिफेस्टो' (जाहीरनामा) पाहिजे ! साहजिकच ह्या सितारा-पक्षाचा जाहीरनामाही फौरन तयार झालाच. असा तसा जाहीरनामा नव्हे, चांगला १९ कलमी जाहीरनामा. हिंदी सिनेमांत जसा सर्व प्रकारचा— अशक्य कोटीतलासुद्धा — मालमसाला खच्चून भरलेला असतो, तसाच ह्या जाहीरनाम्यातही तमाम पब्लिकला दिलासा देणारा आश्वासनांचा मसाला भरलेला आहे. 'बोलोजी तुम क्या क्या खरीदोगे ?' काय पाहिजे ते बोला. कर-आकारणीमध्ये सुधारणा पाहिजे ? चलनवाढीला आळा बसायला पाहिजे ? काळ्या पैशांचा ठीक बंदोबस्त व्हायला पाहिजे ? प्रसार-माध्यमांना स्वातंत्र्य पाहिजे ? गरिबांना घरे हवीत ? मुबलक धान्य हवे ? पाटबंधारे-कालवे, विद्युत ऊर्जा, बेकारी-निर्मूलन हे सारे सारे हवे ना ? आहे, हे सारे काही ह्या सितारा-पक्षाच्या जाहीरनाम्यात तरी आहे !

असा हा १४ पानी भारदस्त जाहीरनामा आलिशान ताजमहाल हॉटेलातील पत्रकार-परिषदेत जेव्हा जाहीर झाला, तेव्हा आम्ही शब्दशूर पत्रकारदेखील थक्क झालो. जणू काही सारे अर्थशास्त्र ह्या फिल्मी पुढाऱ्यांपुढे एखाद्या नवागत 'एक्स्ट्रॉ'प्रमाणे हात जोडून शय्यासंगतीसाठी सिद्ध आहेसे वाटले ! तथापि, एका पत्रकाराने धीर धरून जाहीरनाम्यांतील चूक दाखविली. त्यात ग्रामीण भागाविषयी विवेचन करताना म्हटले होते, 'भारतात ३०० कोटी गुरेढोरे आहेत !' हा आकडा '३० कोटी' असा असला पाहिजे, हे एका पत्रकाराने लक्षात आणून देताच, ताराचंद बडजात्या म्हणाले, "अजी, एक झीरोसे क्या फर्क पडता है !" . . . खरेच आहे ! निवडणुकीच्या जाहीरनाम्यात एक शून्य कमी असले काय अथवा अधिक असले काय ? एकूण साराच मामला शून्याकार नसतो काय ? प्रत्येक खेडुताच्या घरापासून ५ मिनिटांच्या अंतरावर पोस्ट-ऑफिस उघडण्याचे, 'पौष्टिक' आश्वासनही ह्या अ. भा. फिल्मी पक्षाने दिले आहे ! फक्त एकच आश्वासन कटाक्षाने टाळले आहे. 'सिनेमांत काम करण्याबाबत आपण ऑनमनी म्हणून— काळा

पैसा म्हणून — लक्षावधी रुपये घेणार नाही !' हे आश्वासन ह्या पार्टीच्या कोणीही नेत्याने दिलेले नाही !

— राजनारायणांचे विदुषकी बोलणे नि वागणे कोणीही गंभीरपणे मनावर घेत नाहीत, त्याचप्रमाणे ह्या फिल्मी-पक्षाचीही गांभीर्याने दखल घेतली जाणार नाही, हे उघड आहे. पण अशा पक्षाच्या स्थापनेची आवश्यकता का वाटली, हे सांगताना 'मॅटिनी हीरो' देव आनंद ह्यांनी जी व्यथा व्यक्त केली, तिच्याशी सर्वसामान्य जनता सहमत होईल, यात शंका नाही. देव आनंद म्हणाले, "राजकारणी पुढाऱ्यांनी जी विशिष्ट उद्वेगजनक भावना निर्माण केली आहे, तिच्यातूनच हा आमचा पक्ष उदयाला आला आहे !" अगदी खरेच आहे हे. धंदेवाईक राजकारण्यांनी आपल्या बेबंद स्वार्थी वागण्याने आपली विश्वासार्हता तर गमावलीच आहे, पण वाईट गोष्ट ही की, त्यांनी सामान्य जनतेत भयानक वैफल्य निर्माण केले आहे. सिनेमावाल्यांचा पक्ष हे वैफल्य दूर करू शकणार नाही, हें सांगणे नलगे; पण राजकीय नेत्यांनी घातलेला गलिच्छ गोंधळ चव्हाट्यावर मांडण्याचे काम तो प्रभावीपणे करू शकेल. लोकांचे मनोरंजन करणारे हे लोक, लोकांचे दुःख निवडणूक चव्हाट्यावर खचित मांडू शकतील. आणि हेही नसे थोडके !

□

॥ ८ ॥

# चारित्र्यवंतांचा शोध !

*३० सप्टेंबर १९७९*

ही प्राचीन काळची, एका अंधेरनगरीची गोष्ट आहे. एकदा एक प्रवासी ह्या अंधेरनगरीला आला. काही दिवस ह्या नगरीत मुक्काम करून तिच्यातील प्रेक्षणीय स्थळे पाहावीत, जमल्यास काही व्यापार करावा, अशी त्याची मनीषा होती. नगराच्या वेशीपाशीच त्याला एक ब्राह्मण भेटला. तेव्हा त्या चौकस व्यापारी प्रवाशाने त्या ब्राह्मणाजवळ प्रस्तुत नगराविषयी चौकशी केली. त्याने विचारले, "हे ब्राह्मणा ! ह्या नगरीत महान असे काय आहे ?"

"महान ? फक्त ताड-वृक्षांचा समूह — जो ताडीचे दान साऱ्या नगराला करतो !" ब्राह्मणाने उत्तर दिले.

"बरे, दानशूर कोण आहे ? दाता कोण आहे ?"

"देण्याची क्रिया फक्त धोबीच करतात. सकाळी धुलाईसाठी नेलेले कपडे ते संध्याकाळी परत देतात !"

प्रवाशाने निराश न होता विचारले, "ह्या नगरात 'दक्ष' असलेले — तत्पर असलेले— लोक कोण आहेत ?"

"सर्वच दक्ष आहेत— पण. . . पण दुसऱ्याची संपत्ती नि बायको पळविण्याच्या बाबतीत !"

ब्राह्मणाच्या ह्या उत्तराने पुरेपूर वैतागलेल्या नि आश्चर्यचकित झालेल्या त्या प्रवाशाने विचारले "तर मग मित्रा, अशा ह्या भ्रष्टाचारी-दुराचारी नगरात तू जिवंत राहतोस तरी कसा ?"

ब्राह्मणाने तत्काळ उत्तर दिले, "विष-कीटक-न्यायाने ! मित्रा प्रवाशा, एखादा किडा विषाच्या पात्रात दुर्दैवाने पडतो. पण त्याला हळूहळू त्या विषाची सवय होते आणि तो त्या भांड्यात राहूनही कसाबसा जगतो. त्याचप्रमाणे मी ह्या अधःपतित नगरात जगतो आहे !"... ही कथा ज्या श्लोकात गुंफली आहे, तो संस्कृत श्लोक असा—

*'विप्रास्मिन् नगरे महान्*
*कथय कः ?'*
*'तालद्रुमाणां गणः !' ।*
*'को दाता ?' – 'रजको ददाति वसनं'*
*प्रातर्गृहीत्वा निशि !' ॥ '*
*'को दक्षः ?' – 'परदार-वित्त-हरणे*
*सर्वोऽपि दक्षो जनः !' ।*
*'कस्मात् जीवसि हे सखे ?'*
*विष-कृमि-न्यायेन जीवाम्यहम् ! ॥*

ही जुनी औपरोधिक कथा आज सहज आठवण्याचे कारण, सुप्रसिद्ध नि सत्प्रवृत्त उद्योगपती श्री. रामकृष्ण बजाज ह्यांचे एक आवाहन. रामकृष्ण बजाज या आवाहनात म्हणतात,

'ज्या उमेदवाराचे चारित्र्य स्वच्छ असेल त्यालाच मतदारांनी सक्रिय पाठिंबा द्यावा.' हे आवाहन तसे वादातीतच आहे. पण, वर वर्णन केलेल्या अंधेरनगरीसारखी (निदान काही अंशी तरी) देशाची स्थिती असताना, सर्वसामान्य नीतिप्रिय नागरिकांना 'चारित्र्यवान उमेदवार शोधून काढणे फार अवघड नाही काय? ह्या भ्रष्टाचाराच्या, वचनभंगाच्या, विश्वासघाताच्या जमान्यात निर्विवाद सच्छील नि स्वच्छ उमेदवार मिळणे फारच दुरापास्त आहे.

पूर्वीच्या काळी एखादे शहर अथवा एखादे संस्थानच काय ते 'अंधेरनगरी' बनले असेल. पण आता आपल्या 'आध्यात्मिक' वा 'समाजवादी' भारतात, असा एकही मुलूख नसेल की, ज्यात भ्रष्टाचार धिंगाणा घालीत नाही ! सदाचारी माणसे, कार्यकर्ते वा नेते नाहीतच, असे नाही. पण त्यांना कोण कितपत विचारतो ? अशी माणसे सत्ता-राजकारणात बाजूस सारली जातात. बहुतेक ठिकाणी सामाजिक नि राजकीय सत्तेची सूत्रे आहेत भ्रष्टाचाराने बरबटलेल्या बलदंड हातांत ! कोणत्याही युगात बावन्नकशी चारित्र्य-संपन्न माणसे 'चंदनं न वने वने' ह्या न्यायाने दुर्मिळच असतात हे खरे. पण ह्या युगाची शोकान्तिका ही आहे की, दुर्मिळ चारित्र्यवान माणसांची कदरही होत नाही ! विशेषतः आजच्या निवडणुका अत्यंत खर्चिक झालेल्या असल्याने (उमेदवारागणिक सरासरी दोन

लाख रुपये खर्च होत असल्यामुळे) उमेदवारांची निवड करताना हरेक पक्ष बहुश: त्यांची धन-संपन्नताच प्रथमत: लक्षात घेतो; आणि चारित्र्यसंपन्न माणसे प्राय: संपन्न नसल्यामुळे त्यांना तिकीट मिळणे मुश्किल होते. जे सूक्तासूक्त मार्गांनी पैसा उभा करू शकतात, त्यांनाच पक्षात विशेष महत्त्व प्राप्त होते. बरे, उमेदवार नुसता चारित्र्यसंपन्न असूनही भागत नाही. जातीयवादाच्या नावाने शंख करणारे पक्षश्रेष्ठी उमेदवाराची जातही लक्षात घेतातच. सारांश, आर्थिक सुस्थिती नि जात, ह्या दोन चाळण्यांतून चारित्र्यसंपन्न माणसे उमेदवार म्हणून उपलब्ध होणेच कठीण. म्हणूनच 'ज्यांचे चारित्र्य निष्कलंक असेल अशाच उमेदवाराला पाठिंबा द्या' हे आवाहन उच्चारणे जेवढे सोपे आहे, तेवढे ते आचरणे सोपे नाही ! निदान काही मतदारसंघ तर असे असतील की जेथे उडदामाजी काळे-गोरे निवडणे हे वाळूचे कण रगडून तेल काढण्याइतके, अथवा वांझेच्या पोरीला षंढापासून झालेल्या बहिऱ्या मुलाला मुक्याचे गायन ऐकविण्याइतके, अशक्य व्हावे ! !

श्री. रामकृष्ण बजाज ह्यांनी उद्योगपती नि व्यापारी ह्यांना तळमळीने केलेले आवाहनही प्रत्यक्ष आचरणात येणे सोपे नाही. श्री. बजाज ह्या आवाहनात उद्गारतात— "कोणत्याही पक्षाच्या निवडणूक फंडास बेकायदा मदत करणे नाकारले पाहिजे. ज्या पक्षांची लोकशाही नि संमिश्र अर्थव्यवस्था ह्यांच्याशी बांधिलकी असेल अशा पक्षांनाच सहकार्य, आणि तेही वैध मार्गांनी, करावे." तीन महिन्यांपूर्वीच दिल्ली येथे जो खुर्चीचा घृणास्पद खेळ झाला, त्यात बड्या बड्या नामदार-खासदारांच्या लोकशाही-निष्ठेचे वस्त्रहरण झाल्यामुळे, 'लोकशाहीशी बांधिलकी' हादेखील मोठा दुर्मिळ गुण होऊन बसला आहे, असेच कोणीही म्हणेल. त्यातही, जे खरोखरच लोकशाही हे परमोच्च मूल्य मानतात, त्यांनाच तिकीट मिळेल, ह्याचा भरोसा काय? आणि अशाच महाभागांना आमचे स्वार्थपरायण उद्योगपती मदत करतील, ह्याचा भरोसा तरी कितपत बाळगावा?..

—अर्थात ह्याचा अर्थ श्री. रामकृष्ण बजाजांचे आवाहन चूक आहे असा होत नाही. 'ते आचरणात आणणे फार अवघड आहे' एवढेच निदर्शनास आणण्याचा आमचा हेतू आहे आणि विनंतीही आहे की, सर्व संबंधितांनी हे आवाहन आव्हान म्हणून स्वीकारावे. राणा प्रतापच्या शूर राजपूत जनतेने असेच आव्हान स्वीकारले होते; शिवरायांच्या मर्द मावळ्यांनी असेच आव्हान स्वीकारून यशाचे रायगड उभारले होते ! टिळक-गांधींच्या आधुनिक भारतानेही कठीण आव्हाने स्वीकारली होती. मग 'असाध्य ते साध्य करिता सायास' ही जिद्द आजच्या पिढीने का बाळगू नये ?

□

॥ ९ ॥

## शोचनीय शोक-प्रदर्शन !

*१३ ऑक्टोबर १९७९*

सहज शक्य असूनही जे सत्तेच्या सिंहासनापासून सदैव दूर राहिले आणि म्हणूनच जनतेच्या हृदय-सिंहासनावर कायमचे आरूढ झाले, त्या मूर्तिमंत 'लोकशाही प्रकाशां' च्या–जयप्रकाशांच्या–निधनाने हळहळला नाही, असा कोणी भारतीय असेल का? कुणीही नाही. गत सोमवारी ह्या दिव्य दीपाचे निर्वाण होताच, असंख्य भारतीय दु:खित झाले, ही वस्तुस्थिती आहे. पण. . . पण शोक-प्रदर्शन असो, की आनंद-प्रदर्शन असो, आपल्या समाजाला संयम, शिस्त, समयोचितपणा पुरेसा पाळता येत नाही, हेच पूर्वी अनेकदा दिसून आले आहे आणि ह्याही वेळी दृष्टीस पडले. दु:खाचा पहिला-वहिला स्वाभाविक उमाळा अल्पकाळात ओसरला की, आपल्यातील भले भले महाभागही बेशिस्तीने वा अशोभनीय रीतीने वागतात. राजद्वार असो की स्मशान असो, त्या त्या प्रसंगाचे उचित गांभीर्य त्यांना राखता येत नाही, असे खेदाने नमूद करावेसे वाटते. आमच्या समाजाचा कुंभमेळा असो की शोकसभा असो, त्यांत अनास्था, अव्यवस्था अथवा अतिरेक दिसला नाही, असे सहसा होत नाही.

'दूरदर्शन'वर जे.पीं.ना श्रद्धांजली वाहताना आमच्या मान्यवर नेत्यांचा जो गलथानपणा दिसून आला, तो आम्ही समजू शकतो. कारण 'दूरदर्शन'वर कसे बोलावे ह्याचे तंत्र त्यांना अवगत नाही ! कोणी डोळे मिटून श्रद्धांजली वाहिली, कोणी कान खाजवीत वा स्वत:च्या नाकाला स्पर्श करीत श्रद्धांजली वाहिली, कोणी कर्कश आवाजात आणि बहुतेकांनी तोंडातल्या तोंडात पुटपुटत ! आमचे हे बडेबडे मंत्री वा नेते हे कोणी 'टी.व्ही.–स्टार' नव्हेत हे कबूल. पण अवघ्या १-२ मिनिटांच्या श्रद्धांजलीसाठी सामोरे

येताना त्यांनी नीटनेटक्या पोशाखात येणे आणि सुस्पष्ट अस्खलित बोलणे; एवढ्याचीही अपेक्षा प्रेक्षकांनी करू नये काय? बरे, टी.व्ही.ने ह्या सर्व लीडर लोकांचा मेळावा शोक-प्रदर्शनार्थ गोळा करून आणलाच पाहिजे का? ही ठराविक रटाळ रूढी बंद करण्याचे 'माहिती आणि नभोवाणी' खात्याच्या मंत्र्यांनीच ठरविले पाहिजे. पण चाकोरीबद्ध 'दूरदर्शन'च्याही काही मर्यादा नि उणिवा गृहित धरून आपण हे बेंगरूळ नि शोचनीय शोक-प्रदर्शन क्षम्य समजू. पण जयप्रकाशजींच्या अंत्येष्टीसाठी जमलेल्या शोकमग्न समाजात, जे काही आजच्या राजकारण्यांवर रागावलेले तरुण होते, त्यांनी त्यांच्या (प्रामाणिक) रागालादेखील, वेळप्रसंग जाणून, शिस्तीचा नि संयमाचा बांध घालावयास नको काय? चरणसिंग, राजनारायण, मधु लिमये, जॉर्ज फर्नांडिस, इंदिरा गांधी इत्यादींचा धिक्कार ह्या तरुणांनी केल्याच्या वार्ता आहेत. अंत्ययात्रेत हे असे अशोभनीय प्रकार व्हावेत? 'मरणान्तानि वैराणि' ही ज्या देशाची थोर विचारसंपदा आहे, त्या देशात सर्वांगीण क्रांती आणू पाहणाऱ्या युवाशक्तीनेही असे अप्रासंगिक वर्तन करावे?

पण बोलून चालून उसळते तरुण रक्त, असे म्हणून आपण ह्याही अविवेकी निषेध-प्रकाराकडे घटकाभर दुर्लक्ष करू शकतो. तथापि, आमच्या प्रौढ नागरिकांनी तरी आपले कर्तव्य चोख बजावले आहे काय? जयप्रकाशजींना श्रद्धांजली वाहण्यासाठी आयोजिलेल्या सर्वपक्षीय सभेस मुम्बईकर मोठ्या संख्येत उपस्थित राहण्याची अपेक्षा होती. पण सर्व पक्षांची सभा म्हणजे कोणत्याही एकाच पक्षाची सभा नव्हे, ह्या भावनेने म्हणा, (अथवा पूर्वप्रसिद्धी अपुरी पडल्यामुळे म्हणा !) प्रस्तुत सभेला गर्दी अजिबात नव्हती. राज्यपाल, भाराभर मंत्री नि पुढारी हजर असलेल्या चौपाटीवरील ह्या सभेला श्रोत्यांपेक्षा पोलिसांचीच गर्दी अधिक होती, असे वृत्त प्रसिद्ध झाले आहे. पण. . पण. . .त्याच दिवशी—तो आडवार असूनही—चित्रपटगृहे नि नाट्यगृहे मात्र अकल्पितरीत्या 'हाऊस फुल्ल' झालेली होती ! आमचे एक पत्रलेखक श्री. रा. पु. जोशी (दादर) ह्यांनी ह्या प्रकाराचे वर्णन 'सुशिक्षितांची उफराटी श्रद्धांजली' असे केले आहे ! ते काहीसे बोचक असले तरी उद्बोधक खचित आहे. सरकारने दुखवटा म्हणून जाहीर केलेल्या सुटीचा असा 'सदुपयोग' काही कर्मचाऱ्यांनी केला असावा !

परंतु सर्वांत शोचनीय प्रकार झाला महापालिकेतील शोक-प्रकटनाचा ! जयप्रकाश नारायणांना श्रद्धांजली अर्पिण्यासाठी आमचे नगरसेवक जमले होते. शोकप्रदर्शक प्रस्तावही रीतसर मांडण्यात आला. पण त्यावर भाषण करताना एका महाभागाने 'आणीबाणीच्या कालखंडात जे.पी. स्थानबद्ध असताना त्यांचे मूत्रपिंड जाणून-बुजून बिघडविण्यात आले' असा आरोप केला. त्यासरशी त्या शोचनीय शोकसभेला नेहमीचे

वितंडवादाचे स्वरूप आले. आरोपाला चोख प्रत्यारोप मिळाला—'जे. पीं. नी दिलेले दुसरे स्वातंत्र्य जनता पक्ष पेलू शकला नाही. त्याने आपसात भांडत बसण्याऐवजी त्या बिघडलेल्या मूत्रपिंडाबाबत रीतसर चौकशी का नाही करविली ?' आणि मग तिसरा महाभाग त्या शोकसभेत ललकारला, 'चंबळखोऱ्यातील दरोडेखोरांना जयप्रकाश सुधारू शकले, पण जनता-नेत्यांवर त्यांचा काही परिणाम झाला नाही !. . .' वाहवा रे आमच्या नगरसेवकांची शोकसभा, वाहवा रे शोकप्रदर्शन ! शोकप्रदर्शनाच्या वेळीही ह्या महाभागांचा वादप्रिय मुखकंडू उफाळून यावा काय ? जबाबदार नगरसेवकदेखील जर प्रसंगाचे गांभीर्य जाणून, संयम पाळू शकत नसतील, एकाने गाय मारली म्हणून दुसऱ्याने वासरू मारण्याची वृत्ती सोडत नसतील, तर अपरिपक्व तरुण अथवा उदासीन नागरिक ह्यांना कितपत दोष द्यावा ? मग लोकनायकांचे निधन होऊन अद्यापि ५ दिवसही झाले नाहीत तोच, त्यांच्या सुतकातच, इंद्रसेन जोहर ह्यांच्या घरी जाऊन त्यांना गोमयाने —शेणसड्याने—शुद्ध करण्याचा संकल्प सोडणाऱ्या युवा जनताच्या बहाद्दरांना कोणत्या मुखाने अटकाव करावा ?

□

## ॥ १० ॥ इंदिरा-अंतुले-सनसनाटी !

*२ नोव्हेंबर १९७९*

उलट-सुलट कोल्हांट उड्या मारून; उलट-सुलट वक्तव्ये करून; वारेमाप वचने देऊन नि वचनभंग करून; सोयीनुसार पक्ष फोडून नि पक्ष बदलून आमच्या बहुसंख्य राजकारणी महाभागांनी जनतेतील विश्वासार्हता गमावली आहे. अशा महाभागांत चरणसिंग नि त्यांचे चेले अग्रगण्य आहेत ! म्हणूनच, खुद्द राष्ट्रपती नीलम संजीव रेड्डी ह्यांना नेहमीची प्रथा मोडून 'ठरल्या वेळीच निवडणुका होतील, त्या पुढे ढकलण्यात येणार नाहीत,' असे जाहीर करावे लागले. पण खुद्द राष्ट्रपती ज्या पद्धतीने 'जनता-सरकारचे पतन नि काळजीवाहू चरण-सरकारचे उत्थापन' होण्याच्या वेळी वागले, त्यामुळे त्यांच्याही विश्वासार्हतेला तडा गेलेलाच आहे. ह्याच कारणास्तव राष्ट्रपती रेड्डी व नंतर पंतप्रधान चरणसिंग ह्यांच्या घोषणा झाल्या, तरी निवडणुकांबाबत शंकेची पाल सामान्य जनांच्या मनात चुकचुकतच राहिली ! तद्नंतर अलीकडेच, प्रमुख निर्वाचन-आयुक्त शकधर ह्यांनी 'येत्या दि. ३ व ६ जानेवारी रोजी लोकसभेच्या निवडणुका होतील' असे ठामपणे जाहीर केले, तरी 'ह्या मुदतपूर्व निवडणुका ठरलेल्या मुदतीच्या आत होतीलच' अशी चकारयुक्त खात्री सामान्य लोकांना अद्यापि वाटत नाही. 'पाकिस्तानात जशा ठरलेल्या निवडणुका रद्द झाल्या, तशाच भारतातील निवडणुकाही अकस्मात रद्द तर होणार नाहीत अथवा पुढे तर ढकलल्या जाणार नाहीत ?" असा संदेह बाळगणारे कैक नागरिक आढळतात.

## बडबड्या बालिश्टर !

बहुश: जन-मानसातील ह्या संदेहाचा फायदा उठविण्याच्या हेतूनेच, काही राजकारणी आपल्या वक्तव्यांची फुंकर मारून हा संशयाचा धुमसता वन्ही भडकविण्याचा प्रयत्न करताना दिसतात. उदाहरणार्थ, आमचे (वि-) घटना-पंडित बॅरिस्टर अब्दुल रहमान अंतुले ह्यांनी दोनच दिवसांपूर्वी मध्यावधी निवडणुका पुढे ढकलल्या जाण्याची शक्यता व्यक्त केली. इतकेच करून जनाब अंतुले थांबले नाहीत. 'पाकिस्तानचे अध्यक्ष जनरल झिया नि भारताचे परराष्ट्रमंत्री श्यामनंदन मिश्र ह्यांचे क्युबामध्ये खलबत होऊन तेथेच निवडणुका पुढे ढकलण्याचा कट शिजला,' अशी एक सनसनाटी खबरही त्यांनी राजकारणाच्या अवखळ-नाक्यावरून जाहीर केली. ही खबर अब्दुल रहमान ह्यांना कोणत्या रहेमदिल कर्णपिशाच्चाने दिली, असे विचारून ह्या वार्तेची दखल घेण्याचीही वस्तुत: गरज नव्हती. कारण इंदिरा गांधींच्या गोतावळयात—

*'-स्व-पर बलाबल नेणुनि*
*बालिशतर बारगीर बडबडला'*

ह्या जातीचे जे बेफाट 'बालिश्टर' आहेत, त्यांत अंतुले ह्यांचा क्रमांक बराच वरचा लागतो. पण अंतुल्यांची ही भविष्य-वाणी लक्षात घ्यावी लागते कारण तिचा 'बोलविता धनी' —किंबहुना, 'बोलविती धनीण'—राजकारण-कौटिल्य-पंडिता इंदिरा गांधी आहेत ! ज्या दिवशी दिल्लीत बॅरिस्टर अंतुले ह्यांनी 'झिया-मिश्र-गुफ्तगू'ची बित्तंबातमी बाहेर फोडली त्याच दिवशी कलकत्त्यात खुद्द इंदिरा गांधींनी त्याच आशयाचे विधान केले. निवडणुका पुढे ढकलण्याच्या कटाचा सुगावा आधी इंदिराजींना अंतर्ज्ञानाने लागला की अंतुलेजींना, हे कळण्यास मार्ग नाही. बहुश: इंदिराजींना आधी सुगावा लागला असावा. कारण इंदिराजी ध्वनी असल्या, तर अंतुले-गाडगीळ इत्यादी मंडळी प्रतिध्वनी आहेत !

## वक्तव्यातील धूर्तता-सूत्र

झिया आणि मिश्रा ह्यांनी 'कट' रचला असो वा नसो; पण एक सनसनाटी सोडून देऊन जन-मानसात सभय संशयाचे वातावरण निर्माण करण्याचा कट मात्र इंदिरा ह्यांनी धूर्तपणे रचला, असे म्हणावयास हरकत नाही ! "ज्यांना निवडणुकांची भीती वाटते, यशाची खात्री वाटत नाही तेच निवडणुका पुढे ढकलल्या जाण्याच्या अफवा फैलावीत आहेत", असा टोमणा मारून चरणसिंगांनी पुनश्च निवडणुका वेळापत्रकानुसार होतील असे जाहीर केले आहे, हे ठीकच झाले. पण 'इंदिरा गांधी निवडणुकांना भितात' असे जे त्यांनी सूचित केले आहे, ते खरे नाही. निदान चरणसिंगांच्या 'लोकदला'इतके त्यांना भयभीत होण्याचे मुळीच कारण नाही. इंदिरा गांधींच्या सर्व बेछूट नि सनसनाटी वक्तव्यात एक

धूर्ततेचे सूत्र असते. त्यांना मानसशास्त्रीय दबावाचे राजकारण उत्तम अवगत आहे. . .उपर्युक्त सनसनाटी वार्तेप्रमाणेच, पाकिस्तानच्या आक्रमणाचा बागुलबोवा उभा करून, त्या मानसशास्त्रीय दबाव निर्माण करताहेत. आपला स्वार्थ साधत असेल, तर अशा वार्तांनी देशाच्या प्रतिष्ठेला धक्का पोचतो ह्या वस्तुस्थितीची त्यांना पर्वा नाही. म्हणूनच त्या मध्यंतरी असेही म्हणाल्या की, "भारताच्या शेजारची छोटी छोटी राष्ट्रेही आता भारताला नजरेच्या धाकात ठेवू लागली आहेत." ह्या अशा वक्तव्यांचा हेतू हा की, 'अन्य राजकीय पक्ष दुबळे असून, शेजारच्या राष्ट्रांना धाकात ठेवणारी शक्ती म्हणजे केवळ मिसाधारिणी संजय-मातु:श्री', असा दबदबा निर्माण व्हावा. झियांशी संगनमत करण्याइतके आणि निवडणुका टाळण्याइतके चरण-सरकार पोचट आहे, अशी लोकभावना इंदिरा गांधींना निर्माण करायची आहे. इतर सारे शेणामेणाचे आणि आपणच काय ते ताठ कण्याचे, असे वातावरण निर्माण करताना त्यांना राष्ट्राच्या प्रतिष्ठेचा विचार कसा कःपदार्थ वाटतो हे आम्ही ह्यापूर्वीही दाखविले आहे. उदाहरणार्थ, त्यांनी एका बांगलादेशीय नियतकालिकाला दिलेल्या दर्पोक्ति-युक्त मुलाखतीत देशाची प्रतिमा कशी डागाळली आहे हे आम्ही त्या वेळीच चव्हाट्यावर मांडले आहे.

### झिया अंतुलेमियाँ नव्हेत

चरणसिंगांचे दुर्बळ सरकार काही निमित्त सापडताच आपल्या स्वार्थासाठी निवडणुका पुढे ढकलील असा संशय व्यक्त करणे, आम्हास समजू शकते. पण त्यासाठी ते एका परकीय देशाच्या लष्करी सुलतानाला हाताशी धरून काही कट-कारस्थान करील, असे म्हणणे तर्क कितीही ताणला तरी पटू शकत नाही. झिया म्हणजे काही राजनारायण नव्हेत किंवा देवीलाल नव्हेत की, चरणसिंग-मिश्रांचा कुटिल हेतू साध्य करण्यासाठी त्यांनी भारताच्या सीमेवर कटकटी निर्माण करण्याचा खेळ खेळावा ! अथवा जनरल झिया म्हणजे अंतुलेमियाँही नव्हेत की, त्यांनी इंदिरा गांधींच्या इशाऱ्याबरहुकूम काही वारेमाप मुक्ताफळे उधळावीत !. . .झियांना जर भारताच्या सरहद्दीवर कटकटी निर्माण करायच्याच असतील, तर त्या ते स्वतःच्या राजकीय सोयीसाठी करतील, चरणसिंगांच्या सोयीसाठी कदापि करणार नाहीत !. . .

### बावन्नकशी भामिनी !

चरणसिंगांचे काळजीवाहू दुर्बळ सरकार अथवा ह्या देशातील काही अराजकवादी शक्ती, स्वार्थासाठी निवडणुका पुढे ढकलण्यास मागेपुढे पाहणार नाहीत, ही आमची शंका आजही पूर्णतः लोप पावलेली नाही. पण त्यासाठी त्यांच्यावर परकीय देशांशी

खलबत केल्याचा आरोप केवळ इंदिरा गांधीच बेधडक करू शकतात ! नाहीतरी भारतातील गेल्या १९७७ त्या निवडणुकीत परकीय शक्तींनी हस्तक्षेप केला होता, असे त्यांनी म्हटलेच होते. जनता आंदोलनाला परकीय शक्तींची आतून फूस असल्याचा हेत्वारोप त्यांनी केलाच होता !. . ."परकीय शक्तींपासून पूर्णतः अलिप्त राहिलेल्या आणि 'मी अधना, न शिवे भीती मना' असे म्हणू शकणाऱ्या बावन्नकशी भामिनी एकच—आणि त्या म्हणजे इंदिरा गांधी ! बाकी लेकाचे परधार्जिणे परावलंबी ! !" हा आभास निर्माण करण्याचा त्यांचा प्रयत्न सतत चालू असतो. त्याला अज्ञ जन बळी पडणार नाहीत, ह्याची सर्वच देशहितैषी मंडळींनी काळजी घेतली पाहिजे.

□

॥ ११ ॥

# डांग्यांचे इंदिरा-भोजन !

*११ नोव्हेंबर १९७९*

'माणसाने जेवणासाठी जगायचे नसते, तर फक्त जगण्यासाठी जेवायचे असते. महत्त्व जगण्याला आहे, जेवणाला नाही,' असे काही लोक खुशाल म्हणोत; कॉम्रेड श्रीपादराव डांगे ह्यांचे बौद्धिक प्र-पितामह कार्ल मार्क्स ह्यांचे ते सुप्रसिद्ध वचन— ('माणूस केवळ भाकरीवर जगत नसतो') —कोणी खुशाल तोंडावर भिरकावोत; जेवणाचे महत्त्व निर्विवाद्य आहे; भोजनाचे महत्त्व वादातीत आहे ! 'खाणे आणि खिलविणे' हे निदान भारतीय संस्कृतीचे परंपरागत वैशिष्ट्य आहे. म्हणूनच, या देशात कैक 'दे.भ.' आणि 'क्रांतिकारक'देखील भरपूर खातात नि खिलवितात— पैसादेखील ! दुनियेच्या पाठीवरील अन्य कोणत्याही देशांत भारतासारखे भोजन-माहात्म्य आढळणार नाही. येथे बारसे होवो की बारावे होवो, गावजेवण घालावेच लागते ! ब्राह्मणभोजन, सहस्त्रभोजन, लक्षभोजन, मातृभोजन, आवळीभोजन, केळवण इत्यादी भोजनप्रकार जसे भारतात बहरले, तसे अन्यत्र बहरलेले नाहीत. 'भोजने', 'सहस्त्रभोजने', 'अन्नपूर्णे', 'पूर्णपात्रे' इत्यादी भोजनसंबंधी आडनावे ह्याच देशात आढळतील ! 'अन्नाला जागणे', 'मिठाला हराम न होणे' इत्यादी जेवणविषयक वाक्प्रचार नि 'भोजनान्तेच किं पेयम् ?' इत्यादी भोजन-चिकित्सा ही या देशाची खासीयत आहे. ह्या खाबू देशात पुढारी काय काय खातात, कोठे खातात, कसे खातात ह्याविषयी सामान्य लोकांना कोण जिज्ञासा ! म्हणूनच, परवाच वृत्त प्रसिद्ध झाले की, दिल्लीच्या राम मनोहर लोहिया-रुग्णालयात सध्या काही उपचारांसाठी राहिलेले लोकदलाचे चालू अध्यक्ष मिठाई-फेम राजनारायणजी ह्यांचा रोजचा राजेशाही आहार पुढीलप्रमाणे आहे— २ लिटर दूध, ३०० ग्रॅम पनीर, २४ संत्री,

१ किलो मेथी, १ किलो खीर, १ किलो बेसन पकोड्यांसाठी, चपात्या, २०० ग्रॅम मिरे नि १०० ग्रॅम धणे ! शिवाय, आवश्यकतेनुसार कोंबडी-अंडी-मासे नि कॉफी !...

अशा ह्या देशात भोजन-प्रिय ब्राह्मणी संस्कृतीने जेवणास वारेमाप महत्त्व दिले तर विशेष नाही. पण भाई लोकांनी एका जेवणावरून सार्वजनिक रण माजवावे, हे खचित विशेष होय ! भाई डांगे असोत की राजेश्वरराव असोत, अखेर बेटे ब्राह्मणी संस्कृतीच्या सावटातून न निसटलेले भटजीच ! अन्यथा, भाई डांगे ह्यांच्याकडे इंदिरा गांधी जेवून गेल्या म्हणून, कम्युनिस्ट-पार्टीत एवढा 'अब्रह्मण्यम् अब्रह्मण्यम्' असा गहजब का उडावा ? आणि इतर कोणत्याही कॉम्रेडाने आमंत्रण दिले तरी इंदिरा गांधी त्याच्याकडे जेवायला जाणारच नाहीत, असा गर्व भाई श्रीपादरावांनी तरी का मिरवावा ? गेला बुधवार म्हणजे ऑक्टोबर क्रांतिदिन. त्या दिवशीच्या सभेत भाई डांगे ह्यांनी क्रांतीची चर्चा फारशी केलीच नाही. उलटपक्षी, हे इंदिरा-भोजन-प्रकरणच प्रमाणाबाहेर चघळले. भाई डांगे असोत वा चौधरी चरणसिंग असोत; भारतातील बहुसंख्य म्हाताऱ्यांना—

*'अंगं गलितं पलितं मुण्डम्'*

अशा अवस्थेतही बेछूट भाषणबाजीची कोण हौस ! इंदिरा गांधी वगळता, भाई डांगे ह्यांनी सर्वांवर जिभेचा पट्टा चालवून, ऑक्टोबर क्रांतिदिन साजरा केला. स्वतःच्या पक्षातही आपल्यावर 'इंदिरा-भक्त' म्हणून टीका होते, हे डांग्यांनी स्वतःच कबूल केले. पण ह्या टीकेचा समाचार घेताना इतरांना शिव्या नि इंदिराजींना ओव्या अर्पण करून त्यांनी ती टीका सार्थच असल्याचे शाबीत केले ! कम्युनिस्ट पक्षात राहायचे नि इंदिराजींची येताजाता आरती ओवाळायची, ही 'दुहेरी निष्ठा'च त्यांच्या काही पक्षबांधवांना खटकते. आणि म्हणून तर इंदिराजींचे त्यांच्या घरचे भोजन कैक कॉम्रेडांना गैर वाटले असावे. बाकी एवढे खरे की, ह्या कॉम्रेड लोकांनाही भलतीच उशिरा जाग आली. एरव्ही, इंदिरादेवींच्या 'प्रगतीच्या ११ वर्षांत' आणि आणीबाणीच्या पर्वात भाई डांगे ह्यांनी संपूर्ण कम्युनिस्ट पक्षच इंदिराअन्नछत्रात जेव्हा ढकलला, इंदिरादावणीस बांधला, तेव्हाच त्या दुष्कृत्याला कडाडून विरोध झाला असता ! आता आपली परिस्थिती डांगेधोरणामुळे फार शोचनीय झाल्याची जाणीव कैक भाई-मंडळींना झाली आहे. पण ह्या उशिराने सुचलेल्या शहाणपणाचा उपयोग किती ? ज्यांना 'साम्राज्यशाहीचे कुत्रे' म्हणून कम्युनिस्टांनी हिणविले होते, ते इंदिराजनक नेहरू माझे मित्र होते, असे श्रीपादभाई त्यांना ठणकावून सांगताहेत !... आणि तिकडे आपले कम्युनिस्ट बंधू मार्क्सिस्टांशी युती करीत असताना, 'इंदिराजी येत असतील तर येऊ द्यात' असा साळसूद सल्ला देताहेत ! 'इंदिराजींचे राज्य गेल्यावर ही मंडळी (अर्सकाँग्रेसचे नेते ?) पुरुष झाली,' अशी टवाळी करून हशा वसूल करताहेत ! इंदिरा गांधींना दूर सारून, २ ॥ वर्षांत जनता पक्षाने काय

दिवे लावलेत, असा सवाल कम्युनिस्ट पक्षाचे दिवाळे वाजविणारे डांगे विचारीत आहेत !. . . अंतर्गत कलहाचा रोग विकोपाला जाण्यापूर्वी जनता-सरकारने कोणती बहुमोल कामगिरी केली, स्वातंत्र्याची पुनश्च कशी प्रतिष्ठापना केली, हे आम्ही अनेकदा सांगितले आहे. पण तरीही कोणतेही दिवे जनता-सरकारने लावलेच नाहीत हे वादासाठी मान्य केले तरी 'जनता सरकारने आणीबाणीची सर्व स्वातंत्र्यभक्षक आग तर लावली नाही ना?' एवढा प्रश्न तरी डांगे ह्यांना खास विचारता येईल ! इंदिराजींची तळी उचलून इतर सर्वांना जाब विचारणाऱ्या ह्या महाभागांना कोणीही विचारू शकेल की, गेल्या काही वर्षांत इंदिराजींचा शालू सावरण्याचा 'क्रांतिकारक' कार्यक्रम आपल्या पक्षाला देण्यापलीकडे तुम्ही तरी कोणते दीप पाजळले आहेत? आणीबाणीचे दमनचक्र चालू असताना तुम्ही तरी कोणते पौरूष दाखविले आहे? तुमच्या पक्षाच्या नेतृत्वाखालील केरळीय मंत्रिमंडळाने भांडवलदारांना कैक सवलती देऊ केल्या, तेव्हा तुम्ही गप्प का होता?

छे छे, अशी बेफाम भाषणबाजी करण्यात वेळ घालविण्यापेक्षा भाई डांगे ह्यांनी आपल्या विद्वान जावईबापूंना वैदिक-संशोधनात मदत करण्यात वेळ व्यतीत करावा हेच बरे. आणि तेही जमत नसेल, तर इंदूताईंची भोजन-व्यवस्था सांभाळावी !

□

॥ १२ ॥

## नहाटा-कृत 'गर्वहरण !'

*९ डिसेंबर १९७९*

ह्या दुनियेच्या हजारो मैल लांबी-रुंदीच्या फिरत्या रंगमंचावर, विश्व-नाट्य-सूत्रधार रात्रंदिन जी नाना प्रकारांची नाटके करीत असतो, त्यांतील त्याचे सर्वांत लाडके आवडते नाटक कोणते असेल? बहुधा 'गर्वहरण'! उदाहरणार्थ, चंद्राला आपल्या सुखदायी शीतलतेचा नि सूर्याला आपल्या तेजस्वी प्रकाशमत्तेचा गर्व होताच, एकाच दमात एकाच वेळी त्यांचे गर्वहरण करण्यासाठी—

***'चंद्रमे जे अलांछन।***
***मार्तण्ड जे तापहीन।'***

असे साधुसंत त्याने निर्माण केले ! फुलांनी बहरलेल्या कल्पवेलीला आपल्या सौंदर्याचा गर्व होताच, त्या नाना-नाटक-सूत्रधाराने पुष्प-गुच्छाहून सुंदर असलेल्या उरोजांनी शोभणारी नाजूक नारी जन्मास घातली ! पुढे ह्या स्त्री-जातीला— विशेषतः देवांगनांना— लावण्य-गर्व होताच, तो दूर करण्यासाठी नाना-वस्तूंतील तीळतीळ सौंदर्य घेऊन त्याने तिलोत्तमानामक अप्सरा निर्माण केली !. . . अशा प्रकारे सद्गुणांचा माज क्षणार्धात नाहीसा करणारा तो परमेश्वर, दुर्गुणांचा गर्वही झटकन उतरवितोच ! 'आपणच काय ते महाघातक' असा गर्व कालकूट-नामक जहराला होताच तो मोडून काढण्यासाठी त्याने शेकडो खल-पुरुष निर्माण केले !

पुष्पांचे सुगंध चोरणाऱ्या वाऱ्याला आणि इश्काचा मकरंद लुटण्यासाठी शेकडो कळ्यांशी अक्षरशः निर्लज्ज चुंबाचुंबी करणाऱ्या भुंग्याला आपल्या चंचलतेचा मोठा गर्व झाला होता. सरड्याला रंगबदलूपणाचा माज चढला होता, मृगजळाला आपल्या

फसवणूक-पांडित्याची नि मधाने माखलेल्या बचनागाच्या मुळीला आपल्या घातक वंचकतेची मोठी शेखी वाटत होती ! ह्या सर्वांचे एकाच वेळी गर्व-हरण करण्यासाठीच बनेल बिलंदर वारांगना-वर्ग त्याने मानवांकरवी जन्मास घातला ! एकावर नजर ठेवून, दुसऱ्याला खुणावून, तिसऱ्यालाच संगमसौख्य देणाऱ्या, आणि मिथ्या मोहब्बतीच्या मृगजळामागे बड्या बड्या कामी कुरंगांना दौडवून त्यांना बरबाद करणाऱ्या ह्या वेश्यांनाही कालांतरीने गर्वाने पछाडले तेव्हा ? तेव्हा त्याने भारतात, स्वातंत्र्योत्तर काळात, महाबिलंदर पुढाऱ्यांचे पीक राजकीय क्षेत्रात उभे केले ! क्षणाक्षणाला भूमिका बदलणे, आपल्या उघड्यानागड्या स्वार्थाला परमार्थाचा मुलामा फासणे, राष्ट्रपुरुषांना साक्षी ठेवून केलेल्या प्रतिज्ञा गाजराच्या पुंगीप्रमाणे मोडून खाणे, वचनभंग-शिस्तभंग वारांगनेच्या भृकुटिभंगाइतक्या सहजतेने करणे, ह्या पक्षातून त्या पक्षात नि त्या पक्षातून ह्या पक्षात लीलया उडी मारणे, रामराज्याची भाषा बोलत बोलत 'आयाराम-गयाराम नीती' आचरणे इत्यादी कृत्यांत तरबेज असलेल्या आमच्या बड्या बड्या राजकीय नेत्यांनाही आपल्या करामतीचा गर्व झाला, तेव्हा तो गर्व धुळीला मिळविण्यासाठीच एका मामुली फिल्मी निर्मात्याला, त्या जगन्नाट्य-निर्मात्याने मिसाधारिणी देवीच्यामार्फत पुढे आणले. त्याचे नाव अमृत नहाटा ! (हा 'अनृत नायटा' ह्या नावाचा अपभ्रंश तर नसेल ?) 'किस्सा कुर्सीका' ह्या संजय-दग्ध चित्रपटाचा हा निर्माता !

त्याने जी कोल्हांट उडी मारली, ती पाहून अलीकडच्या विख्यात राजकीय गद्दारांनीदेखील आश्चर्याने स्वतःच्या वाचाळ मुखात बोट घातले असेल ! आमच्या वाचकांना हे ठाऊकच आहे की, अमृत नहाटांनी निर्मिलेला 'किस्सा कुर्सीका' हा चित्रपट, आपल्या नि आपल्या मातोश्रींच्या सत्ता-पिसाटपणावर टीका करणारा आहे अशा कल्पनेने, युवराज संजय ह्यांनी आणीबाणीच्या त्या जुलमी कालखंडात जबरीने कब्जात घेतला. आणि त्याची रिळे आपल्या त्या कुप्रसिद्ध मारुती कारखान्यात जाळून टाकली. ह्या सर्व प्रकारांत जी गुंड-पुंडगिरी संजय ॲण्ड कंपनीकडून घडली ती जनता सरकारने रीतसर न्याय मंदिरात दाखल केली. ह्यामुळेच अमृत नहाटा हा मामुली निर्माता नि त्याचा कलादृष्ट्या मामुली असलेला चित्रपट एकदम जागतिक प्रसिद्धीच्या झोतात आला. सेशन्स कोर्टाने आरोपी संजय नि विद्याचरण शुल्क ह्यांना २ वर्षांची सजा ठोठावली. त्यावर संजय-विद्याचरणांनी सर्वोच्च न्यायालयात फेर-विचाराचा अर्ज केला. ह्या अर्जाबाबत सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय जाहीर होण्याची घटिका जवळ येत चालली होती. आणि बहुतेक तज्ज्ञांच्या मतानुसार संजय-विद्याचरण तुरुंगात जाण्याचा बाका प्रसंग अटळ होता !. . . म्हणूनच सर्वोच्च न्यायालयाचे प्रमुख न्यायाधीश चंद्रचूड ह्यांना खुनाच्या धमक्या देण्याचे व न्यायालयात गुंडगिरी करण्याचे प्रकार संजय भगतांकडून

होऊ लागले होते. पण...

पण ह्या गुंडगिरीने काम साधत नाही अन् शिक्षा टळत नाही, अशी परिस्थिती दिसत असतानाच अभूतपूर्व धक्कांतिका घडली. खुद्द खासदार नहाटाच जनता पक्ष सोडून इंदिरा-काँग्रेसवासी झाले आणि त्यांनी सुप्रीम कोर्टात निवेदन पाठविले की— 'बिचाऱ्या निरपराध संजय-विद्याचरणांना उगाच ह्या खटल्यात गोवल्याबद्दल मी आता पश्चात्ताप-दग्ध झालो आहे. केवळ चरणसिंगादी नेत्यांच्या दडपणामुळे मी ह्या खटल्यात ह्या सज्जनांना गुंतविले. ह्या अपराधाच्या टोचणीमुळे मला रात्ररात्र झोपदेखील येत नाही !'... खरोखर, संजय गांधींच्या श्वशुरांचा खून, दिल्लीचे नायब राज्यपाल किशनचंद ह्यांची आत्महत्या, नगरवालाचे आकस्मिक निधन ह्या मालिकेत शोभणाराच हा नवलाईचा प्रकार आहे.

तब्बल दोन वर्षांनंतर, निवडणुका ऐन तोंडावर आलेल्या असताना फिर्यादी अमृत नहाटाच असे उलटावेत, हे निःसंशय संशयास्पद आहे. हा राजकीय चित्रपट दूरदर्शनने आपल्या नियमानुसार स्वीकारला नाही म्हणून नहाटा नाराज झाले होते म्हणतात ! पण केवळ ह्या नाराजीपायी त्यांनी अशी कोल्हांट उडी मारली असेल का ? की हे सारे प्रकरण निदानपक्षी निवडणुकांपूर्वी निकालात निघू नये, पुढे ढकलले जावे, ह्या हेतूने नहाटांवर काही 'सार्थ' जादूटोणा करण्यात आला ? प्रचंड आमिष दाखवून वा मुखलेप करून नहाटांनाच फितूर करण्याचे कारस्थान घडले असेल काय ? असे असेल तर (आणि असेच असण्याचा संभव स्पष्ट दिसतो) आपल्या देशाच्या सार्वजनिक चारित्र्याला 'बदनामी'चे डांबर फासले गेले आणि बड्या बड्या गद्दारांचा गर्व नहाटांनी जमीनदोस्त केला असेच म्हणणे भाग पडेल ! पण मग ह्या किळसवाण्या प्रकारात, नहाटांपेक्षा त्यांना प्रलोभन दाखविणाऱ्या शक्तीच अधिक दोषास्पद ठरतात. महात्मा गांधींनीच एकदा ब्रिटिशांना सवाल विचारला होता—

"Who is more to be blamed? The tempter or the tempted?"

गलिच्छ सत्ता-राजकारणासाठी अशी फंदफितुरी माजविणारे कदाचित सर्वोच्च न्यायालयाच्या पंजातून, तात्पुरते सुटू शकतील. पण निवडणुकांच्या न्यायालयात त्यांना कठोरातील कठोर शिक्षा जनता-जनार्दनाने केली पाहिजे !

□

॥ १३ ॥

## समाज-शारदे ! रडू नकोस !

*१८ जुलै १९७९*

भारतीय समाज-शारदे ! तुझ्या डोळ्यांत अश्रू का तरळत आहेत? नाट्याचार्य कै. गोविंद बल्लाळ देवलांच्या त्या 'शारदे'सारखीच तू खिन्न का? बाळे ! इतकी दुःखी होऊ नकोस, रडू नकोस ! वयोवृद्ध पतिराज– तो 'अवघे पाऊणशे वयमान' असलेला श्रीमंत भुजंगनाथ– आपल्या नशिबी येणार, ह्या कल्पनेने कष्टी झालेली ती कांचनभटाची कन्या "यमपाश गळ्याशी ज्यास, लागला त्यास मला का देता?" असा आर्त सवाल विचारून अश्रू ढाळीत होती. पण तू, जनता शारदे ! अश्रुपात करू नकोस ! कारण, तिच्याइतपत तुझी अवस्था शोचनीय खासच नाही. तुझे भाग्य तिच्या मानाने थोर ! जरा-जख्खड पतिराजाबाबत तिला काही 'चॉइस'च नव्हता, पर्याय नव्हता. पण तुला एकच नव्हे, तर तीन सत्तालोलुप म्हाताऱ्यांतून 'ट्रायल ॲन्ड एरर' पद्धतीने जो उरेल, त्याच्यासंगे संसार थाटण्याची मुभा आहे ! तरीही तू दुःखी? 'आम्ही गाई जातीच्या। नाही आम्हां वाचा' असे त्या कांचनभटजीच्या पोरीप्रमाणेच तूही म्हणतेस? तू गाईप्रमाणे गरीब असशील, पण समाज-शारदे ! तू अगदी मूक आहेस, असे म्हणता येणार नाही. अग, थोर पुढाऱ्यांचे 'झिंदाबाद' म्हणण्याचे नि जयजयकार करण्याचे भाग्य तुला लाभले आहे ! तुला आक्रोश करण्याचेही स्वातंत्र्य आहे. आणि त्यामुळेच तू 'माया जळली का? तिळही ममता नाही का?' असे सवाल आम्हांस– ह्या देशातील तथाकथित बुद्धिमंतांस ('इन्टलेक्च्युअल्स'ना)– विचारीत आहेस ! पण आम्हास असे अस्वस्थ करणारे प्रश्न विचारू नकोस, भारतीय समाज-शारदे ! अश्रुपात करू नकोस !

### तीन वृद्ध-युवा !

बाळे ! निराशा सोड आणि भारताच्या राजधानीकडे पहा. 'अजून यौवनात मी' असा अभिमान बाळगणारे तीन वृद्ध-युवा तुला सनाथ करण्यासाठी उत्सुक आहेत. काय म्हणतेस ? 'आपण अद्यापि तरुणच आहोत' ह्या भ्रमात असलेला कोणीही वृद्ध नवरा नको ? 'पाहिजे मुलीला तरुण सद्गुणी सुंदरसा नवरा' हे तुझ्या आईने— भारतमातेने— तुझ्या डोक्यात भरविलेले वेड अद्यापि दूर होत नाही ? काय म्हणतेस ? मला न विचारता माझा प्राणनाथ निवडणारे नि ठरविणारे तुम्ही कोण ? समाज-शारदे ! असे उद्धट प्रश्न विचारू नकोस. ह्याही बाबतीत तू त्या देवलांच्या शारदेहून भाग्यशाली आहेस, अग, तिला तिच्या बापाने एकदाही विचारले नाही. पण दर पाच वर्षांनी निवडणूकमासात तुझी इच्छा विचारली जाते ! तुझ्या आशा-आकांक्षांचा कानोसा घटके-घटकेला घेण्यास कोणाला फुरसत आहे ? तेव्हा ह्याविषयी उगाच कष्टी होऊ नकोस, रडू नकोस. तरुणांचीही दमछाक करू शकणाऱ्या तीन चिवट म्हाताऱ्यांपैकी जो बहुमान्य असेल, त्यालाच तुझा स्वामी म्हणून आम्ही निवडू ! तू निःशंक हो, रडू नकोस !

### पार्वतीचा कित्ता नको विसरूस

काय तक्रार आहे तुझी ? ह्या 'अनुभवसंपन्न', 'मुरब्बी' वृद्धांपैकी कोणासही पसंत करण्यास तू का तयार नाहीस ? काय बडबडतेस ? 'मुख सुरकुतले, मस्तक पिकले, स्मशान ज्यांनी सन्निध केले' असे हे बुढ्ढे मला सुखी करू शकणार नाहीत, ह्यांना नव्या युगाची चाहूल नाही, नव्या नव्या विचारांची जाणीव नाही, ह्यांना संसार-शकट नीट चालविता येणे शक्य नाही ? — छे, छे, छे. नाट्याचार्य देवलांचा वृद्ध भुजंगनाथ आपल्या समर्थनार्थ जे म्हणाला होता ते विसरू नकोस—

*बळ ज्याचे त्यास ते !*
*वयोवृद्ध, परि त्या शंभूने*
*उगाचि का, जी कुमारिका*
*त्या वरिले गौरीते ?. . .*

नगराज-कुमारी पार्वती हिला जर तो पुराणपुरुष पसंत पडला, तर तुला ह्या दिल्लीश्वर वृद्धांपैकी एकही का आवडू नये ?. . .

### हा 'बलसाडी आंबा' पहा !

हा बलिष्ठ टुणटुणीत तब्येतीचा वृद्ध नवरदेव (वय वर्षे ८२) पाहा. त्याच्यावरील काही स्वजनांचाही विश्वास उडाल्यामुळे, तो जरा बाजूस पडला असला, तरी तो नवा

लवाजमा उभारू शकतो. त्याच्या घरचे १५०, पंजाबातील ७, तामिळनाडूतून १८, शिवाय काही अलबते-गलबते, असा २०० अनुचरांचा लवाजमा आपल्यापाशी आहेच, असा ह्याचा दावा आहे. त्यामुळेच तो पुनश्च मुंडावळ्या बांधून तुझ्या प्रेमाखातर उभा राहू शकतो ! 'काही भांडकुदळ बेशिस्त कुटुंबियांनी घोटाळा केला, एरव्ही आपला कारभार उत्तम चालला होता नि चालू शकतो,' असेही ह्याचे म्हणणे आहे. 'उत्तम प्रशासक नि वार्धक्यातही ताठ असलेला माणूस' असा ह्याचा गुणगौरव करणारे लोक थोडके नाहीत ! 'शिवाम्बू'— अस्त्र अभिमंत्रून मदिरेचा नायनाट करण्याचा ह्याचा संकल्प सर्वश्रुत आहे ! नाही म्हटले तरी ह्याने आवळ्या-भोपळ्याची पंचमुखी मोट २ ॥ वर्षे बांधून दाखविली आहे ! अशा विक्रमी वृद्धाने तुला सनाथ केले तर काय बिघडले ?. . . काय म्हणतेस ? नको नको, हा फार हट्टी आहे, हटवादी आहे. ह्याने विश्वासार्हता गमावली आहे ?. . . हा बलसाडचा पिकलेला आंबा नको ? बरे बरे, हरकत नाही. पण तू निराश होऊन रडू नकोस !

### हा संधी-विग्रहात पटाईत !

समाज-शारदे ! हा वृद्ध (वय अवघे ६७) तुला खचित आवडावा. अग, ह्याचे नावच किती सुरेख आहे पहा ! जगताला 'जीवन' वाटणारा हा बुद्धिमान वृद्ध ! काही 'राम' असला तर तो ह्याच्यातच ! बुडत्या जहाजाचे वा कोसळत्या घराचे भीषण भवितव्य ह्यालाच आधी जणू 'अंतःप्रेरणे'ने कळते. केव्हा कोणाशी 'संधी' करावा नि 'विग्रह' केव्हा छेडावा, हेही ह्यालाच छान समजते ! उत्तम प्रशासकीय अनुभव ह्याच्याही गाठी आहे. शिवाय, तो 'फॅडिस्ट' नसून, समतोल विचाराचा आहे. महात्माजींनी ज्यांना 'श्रीहरीचे जन' म्हणून संबोधिले, त्यांना तर हा आपला तारणहारच वाटतो ! अशा ह्या वयोवृद्धाला, केवळ तो वयाने तरुण नाही म्हणून नाक मुरडण्यात काय अर्थ ? अग, ह्याचा लवाजमा लीलया २७५ च्या घरात जाऊ शकतो. . . आणि तरीही 'तो नको' असे तू म्हणतेस ? समाज-शारदे ! हा तुझा अतिचोखंदळपणा ठीक नाही. मूर्ख मुली. . . बरे बरे, हरकत नाही. तुला 'मूर्ख' म्हटल्याबद्दल क्षमस्व. पण नाराज होऊ नकोस, रडू नकोस !. . .

### ह्याने अनेक घरठाव केले !

हा तिसरा चिवट नि धूर्त म्हातारा पतिराज (वय : फक्त ७७) तुला जर पसंत पडला नाही तर, तुझ्या अकलेची तारीफ करावी तेवढी थोडीच ! अग, ह्याला 'ब्लड प्रेशर' असले, तरी प्रतिस्पर्ध्यांवर 'प्रेशर (दबाव) आणण्यात ह्याच्यासारखा हाच ! ह्याला

'हृदय-विकार' असला, तरी आभाळाएवढी महत्त्वाकांक्षा, ह्या वयातही हा हृदयात बाळगू शकतो ! ह्याने ह्या आकांक्षेपायी, सत्ता-संपादनासाठी अनेकदा अनेक घरठाव केले, तरीही तो असंतुष्टच राहिला. पण म्हणून काय बिघडले ? अग, 'असंतोषः श्रियः मूलं' (असंतोष हेच वैभवाचे मूळ) हा त्रिकालाबाधित सिद्धान्त नाही काय ? 'संपदा चपलचरणा' हे ह्या चंचल-चरण (की कंपित-चरण ?) वृद्धाला ठाऊकच आहे. म्हणून तर त्याने राज-संपदेसाठी वेळोवेळी धूर्त पवित्रे टाकले. आपलेच काही अनुचर बाहेर पाठवून आणि आपण स्वतः आत राहून, एखादा प्रचंड किल्ला अंतर्बाह्य आघातांनी कसा मोडकळीला आणावा, हे हा मुरब्बी माणूस उत्तम जाणतो. अशी 'डिप्लोमसी' कोण्या तरुणाला जमेल काय ? दुसऱ्यावर दात ठेवणारा हा वृद्ध इतका कुशल आहे की पाहिजे त्याच वेळी ह्याचा दात दुखू शकतो ! वत्से, समाज-शारदे ! उत्तर भारताच्या किसानांत ह्याला सन्मान्य स्थान आहे, ह्यालाही शासकीय अनुभव चांगला आहे. ह्याचे स्वतःचे अनुचर १०च असले, तरी ते कडवे आहेत, — रामभक्त हनुमंतासारखे ! शिवाय, हा महत्त्वाकांक्षी महाभाग यशवंतमार्गे जाऊन, अनुचरांचा बराच मोठा लवाजमा गोळा करू शकतो. 'काठीवाचूनि नेट न पाया' अशी ह्याची अवस्था असली, तरी 'परि मोठे अवसान !' आज घडीला सर्वांत जास्त उसनवारी करून सर्वांत मोठे उसने अवसान हा दाखवू शकतो !. . . आणि तरीही तो तुला रुचत नाही !

**ते 'स्वयंवर' अशक्य !**

कोणताच वृद्ध वर पसंत नाही, असे तू म्हणतेस ? अशा वृद्धांपैकी कोणालाही वरिले तरी सुखसमाधान नाही, असे तू म्हणतेस ? वेडे पोरी, 'जगी सर्वसुखी असा कोण आहे ?' प्रत्येकात काही ना काही वैगुण्य असावयाचेच ! तेव्हा ह्यांच्यापैकी. . . काय म्हटलेस ? 'उघड उघड मैदानात सर्वांना उतरू द्या. वृद्धांना, तसेच तरुणांना ! आणि ह्या (मध्यावधी—) स्वयंवरात जो कोणी आपले बल सिद्ध करील त्यालाच मी माळ घालीन ! इकडचे-तिकडचे उसने बळ आणणाऱ्या, भाडोत्री गारदी-पलटणी उभ्या करणाऱ्या, घटकोघटकी भूमिका बदलणाऱ्या, स्वार्थाला तत्त्वज्ञानाचा सोनेरी मुलामा फासणाऱ्या तरुण नवरदेवाचीही मला अभिलाषा नाही, तर मग ह्या वृद्धांची कथा काय ? म्हणूनच म्हणते, सरळ सार्वत्रिक लढाई होऊ द्या. त्यात जो सर्वश्रेष्ठ ठरेल तोच माझा स्वामी !'

— छे, छे छे, हा (मध्यावधी—) संगर व्यवहार्य नाही. तो कोणालाच नको आहे. सध्या तरी त्यासाठी चांगलासा मुहूर्त नाही. म्हणून म्हणतो, जे नशिबी आहे, तेच हसतमुखाने स्वीकार. समाज-शारदे ! निराश होऊन रडू नकोस !

□

॥ १४ ॥

# देवरस ! तुम्हीदेखील ?

*१४ फेब्रुवारी १९८०*

आणीबाणी-विरोधी-सत्याग्रहात जिच्या हजारो शिस्तबद्ध स्वयंसेवकांनी मनःपूर्वक भाग घेऊन एकाधिकारशाहीची बलदंड फळी खिळखिळी केली होती, तसेच १९७७ च्या लोकसभा-निवडणुकीत जनता-पक्षाच्या मागे आपले कष्टाळू सैनिकांचे शिस्तशीर बळ उभे केले होते, त्या भारतव्यापी संघटनेचे– रा. स्व. संघाचे– सरसंघचालक बाळासाहेब देवरस ह्यांच्या परवाच्या अहमदाबादेतील उद्गारांनी हजारो संघ-प्रेमी लोकांच्या मनात शंकेची पाल चुकचुकली असेल ! 'रा. स्व. संघ इंदिरा-काँग्रेसशी हातमिळवणी करणार की काय ?' ह्या शंकेने व्याकुळ होऊन कैक लोकशाहीवादी, 'ब्रूटस यू टू' ह्या चालीवर म्हणाले असतील 'बाळासाहेब, तुम्हीदेखील ? ज्या इंदिरा गांधींनी निवडणूक-प्रचारसभेत रा. स्व. संघाला 'जातीय', 'संकुचित', 'फॅसिस्ट' इत्यादी दूषणे दिली होती, त्यांच्यासमोर तुम्ही सहकार्यार्थ हात पुढे करावा ? तुम्हीदेखील इंदिराजींच्या व्यक्तिमत्त्वाने प्रभावित व्हावे काय ?. . . जे बोलून चालून सत्ताराजकारणाच्या सौदेबाजीत उतरले आहेत, त्यांनी अचानक साक्षात्कार झाल्याप्रमाणे पक्षांतर करून इंदिराजींशी जवळीक साधावी, हे अशोभनीय असले तरी अस्वाभाविक नाही ! पण सत्तालोलुप राजकारणाचा धिक्कार नि सांस्कृतिक कार्याचा सत्कार करण्याचे ब्रीद जी संघटना धारण करते, तिच्या नेतृत्वपदी असूनही बाळासाहेब ! तुम्हीदेखील इंदिरा काँग्रेसकडे झुकावे काय ?. . .'

### संदिग्ध भूमिका

अशा प्रकारची प्रतिक्रिया अहमदाबादेच्या ज्या पत्रकार-परिषदेमुळे निर्माण झाली, त्या परिषदेत बाळासाहेब देवरस काय म्हणाले ? ते म्हणाले, "लोकसभा निवडणुकीत जनतेने केलेले मतदान, हे सुस्थिर केंद्रीय सरकार येण्यासाठी केलेले मतदान आहे. त्यामुळे लोकसभेची मुदत संपेपर्यंत केंद्रात स्थिर सरकार राहणे आवश्यक आहे." ठीक आहे. ह्या विधानाबाबत वाद असण्याचे कारण नाही. पण 'स्थिर' सरकार कोणत्या वृत्तीने चालणार ? हुकूमशाही सूडवृत्तीने की लोकशाही सहकार्य-भावनेने ?. . . ह्याबाबत बाळासाहेबांनी खुलासा करणे जरुरीचे होते. कारण केवळ 'स्थिरता' हा उत्कृष्ट शासनाचा एकमेव निकष असू शकत नाही. "केंद्राप्रमाणेच राज्यातील बहुमतात असलेली सरकारेही मुदत संपेपर्यंत कायम राहणे आवश्यक आहे. आणि म्हणूनच पक्ष-बदलाची प्रवृत्ती तावडतोब थांबली पाहिजे," असे बाळासाहेबांनी ह्या पत्रकार-परिषदेत सांगितले, ते अगदी योग्यच आहे. पण सध्या राज्य-सरकारे कोसळून पाडण्यासाठी पक्षबदलास उत्तेजन कोण देत आहेत ? राज्या-राज्यांतील काही दुर्दैवी घटनांचा बाऊ प्रमाणाबाहेर करून, तेथील स्थिर सरकारे उलथण्यासाठी प्रक्षोभजनक वातावरण कोण निर्माण करीत आहेत ?. . . आणि तरीही बाळासाहेब ह्या पत्रकार-परिषदेत 'श्रीमती गांधी सुधारण्याची आशा आपण करू या,' असा आशावाद कशाच्या बळावर प्रकट करताहेत नकळे !

### अन्वयार्थ

अर्थात संघप्रेमी जनांच्या मनातही साशंकता निर्माण झाली, ती बाळासाहेबांच्या वरील उद्‌गारांनी नव्हे, तर– 'श्रीमती गांधींनी देशातील समस्या सोडविण्यासाठी संघाकडे साहाय्य वा सहकार्य मागितले, तर ते निश्चितपणे दिले जाईल. इंदिरा काँग्रेस व संघ ह्यांच्यात समझौता होऊ शकेल' ह्या उद्गारांनी ! ह्या उद्गारांमुळे शंकित झालेल्यांना बाळासाहेब म्हणू शकतील की मी माझी भूमिका बदललेली नाही. मी आणीबाणी काळापासून जी भूमिका मांडत आलो आहे, तिच्याशी आजची ही सहकारवृत्ती सुसंगतच आहे ! कारण, वाचकांना हे आठवत असेल– बाळासाहेबांनी तुरुंगातून लिहिलेल्या (आणि मधू लिमये आदींनी वादग्रस्त केलेल्या–) त्या पत्रात, सर्वोच्च न्यायालयातील विजयाबद्दल इंदिरा गांधींचे (औपचारिक शिष्टाचार म्हणून) अभिनंदन करून, त्यांनी वीस कलमी कार्यक्रमाला पाठिंबा दिला होता. इंदिरा गांधींवर 'न्यूरेनबर्ग स्टाईल' कारवाई व्हावी असे जेव्हा जनता-पक्षातील जहाल म्हणत होते, तेव्हा बाळासाहेबांनी 'कोणत्याही प्रकारची न्यायालयीन कारवाई देशाच्या माजी पंतप्रधानांवर– इंदिराजींवर– करू नये,

१९७७ मार्चमधील निवडणुकांतील प्रचंड अपयश हीच शिक्षा त्यांना पुरेशी आहे,' असे मत जाहीर केले होते. आणि १९८० च्या लोकसभा-निवडणुकीपूर्वी 'संघाला निवडणूक-राजकारणात रस नाही, स्वयंसेवकांनी त्यांना वाटेल त्यास मत अथवा मदत द्यावी,' असा अलिप्ततावाद प्रकट केला होता !. . . अर्थात, बाळासाहेब देवरसांची ही भूमिका राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या परंपरागत धोरणास अनुसरूनच आहे. स्वातंत्र्यपूर्व काळातही, आद्य सरसंघचालक डॉ. हेडगेवार ह्यांच्या कारकीर्दीतही, रा. स्व. संघ, संस्था म्हणून, केवळ राजकारणापासूनच नव्हे, तर दैनंदिन जनसमस्यांपासूनही अलगच होता. 'आम्ही राष्ट्रकारणाशी निगडित आहोत, राजकारणाशी आम्हास कर्तव्य नाही,' असे संघ-स्वयंसेवक व कार्यकर्ते सांगत असत. म्हणूनच शेकडो स्वयंसेवक व्यक्तिशः जसे महात्मा गांधीपुरस्कृत असहकार चळवळीत सहभागी झाले, तसेच हिंदुसभा-पुरस्कृत भागानगर-सत्याग्रहातही सामील झाले. तसेच १९४२ च्या आंदोलनातही जसा कैक स्वयंसेवकांनी भाग घेतला होता, तसाच स्वातंत्र्यवीर सावरकर-प्रसारित सैन्य-भरतीच्या कार्यक्रमातही शेकडो संघ-स्वयंसेवक सहभागी होते. (याच कारणास्तव, कित्येक महासभा नेत्यांप्रमाणेच काँग्रेस-नेत्यांचीही संघाला सहानुभूती लाभली होती !) पण रा. स्व. संघ-संघटना म्हणून, अधिकृतरीत्या राजकारणापासून दूरच राहिली !. . . ही अलिप्तता अपरिहार्य असण्याचे कारण एकच. आणि ते हे की 'हिंदू समाज-हिंदू संस्कृती' ह्यांना 'सर्वेषां अविरोधेण' — कार्यपद्धतीने सुसंघटित नि समर्थ करण्याच्या उद्देशाने, तरुण पिढीवर नैतिक संस्कार घडविणारे एक मैदानी विद्यापीठ म्हणजेच राष्ट्रीय स्वयंसेवक संघ', ही डॉक्टर हेडगेवारांची संकल्पना. आजही हीच संकल्पना बहुसंख्य स्वयंसेवकांच्या मनात आहे. आणि तिच्याशी सुसंगत असाच बाळासाहेबांच्या प्रस्तुत अहमदाबादेतील विधानांचा अन्वयार्थ लावला गेला पाहिजे, अशी अपेक्षा कोणी केली, तर ती निखालस चूकही म्हणता येणार नाही. पण—

## एकतर्फी औदार्य

असा अन्वयार्थ लावला जाण्याजोगते वातावरण सध्या विद्यमान नसताना, बाळासाहेब देवरसांसारख्या अनुभवी नेत्याने, (सध्या एकाधिकारशाही प्रवृत्तींची चढती कमान असताना—) उपर्युक्त गोंधळ उडविणारी नि लोकशाहीवाद्यांचे नीतिधैर्य खचण्यास कारणीभूत होऊ शकणारी विधाने टाळावयास हवी होती. ह्या विधानांतून व्यक्त झालेली मते, बाळासाहेबांची वैयक्तिक मते आहेत, की राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यकारिणीने बहुमताने मंजूर केलेली आहेत? जोपर्यंत इंदिरा गांधींनी सहकार्याचे जाहीर आवाहन केलेले नाही तोपर्यंत ही सहकार्याची एकतर्फी (युनिलॅटरल) तयारी दाखविण्याचे औदार्य

तरी कशासाठी ? ते असो. 'इंदिरा-काँग्रेसच्या सरकारांना जे साहाय्य करावयाचे ते केवळ पक्षातीत विधायक उपक्रमांबाबतच आहे. आमची सहकार-सिद्धता म्हणजे इंदिरा-शरणता नव्हे. एकाधिकारशाही धोरणांना पाठिंबा तर नव्हेच नव्हे' हे देवरसांनी अगदी सूर्यप्रकाशाइतके स्पष्ट करण्याची जरुरी आहे. जनता पक्षातील काही स्वयंमन्य 'पुरोगामी' मंडळींनी एके काळी संघाचे गोडवे गाऊन नंतर मात्र त्याच्यावर बेफाम टीकेचे आसूड ओढले हे खरे. कित्येक महाभागांना रा. स्व. संघ 'मुस्लीम लीग' वा 'खोमेनी' ह्यांच्याहूनही जातीय वाटू लागला, आणि त्याला धारेवर धरण्यातच त्यांनी 'सेक्यूलरवादा'ची परमावधी मानली हेही खरे. पण ह्याची कडवट प्रतिक्रिया म्हणूनदेखील संघ-नेत्यांनी ही संघटना एकाधिकारशाहीकडे झुकविण्याची चूक करता कामा नये ! अलीकडील पराभवाने खचून न जाता, गडबडून न जाता, समस्त लोकशाहीवादी शक्तींनी एकजुटीने उभे राहण्याचा हा काळ आहे. आणि म्हणूनच बाळासाहेब देवरसांनी आपल्या सहकार-सिद्धतेचा सविस्तर खुलासा करून साशंकतेचे मळभ दूर केले पाहिजे.

□

॥ १५ ॥

# विसरा आणि क्षमा करा?

*५ डिसेंबर १९७७*

झाले गेले गंगेला मिळाले, असे म्हणून उन्मत्तांनी केलेले अत्याचारही कालांतराने विसरणे, हा आपल्या सोशिक भारतीयांचा स्वभावधर्म आहे. 'क्षमा शस्त्र जया नराचिये हातीं। दुष्ट तयाप्रती काय करी? ॥' असा आपल्या संतांचा सवाल आहे. 'फरगिव्ह अँड फरगेट' हे धोरण भारतीय समाजाने जेवढे अवलंबिले आहे, तेवढे ते अन्य कोणत्याही समाजाने अवलंबिले नसेल. 'शठासी व्हावे शठ' असे समर्थ रामदासांसारख्या व्यवहारनिष्ठ संतांनी म्हटले असले, तरी बहुतेकांची शिकवण क्षमाशीलतेचीच आहे. म्हणूनच महात्मा गांधींनी राजकारणाचे अध्यात्मीकरण करण्याचा हव्यास धरून, 'शठं प्रति सत्यम्' ह्या यतिधर्माचा पुरस्कार केला! चंदनवृक्ष, आपल्या जीवावर उठलेल्या कुऱ्हाडीच्या पात्याचेही मुख सुगंधित करतो, तद्वत माणसांनी वागावे, अपकाराचीही फेड दिलदार उपकाराने करावी, हिंसाचारावर अहिंसेचे मलम लावावे, क्रोधाला अक्रोधाने जिंकावे, पतित गुन्हेगार पश्चात्ताप-पावन कसे होतील ह्याची कोशिस करावी, आपण स्वतः आत्मक्लेश सोसून अट्टल अपराध्यांचे हृदयपरिवर्तन करावे, असा गांधीजींचा सल्ला असे, आग्रह असे...

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मान्यवर बाळासाहेब देवरस हे तसे गांधीवादी नव्हेत. जयप्रकाश नारायणांप्रमाणेच गांधीजींविषयी ते पूज्य भाव बाळगणारे आहेत, पण गांधीवादाचे दीक्षित खचित नव्हेत. आणि तरीही मुंबई-पुणे येथील त्यांच्या सत्कारसमारंभात ते उद्गारले, 'आणीबाणीच्या काळ्या कालखंडातील दुर्दैवी घटनांबाबत विसरा आणि क्षमा करा, या आवाहनाशी मी थोडासा (म्हणजे किती?) सहमत आहे. मी

असे विधान करणे लोकांना आश्चर्याचे वाटेल. कारण आणीबाणीच्या काळात इतरांसमवेत लक्षावधी संघ-स्वयंसेवकांनाही कठोर कारावास घडला आहे. त्यांच्या कुटुंबियांना नि सहानुभूतिदर्शकांनाही छळ सहन करावा लागला आहे. पण तरीही 'जशास तसे' या धोरणाने देश चालू शकणार नाही. अर्थात याचा अर्थ असा नव्हे की, आणीबाणीच्या सर्व गुन्ह्यांना क्षमा करावी." बाळासाहेबांचे चारित्र्य नि देशभक्ती जयप्रकाशांप्रमाणेच उज्ज्वल आहे, ह्याबद्दल त्यांचे विरोधकही ग्वाही देतील. आणि तरीही आम्हास वाटते की, त्यांनी आणीबाणीतील कोणत्याही अनुचित घटनेबाबत वा लहानशाही अपराधाबाबत 'विसरा आणि क्षमा करा' हा यतिधर्म बोलू नये. संघासारख्या सांस्कृतिक संघटनेच्या नेत्याला ही साधुवृत्ती व्यक्तिशः शोभादायक असेलही, पण राजकारणाच्या धकाधकीच्या मामल्यात ही 'विसरा नि क्षमा करा'ची लहानशी फटही अनर्थकारक ठरेल. बाळासाहेब देवरसांप्रमाणेच आम्हीही 'राज्य करणे म्हणजे सूड उगवणे नव्हे' हे जाणतो आणि क्षमाशीलता हा विशिष्ट मर्यादेत सद्गुणच होय, हे मान्य करतो. पण क्षमा कोणाला? जे खरोखरच पश्चात्तापाने पोळले असून जनताजनार्दनाला मनोभावे 'क्षमस्व परमेश्वर' असे म्हणतील त्यांना! ज्यांच्या हातावरील काळ्या पैशाचे नि निरपराधांच्या रक्ताचे डाग अद्यापि जसेच्या तसेच आहेत, आणि तरीही ज्यांच्या डोळ्यांत खोट्या पश्चात्तापाचेही अश्रुबिंदू दिसत नाहीत अशांना क्षमा का करावी?

जॉर्ज फर्नांडिस यांचे धाकटे बंधू मायकेल-लॉरेन्स नि वृद्ध माता-पिता ह्यांना ज्यांनी अतीव मनस्ताप दिला, लॉरेन्सचा अमानुष छळ तुरुंगात केला, त्यांना क्षमा? लॉरेन्स निदान राजकारणी जॉर्जचा भाऊ होता. पण कन्नड अभिनेत्री स्नेहलता रेड्डी? केवळ संशयावरून पोलिसांनी तिचा नि तिच्या मुलांचा असह्य छळ केला. परिणामी तुरुंगातून सुटका होताच तिचा मृत्यू घडला. काय स्नेहलतेचा छळ नि मृत्यू विस्मरणात ढकलावा नि त्या छळवादी राक्षसांना क्षमा करावी? श्री. बी. जी. ख्रिस्तोफर ह्या आंध्रदेशीय गरीब कारकुनाच्या माय-बहिणींना नग्न करून, त्यांची घोर विटंबना त्याच्या समक्ष करणाऱ्या नरपशूंना क्षमा करायची? केरळच्या राजन नावाच्या कॉलेज विद्यार्थ्याचा आजही पत्ता नाही (त्याचा केव्हाच तुरुंगातील छळाने मृत्यू झाला म्हणतात) त्या राजनच्या आईवडिलांच्या करुण हंबरड्यांना उत्तरादाखल काय 'विसरा नि क्षमा करा' असे सांगणार? तुर्कमनगेटच्या गरीब नागरिकांवर अमानुष गोळीबार होऊन शेकडो लोक मेले. त्यांची प्रेते म्युनिसिपालिटीच्या 'डॉग व्हॅन' मधून नेण्यात आली, कचऱ्याच्या गाड्यांतून नेण्यात आली, त्यांचे ओघळणारे रक्त श्वान-शूकरांनी चाटले! ही सारी हत्याकांड-कथा ऐकून राष्ट्रपती फक्रुद्दिन अलीही हळहळले होते. पण आपण काय ह्या मृतांच्या नातेवाइकांना क्षमावृत्ती धारण करावयास सांगणार?— झोपड्या-झोपड्यांवरून

फिरलेले बुलडोझर्सचे आवाज अद्यापी पुरे शमले नाहीत, कारावासांतील निरपराधांच्या करुण किंकाळ्या अद्यापि हवेत विरल्या नाहीत, आणि हजारो मायबहिणींच्या कपाळींचे मंगल-तिलक पुसले गेले, मंगळसूत्रे तुटली ! ह्या साऱ्या घटनांना दुर्दैवी म्हणून स्मृतिपार कसे करता येईल? आठ-दहा वर्षांच्या बालकांवर नि जख्खड वृद्धांवर झालेले नसबंदीचे अत्याचार कसे विसरता येतील?

ह्या साऱ्या दानवी घटनांना कारणीभूत झालेले एकतंत्री हुकूमशाहीचे नि आणीबाणीचे जे निर्माते नि साथीदार त्यांना कोणत्याही अपराधाबद्दल क्षमा करता येणे शक्य नाही. 'जशास तसे' ह्या न्यायाने नव्हे, सूडभावनेने नव्हेच नव्हे, तर न्यायाच्या पावित्र्यासाठी— गुन्हेगारी मनोवृत्तीला कायमची दहशत बसविण्यासाठी— भावी काळात अशा आसुरी लीलांची कधीही पुनरावृत्ती होऊ नये म्हणून — कडक सजा झालीच पाहिजे. आणि हे शासन केवळ मामुली 'गारद्यां'ना नव्हे, तर लोकशाही-नारायणाचा वध करण्याचा हुकूम देणाऱ्या सूत्रधारांनाही झाले पाहिजे. किंबहुना, सत्तापिपासू सूत्रधारांनाच जन्माची आठवण राहील, असे जबर शासन झाले पाहिजे.

— अनवधानानं झालेल्या चुकीला क्षमा करता येईल एक वेळ, पण आणीबाणीत जे जे अपराध जाणीवपूर्वक झाले, त्यांना कधीही क्षमा करता येणार नाही. मग तो अपराध कोणाचाही असो, केवढाही असो. सारांश, ज्यांना राज्य करावयाचे आहे, किंबहुना स्वराज्याचे सुराज्य करावयाचे आहे, त्यांना राजकारणाच्या खेळात सात्त्विक औदार्य दाखविता येणार नाही. राज्यकर्त्यांचे काळीज कर्तव्यकठोर पोलादाचे असावे लागते, सात्त्विक क्षमाशीलतेचे मेण येथे सहसा कामी येत नाही. कर्तव्याच्या कुरुक्षेत्रात उभे राहिल्यावर भीष्म-द्रोणांवरही अर्जुनाला अखेर कठोर बाणच सोडावे लागतात— 'विसरा नि क्षमा करा' हे धोरण स्वीकारता येत नाही !

□

॥ १६ ॥

## संघ-सभेचा निर्णय

*२५ मार्च १९८०*

गेली दीड-दोन वर्षे 'दुहेरी निष्ठे'च्या प्रश्नाने जनता-पक्षाची निम्मी हाडे खिळखिळी केल्यावरही हा प्रश्न शिल्लक उरावा, हे कितीही खेदजनक असले, तरी कटू सत्य होय ! एखाद्या दुर्धर व्याधीपासून मुक्तता हवी असेल, तर त्या व्याधीचे समूळ उच्चाटन करणे हाच शहाणपणाचा व श्रेयस्कर मार्ग ठरतो. रा. स्व. संघाशी जनता-पक्षाचे किंवा संघाचे जनता पक्षाशी कोणत्या प्रकारचे संबंध असावेत, या जटिल प्रश्नाचा कायमचा सोक्षमोक्ष जर जनता-पक्षाच्या स्थापनेच्या वेळीच (अथवा प्रारंभीच्या काळात) लावून टाकला असता, तर ते दोघांच्याही दृष्टीने इष्ट ठरले असते. पण आजचे मरण उद्यावर ढकलण्याच्या आत्मघातकी प्रवृत्तीमुळे, जनता-पक्षाचे सर्व श्रेष्ठी या प्रश्नाचा कायमचा निकाल लावण्याचे टाळीत राहिले. ह्या 'अशुभस्य कालहरणम्' धोरणाला संघ-जनांनीही प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे हातभार लावला. आणि त्यातूनच शेवटी आजची दारुण परिस्थिती उद्भवली ! आता यापुढे तरी अधिक कालापहरण करू नये या निर्धाराने जनता-पक्षाच्या कार्यकारिणीने एक आठवड्यापूर्वीच जनता-पक्षाच्या पदाधिकाऱ्यांना व आमदार-खासदारांना संघाची दारे बंद करण्याचा निर्णय बहुमताने घेतला. या निर्णयाला अर्थातच कार्यकारिणीतील बाजपेयी-अडवानी-देशमुख या संघत्रयीचा विरोध होता. 'संघाच्या स्वयंसेवकांनाच ही अपमानास्पद व दुय्यम दर्जाची वागणूक का ?' असा या तिघांचा आक्षेप होता. एवढेच नव्हे, तर २२ मार्चला संघाच्या प्रतिनिधी सभेची बैठक याच प्रश्नाचा विचार करण्यासाठी भरत असताना, कार्यकारिणीने घाई करू नये, असाही पूर्वाश्रमीच्या जनसंघ नेत्यांचा युक्तिवाद होता. हा सर्व इतिहास सविस्तर प्रसिद्ध झाल्याने

त्याची पुनरावृत्ती येथे करण्याचे कारण नाही. पण एवढे खरे की, जनता-पक्षाच्या कार्यकारिणीने 'शेंडी तुटो वा पारंबी तुटो' ही घायकुतीची भूमिका एकदा स्वीकारल्यानंतर, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या प्रतिनिधी-सभेने, जो निर्णय रविवारी घेतला, त्यापेक्षा वेगळ्या निर्णयाची संघाकडून अपेक्षा करणेही व्यर्थच होते ! 'जनता-पक्षातील दुहेरी निष्ठेच्या प्रश्नाची या ठिकाणी चर्चा करण्याची आता गरज उरलेली नाही,' असाच प्रस्ताव संघाच्या सर्वश्रेष्ठ प्रतिनिधीसभेत संमत होणे, क्रिया-प्रतिक्रिया-न्यायाने क्रमप्राप्त होऊन बसले होते ! आपल्या स्वयंसेवकांना मन चाहेल त्या राजकीय पक्षात जाण्यास मज्जाव करण्याची संघाची तयारी नाही, असाच या प्रस्तावाचा अर्थ आहे.

## अपरिहार्य निर्णय

संघाच्या प्रतिनिधी-सभेने घेतलेल्या या भूमिकेमुळे जनता पक्षाविषयी सहानुभूती असणाऱ्या लोकशाहीवाद्यांना काय वाटेल, हे, न्या. छागला यांनी ज्या पद्धतीने संघाच्या या निर्णयाबद्दल खेद प्रदर्शित केला आहे, त्यावरून स्पष्ट होते, 'दुहेरी निष्ठे'चा प्रश्न इतक्या चिरडीवर यावयास नको होता, त्यायोगे आणखी फाटाफूट व्हावयास नको, अशीच जनताप्रेमी मंडळींची मनोभावना आहे. संघाच्या प्रतिनिधीसभेने घेतलेला हा तीव्र प्रतिक्रियात्मक निर्णय चूक की बरोबर, या वादात या ठिकाणी शिरण्याचे प्रयोजन नाही. असा निर्णय न घेता संघाच्या प्रतिनिधी-सभेने जनताश्रेष्ठींच्या मताप्रमाणे आपल्या स्वयंसेवकांना राजकीय पक्षाची दारे बंद केली असती, म्हणजेच जनता पक्षातील पूर्वाश्रमीच्या जनसंघीयांना संघातून काढून टाकले असते, तर जनता पक्षाचे हित झाले असते की नाही, हा प्रश्नही जर-तरच्या स्वरूपाचा आहे. त्याची चर्चाही आता अप्रस्तुत आहे. पण एक गोष्ट मात्र स्पष्ट की, यापेक्षा वेगळा निर्णय घेणे, प्राप्त परिस्थितीत संघालाही अत्यंत मुश्किल होते. कारण, जनता पक्षातील निर्णयावर जसा पक्षबाह्य शक्तींचा प्रभाव नको, अशी जनताश्रेष्ठींची रास्त भूमिका आहे, तद्वतच संघानेही इतरांच्या दडपणाने कोणतेही निर्णय घेऊ नयेत, असे संघ-नेत्यांना वाटणे स्वाभाविकच म्हणावे लागेल. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रमुख सरसंघचालक बाळासाहेब देवरस यांनी एक वर्षापूर्वीच 'संघातील परिवर्तना'संबंधी बोलताना असे म्हटले होते की, 'संघाच्या स्वयंसेवकांच्या इच्छेनेच कोणतेही परिवर्तन घडून येईल. पिस्तुलाचा धाक दाखवून कोणीही संघात परिवर्तन करू पाहील, तर ते परिवर्तन संघास मान्य होणार नाही.' पण समजा, संघाच्या प्रतिनिधी-सभेने वेगळा निर्णय घेतला असता व जनता पक्षातील संघ स्वयंसेवकांना संघाच्या दैनंदिन कार्यक्रमातून अर्धचंद्र दिला असता तर? तर जनता पक्षासमोरील आजचा पेचप्रसंग फार तर तात्पुरता मिटला असता. कायम स्वरूपाचा

तोडगा त्यामुळे निघू शकला नसता, असे आम्हास वाटते.

## चिघळलेली जखम

आम्ही असे म्हणतो, त्यामागे 'दुहेरी निष्ठे'च्या प्रश्नाचा इतिहास आहे, ह्या चिघळलेल्या जखमेचा 'केस-पेपर' आहे ! जनता पक्षातील भाऊबंदकी मिटून तो पक्ष इंदिरा-काँग्रेसला एक तुल्यबळ असा पर्यायी पक्ष म्हणून उभा राहावा, हीच आमची प्रारंभापासूनची लोकशाहीनिष्ठ भूमिका. पण आम्हा सामान्यजनांच्या ह्या भूमिकेहून, कैक जनतानेत्यांची सत्ता-लालसा अधिक बलवत्तर ठरली ! आपली अनावर सत्तालालसा झाकून ठेवण्यासाठी चरणसिंग-जगजीवनराम प्रभृतींनी सोयीस्करपणे संघाचा बागुलबोवा प्रमाणाबाहेर उभा करण्याचा प्रयत्न केला. अगदी काही जनताहितैषी मंडळींना वाटते त्याप्रमाणे, संघ जनता पक्षात विलीन झाला असता किंवा बाजपेयी, अडवाणी प्रभृतींनी जाहीरपणे संघाचा अव्हेर केला असता, तरी जनता-पक्षातील या असंतुष्ट गटाचे कितपत समाधान झाले असते आणि ते कुठवर टिकले असते, याबद्दल आम्हास शंका आहे. मधू लिमये, चरणसिंग, राजनारायण, जगजीवनराम यांची संघासंबंधीची काही काळापूर्वीची मते पाहिली, तरी संघाचा प्रश्न एखादे निमित्त म्हणूनच त्यांना हवा होता, असेच नाइलाजाने म्हणावेसे वाटते. १९७४-७५ मध्ये चरणसिंगांनी आपण होऊन बाळासाहेब देवरसांना भेट देऊन भाक्रांद व जनसंघ यांचे विलीनीकरण व्हावे अशी सूचना केली होती, तेव्हा चरणसिंगांना संघाचा विटाळ का वाटला नाही, असा मार्मिक प्रश्न प्रा. मधू दंडवते यांनीच एके ठिकाणी विचारला आहे. आता जगजीवनराम बाबू हे संघविरोधी घोषणा देऊन जनता पक्षाबाहेर पडले हे खरे, पण गेल्याच वर्षी १९७९ च्या एप्रिलमध्ये जगजीवनराम यांनी दिलेल्या एका सविस्तर मुलाखतीत संघाची भलावण केलेली आहे, ती काय म्हणून ? 'जनता पक्षाची ध्येय-धोरणे मान्य करून जर कोणी पक्षाचे सदस्यत्व स्वीकारले, तर त्याच्या दुहेरी निष्ठेबद्दल वाद उकरून काढणे हे निरर्थक आहे,' असे त्या वेळी जगजीवनराम यांचे म्हणणे होते ! ज्या वेळी मधू लिमये, राजनारायण, जॉर्ज फर्नांडिस, चरणसिंग यांनी संघाचे बुजगावणे पुढे करून जनता-पक्ष सोडला, त्या वेळी जगजीवनरामांनी जाहीरपणे तीव्र नापसंतीच व्यक्त केली नव्हती काय ? संघ स्वयंसेवकांना जनता पक्षात प्रवेश-मज्जाव करावा काय ? असा स्पष्ट प्रश्न मुलाखतकर्त्याने विचारला असता, बाबूजी कोणताही आडपडदा न ठेवता म्हणाले होते की, 'असा मज्जाव कसा करता येईल ? एखाद्याने पक्षाचे ध्येय-धोरण मान्य करून त्यांच्या अंमलबजावणीत आडकाठी आणली नाही तोपर्यंत, त्याला पक्षाबाहेर काढले जाऊ लागले, तर पक्षाचे काम चालणेच अशक्य होऊन जाईल.' अच्युतराव

पटवर्धनांसारख्या राजकारणापासून दूर असलेल्या त्रयस्थ विचारवंतानेही या साऱ्या प्रकाराने अस्वस्थ होऊन विचारले होते, 'संघाने असे काय केले, या वर्ष-दीड वर्षातच असे काय घडले की, ज्यामुळे संघाचे या सर्वांना वावडे वाटावे? संघाविरुद्ध सर्वजण बोलतात, पण त्याने काय केले हे कोणी सांगतच नाही.'

### यथा काष्ठं च काष्ठं च

ह्या इतिहासाचा ओझरता उल्लेख येथे करण्याचे प्रयोजन एवढेच की, 'दुहेरी निष्ठे'ची समस्या, ही सोडविण्यासाठी नव्हतीच, तर सोयीनुसार वापरण्यासाठीच होती, ही दुर्दैवी परिस्थिती लक्षात यावी. ही परिस्थिती कायम राहण्याच्या बाबतीत, जनता-पक्षातील इतर घटकांप्रमाणेच पूर्वाश्रमीचे जनसंघवाले नि संघवालेही दोषभागी आहेत. आम्ही संघ-जनांचे आंधळे तरफदार अथवा उथळ टीकाकार नसल्याने, वेळोवेळी संघ-जनांना 'तदेकं वद निश्चित्य,' गोलमाल भाषा न वापरता एकदाचा सोक्षमोक्ष लावून टाका,' असा सल्ला दिला होता. कारण, प्रेमाप्रमाणेच ऐक्य-भावनाही मनमोकळेपणानेच निर्माण होते आणि ती 'लगाये न लगे और बुझाये न बने' असे आमचे स्पष्ट मत होते नि आहे. आम्ही हेही पूर्वीच आवर्जून सांगितले आहे की, रा. स्व. संघासंबंधी जे काही ग्रह-आग्रह वा पूर्वग्रह पसरले आहेत वा पसरविले जात आहेत, त्यांचे निराकरण करण्याचा संघाने कधी प्रयत्नच केला नाही. 'संघ अमूक असा आहे आणि अमूक तसा नाही' असे केवळ संघाच्या स्वयंसेवकांनी म्हणून उपयोगी नाही. इतरांची (किमानपक्षी, आपल्या भागीदारांची !) तशी खात्री पटली पाहिजे. संघनेत्यांना या कामी यश आले नाही, किंबहुना त्यांनी तसा प्रयत्नही केला नाही, असे खेदाने व नाइलाजाने म्हणावे लागते. त्यांनी असा प्रयत्न अधिक नेटाने वा प्रामाणिकपणे केला असता, तर कदाचित आजचे चित्र काहीसे वेगळे दिसले असते. सोमवार व मंगळवार असे दोन दिवस मुंबईत मोरारजीभाईंच्या पुढाकाराने सामोपचाराचा अखेरचा प्रयत्न होत आहे. पण त्यातून काही निष्पन्न होईल काय? आता तीनच पर्याय उरले आहेत– (१) जनता पक्षातील अन्य घटकांना जर पूर्वाश्रमीच्या जनसंघवाल्यांचा रा. स्व. संघ संबंध मान्य नसेल, तर जनसंघीयांनी जनता-पक्षाबाहेर पडणे, (२) जनसंघीयांनी संघाशी संबंध तोडून जनता-पक्षात राहणे, (३) सर्वच. घटक-पक्षांनी 'जनता-पक्ष' हे भारतीय लोकशाहीला पडलेले एक अल्पकालीन स्वप्न होते, पण ते आता भंग पावले आहे हे वास्तव सत्य लक्षात घेऊन, प्रेमाने परस्परांचा निरोप घेऊन वेगवेगळी वाटचाल करणे !

तिसरा पर्याय प्रत्यक्षात उतरल्यास महाभारतकारांनी सांगितलेले कठोर सत्य येथेही प्रत्ययास येईल–

*यथा काष्ठं च काष्ठं च*
*समेयातां महोदधौ ।*
*समेत्य च व्यपेयातां*
*तद्वत भूत-समागमः ॥*

(ज्याप्रमाणे एखाद्या महान सागरात भिन्न भिन्न काष्ठे एकत्र येतात, काही काळ एकत्र वाहतात आणि मग एका दुर्भागी लाटेसरशी अलग होऊन जातात, त्याचप्रमाणे ह्या संसार-सागरातील प्राणिमात्रांची (आणि पक्षांचीही !) अवस्था आहे !

□

॥ १७ ॥

# इंदिराजींचे डोळे !

*७ ऑगस्ट १९७७*

देह-नगरीचा राजा आहे हृदय आणि राणी आहे बुद्धी ! पण राजाराणी हुकूम-वटहुकूम काढण्यापलीकडे काही करत नाहीत. प्रत्यक्ष कृती, अंमलबजावणी करतात हात-पाय, नाक-कान, जीभ-डोळे हे देहनगरीचे सरदार ! ह्या सर्वांत श्रेष्ठ आहेत डोळे. (विशेषतः सुंदर नारींचे डोळे !) हे मूक असूनही ग्रंथच्या ग्रंथ बोलतात; अत्यंत नाजूक असूनही तलवारीहून धारदार बनतात; एकाच वेळी मध, अमृत नि हलाहल ह्यांची वृष्टी करू शकतात ! कधी सुखाची संवेदना तर कधी दुःखाची तीव्र वेदना अश्रूंचे रूप धारण करून नेत्रांतूनच घळघळा ओघळते ! तिरपेपणा इतरत्र खटकला, तरी नयनांच्या बाबतीत खटकत नाही. उलटपक्षी तिरप्या कटाक्षांनी इश्काची लज्जत दसपट वाढते ! भुवयांच्या धनुष्यावरून सुटलेल्या नैनबाणाने मोठेमोठे ऋषीमुनीही घायाळ होतात, तिथे सामान्यजनांची काय कथा ? एरव्ही काळ्याकुट्ट काजळाला कोणी ढुंकूनही विचारले नसते. पण डोळ्यांचा संयोग घडताच काळे काजळही देखणे दिसू लागले ! डोळे— विशेषतः रमणीचे डोळे— अत्यंत प्रभावी असल्यामुळेच त्यांत काही अलौकिक जादुगारी असल्याचा भास होऊ लागला !

परंतु केवळ सौंदर्य-शालिनीचेच डोळे जादुभरे नि प्रभावी असतात आणि इश्काच्या नाजूक मुलखातच ते पराक्रम गाजवितात, असे नाही. राजकारणाच्या खडतर प्रदेशात सत्ता-शालिनीचे नेत्रही प्रचंड विक्रम करू शकतात ! सत्ताशालिनीची मेहरनजर हजारोंना सुख देऊ शकते, हजारो रंकांना राव बनवू शकते. सत्ताशालिनीच्या कृपादृष्टीने एका क्षणात गावगुंडांना पुढाऱ्यांची, मूर्खशिरोमणींना बृहस्पतीची, विदूषकांना विनोदाचार्यांची, पाजी

पायपोसांना शिरोरत्नांची महती प्राप्त होऊ शकते ! आणि सत्तावतीची खपानजर होताच एका क्षणात हजारो निरपराधांच्या घरादारांवरून गाढवांचे नांगर फिरतात; हजारो देशभक्तांच्या कपाळी 'देशद्रोही,' 'हिंसाचारी,' 'परक्यांचे हस्तक' इत्यादी बेछूट आरोपांच्या लांच्छन-मुद्रा बिनाचौकशी ठोकल्या जाऊन, त्यांची रवानगी कारावासात होते ! सत्ताशालिनीची मेहरनजर वा क्रुद्ध नजर काय चमत्कार करू शकते, ह्याचा अनुभव आपणास 'आणीबाणी'च्या त्या काळयाकुट्ट कालखंडात आलेलाच आहे. इंदिरा गांधींची नजर जोवर सरळ होती, त्यांचे डोळे जोवर केवळ देशाच्या विकासाकडेच लागले होते, तोवर त्यांनी केलेली देशसेवा त्यांचे विरोधकही विसरू शकणार नाहीत. . . विशेषतः बांगला देशाच्या मुक्तिसंग्रामात त्यांनी बजावलेली कामगिरी पाहून कोट्यवधी स्वातंत्र्यवाद्यांचे डोळे निवले. पण ह्या कर्तबगार स्त्रीच्या डोळयांवर ज्या वेळी सर्वंकष सत्तेची धुंदी चढली तेव्हा ? 'पुत्राचे सहस्र अपराधही' तिला दिसू शकले नाहीत, आणि सच्च्या देशसेवकांच्या, लोकनायकांच्या सरळ कृत्यांतही तिला हिंसाचारी राष्ट्रद्रोह दिसू लागला ! इंदिराजींची मेहरनजर लाभावी म्हणून हजारो काँग्रेसजन बुभुक्षित लाचार नजेरने त्यांच्याकडे पाहू लागले; 'रामशास्त्री' म्हणविणारे शेकडो बहाद्दर चमकशास्त्री नमकशास्त्री बनले ! तेव्हा त्यांच्या डोळयाला डोळा भिडविण्याची कुणाची शहामत नव्हती. 'इंदिरा इज इंडिया' अशी भाटगिरी करणारे महाभाग इंदिरेच्या डोळयांवरील सत्ता-मदिरेची धुंदी कशी काय उतरवू शकणार ? उलटपक्षी ते त्या डोळयांची तारीफच करू लागले—

*इन्किलाबकी जबान है*
*तुम्हारी आँखे !*
*काँग्रेसकी शान है,*
*तुम्हारी आँखे !*

इंदिराजींच्या दोषांबद्दल तक्रार करावी, त्यांना जाब विचारावा, अशी ऊर्मी मनात आली, तरी त्यांच्यापुढे जाताच काँग्रेसजनांचे सारे अवसान गळून जात असे. आणि मग ते मनातल्या मनात म्हणत—

*थी खता उनकी, मगर*
*जब आ गये वो सामने ।*
*झुक गयी मेरीही आँखे,*
*चष्मे सियासत् देखिये ॥*

आणि ज्यांचे लोकशाहीबाबतचे इमान इंदिरा-प्रभावाने डळमळू लागले होते असे कैक संभ्रमित मऱ्हाठी काँग्रेसधुरीण दबक्या भयभीत आवाजात निष्फळ उद्गार काढीत—

*चव्हाणको (म्हणजे यशवंतरावांना !)*
*बुलाओ ! मेरा इमान संभाले ।*
*फिर देख लिया उसने,*
*काफिर की नजर से ।।*

परंतु इंदिराजींच्या त्या पाखंडी नजरेपासून स्वत:चाही बचाव करण्यास यशवंतराव पुरेसे समर्थ नव्हते; मग इतरांची काय कथा ?

इंदिरा-नजरेच्या इशाऱ्यावर चालणाऱ्या त्या 'आणीबाणी'त 'इंदिरा म्हणजेच इंडिया' हे खुशामतखोर घोषवाक्य प्रतीकात्मकरीत्या शिल्पांकित करण्याचा बेत आखला गेला. भारताचे मानचित्र शिल्पबद्ध करून, त्यात राजधानीच्या जागी प्रियदर्शनीचा चेहरा दाखवायचा, अशी ती कल्पना होती. ह्या चेहऱ्यात जे भारताकडे कृपादृष्टीने पाहणारे डोळे, ते 'फॉरेन'हून इंपोर्ट करण्यासाठी २ ।। लाख रुपयांचे परकीय चलन आवश्यक होते. हाय हाय ! पण २ आठवड्यांपूर्वीच जनता-पंतप्रधान मोरारजी देसाई ह्यांनी 'त्या डोळ्यांसाठी विदेशी चलन दिले जाणार नाही,' अशी घोषणा करून इंदिरा-भक्तांना दु:खात लोटले—भारतही त्या मिसाधारिणी देवीच्या शिल्पबद्ध कृपादृष्टीला अंतरला !. . . पण. . . पण ही महत्त्वाकांक्षी राजकारण-पारंगत देवी अशी तशी नाही. तिच्या शिल्पाकृतीत जनता-धुरंधर खो घालू शकले, तरी तिच्या चतुर कृतीत ते कितपत खो घालू शकतील ? तिच्या कर्तबगार करामती नजरेच्या आड कितपत येऊ शकतील ? पहा— गेल्या काही दिवसांत राजकारणाच्या रंगमंचावर पुन्हा पदार्पण करण्यासाठी अनेक वाटा ती इंदिरा-नजर शोधू लागली आहे. ती पवनारच्या विनोबा-आश्रमाकडे वळली— राजकारणाकडे वळण्यासाठीच ! त्या आश्रमात इंदिरा-दर्शनेच्छूंची रीघ लागली आणि बाबांनी आपला गूढ नि गुप्त आशीर्वाद तिला दिला ! इंदिरा-नजरेला हा आशीर्वाद नजर होताच, शेरेकश्मीर शेखअब्दुल्लाही तिच्या सेवेस धावले. 'काश्मीरमधून लोकसभेसाठी उभ्या रहा' अशा ऑफरचा नजराणा त्यांनी दिला ! अलीकडेच खासदार खुर्शीद अलमखान ह्यांच्या निवासस्थानी आणि कर्नाटकी खासदार एफ. एम. खान ह्यांच्या पुढाकाराने दिल्लीच्या 'कर्नाटक हाऊस'मध्ये इंदिरादेवींच्या पुनरागमनाचे स्वागतगीत गाण्यासाठी, दोन्ही सभागृहांतील डझनावारी काँग्रेस सदस्य तसेच माजी नामदार-खासदार गोळा झाले आणि म्हणू लागले— "पुनश्च काँग्रेसकडे नि देशाच्या राजकारणाकडे ते कृपाळू इंदिरा-नेत्र वळावेत ! 'इंदिरा-यशवंत-ब्रह्मानंद' असे नवे सामुदायिक नेतृत्व आकारास यावे !" असे नेतृत्व आकारास येताच कालांतराने सामुदायिकतेचा स्वाहाकार करून, एकमेव अद्वितीय इंदिरा नेतृत्वच पुन्हा निर्माण होईल, असे जाणकार राजकीय निरीक्षकांच्या नजरेस वाटते ! ते काहीही असो, इंदिराजींचे डोळे सक्रिय राजकारणाकडे वळले आहेत हे निश्चित !

□

## ॥ १८ ॥ दार उघड, बया दार उघड !

*१८ जून १९७८*

तुम्ही नाना प्रकारचे दरवाजे पाहिले असतील. शनिवारवाड्यासारख्या जुनाट वाड्याचे, रायगडसारख्या दणकट किल्ल्यांचे ! काही भक्कम लाकडी तर काही आधुनिक लोखंडी; काही दोन पंखांचे तर काही बिनपंखांचे, — नाटकाच्या पडद्याप्रमाणे गुंडाळले जाणारे (रोलिंग) ! आत काय चालले आहे ह्याचा मुळीच थांगपत्ता न लागू देणारे, मुरब्बी राजनीतिज्ञासारखे मख्ख; तर काही आपल्या फटी-फटीतून आतला तमाशा पाहू देणारे चहाडखोर ! काही दरवाजे उदार, नेहमी खुलेच राहणारे, तर काही खाशांनाच प्रवेश देणारे !

पण हा, अलीकडेच वृत्तपत्रांत गाजत असलेला देवीजींच्या छावणीचा दरवाजा असा तसा नाही. हा 'देवराजां'नी देवदार वृक्षापासून बनविलेला अन् 'बुट्ट्या-बुट्ट्यां'नी शोभिवंत केलेला भव्य सुंदर दरवाजा, साक्षात भूलोकीच्या स्वर्गाचाच दरवाजा म्हणा ना ! ह्या दरवाजातून जे भाग्यशाली भाविक आत जातील, ते आपली अस्मिता गमावून— अभिमान गमावून— स्वतंत्रता गमावून— 'स्वर्गस्थ'च होतील ! ह्या भव्य दरवाजावर प्रगतीच्या पर्वातील पराक्रमांची चित्रे कोरलेली असून, त्यात कोठे कोठे रक्ताचा लाल रंग भरलेला आहे. दुबईच्या सुवर्णरसांनी विधायक विचारांची २० सूत्रे ह्या दरवाजावर रेखाटली आहेत. ह्यावरील एक चित्र आहे 'जग हे बंदिशाळा' हा महान वेदान्त सूचित करणाऱ्या तुरुंगाचे. दुसरे चित्र आहे 'अनुशासन' ह्या अक्षरांनी अंकित झालेल्या मजबूत राजदंडाचे ! औद्योगिक प्रगती सूचित करणाऱ्या एका मोटारीच्या कारखान्याचेही चित्र ह्या दरवाजावर शोभते आहे !. . . हा दक्षिणापथातील दगडांच्या पायावर दक्षिणेला उभा

असलेला दरवाजा उत्तराभिमुख असून, दिल्लीकडेच नजर रोखीत आहे ! देवीजींचा दुर्ग जसा आंध्र-कर्नाटक-तामिळनाडूमधील कारागिरांनीच मुख्यतः बांधला, तसाच हा दरवाजाही त्यांनीच तयार केला. असा हा आगळा वेगळा दरवाजा ! विरोधकांचा काटा काढण्यात कुशल असलेल्या फतेहपूर शिक्रीचा 'बुलंद दरवाजा' ज्याच्यापुढे ठेंगणा वाटेल असा हा दरवाजा !

या दरवाजाच्या देवडीवर काही दिवसांपूर्वी बराच शुकशुकाट होता. पण आता त्याला पुनश्च पूर्ववैभव येऊ लागले असल्याने देवडीवर याचकांच्या टोळ्या झांजा वाजवून भजन म्हणताहेत—

*"जय देवी, जय देवी*
*जय साहस-चतुरे !*
*सत्ता-दायिनी देई*
*आम्हा हार-तुरे !"*

महंमद गजनीने सोरटी सोमनाथाची दुर्दशा केली, पण येथे ते शक्य नाही. कारण देवीजींच्या केसाला साक्षात न्याय-देवतेने जरी थोडासा धक्का लावला, तरी सारा मुलूख पेटवून देण्याची प्रतिज्ञा केलेले वीर हातात पेटते पलिते घेऊन, दरवाजावर पहारा देत खडे आहेत ! इतका आकर्षक दरवाजा ह्यापूर्वी कोणत्याही दुर्गाला-देवळाला-महालाला किंवा मंदिराला लाभला असेलसे वाटत नाही. मग नवल कसले की उर्दू शायरीतील आशिकांप्रमाणे—

'बिस्तर बिछा दिया है तेरे दर के सामने' असे गर्जत शेकडो महाभागांनी ह्या दरवाजासमोरच्या पायऱ्या-पायऱ्यांवर आपले बाडबिस्तरे ठेवले आहेत !

खरोखरच 'देवीजींच्या द्वारी । उभा क्षणभरी । तेणें मुक्ति चारी । मेळविल्या ॥' अशा भावनेने ज्या दरवाजापुढे याचकांच्या झुंडी लोटत आहेत, त्याला उर्दू शायरीच्या नायिकेच्या दरवाजाची शान प्राप्त झाल्यास आश्चर्य नाही. उर्दू शायरीतील लाचार प्रेमिक कित्येकदा म्हणतो, "तुझ्या मैफलीत, तुझ्या 'इन्नर कॅबिनेट'मध्ये, मला प्रवेश न मिळाला तरी हरकत नाही. मला तुझा द्वारपाळ तर करशील ना ? करून तर पहा. मग—

***गैर को आने न दूं***
***तुमको कहीं जाने न दू ।***
***काश ! मिल जाये तुम्हारे***
***दर की दरबानी मुझे !***

(कोणत्याही गैर माणसाला, प्रतिगामी व्यक्तीला आत येऊच देणार नाही. तुम्हालाही बाहेर पडण्याची तकलीफ देणार नाही. भाग्यवशात तुमच्या दरवाजाचा दरबान झालो

तर !) साधारणतः ही अशीच लाचारी ह्या देवीजींच्या दरवाजापुढे घोंगावत आहे. . . अरे, पण हे काय? ह्या दरवाजापुढे कणखर सह्याद्रीचे नरशार्दूल? सातपुड्यापाशीच अश्वमेधाचा घोडा रोखण्याची ज्यांची ताकद, तेदेखील ह्या दरवाजापुढे जमा होऊन दीनवाणी आराधना करताहेत? दार ठोठावत आहेत? आणि म्हणताहेत—

*'दार उघड, बया दार उघड !'*

तुझ्यापाशी एकरूप-एकदिल होण्यासाठी आम्ही आलो आहोत, दार उघड, बया दार उघड ! एकट्याच्या बळावर शत्रूचा निःपात करणे शक्य होणार नाही, तुझ्या पाठबळाची आम्हास जरुरी आहे, म्हणूनच दार उघड, बया दार उघड ! कोणत्याही ऐहिक लाभासाठी नव्हे, तर देशाच्या परम कल्याणासाठीच आम्हास तुझ्या दिलजमाईची प्यास लागली आहे. हे लक्षात घे अन् दार उघड बया दार उघड ! काय? तुझे खासे खासे भक्तशिरोमणी— तुझे औरस भक्त— म्हणताहेत, 'दिलजमाई नको, ऐक्य नको, काहीही नको, संपूर्ण शरणागतीच हवी ?' तोपर्यंत दरवाजा बंद ?. . . छे छे, हे खरे वाटत नाही. खरेच का तू दरवाजा खोलणार नाहीस? कोणी म्हणतात— 'तू दरवाजा बंद केला आहेस, अगदी आतून कडी लावून बंद केला आहेस. कारण तुला ऐक्यभावाची तळमळच नाही, स्वतःचा भाव वाढवून घेण्याची हाव आहे ! तुला समान दर्जाची सन्मान्य मैत्री नकोच आहे. अशांनाच तू आत घेशील की, जे तुझे कायमचे बंदे गुलाम होऊन, आपले सारे व्यक्तिमत्त्व विलीन करण्यास सिद्ध होतील ! मोठ्या मासोळीने छोटी मासोळी गिळणे म्हणजेच खरी एकरूपता, अशी तुझी एकतेची व्याख्या आहे !'. . . पण ह्या कुत्सित टीकेवर आम्ही विश्वास कसा ठेवावा? तू तुझा शानदार दरवाजा कायमचा बंद केलास, ह्यावर आमचा विश्वास बसत नाही. आमचे काही व्यवहारपंडित आम्हास धीर देताहेत— 'निराश होऊ नका. देवीजी दिलदार आहेत, समंजस आहेत, ऐक्यभावाचे त्या स्वागतच करणाऱ्या आहेत. त्यांचा दरवाजा बंद दिसतो, पण वस्तुतः तो तसा बंद नाही. केवळ 'जयघोषा'चा त्रास होऊ नये म्हणून तो लोटून घेतला आहे इतकेच ! भक्तांची दिंडी आत घेण्यासाठी दिंडी-दरवाजा खचित खुला होईल. . .' हा आमच्या पंडित मित्रांचा आशावाद सार्थ करण्यासाठी दार उघड, बया दार उघड ! किमानपक्षी, दिंडी-दरवाजा तरी उघड !

'पुरे झाले हे एकरूप होण्याचे भजन ! भोळसट भक्तिभावाचे करा दफन' असा गडगडाट हे शरद-मेघ करताहेत, 'फुटीरतेच्या देवतेला ऐक्यभावाचा नैवेद्य कशाला दाखविता? तिला ऐक्यभाव हवा आहेच कोठे?' असा कठोर सवाल आमचे एकेकाळचे गुरुवर्य करताहेत. त्यांची भाकिते खोटी पाडण्यासाठी तरी, दार उघड बया दार उघड !

जर तू खरोखरीच दरवाजा कायमचा बंद केलास तर? तर आमच्या नशिबाचाच

दरवाजा बंद झाला, असे म्हणणे भाग आहे. पण आमच्या नशिबाची बात राहू दे. आम्हास वैयक्तिक स्वार्थ कसा तो ठाऊकच नाही. कोट्यवधी गोरगरिबांच्या कल्याणासाठीच आम्हास सहकार्य दे. दार उघड. बया, दार उघड !. . . तू निष्ठुर ठरू नयेस म्हणून दार उघड. तू दीर्घद्वेषी ठरू नयेस यासाठी तरी दार उघड. तू सद्भावनेला सद्भावनेने प्रतिसाद देत नाहीस, आपला हेका सोडत नाहीस, अशी तुझी बदनामी टाळण्यासाठी तरी दार उघड ! ऐक्यभावाची तुझी गंगा आमच्या आदरभावाच्या यमुनेला मिळावी आणि साऱ्या दुनियेचे प्रयागक्षेत्र व्हावे, याकरिता हे दलित-दैन्य-हारिणी, सहकार्याचा दरवाजा उघड !

□

॥ १९ ॥

# धन्य धन्य संत इंदिराजी !

*२४ एप्रिल १९७९*

अप्रत्यक्षपणे इंदिरा गांधींच्या एकाधिकारशाहीचा पुरस्कार करणाऱ्या काँग्रेसच्या महासमितीचे ताबूत दोन दिवस आपल्या परीने बेफाम नाचून थंडे झाले. ह्या अधिवेशनाला मतदानाचा पूर्ण हक्क असलेले काँग्रेस महासमितीचे ३७६ सदस्य उपस्थित होते, असा दावा इंदिरा काँग्रेसचे सरचिटणीस बॅ. अंतुले ह्यांनी केला होता, पण महासमिती सदस्यकक्षात पुरते अडीचशे सदस्यही बसलेले दिसत नाहीत, हे पत्रकारांनी निदर्शनास आणले, तेव्हा अंतुल्यांनी 'ते इतर कक्षांत बसलेले आहेत,' अशी बालिष्टरी केली अन् वेळ मारून नेली. दुसऱ्या स्वर्णसिंग काँग्रेसच्या कार्यकारिणीनेही ह्याच सुमारास पूर्वीचा निर्णय बदलून, काँग्रेस महासमितीचे अधिवेशन भरविण्याचा निर्णय कालच घेतला, हेही ह्या संदर्भात विसरता येत नाही. त्यामागेही त्या पक्षाच्या धुरिणांचे काही अंदाज-होरे असण्याची शक्यता आहे. आणि तेही राजकारणात कसलेले नेते आहेत हे ध्यानात घेता इंदिरा-काँग्रेसला मिळालेला देशातील काँग्रेसजनांचा पाठिंबा त्या पक्षाचे नेते दाखवितात तेवढा भरघोस होता, असे म्हणता येत नाही. इंदिरा काँग्रेसवाल्यांना स्वतःच्या नावातील इंदिरादर्शक 'आय' काढण्याची तर एवढी घाई झाली होती की, त्यांनी तसा ठरावही टाळ्यांच्या गजरात संमत केला आणि काँग्रेस दुभंगण्यापूर्वीच्या महासमितीच्या बैठकीतील कामकाजाच्या अहवालाला मंजुरीही दिली.

अर्थात पक्षाच्या नावातील इंदिरादर्शक 'आय' काढला म्हणून गांधींचा मी-पणा (आय) गेला का ? मुळीच नाही. अधिवेशनात सर्वप्रथम जो ठराव संमत झाला तो देशात आणीबाणीकालीन गुन्ह्याचा विचार करण्यासाठी स्थापण्यात येणाऱ्या खास न्यायालयांना

विरोध करणारा. या खास न्यायालयांमुळे इंदिरा गांधी आणि त्या काळात त्यांच्याभोवती असलेली संजय गांधी- शुक्ला- धवन ही त्यांची प्रभावळ, ह्यांना विशेष त्रास होणार असला, तरी ह्या प्रभावळीचे राज्याराज्यांतील साथीदारही त्यामधून सुटणार नाहीत, हेही तेवढेच खरे आहे. साहजिकच हा ठराव सर्वानुमते संमत झाला तर त्यात आश्चर्य नाही ! खुद्द इंदिरा गांधींना ह्या ठरावाविषयी किती अगत्य आहे हे त्यांच्या समारोपाच्या भाषणातील 'खास न्यायालय-विधेयक-विरोधी दिल्लीतील १६ मे ची निदर्शने कमालीची जोरदार होऊ द्या, खूप माणसे जमवा'- ह्या आर्त आदेशावरून दिसून आले आहे ! किंबहुना काँग्रेस महासमितीचे हे अधिवेशन भरविण्यामागे इंदिरा गांधी ह्यांचे जे प्रमुख उद्देश होते त्यांपैकी 'खास न्यायालय-विरोधा'च्या उद्देशाला अग्रक्रम द्यावा लागेल. त्यांना बाकी कशाची विशेष पर्वा नव्हती. उभय काँग्रेसच्या ऐक्य वाटाघाटी फिसकटल्या तेव्हाच त्यांनी 'आपली लढाई आपणालाच लढावयाची आहे' ही खूणगाठ मनाशी बांधलेली होती. आपणाला त्यासाठी जास्तीत जास्त कितीजण आपल्यामागे आणता येतील, एवढेच त्या पाहत होत्या. 'तुम्ही हव्यात म्हणून आम्ही तुमच्या कुत्र्यांनाही जवळ करावे (लैला प्यारी , तो लैला का कुत्ताभी प्यारा !) हे योग्य नाही,' ही तारकेश्वरी सिन्हा ह्यांची संजय गांधींच्या संदर्भातील टीका त्यांना झोंबली आणि त्यावरून अधिवेशनात इंदिरा-तारकेश्वरी खटकाही उडाला. म्हणूनच, संजयविषयीचे त्यांचे एकूण अधिवेशनातील मौन सर्वार्थसाधक होते, हे विसरता येत नाही. मॅयनीहान ह्यांच्या आरोपांविषयीदेखील त्यांनी असाच गोलमाल खुलासा केल्याचे जाहीर झाले आहे. म्हणजे त्यांना सोयीस्कर नसलेले अप्रिय विषय तेवढे शक्यतो टाळायचे होते, जनता सरकारविरुद्ध रानं पेटवता येईल एवढ्याच विषयांचा ऊहापोह करावयाचा होता. इंदिरा गांधींनी हे कार्य मात्र सर्वशक्तिनिशी केले. 'रा. स्व. संघाविना जनसंघ नाही आणि जनसंघाविना जनता पक्ष नाही' हे त्यांचे आवडते तुणतुणेही त्यांनी नेहमीप्रमाणेच वाजविले.

तारकेश्वरी नि देवराज अर्स ह्यांची पहिल्या दिवशीची भाषणे सुलताना इंदिराजींना मुळीच पसंत नव्हती. आणि दुसऱ्या दिवशी त्यांनी कितीही 'पॅचवर्क' केले, तरी आपल्या पक्षातही आपल्या पायाखालील वाळू थोडीबहुत घसरत चालल्याचा प्रत्यय त्यांना आलाच असला पाहिजे. इंदिरा-काँग्रेसच्या ह्या दोन दिवसांच्या भक्तमेळाव्यात, जरी देवराजांनी संजय-विरोधी सूर काढला अन् तारकेश्वरीने 'वॉक आऊट'चा रुसवा केला, तरी एकंदरीत इंदिराजींपुढे आरतीच ओवाळली गेली ! एका भारावलेल्या प्रतिनिधीने तर संत इंदिराजींवर पुढील अभंग रचल्याचे समजते—

> ***जगाच्या कल्याणा इंदिरेची मूर्ती***
> ***गरिबी भारती— प्रकटली ।।***

*आणीबाणीचे ती करी समर्थन*
*म्हणे 'समर्थ न – दुजा कोणी !'*
*पुत्राचे सहस्त्र घडता प्रमाद*
*नच मानी खेद– माताजी ती !*
*वदते, 'मी सिद्ध जरी संन्यासाते,'*
*राजकारणाते– सोडवेना–*

(कारण ?. . .)

*बुडती हे जन न पाहवे डोळां*
*तयांचा कळवळा– मला येई !*
*'जनता'चे राज्य अपेशी, अस्थिर*
*म्हणोनी सुस्थिर– मला करा !*
*कैची येई कामा 'तिसरी ती शक्ति'*
*ऐका माझी युक्ती–मुक्तिदायी ।*
*हिला साथ देता सत्तेच्या नाटकी*
*अर्स कर्नाटकी– चक्रावले*
*साठे-अंतुलेची मग काय बात ?*
*धोटे जांबुवंत – नम्र होती !*
*ऐक्य गुन्हाळात मोहिते यशवंत*
*दोन्हीही वसंत– पस्तावले !*
*लोकशाहीचा तो जरी झाला अंत*
*तरी नच खंत– हिला काही ।*
*ऐसी नामवंत भारत-देशात*
*धन्य धन्य संत– इंदिराजी !*

□

॥ २० ॥

# म्हणे विसरून जा !

*३ फेब्रुवारी १९८०*

तुम्हीच सांगा– विशाल समाजाच्या मानाने व्यक्तिगत जीवन ते केवढे ? महान सिंधूमधील लहान बिंदूएवढे ! पण तरीही ह्या चिमुकल्या जीवनातील– विशेषतः वैयक्तिक इश्काच्या मुलखातील– आठवणी माणसे जपून ठेवतात, त्या आठवणींच्या साठवणीत भूतकाळ जपून ठेवतात. कधीकधी जर खुद्द प्रेयसीपेक्षा प्रेयसीच्या आठवणीच त्यांना श्रेष्ठ वाटतात. ते म्हणतात– 'प्रिये, तुझ्यापेक्षा तुझी यादच अधिक चांगली. कारण, तू तर बोलावले तरी येत नाहीस. पण तुझी आठवण न बोलावता येते ! . . . विशेषतः प्रेमात अपयश आले नि हृदयभंग झाला तर भूतकालीन रम्य क्षणांच्या आठवणींचाच आधार घ्यावा लागतो. आणि म्हणावे लागते–

*हसीन यादोंकी शम्मे*<br>
*मुझे जलाने दो ।*<br>
*मजार है मेरे सीने में*<br>
*आरजूओंके ॥*

माझ्या हृदयात आकांक्षांची शवपेटिका आहे. तिच्यावर मला सुंदर आठवणींच्या ज्योती उजळू द्या !. . . पण मानवी जीवनात सुखाचे क्षण 'जवापाडे' आणि दुःख मात्र पर्वताएवढे ! मग सुंदर आठवणीही अगदी थोडक्याच असणे– अथवा अजिबात नसणे– हेच संभवनीय नाही काय ? भूतकालीन दुःखकारक आठवणीच

जर अधिक असतील, तर त्या विसरणेच योग्य नाही काय? माणसे कडवट नि क्लेशकारक आठवणी विसरण्याचा प्रयत्न जरूर करतात. पण हाय! त्या आठवणींचे खोल व्रण बनल्यामुळे तो प्रयत्न विफल होतो. कोणी शायर म्हणतो—

*याद इक जख्म बन गई, वर्ना*
*भूल जाने का कुछ खयाल तो था*

परंतु ह्याबद्दल प्रेमीजनांना वा सामान्य जनांना दोष देणे इष्ट नाही. भूतकालीन कटू प्रसंग मोठमोठ्या व्यक्तीही, वैभवाच्या राजेशाही सुखातही विसरू शकत नाहीत. ह्याच जन्मात नव्हे, तर पुढील जन्मातही विसरू शकत नाहीत. हेच सत्य कथन करणारा 'लीलाशुक बिल्वमंगल' कवीचा 'कृष्णकर्णामृत' काव्यातला तो अत्यंत सुंदर श्लोक ह्या संदर्भात सहज आठवतो. त्यातील प्रसंग असा आहे : यशोदा बाल श्रीकृष्णाला रामायण-कथा सांगून झोपवीत आहे.

**यशोदा** : पूर्वी ईक्ष्वाकू वंशात राम नावाचा पराक्रमी राजा होऊन गेला!

**कृष्ण** : हूं.

**यशोदा** : त्याच्या पत्नीचे नाव सीता.

**कृष्ण** : हूं.

**यशोदा** : वडील दशरथाचे वचन पूर्ण करण्यासाठी राम-सीता वनात गेले. पंचवटी-अरण्यात राहू लागले. तेथेच एके दिवशी रावणाने सीतेचे अपहरण केले! . . .

बस्स! येथेच ते कथाकथन भंग पावले. कारण, श्रीकृष्णाने स्वतःचीच ती रामावतारातील पुरातन कथा ऐकताच सीताहरणाच्या उल्लेखासरशी गतजन्मातील आठवण आणि वीरवृत्ती जागृत होऊन तो एकदम गर्जला — "लक्ष्मणा! माझे धनुष्य कोठे आहे? धनुष्य, धनुष्य, धनुष्य!"

*(रामो नाम बभूव– 'हुं';*
*तदबला सीतेति– 'हुं'; तौ पितुः*
*वाचा पंचवटी-वने निवसतः*
*तां आहरत् रावणः ॥*
*कृष्णेनेति पुरातनीं निजकथां*
*आकर्ण्य मात्रेरितां,*

*सौमित्रे ! क्व ध्वनुर्ध्वनुर्ध्वनुरिती*
*प्रोक्ता गिर: पान्तु व: ॥)*

सारांश, भूतकालीन कडवट घटना नि अन्याय-अत्याचार विसरणे तर फार मुश्किल असते. एकवेळ साखरेच्या पदार्थांची चव विसरता येईल, पण कडू कोयनेलची कुरुची विसरता येणे दोघांनाही अशक्य !

फार दूर कशाला जा. सांप्रत, भरघोस हुकमी बहुमतांच्या पाठिंब्यावर दिल्लीच्या तख्तावर स्थानापन्न झालेल्या इंदिरा गांधींचेच उदाहरण घ्या ना. 'आणीबाणीचा सुमारे २ वर्षांचा (काळाकुट्ट) कालखंड आता इतिहासजमा झाला असल्याने तो विसरावा', असे अत्यंत उचित आवाहन त्यांनी नुकतेच लोकसभेतील भाषणात केले खरे. पण त्या स्वतःच आपल्या सत्ताभ्रष्टतेचा सुमारे ३ वर्षांचा कालखंड विसरलेल्या नाहीत, हे त्याच भाषणावरून दिसून येते. म्हणूनच त्यांनी विरोधी पक्षांवर अतिरेकी अतएव अन्याय्य टीकेचे आसूडही आवेशाने ओढले. 'आता आणीबाणीच्या मेलेल्या घोड्याला ('डेड हॉर्स'ला) झोडपत बसण्याची खोड विरोधकांनी सोडावी, असा उपदेश करीत असतानाच, त्याच त्या असिद्ध आरोपांचे– गतकालीन असिद्ध गोष्टींचे– तुणतुणे त्या वाजवीतच राहिल्या. कोणताही ठोक पुरावा सादर न करता आपले आणि आपल्या पिताजींचे चित्र जाळून टाकण्याचा आदेश जनता-परराष्ट्र खात्याने आपल्या वकिलातींना दिला होता, ही आठवण त्या उगाळीत बसल्या ! सी. बी. आय. चे एक अधिकारी एन. के सिंग ह्यांना केवळ एका उलटलेल्या साक्षीदाराच्या तक्रारीच्या आधारावर अशोभनीयरीत्या हरयाणा-पोलिसांनी पकडून नेल्याचे प्रकरण नव्या राजवटीचा आणीबाणी-पॅटर्न प्रदर्शित करीत असतानाच, जनता-पक्षाने कायदेशीररीत्या केलेल्या चौकशी आयोगांच्या आठवणींनीही इंदिराजी आज संतप्त होताहेत !. . . विद्यमान साधुसंतांचा आशीर्वाद घेणाऱ्या, ठिकठिकाणच्या देवस्थानांना भेटी देणाऱ्या, यथासांग पूजाअर्चा करणाऱ्या आणि आज हुकमी बहुमताचा खऱ्याचे खोटे नि खोट्याचे खरे करू शकणारा परीस हाती असताना जर इंदिराजी ३३ महिन्यांचा वनवास विसरू शकत नाहीत, तर 'आणीबाणी'चे वळ विरोधी पक्ष नि होरपळलेले लोक सत्वर कसे विसरतील? जनता-पक्षाने काहीच भले केले नाही, असे इंदिराजी कितीही कंठरवाने म्हणाल्या, तरी त्या पक्षाने केलेली काही सत्कृत्ये जशी विसरता येणे कठीण आहे, तसेच आणीबाणीतील अत्याचार नि भ्रष्टाचार विस्मृतीच्या गर्तेत फेकणे फार अवघड आहे !

— तो सारा कटू भूतकाळ विसरविणे, किमानपक्षी त्याच्या स्मृती अंधुक करणे,

हेच उद्दिष्ट असेल, तर उपाय एकच आहे— सूडबुद्धीने न वागता पक्षातीत व्यापक दृष्टीने लोकशाही सत्कृत्यांचे नवे पर्व सुरू करणे! अक्रोधाने क्रोध जिंकणे, वर्तमानकालीन पुण्याईचा पाऊस पाडून भूतकालीन पातक धुणे! ही जबाबदारी सर्वांचीच असली, तरी सत्तारूढ पक्षावर तिचा विशेष बोजा नि बोज आहे!

□

॥ २१ ॥

# 'मी जादुगारिणी नाही'

*१६ मे १९८०*

जेव्हा जेव्हा आपला वर्तमान-काळ उजळ नसतो, निराशाधूसर असतो, तेव्हा दोन गोष्टी आपल्याकडून कळत-नकळत होतात. एक तर आपण 'एक काळ ऐसा होता' ह्या थाटात आपला भूतकालीन भलाबुरा पराक्रम कथन करतो अथवा भविष्यकाळचे उज्ज्वल चित्र रंगवितो ! आपली सामान्य माणसांची ही प्रवृत्ती बड्या नेत्यांत नि राज्यकर्त्यांतही आढळते. असे नसते तर, श्रीमती इंदिरा गांधी ह्यांनी आपल्या अलीकडच्या निवडणूक प्रचारसभेत आपल्या आणीबाणीपूर्व 'प्रगतिदशका'चे चित्र रेखाटले नसते आणि वर्तमानकाळात दुःख भोगत असलेल्या गरीब जनतेला 'धीर धरा, थोडी कळ सोसा, आम्हाला साथ द्या, सर्व काही ठीक होईल', असे भविष्यकालीन सुस्थितीचे आश्वासन दिले नसते ! सामान्य माणसाची आणखी एक प्रवृत्ती असते आणि ती म्हणजे सद्यःकालीन खडतर परिस्थितीचे संपूर्ण खापर पूर्वकालीन व्यक्तींवर अथवा अन्य क़ोणावर फोडणे. ह्याबाबतीत असामान्य माणसेदेखील सामान्यांचाच हा धोपटमार्ग आचरतात. परवाच मुंबई येथे इं. काँ. निवडणूक प्रचाराचा नारळ फोडताना इंदिराजींनी हेच केले. पूर्वीच्या जनता व काळजीवाहू राजवटींच्या नावाने खडे फोडले ! 'घोडा का निकामी झाला? भाकरी का करपली? आणि पाने का कुजली?' ह्या प्रश्नांचे उत्तर एकच– 'न फिरवल्याने.' ह्याच चुटक्याच्या धर्तीवर 'अवाढव्य चलनवाढ का? साखरेचा तुटवडा का? गोडेतेल, साखर, सिमेंट-पोलाद, अन्नधान्य महागडे का? अत्यावश्यक वस्तूंची चणचण का? इतकेच नव्हे, तर जातीय तणाव का? हरिजनांवर अत्याचार का? कायदा-सुव्यवस्था ह्यांची स्थिती कोसळलेली का? स्त्रियांवर बलात्कार का?' ह्या

साऱ्या (आर्थिक नि बिन-आर्थिक) प्रश्नांचे इंदिराजींनी एकच उत्तर दिले— 'हे सारे जनता-सरकारच्या अकार्यक्षम कारभारामुळे! सुमारे २ ॥-३ वर्षांत विरोधी-राजवटींनी माझ्या प्रगतिदशकावर बोळा फिरविला. इतकेच नव्हे, तर असे काही घोटाळे सर्व आघाड्यांवर करून ठेवले की आम्ही म्हणूनच ते निस्तरतो आहोत,' हा इंदिराजींच्या भाषणाचा आशय.

पण तो कितपत खरा आहे? जनता-राजवटीत अंतर्गत भांडणे होती हे कबूल (म्हणून तर जनताजनार्दन रुष्ट झाला), पण तिने आर्थिक आघाडीवर (मूलभूत स्वातंत्र्यावर प्रहार न करता, वटहुकुमांचे आसूड न उगारता) जी काही प्रगती केली, ती अगदीच उपेक्षणीय खास नव्हे. अर्थात लोकशाही पद्धतीने होणारी प्रगती ही नेहमी मंदगतीच असायची. पण ह्या प्रगतीतच जनता-राजवटीने कित्येक चांगल्या गोष्टींचा— विशेषतः लोकशाही प्रथांचा— पाया घातला. परंतु, इंदिराजी जनता-राजवटीत 'काही भले झाले' हे मानावयासच तयार नाहीत. उलटपक्षी, आपण मोठ्या कष्टाने उभारलेला धान्यसंचय नि धन-संचय जनताने उधळून टाकल्याचा नि आजच्या भाववाढीस नि टंचाईस जनता-पक्षच कारणीभूत असल्याचा उघडउघड एकांगी नि अतिरेकी प्रचार त्या करताहेत. जनता-राजवटीने आपल्या कारकीर्दीत काय केले, हे याच स्तंभातून आम्ही पूर्वी मांडले असल्याने त्याची पुनरुक्ती करण्याचे कारण नाही. पण इंदिराजींना कोणीही विचारू शकेल की आपल्या 'प्रगति-दशका'ने जर सारे काही आलबेल केले होते, तर 'आणीबाणी'ची जरुरीच काय होती? स्मगलर्स— काळाबाजारवाले— गुन्हेगार ह्यांना वठणीवर आणण्यासाठी आणीबाणीचे उपाय योजण्याची पाळीच का आली? सारांश, श्रीमती गांधी भासवितात तेवढे त्यांच्या राजवटीत आलबेल खास नव्हते.

पण त्या भूतकालीन गोष्टी जाऊ द्या. गेल्या ४-५ महिन्यांत (प्रगतीच्या १०० दिवसांत!) इं. कॉं. सरकारकडून गरिबांना दिलासा वाटेल, निदान भावी काळाबद्दल आशा वाटेल, असे काही विशेष घडलेले नाही. जनता-राजवटीच्या भांडकुदळ उत्तरार्धाला विटलेल्या सामान्य जनांनी, 'इंदिराजींसारख्या कणखर, बलदंड व्यक्ती'ला (आणि गाड्याबरोबर नळ्याची यात्रा, ह्या न्यायाने इंदिरा-कॉंग्रेसला!) भरघोस पाठिंबा दिला तो मोठ्या अपेक्षेने. तो आणीबाणीला पाठिंबा नव्हता, तर दोषसंकुल असूनही जबरदस्त असलेल्या एका विभूतीला दिलेला पाठिंबा होता. आता साहजिकच ताडितपीडित जनता काही इंदिराकृत चमत्काराची अपेक्षा करते आहे! पण असे काही घडत नाही हे पाहताच, हीच गरीब उतावीळ जनता आपल्या बलाढ्य देवतेवर 'न पावलेली भगवती' (गॉडेस दॅट फेल्ड) म्हणून रुसण्याचाही संभव आहे, हे इंदिराजींसारख्या चाणाक्ष बुद्धिमतीच्या लक्षात आले असावे आणि म्हणून त्या प्रचार-दौऱ्यात पुनः पुन्हा सांगताहेत, "माझ्यात

काही चमत्कार नाही. माझ्यापाशी जादूची कांडी नाही, 'मॅजिक वॅण्ड' नाही !"

— खरेच आहे. पुढारी केवढाही प्रचंड प्रज्ञेचा वा प्रभावाचा असो, अखेर तो माणूसच. त्याच्यापाशी 'जादूची कांडी' नसतेच. जादू असते ती दुःखित-दलित जनतेच्या भाबड्या भक्तिभावात— विभूतीवरील श्रद्धेत ! ही श्रद्धाच हळूहळू डळमळत चालली आहे, असा आभास श्रीमती गांधींच्या अलीकडील वक्तव्यांवरून मनात तरळतो.

□

॥ २२ ॥

# दिल्ली-शरणता

*१२ जून १९८०*

आपल्या महाराष्ट्राचे नवे सुविद्य मुख्यमंत्री बॅरिस्टर अब्दुल रहेमान अंतुले ह्यांच्या मस्तकी मानाचा मुकूट चढल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करीत असतानाच आम्ही याच स्तंभातून त्यांना इशारा दिला होता की—

'परि कंटकमय तो हेम-मुकुट अवलोकी !' ह्या मुकुटाला सोन्याची झळाळी असली, तरी अनेक अडचणींचे-समस्यांचे काटेही लगटले आहेत ! अंतुले ह्यांना ह्या वस्तुस्थितीची चुणूक लगेच मंत्रिमंडळ बनवितानाच आली आहे. (कदाचित हा अग्रलेख प्रसिद्ध होईपर्यंत मंत्रिमंडळाच्या जडणघडणीची समस्या निकालात निघून, भाग्यशाली मंत्र्यांची यादी प्रसिद्धही झाली असेल !) 'श्रीवर्धनचा आधुनिक बाळाजी विश्वनाथ— इंदिराजींचा विश्वासू हात— अनाथ कोकणचा कर्तबगार कांत' अशा आशयाच्या स्तुतीचा वर्षाव, अभिनंदनाची बरखा-बहार, पुष्पहारांनी खुशबूदार झालेले सत्कार . . हे सारे स्वीकारून आणि आपल्या संभाव्य मंत्र्यांच्या शुभनावाची यादी खिशात ठेवून, श्री. अंतुले दिल्लीला सानंद रवाना झाले ! यादीवर इंदिराजींनी नजर टाकण्याचा उपचार एका दिवसात पूर्ण होऊन, बुधवारी नव्या मंत्रिमंडळाचा शपथविधी होईल अशी त्यांची अपेक्षा होती. पण तसे झाले नाही. मंत्रिमंडळाची प्रसूती सुलभतेने होईना. उपमुख्यमंत्रिपदाचा वाद उपस्थित होऊन, त्या पदाच्या प्राप्तीसाठी तीन नारी नि दोन नरोत्तम ह्यांची रस्सीखेच सुरू झाली. आपापली खास गुणवत्ता (क्वॉलिफिकेशन्स) पुढे करून शालिनीताई पाटील, प्रतिभाताई पाटील नि सरोजताई खापर्डे ह्या महनीय ताईमंडळींनी तर उपमुख्यमंत्रिपदावर हक्क सांगितलाच, शिवाय रामराव आदिक नि जवाहरलाल दर्डा

ह्यांनीही आपली इच्छुकता व्यक्त केल्याचे वृत्त झळकले. हे झाले उपमुख्यमंत्रिपदाचे सत्ता-रामायण ! शिवाय, मंत्रिपदाचे डझनावारी इच्छुक दिल्लीला तळ ठोकते झाले ते वेगळेच ! ह्यात अर्धा डझन खासदारांचाही समावेश ! मग जे ह्यांच्याहून कमी महत्त्वाकांक्षी अथवा कमी सामर्थ्यवान ते समर्थांना नम्रतेने म्हणू लागले—

*नित्य तुम्ही प्रभु-चरणी*
*पेढे-बर्फी नवा खवा खावा,*
*मग आम्ही गरिबांनी*
*रेवडीचा स्वाद का न चाखावा ?*

उपमुख्यमंत्रिपदाचे पेढे अथवा मंत्रिपदाची बर्फी तुम्हास खुशाल मिळो, आम्हाला उपमंत्रिपदाच्या रेवड्या तरी मिळाल्याच पाहिजेत ! ह्या साऱ्या कलकलाटाने बिचाऱ्या अंतुल्यांचा मुख्यमंत्रिपदाचा मजा 'किरकिरा' होऊन गेला असेल, आणि इंदिराजींचे कान किटले असतील !

## चलो दिल्ली !

बॅरिस्टर अंतुले ह्यांची भूमिका अशी की, उपमुख्यमंत्रिपद हवेच कशाला ? आणि निर्माण केले तरी त्याचा दर्जा मंत्रिपदा-इतकाच असावा. तथापि, उपमुख्यमंत्रिपदाच्या इच्छुकांचे— विशेषतः शालिनीताईंचे— म्हणणे असे की, वसंतदादा पाटील मुख्यमंत्री असताना, नासिकराव तिरपुडे उपमुख्यमंत्री होतेच ना ? मग तीच इंदिरा-निर्मित प्रथा पुनरुज्जीवित करण्यास हरकत कोणती ?. . . हा अग्रलेख प्रकाशित होईपर्यंत हे सारे वाद बहुशः मिटले असतील (अर्थात इंदिराजींच्या हस्तक्षेपामुळे !). बॅरिस्टर अंतुले ह्यांच्या मंत्रिमंडळातील मानकरी निश्चित ठरून गेले असतील. पण दिल्ली-मुक्कामी ह्याप्रीत्यर्थ घडलेली रस्सीखेच केवळ अंतुले ह्यांनाच नव्हे, तर इतरेजनांनाही बरीच उद्‌बोधक ठरावी. . . असे पहा कीं बॅरिस्टर अंतुले हे 'एकमता'ने मुख्यमंत्रिपदी निवडले गेले आहेत ना ? शर्मा व केसरी ह्यांच्या अहवालानुसार बहुसंख्य आमदारांचा त्यांनाच पाठिंबा होता नि आहे ना ? शिवाय, सरतेशेवटी त्यांच्या नावावर श्रीमती इंदिरा गांधी ह्यांनी केवळ पसंतीचीच नव्हे, तर विश्वासार्हतेचीही मुद्रा ठोकली आहे ना ?. . . तर मग हा सर्वमान्य (किमानपक्षी, बहुमान्य) नेता, जी कोणती यादी सादर करील ती विशेष खळखळ न करता मान्य करणे हेच शिस्तबद्धपणाचे बिरूद मिरविणाऱ्या पक्षास भूषणावह ठरणारे नाही काय ?. . . महाराष्ट्रातील इं. काँ. जनांनी ह्याचा विचार करावयास पाहिजे. तिकीटवाटपात मतामतांचा गलबला झाला, चला दिल्लीला इंदिराजींकडे. मुख्यमंत्रिपदाचा घोळ झाला, घेऊन चला तो इंदिराजींकडे. हा उपमुख्य मंत्रिपदाचा गुंता उद्भवला, टाका तो श्रीमती

गांधींपुढे ! हा असा खाक्या स्वावलंबी, स्वाभिमानी शिस्तबद्धतेला विशोभितच आहे. प्रत्येक गोष्टीसाठी आमदार-नामदार-खासदार ह्यांच्या झुंडी दिल्लीत डेरेदाखल होऊ लागल्या, तर मग तुमचे आपसातले सौजन्य नि सौहार्द संपलेच म्हणावयाचे !. . . ह्या दिल्ली-शरणत्वाला महाराष्ट्राच्या लोक-मानसात कितपत प्रतिष्ठा लाभेल ?. . .

## बुरी आदत

इंदिराजींची कर्तबगारी नि प्रभावशीलता आता वादातीत आहे. त्यांच्या साता जन्मांच्या दुश्मनांनादेखील ती मान्यच करावी लागेल. ह्या कर्तबगारीमुळेच इंदिरा काँग्रेसच्या देव्हाऱ्यात त्यांना देवतेचा मान मिळतो आहे ! पण हरेक बाबतीत देवतेला साकडे घालणाऱ्या भक्तजनांचा हा अनन्य-शरणभाव त्यांच्या आत्मिक अधोगतीस कारणीभूत होणार नाही काय? त्यांनी स्वतःचे प्रश्न स्वतःच सोडविण्याचा आटोकाट प्रयत्न केला पाहिजे. इंदिराजींपुढे केवढ्या प्रचंड देशव्यापी समस्या उभ्या आहेत ! 'ही खंबीर नि चतुर व्यक्तीच ह्या समस्या-समुद्रातून राष्ट्र-नौका सुबत्तेच्या सुरक्षित किनाऱ्याला नेईल,' असा विश्वास येथील दारिद्र्यपीडित सामान्य जनांनी प्रकट केला आहे. अशा स्थितीत क्षुल्लक नि क्षुद्र कटकटीपायी त्यांचा वेळ खाणे, हे काय त्यांचे हात बळकट करण्याचे लक्षण ?

— हाय ! आम्हा भारतीयांची ही पिढीजात आदतच आहे की, मोठ्या माणसामागे नसत्या गोष्टींचा भुंगा लावून त्यांना हैराण करणे. टिळक-गांधी-नेहरू ह्यांचा किती शक्तिपात ह्या प्रवृत्तीपायी झाला, हा एक मनोरंजक नि उद्बोधक अभ्यासाचा विषय होईल. ज्या देशातील सात्त्विक भक्तदेखील भगवंतालासुद्धा दळणकांडणादी कामे करावयास भाग पाडतात, तिथे तामसी सकाम अनुयायांनी स्वतःच्या मतलबासाठी आपल्या श्रेष्ठ नेत्यांना परेशान केल्यास नवल कसले ? — पण देशहितार्थ ही प्रवृत्ती दूर झालीच पाहिजे.

□

॥ २३ ॥

# इंदिराजींची अंगठी !

*२३ नोव्हेंबर १९८०*

हिरा-पाचू-माणिक-इंद्रनील इत्यादी बहुमोल रत्नांशी तुम्हा-आम्हा सामान्य जनांचा फारसा संबंध येतच नाही. रत्नांचा शौक श्रीमंतांनाच परवडू शकतो. आपल्या नशिबी बहुधा कठोर परिस्थितीने दिलेले 'चौदावे रत्न !' साहजिकच, ह्या रत्नांच्या वा मौक्तिकांच्या किमती किती प्रचंड असू शकतात, ह्याची आपणास कल्पना नसते. 'स्यमंतक' मण्यापासून तो 'कोहिनूर'पर्यंतच्या हिऱ्यांच्या-माणकाच्या-मोत्यांच्या नवल-कथा आपण केवळ आश्चर्यस्तंभित होऊन वाचावयाच्या ! आपण सारे बळ एकवटून आपल्या गृहदेवतेसाठी, वाढदिवसानिमित्त, कानांतील कुड्या आणल्याच, तर त्यांची किंमत असून असून असणार किती ?— शे-पाचशे रुपये ! मग कानातील ह्या अलंकाराची किंमत चार कोटी रुपये असू शकते, ह्यावर आपला विश्वास बसू शकेल काय ? पण विश्वास ठेवा अगर ठेवू नका, कानातील हिऱ्यांच्या कुडीचा जिनिव्हामध्ये लिलाव करण्यात आला, तेव्हा ती ४ कोटी रुपयांना विकली गेली, अशी नवलवार्ता प्रसिद्ध झाली आहे. हा दागिना इराणच्या माजी शहांची विधवा पत्नी फरार हिने विक्रीसाठी लिलावात ठेवला होता.

पण हे झाले हिऱ्या-मोत्यांच्या अलंकाराच्या बाजारी किमतीबद्दल. जव्हेरीबाजारांचे नि सराफ कट्ट्यांचे रूक्ष व्यवहारी निकष वेगळे आणि मृदुल भावनांच्या दुनियेतील निकष वेगळे. भावविश्वातील भाव रुपये - पौंड - डॉलर्समध्ये ठरविताच येत नाहीत. कोणी प्राचीन कवी म्हणतो, "त्या शून्याकार बिंदीची किंमत ती किती ? फार तर सहस्र रुपये, पण राधेच्या भालपटलावर ती आरूढ होताच तिची शोभा नि साहजिकच किंमत शतगुणित झाली' आणि तोच पुढे सांगतो— "मोरपिसांचा तुरा धारण करणारा श्रीकृष्णाचा रत्नजडित

सुवर्णमुकुट गर्वाने चमकू लागला. 'आपण भगवंताच्या मस्तकी चढलो' ह्या भावनेने तो घमेंड मिरवू लागला. पण ही घमेंड कुठवर?. . . राधा रुसली नाही तोवर! रुसलेल्या राधेचा राग दूर करण्यासाठी श्रीकृष्ण जेव्हा तिच्या चरणांवर मस्तक ठेवील, तेव्हा त्या मुकुटाची घमेंड त्याच्या किमतीसह खाली उतरेल!" सारांश, भावनेच्या मुलखात रत्नांची-मौक्तिकांची-अलंकारांची किंमत वेगळ्याच प्रकारे ठरते, वेगळ्याच प्रकारे चढते किंवा घटते.

*अंगाचेनी सुंदरपणें।*
*लेणियां आंगचि होय लेणे॥*

ह्या ज्ञानेश्वरीतील दृष्टान्ताप्रमाणे जेथे अलंकाराची शोभा, अलंकार धारण करणारे सुंदर शरीरच वृद्धिंगत करीत असेल, तेथे त्या अलंकाराची किंमत मोजता येणेच मुश्किल!

अलंकार जोवर सराफांच्या नि जवाहिऱ्यांच्या दुकानांत केवळ मखमली पेट्यांत अथवा शो-केसेसमध्ये पडून असतात तोवर त्यांची किंमत केवळ कागदी चिठ्ठ्यांवर! ते जेव्हा खरीदले जातात आणि सुयोग्य व्यक्तींच्या देहाचा आश्रय घेतात, तेव्हाच त्यांना खरे मोल चढते. दागिने आश्रित असतात, आश्रयदाते नसतात! म्हणूनच, त्यांना कोणाचा आश्रय लाभतो ह्यावरच त्यांची खरी किंमत अवलंबून राहते. काळ्याकुट्ट हबसाण स्त्रीच्या रुंद फेंदाड्या नाकाचा आश्रय लाभताच, नवलाखाच्या नथीची किंमत लाखेच्या पातळीलाच यावयाची! रत्नजडित मुकुट तोच. पण तो दुराचारी कंसाच्या मस्तकी चढताच त्याचे अधोमूल्यन आणि कृष्णाच्या शिरावर आरूढ होताच ऊर्ध्व-मूल्यन ठेवलेलेच! मोत्यांची कर्णफुले जेव्हा एखाद्या माशुक मदनिकेच्या कानांत लटकतात नि मागे-पुढे झोके घेत गोऱ्या गुलाबी गालांशी गुलगुल बात करतात, तेव्हाच त्यांचे मोल, जव्हेरी बाजारातील किमतीहून शतपट वाढते. कारण, प्रेमीजनांना वाटते की ही कर्णफुले नव्हेत, तर चिमुकली नक्षत्रेच त्या सुंदरीच्या कानांना लटकली आहेत! त्यांच्या आंदोलनासरशी प्रेमवीराचे चित्त हेलकावे खाऊ लागते. आणि तो त्या हलत्या कर्णफुलांना पाहून उद्गारतो—

*मोती तुम्हारे कानके*
*थर्रा रहे हैं क्यों?*
*फरियाद किस गरीबकी*
*गोश-आश्ना हुई?*

सुंदरी, तुझी कर्णफुले का हलताहेत अन् त्यांतील मोती का थरथरत आहेत? कोणत्या गरिबाची— प्रेमभंग झालेल्या बेचैन जीवाची— करुणाजनक तक्रार तुझ्या कर्णपथावर आली आहे?. . . वाहवा! असा शेर ज्या कर्णफुलांनी प्रस्फुरित केला, त्यांचे

मोल त्या ४ कोटी रुपयांच्या कुड्यांहून मोठे मानले पाहिजे.

या अलंकार-पुराणावरून साहजिकच आम्हाला आठवते ती इंदिराजींना तीन दिवसांपूर्वीच, त्यांच्या वर्धापनदिनी मिळालेली विलक्षण अंगठी ! इंदिरा-काँग्रेसचे नेते श्री. सत्पाल कपूर ह्यांनी नजर केलेली ही सोन्याची अंगठी रत्नजडित आहे. तिचे वैशिष्ट्य हे की, त्यातील रत्ने इंदिराजींच्या प्रकृतिनुसार आपले रंग बदलतील. त्यांची प्रकृती उत्तम असेल तर रत्नांचा रंग निळसर दिसेल ! बहोत खूब ! म्हणजे ही अंगठी प्रतिकात्मक दिसते. कारण, इंदिराजींनी गोळा केलेली अनेक 'रत्ने'ही त्यांच्या प्रकृतीचे तानमान पाहून रंग बदलत नाहीत काय? आज इंदिरा काँग्रेसमध्ये चमचमत असलेली अनेक नर-नारी-रत्ने रंगपालटाविषयी विख्यातच आहेत ! ते काहीही असो. ही जादुभरी रत्नजडित अंगठी त्या जादुगारिणीला– इंदिरा गांधींना– खचितच शोभून दिसेल आणि तिचे मूल्य शतपट वाढेल, ह्यात शंकाच नाही. जिच्या 'पंजा'ने गेल्या निवडणुकीत मोठमोठ्या महारथींना तडाखा दिला, तिच्या त्या 'पंजा'तील एका बोटावर विराजमान झालेली ही अंगठी ! जिच्या एका अंगुलीनिर्देशासरशी राज्याचे मुख्यमंत्री चढतात वा पडतात, अशा बलाढ्य महिलेच्या करांगुलीत बसलेली ही अंगठी ! तिची किंमत रुपये आणे-पैंत कशी करता येईल? इंदिराजींच्या हातून अशी काही विधायक राष्ट्रसेवा घडो, देशाचे वैभव वाढो की, त्यांच्या हाताला भूषविणारी ही अंगठी पृथ्वीमोलाची ठरावी. सत्पाल कपूरांनी दिलेली ही वाढदिवस भेट सत्पालक नि शुभकारक होवो !

□

॥ २४ ॥

## इंदिराजींचा उपदेश !

### छोड दो ये आदत पांव छूनेकी !

*२९ फेब्रुवारी १९७६*

मानव जातीत दोन परंपरा प्राचीन काळापासून आढळतात. एक : स्वतःच्या पायावर ताठ उभे राहण्याची, दुसरी : दुसऱ्याचे पाय मागे ओढण्याची अथवा लाचारीने पाय धरण्याची ! पहिली परंपरा आहे पृथ्वीराज चव्हाणाची, महाराणा प्रतापाची तर दुसरी परंपरा आहे घरभेद्या जयचंदाची, मान तुकविणाऱ्या मानसिंगाची ! पेशवाईतील पहिला बाजीराव पहिल्या परंपरेचा प्रतिनिधी, तर दुसरा बाजीराव दुसऱ्या परंपरेचा ! स्वतःच्या पायावर स्वतःच्या सद्‌गुण-बळाने ताठ मानेने उभे राहणे मानवाला अत्यंत भूषणावह असले तरी फार कष्टदायक. ही हाल-अपेष्टांची, स्वाभिमानाची, परंपरा सांभाळणारी माणसे दुनियेत थोडीच असतात. अर्थात अशा स्वाभिमानी सत्त्वशील माणसांची संख्या ज्या देशात जास्त, तो देश सुखी आणि समृद्ध होतो, जगाच्या आदराचा विषय होतो. आपला भारत एकेकाळी असा होता. पण प्रदीर्घ पारतंत्र्यात ही तेजस्वी परंपरा अजिबात लुप्त झाली नसली, तरी बरीच क्षीण झाली, बलिष्ठांचे लाचारीने पाय धरण्याची परंपरा पुष्ट झाली. इतकी की स्वातंत्र्याच्या २८ वर्षांतही ही 'बुरी आदत' विशेष सुटली नाही !

पाय धरणे, 'चरणारविंदी मिलिंदायमान होणे,' विनम्रतेने चरण-सेवा करणे फक्त दोनच क्षेत्रांत क्षम्य आहे– क्वचित भूषणावहही आहे– १) देवभक्तीत, गुरुभक्तीत, मातृ-पितृदेवतांच्या भक्तीत २) निष्ठावंत प्रीतीत, वफादार इष्कात. प्रीतीचीच उत्कट अवस्था म्हणजे भक्ती. तिच्या नऊ प्रकारांत 'पादसेवनम्' म्हणजे चरण-सेवा आणि

'दास्यम्' म्हणजे खुषीची गुलामी सांगितलेलीच आहे. मग पांडुरंगाच्या चरणी मस्तक ठेवणारा तुकाराम अथवा लैलाच्या चरण-धुळीसाठी तळमळणारा मजनू निंद्य कसा? एरव्ही, रणांगणावर सिंहाच्या शौर्याने वावरणारा, स्वतःच्या मनाला अतिशय जपणारा आणि अपमानाने संतप्त होणारा धैर्यधर वनमालेच्या— भामिनीच्या— मधुर सहवासात 'प्रेम-सेवाशरण' होऊन, 'मी चुरिन तव चरण' अशी लीन भाषा तल्लीनतेने बोलतो! एवढा चक्रवर्ती दुष्यंतराजा एकांतात शकुंतलेला वचन देतो— 'हे करभोरू! तुला मांडीवर बसवून तुझे कमलाप्रमाणे तांबूस पाय मी चेपीन'. आपल्या उर्दू शायरीत तर, दिलरुबाच्या चरणांखाली हृदय-पुष्पांच्या पायघड्या घालण्याची चढाओढच लागलेली दिसते. प्रेमवीराच्या करपलेल्या कलेजाला, नुसत्या चरणवंदनाने समाधानाचा चंदन-लेप लागू शकत नाही, तर 'रख दूं कदम कदमपर कलेजा निकालकर' ही तमन्ना पुरी व्हावी लागते! चरणांना केवळ हात लावल्याने, उर्दू प्रियकराचा प्रेमभाव पुरता प्रकट होत नाही, तर मेहेंदीने रंगलेल्या त्या गौर गुलाबी नाजूक पायांचे चुंबन घेतल्यानेच आपला इष्क 'पाया' शुद्ध होईल असे त्याला वाटते! ह्या चरणचुंबनाला उर्दूत 'कदम-बोसी' म्हणतात. परंतु, समजा ह्या चरण-चुंबनाने ती चंचल चारुगात्री संतापली आणि तिने त्या निष्ठावंत 'हीरो' चा शिरच्छेद केला तर? तरीही त्या इष्काच्या शहिदाचे चरण-सेवा-व्रत सुटत नाही. मिर्जा दाग फर्मावतात—

*था बुरा मौका, मगर*
*अच्छा रहा पासे-अदब!*
*आज कटकर पांवपर*
*कातिल के, मेरा सिर गिरा*

(प्रसंग तर मोठा बांका होता. त्या कत्तलबाज कामिनीने माझा शिरच्छेद केला. पण तरीही माझी आदरभावना नि आदब चांगली सांभाळली गेली. कारण, माझे मस्तक धडापासून वेगळे होऊन पडले ते तिच्या चरणांवरच! तिच्या पवित्र पदांवर माझे शिरकमळ अर्पिले गेले!)

'देवा, तुझ्या पद-पद्मांची सेवा नित्य घडावी' अशी प्रार्थना, विठ्ठलचरणी कुर्बान होणाऱ्या कान्होपात्राने केली; अथवा 'कशि या त्यजू पदाला' असा सवाल पतिव्रता सिंधूने काकुळतीने विचारला; तर ते दुर्बलतेचे वा लाचारीचे लक्षण नसून सामर्थ्यशाली निष्ठेचेच उदाहरण होय! परंतु—

अशी कोणतीही उत्कट नि उन्नत भावना हृदयात नसताना केवळ ऐहिक स्वार्थासाठी; दीड वितीचे पोट जाळण्यासाठी; पत्त्यांच्या बंगल्याप्रमाणे क्षणात उभे राहणारे नि निमिषात कोसळणारे वैभव मिळविण्यासाठी; सरकारी कृपेच्या प्रासादावर कावळ्याप्रमाणे बसून

क्षुद्र सत्तेचे मांसखंड चघळण्यासाठी, बलिष्ठांच्या पायाला हात लावून कनिष्ठांना लाथ मारणाऱ्या लाचारांची संधिसाधू गर्दी भारतात ठायी ठायी झाली आहे. कोट्यधीश नि सत्ताधीश स्वजनांची चरणसेवा करता करता, स्वाभिमानाचा नि स्वतंत्र बुद्धिमत्तेचा लोप होत जातो आणि मग प्रत्येक बाबतीत परक्यांच्या पायांना हात लावण्याची सवय जडते. एकदा लाचारी अंगी बाणली की तिला देशांतर्गत क्षेत्र पुरे पडत नाही; आंतरराष्ट्रीय दादांच्याही पुढे ती लोळण घेऊ लागते ! स्वतःच्या पायांवर उभे राहण्याचे स्वावलंबन सुटले की न्यूनगंडाने पछाडलेले परावलंबन हरेक बाबतीत सुरू होते.

ह्याच वाईट सवयीवर पंतप्रधान इंदिरा गांधी ह्यांनी अचूक बोट ठेवले आहे; आणि आमच्या 'परान्न-पिंड-पुष्ट' लाचार शिरोमणींच्या डोळ्यांत झणझणीत अंजन घातले आहे. गेल्या २२ तारखेला, शिवाजी-उद्यानावरील प्रचंड सभेत इंदिराजींनी जे तडाखेबंद, आत्मविश्वासपूर्ण व्याख्यान दिले, त्यात प्रामाणिक विरोधकांनाही सहज पटावेत असे जे काही मुद्दे होते, त्यांतील हा एक मुद्दा होय. इंदिरा गांधींनी संदेश दिला की—

*पैर मिलाके चलो,*
*करो खिदमत वतनकी ।*
*भाइयों ! छोड दो*
*ये आदत पैर छूनेकी !*

राष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी एकसाथ पावले टाका; सर्वांची पावले मिळती-जुळती असू द्या. पण बलदंडांच्या पीवलांना लाचारीने हात लावण्याची सवय सोडून द्या ! परकीय मतलबी ढुढ्ढाचार्य काय म्हणतात ह्याचा विचार करण्यापूर्वी स्वतःच कठोर आत्मपरीक्षण करा. मग 'साहेब-वाक्यं प्रमाणम्' ह्या गुलामी मनोवृत्तीची जरुरी भासणार नाही ! कोणत्याही देशाचे ज्ञानविज्ञान पवित्रच. ते आत्मसात केलेच पाहिजे हे खरे. पण अर्थकारण, राजकारण, साहित्य-संस्कृती, व्यवस्थापन, यांत्रिक नि तांत्रिक प्रकल्प ह्या सर्व बाबतींत पाश्चिमात्यांचे पाय धरून काही 'रेडिमेड फॉर्म्युले' मिळविण्याची आदत योग्य नाही ! आपले भवितव्य आपल्याच हाती आहे. मग ही पाय धरण्याची यातायात कशाला? आपल्या समाजाची नि साधन-संपत्तीची आजची स्थिती आपणच उघड्या डोळ्यांनी अभ्यासून, आपण हरेक क्षेत्रात स्वावलंबी बनले पाहिजे. तरच आपल्या स्वातंत्र्याला खरा अर्थ नि सामर्थ्य प्राप्त होईल !

□

॥ २५ ॥

## सरकारी वृत्तपत्राचे स्वागत !

*१३ मार्च १९८१*

१८५७ च्य. स्वातंत्र्य-समराने त्रिखंडात गाजविलेला दिल्लीचा अखेरचा मोगल-बादशाह बहादुरशाह 'जफर' दीर्घायुषी होता. पण तरीही तो निराशावादी असल्यामुळे आपल्या आयुष्याचा हिशेब मांडताना उद्‌गारला :—

***उम्रे दराज को मांग कर***
***लाये थे चार दिन !***
***दो आरजू में कट गये***
***दो इन्तजार में !. . .***

ही अशी निराशा नि हताश मनोवृत्ती आपले उत्साह-सागर मुख्यमंत्री बॅ. अ. र अंतुले ह्यांच्यापाशी औषधालाही नाही. केवळ 'आरजू' नि 'इन्तजार' ह्यांच्यात वाया घालविण्यासाठी त्यांना देवाने उमेदीची उमर दिलेली नाही ! म्हणूनच की काय, प्रायः दर सप्ताहाला ते कोणत्या ना कोणत्या भव्य कार्याचा शुभारंभ करतात अथवा संकल्प सोडतात. 'वर्षाचे दिवस अवघे ३६० असून दिवसाचे तास अवघे २४ आहेत, अंतुल्यांचा उत्साह पाहून दिलदार परमेश्वराने त्यांना काही जादा तास 'सब्सिडी' म्हणून बहाल केलेले नाहीत,' हे सत्य जणू ते विसरले असावेत ! पण अंतुलेजींनी 'संकल्पनियोजन' करावे, असे त्यांच्या हितचिंतकांना वाटते. ते कितीही अष्टावधानी असले, तरी करणार आहेत काय काय ? जिने मोगलांइतकाच इतिहास-संशोधकांचा दम उखडविला त्या भवानी तलवारीच्या प्राप्तीची जिम्मेदारी त्यांनी उचललीच आहे; 'संजय निराधार योजने'चा गोवर्धन-पर्वत ते उचलीतच आहेत; कोकणला कृषी विद्यापीठ तर मराठवाड्याला संतपीठ

बहाल करण्याचा मनसुबा त्यांनी जाहीर केलाच आहे, ५ कोटींच्या 'इंदिरा प्रतिष्ठान'ची प्राण-प्रतिष्ठा त्यांनी केलीच आहे; ८ कोटींच्या कर्जमाफीची धुरा त्यांनी खांद्यावर घेतलीच आहे. आणि हे सारे कमी आहे म्हणूनच की काय त्यांनी सरकारी वृत्तपत्र सुरू करण्याचा संकल्प परवाच विधानसभेत सोडला आहे !

## बहोत अच्छे

अन्य संकल्पांविषयी आमचे मुख्यमंत्र्यांशी काही मतभेद असले, तरी– संकल्पित सरकारी वृत्तपत्राच्या संकल्पाचे– आम्ही मनःपूर्वक स्वागत करतो. शेतकऱ्यांना मार्गदर्शक ठरावे म्हणून (अवाढव्य खर्च करून का होईना–) जसे नमुनेदार फार्म तयार करतात, तद्वत महाराष्ट्रातील पत्रकारांना मार्गदर्शक ठरावे म्हणून नमुनेदार सत्यव्रती वृत्त-पत्र अंतुलेजी उभारू इच्छितात, हे पाहून कोणत्या पत्रकाराचा ऊर आनंदाने भरून येणार नाही ! आजवर शासनाने पत्रकारांशी बरीच जवळीक साधण्याचा प्रयत्न केला, कैक मंत्र्यांनी कैक संपादकांना वारंवार प्रीति-भोजनास बोलावले, ग्रामीण पत्रकारांचे तर आलीशान 'ओबेराय' हॉटेलात संमेलन भरविले आणि सत्तारूढ पक्षाच्या डझनभर धुरीणांनी पत्रकारांना अनाहूत उपदेशांचे शेकडो डोस पाजले. तरीही बेट्या बिलंदर पत्रकारांत जेव्हा काहीच सुधारणा झालेली दिसेना, तेव्हा अंतुले ह्यांनी उपरोक्त 'सरकारी वृत्तपत्रा'चा संकल्प सोडला असावा. बहोत अच्छे ! कारण उपदेशाच्या मणभर शब्दांनी जे साध्य होत नाही, ते प्रत्यक्ष कणभर कृतीने साध्य होत असते ! हे नमुनेदार सरकारी वृत्तपत्र दृष्टीस पडताच, सत्यशील हरिश्चंद्र राजाच्या वृत्तीने १०० टक्के सत्य नि विधायक बातम्या कशा द्याव्यात ह्याचे शिक्षण आम्हा पत्रकारांना आपोआप मिळू शकेल ! म्हणूनच आम्ही म्हणतो 'ह्या संकल्पाचे स्वागत असो !', . . हा बेहतरीन बुलंद संकल्प मुख्यमंत्र्यांच्या मस्तकात कैक दिवसांपासून घोळत असावा. कारण, कैक दिवसांपासून त्यांची प्रचलित पत्रकारांविषयीची तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. 'पिवळे पत्रकार' नि 'ढवळे पत्रकार' असा भेदभाव न करता त्यांनी पत्रकारवर्गावर अनेकदा कटू शब्दांचे तीर चालविले आहेत ! वृत्तपत्रांनी आपली विश्वासार्हता गमावली आहे. (Newspapers have lost their credibility) असे उद्‌गार त्यांनी केसरी जन्मशताब्दी महोत्सवात काढले होते. . . पण हाये हाये ये जालिम जमाना ! जर एखाद्या वस्तूची विश्वासार्हता घटली तर तिचा खपही घटावयास नको काय ? तथापि, ह्या जमान्यातील जनतेला काही विवेकच उरलेला नसावा. अहो, 'प्रेस इन इंडिया' हे केंद्र सरकारचे प्रकाशनच ओरडून सांगते आहे की, गेल्या वर्षभरात भारतीय वृत्तपत्रांचा खप किती तरी वाढला आहे ! ह्या विरोधाभासाचा उलगडा अंतुले ह्यांनी उपरोक्त भाषणातच केला आहे. तो असा की,

'बातम्या कळण्यासाठी दुसरा काही पर्याय नसल्यामुळेच लोक वृत्तपत्रे वाचत असावीत. (They perhaps read newspapers because they have no other option.) पण हेही पटणारे नाही. कारण, 'रेडिओ'सारखे खेड्यापाड्यापर्यंत पोहोचलेले माध्यम तिन्ही त्रिकाळ बातम्यांचा (अर्थात निर्भेळ सत्य बातम्यांचा !) पाऊस पाडत असूनही, वृत्तपत्रांची ग्राहकसंख्या अधिकाधिक वाढतेच आहे. . . ते काहीही असो. 'सध्याची वृत्तपत्रे तळागाळाच्या समाजाला विधायक योजनांची नीट खबर देत नाहीत, लोकशिक्षण करीत नाहीत, उलटपक्षी खून-बलात्काराच्या बातम्या मात्र भडकपणे देतात. घबराट पसरवितात. अन्याय्य टीका करतात. असत्य वा अर्धसत्य वृत्ते छापतात' असा केवळ अंतुले ह्यांचाच नव्हे, तर अनेकानेक सत्ताधीशांचा समज झाला आहे. आणि म्हणूनच सत्यव्रत सरकारी वृत्तपत्राचा संकल्प !

## 'छिद्रान्वेषी' टीकाकार

सरकारी वृत्तपत्र काढण्याची कल्पना तशी नवीन नाही. रशियातील 'प्रावदा' आणि 'इशबेस्तिया' ही वृत्तपत्रे सर्वार्थानि सरकारी वृत्तपत्रेच म्हणावी लागतील. सर्व कम्युनिस्ट देशांत, तसेच काही आफ्रिकी राष्ट्रांत, आज सरकारतर्फे वृत्तपत्रे प्रसिद्ध केली जात आहेत (पण त्या देशांतही ती शंभर टक्के सत्यवादी मानली जात नाहीत.).ही हुकूमशाही रंगाच्या देशांची उदाहरणे बाजूस ठेवली तरी, काही लोकशाही राजवटीतही स्वतःची मुखपत्रे असल्याची उदाहरणे दिसून येतात. . . आपल्या सरकारच्या वतीने प्रसिद्ध होणारी 'गॅझेटे' हा सरकारी वृत्तपत्रांचाच प्राथमिक प्रकार नव्हे काय? म्हणून तर सदैव सरकारची तळी उचलून धरणाऱ्या वृत्तपत्राला उपहासाने 'सरकारी गॅझेट' म्हणण्याचा प्रघात रूढ झाला आहे ! आपले भारत सरकार 'योजना'नामक बहुभाषिक पाक्षिक नि 'भारत देश' नामक भित्ति-वार्तापत्र गुळगुळीत कागदावर ठसठशीत टाइपात प्रसिद्ध करीत असते. हे सरकारी वृत्तपत्रांचेच प्रकार म्हणावे लागतील. महाराष्ट्रातही राज्य-सरकारच्या वतीने वेगवेगळ्या भाषांतून 'लोकराज्य' पाक्षिक प्रसिद्ध केले जातेच. शिवाय, शासनाच्या आणि मंत्र्यांच्या विविध बातम्यांचा (अर्थात सत्य नि विधायक बातम्यांचा) वृत्तपत्रांना पुरवठा करण्यासाठी प्रसिद्धी खाते आहेच ! हे खाते 'सरकारने अमके केले नि तमके करणार आहे' हे सांगणाऱ्या पुस्तिकाही अधूनमधून प्रसिद्ध करतेच. . . पण हे सारे सत्य-वृत्त-प्रसारार्थ अपुरे पडत आहे, अशी मुख्यमंत्र्यांची भावना झाली असावी. म्हणूनच त्यांनी नव्या सरकारी वृत्तपत्राच्या प्रकाशनाची चमकदार घोषणा केली !. ,. ह्या घोषणेचे खुल्या दिलाने स्वागत करावयास नको काय? पण नाही. काही छिद्रान्वेषी टीकाकार म्हणतात— 'लोकशाही राजवटीत वृत्तपत्रांची भूमिका कोणती असावी, या बाबतीत योग्य ते भान न राहिल्यामुळेच

प्रचलित वृत्तपत्रांविषयी कटू भावना निर्माण झाली आणि तिच्यातूनच ही 'सरकारी वृत्तपत्रा'ची कल्पना बाहेर पडली. वृत्तपत्रांची भूमिका सरकारचे अनधिकृत प्रसिद्धी खाते बनण्याची नसून, जबाबदार विरोधी पक्षाच्या भूमिकेसारखीच त्यांची भूमिका असली पाहिजे, हा सिद्धांत आता प्रगत लोकशाही देशांत सर्वमान्य आहे. जनतेच्या व्यथा सार्वजनिक वेशीवर टांगणे, सरकारी धोरणांतील उणिवांवर नेमके बोट ठेवणे, मग्रूर सत्ताधीशांवर अंकुश ठेवणे ही जशी जबाबदार विरोधी पक्षाची प्रमुख कामे आहेत, तशीच ती वृत्तपत्रांचीही आहेत. पण शासनाच्या सत्कृत्यांना आपल्या परीने सहकार्य देणे हे जसे जबाबदार विरोधी पक्षांचे कर्तव्य, तसेच ते वृत्तपत्रांचेही कर्तव्य होय. काही तुरळक अपवाद वगळता, भारतीय वृत्तपत्रे उपरोक्त धोरणानेच वागत आहेत. म्हणूनच ती जनतेत रुजली आहेत; राज्यकर्त्यांपेक्षा त्यांची विश्वासार्हता नक्कीच कमी नाही ! पण हे दुर्दैवाने आमच्या आजच्या सत्ताधीशांना पटत नाही, लोकशाहीला आवश्यक असलेली खिलाडू वृत्ती बाळगून ते वृत्तपत्रांकडे पाहत नाहीत, ह्याला काय म्हणावे ? जर राज्यकर्त्यांचा दूषित दृष्टिकोन बदलला तर त्यांना सरकारी वृत्तपत्र काढण्याची जरुरीच भासणार नाही.'

### तयार इन्फ्रा स्ट्रक्चर

या टीकेकडे आमच्या शासनाने मुळीच लक्ष न देता, वृत्तपत्र काढावेच ! त्यामुळे एक तर आजचे वृत्तपत्रकर्ते तरी धडा शिकतील, अथवा शासन तरी धडा शिकेल ! कारण 'जावे त्याच्या वंशा तेव्हाच कळे' असे हे पत्रकारितेचे खडतर व्रत आहे. . . दुसरे असे पहा की, पत्रकारांनीच नेहमी पंतोजीची भूमिका घेऊन शासनाला का शिकवावे ? आदर्श वृत्तपत्र काढून सत्य नि विधायक वृत्ते कशी द्यावीत, हे पत्रकारांना शिकविण्याचा शासनालाही 'चान्स' का मिळू नये ?. . . काय म्हणता ? ह्या योजनेवर करदात्याचा फार पैसा उधळला जाईल ? हरकत नाही. सत्य नि कल्याणकारक वृत्तांच्या प्रसाराने जे लोकशिक्षण साधेल, त्यासाठी लाखो रुपये खर्च झाल्यास काय बिघडले ? दुसरे काहीही घडले नाही, तरी रद्दीच्या व्यापाराला तर तेजी येईल ना ?. . . पण 'फार पैसा खर्ची पडेल,' ही कल्पनाच मुळी भ्रामक आहे ! सरकारपाशी कागदाला तोटा नाही. शाईला तोटा नाही. गुळगुळीत कागदावर जे सरकार 'लोकराज्या'दी फर्मास प्रकाशने छापू शकते, त्याचे मुद्रणालयही सुसज्जच आहे. बातम्या लिहिण्यासाठी, भाषांतर करण्यासाठी दैठणकरांपासून तो पैठणकरांपर्यंत प्रसिद्धी खाते सिद्धच आहे ! (फक्त थोडासा 'ओव्हर टाइम' वाढेल इतकेच !) ह्या सरकारी वृत्तपत्रांकडे अंतुलेसाहेबांना लक्ष देण्यास फुरसत नसली, तर जयंतराव टिळक नि जवाहरलालजी दर्डा ह्यांच्यासारखे यशस्वी पत्रचालक मंत्रिमंडळात आहेतच ! संपादक-पदाची एक्स्ट्रा जबाबदारी स्वीकारायला तर, एक सोडून

तीन एक्स्ट्रॉ सचिव अगदी हाताशीच आहेत– आमचे मित्र दिनेश देसाई– वसंतराव देशमुख नि सुदर्शन आर्य ! तिघेही प्रसिद्धी-विद्या-पारंगत ! तिघांचाही वृत्तपत्र-सृष्टीशी घनिष्ठ नि घरोब्याचा संबंध !

— हे सारे 'इन्फ्रा स्ट्रक्चर' तयार असताना सरकारी वृत्तपत्र काढण्याचा संकल्प साकार होण्यास कितीसा उशीर? आम्ही त्या संकल्पित आदर्श सत्यव्रत वृत्तपत्राच्या स्वागतास सिद्ध आहोत !

□

॥ २६ ॥

# 'दाराशुकोह-शिष्यवृत्ती' द्या !

*१८ मार्च १९८१*

युरोपच्या इतिहासात धर्मसत्ता नि राजसत्ता ह्यांचा तीव्र संघर्ष प्रदीर्घ काळ चालला आणि त्यातून अखेर 'सेक्युलॅरिझम्'चे नवनीत प्रकट झाले ! धर्मसत्तेचे जोखड राजसत्तेने झुगारले आणि राज्यकर्ता कोणत्याही धर्माचा असो, त्याने कोणत्याही विशिष्ट धर्माची कुरघोडी राज्यकारभारावर होऊ देऊ नये, धार्मिक बाबतीत प्रजाजनांना पूर्ण स्वातंत्र्य द्यावे, पक्षपात न करता सर्व धर्मपंथांकडे समानतेने पाहावे हे तत्त्व– हे सर्वधर्मसमभावाचे (सेक्युलॅरिझमचे) तत्त्व– अंगिकारले गेले. धर्मगुरूंची अरेरावी नि असहिष्णुता ह्यांच्या आगीत दीर्घकाल होरपळलेल्या युरोपात सर्वधर्मसमभावाचा यशोदुंदुभी विशेष निनादला, ह्यात नवल नाही. पण भारतात, धर्मसत्ता नि राजसत्ता ह्यांचे सर्प-मुंगसासारखे अटीतटीचे वैर कधीच निर्माण न झाल्यामुळे, येथे 'सेक्युलॅरिझम'चे स्पेशल नगारे वाजविण्याचे कारणच नव्हते ! 'साधनानां अनेकता' हे तत्त्व ह्या देशाच्या हाडी-मांसी हजारो वर्षांपासून भिनलेले. 'तुम्ही कोणत्याही देवाला कसेही वंदन करा, ते अखेर ह्या जगताच्या मुळाशी असलेल्या परमेश्वरालाच पोचते', अशी दिलदार धारणा असलेला हा देश (रेव्हरंड ना. वा. टिळक ह्यांच्या शब्दांत सांगावयाचे झाले तर–)

***भिन्न दिशांनी सरिता नाले***
***जरी कितीही वाहत असले***
***एक नदीपति त्यांच्या पुढती***
***का मग बोंबाबोंब ?***

असा स्पष्ट सवाल संकुचित धर्मांधांना सदैव विचारीत आला ! पण तरीही जेव्हा या

भूमीवर धर्मा-धर्मांचे नि जाति-जातींचे तीव्र संघर्ष सुरू झाले, तेव्हा 'मजहब नहीं पढाता आपसमें बैर रखना' हे सांगण्याची आवश्यकता निर्माण झाली; धर्मांध वा जात्यंध माथेफिरूंना ताळ्यावर आणण्यासाठी येथील मूलभूत सेक्युलर संस्कृतीला 'सर्वधर्मसमभावा'चा पुरस्कार करावा लागला !

## 'ईश्वर-अल्ला तेरे नाम'

हा पुरस्कार ज्याने केला नाही, सर्व धर्म हे अखेर मानवता-धर्माचेच भिन्न भिन्न आविष्कार होत, असे ज्याने मानले नाही, असा एक तरी थोर पुरुष दाखवून देता येईल काय? या देशातील प्रत्येक युगपुरुषाने, प्रत्येक साधुसंताने सर्व-धर्म-समभावाचे तत्त्व मानले आहे, यथाशक्ती पाळले आहे. सेक्युलॅरिझम ही काही आजच शोधून काढलेली चीज नव्हे ! आज राजकारणात– विशेषतः निवडणूक राजकारणात– धार्मिक वा जातीय 'स्ट्रॅटेजी' आखणाऱ्या नि आचरणाऱ्या, एकगठ्ठा मतांसाठी धार्मिक वा जातीय भावनांना खतपाणी घालणाऱ्या आणि तोंडाने मात्र 'सर्वधर्मसमभावा'चा जप करणाऱ्या राजकारणी लोकांनी हे खूप लक्षात ठेवावे की, येथील सर्वसामान्य जनता येथील सत्ता-राजकारण्यांहून अधिक सर्वधर्म-समभावी आहे ! कारण, येथील साधुसंतांच्या मानवताधर्म-शिकवणीचा संस्कार तिच्या मनावर झालेला आहे. एकाच महान दर्यावर लाटा उठतात, तरंग उठतात, भोवरे निर्माण होतात, बुडबुडे उद्‌भवतात, पण अखेर ते सारे पाणीच, तद्वत एकाच मानवता-धर्माचे हिंदू धर्म - इस्लाम धर्म - ख्रिश्चन धर्म इत्यादी भिन्न भिन्न आविष्कार म्हणजे मूलतः मानव्य धर्मच होय, हीच या देशांतील महापुरुषांची नि महात्म्यांची शिकवण ! म्हणूनच 'एक सद् विप्राः बहुधाः वदन्ति' असे म्हणणाऱ्या प्राचीन ऋषीचा वैचारिक हुंकार 'ईश्वर अल्ला तेरे नाम' ह्या महात्मा गांधींच्या शब्दांतून ऐन जातीय संघर्षाच्या धुमाळीतही बाहेर पडला ! हा विचार सामान्य जनतेत रुजविण्यासाठी जुन्या जमान्यातील भारतीय विभूतींना केवढे प्रयास पडले, ह्याची कल्पना आजच्या वाचीवीरांना नाही ! ती कल्पना करून देण्यासाठी जुन्या काळातील भारताच्या सेक्युलर-प्रवासाचे संशोधन होणे आणि ते आधुनिक पिढीपुढे येणे अत्यंत जरुरीचे आहे.

## स्तुत्य योजनेला दुरुस्ती

म्हणूनच, सर्वधर्मसमभावावरील संशोधनास ५ लाख रुपयांचे पारितोषिक देण्याची जी घोषणा मुख्यमंत्री बॅ. अ. र. अंतुले ह्यांनी औरंगाबाद येथे केली, ती स्तुत्यच ठरते. 'शिवाजी महाराजांची प्रमुख तत्त्वप्रणाली सर्वधर्मसमभाव. तिच्या प्रसाराला उत्तेजन मिळावे ह्या उद्देशाने शिवरायांच्या सर्वधर्मसमभावावर संशोधनात्मक लिखाण करणाऱ्यांसाठी

रु.५,००,००० ची पारितोषिक योजना महाराष्ट्र शासन कार्यान्वित करील" असे मुख्यमंत्र्यांनी जाहीर केल्याचे वृत्त प्रसिद्ध झाले आहे. या योजनेचा तपशीलवार आराखडा अद्यापि प्रसिद्ध व्हायचा असला, तरी ही सद्हेतुमूलक योजना निःसंशय प्रशंसनीय आहे यात शंका नाही. पण शिवशाहीचे नि सर्वधर्मसमभावाचे एक डोळस अभ्यासक ह्या नात्याने आम्ही काही वेगळे मतप्रदर्शन वेळीच (योजनेचा अंतिम आराखडा पूर्ण होण्याआधीच) करू इच्छितो. आम्ही मागेच म्हटल्याप्रमाणे ह्या देशातील सर्वच युगपुरुष 'सर्वधर्म-समभावा'चे तत्त्व मानणारे होते. तेव्हा छत्रपती श्री शिवाजी महाराजांचा त्यात अंतर्भाव होतोच. पण 'सर्वधर्म-समभावा'ची संस्थापना हेच शिवरायांचे प्रमुख जीवित-ध्येय होते, असे मानणे इतिहासशुद्ध ठरणार नाही. प्रत्येक गोष्ट शिवाजी महाराजांच्या नावाला जोडण्याची जी टूम महाराष्ट्रात आजकाल निर्माण झाली आहे, तिला अनुसरूनच येथे शिव-नामाचा वापर करावयाचा असेल तर गोष्ट निराळी ! पण असे केल्यामुळे शिवरायांच्या अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाला सीमित केल्यागत होते, शिवाय ह्या महत्त्वाच्या विषयाला 'अव्याप्ती' चा दोष जडतो, हे लक्षात ठेवले पाहिजे. ह्या संदर्भात 'प्राधान्येन व्यपदेशाः भवन्ति' हा सिद्धान्त डोळ्यांपुढे ठेवून महापुरुषांचा विचार केला पाहिजे. उदाहरणार्थ, लोकमान्य टिळकांनी नाट्यकलेला, गणित-विद्येला, ज्योतिर्गणिताला उत्तेजन दिले. तेही सर्वधर्मसमभावाचेच उपासक होते. पण तरीही उपर्युक्त विषय हे त्यांचे प्रधान क्षेत्र नव्हे, प्रधान जीवित कार्य नव्हे. स्वामी विवेकानंद संगीत शास्त्रातही प्रवीण होते. पण म्हणून सरकारने 'विवेकानंदांचे संगीत' ह्या विषयावरील संशोधनासाठी ५ लाख रुपये मुक्रर करणे, संयुक्तिक ठरणार नाही ! हाच न्याय शिवाजी महाराजांच्या सर्व-धर्म-समभावालाही लागू आहे. शिवाय असे पहा की, शिव-चरित्राचे सर्व बाजूने भरपूर संशोधन आधीच झाले आहे. त्यांच्या 'सेक्युलॅरिझम'ची विस्तृत नोंद त्यांच्या अनेक विद्वान चरित्रकारांनी केलेलीच आहे. मग ह्या विषयात आणखी नवे संशोधन कोण कितीसे करणार ? म्हणूनच आम्ही उपर्युक्त स्तुत्य योजनेला अशी दुरुस्ती सुचवू इच्छितो की विषयाची व्याप्ती वाढवावी. म्हणजे 'महाराष्ट्रातील सर्वधर्मसमभावाची वाटचाल' अथवा 'भारतीय संतांनी पुरस्कारलेला सर्वधर्मसमभाव' अशा प्रकारचा विषय तरुण संशोधकांपुढे ठेवावा.

### शहीद शाहजादा !

सर्वधर्म-समभावाचा प्रसार हेच ज्यांचे मुख्य जीवितध्येय होय, अशा पुरुषांत (आमच्या मते—) शहाजहानचा ज्येष्ठ पुत्र दाराशुकोह अग्रगण्य ठरेल. तो राजकारणात कच्चा होता, रणांगणात शूर असला तरी कसलेला नव्हता. पण शहाजहानचा हा लाडका

पुत्र सर्वधर्मसमभावात मजबूत होता. इस्लामधर्मीय पंडितांप्रमाणेच हिंदूधर्मीय पंडितांचाही गराडा त्याच्याभोवती पडलेला असे. त्यांच्याबरोबर धर्मचर्चा करण्यात त्याचा बहुतांश वेळ निघून जाई. तो 'शाहीयत' नामक ग्रंथात म्हणतो, 'सत्य ही कोणत्याही एकट्या धर्माची मक्तेदारी नाही.' तो पर्शियन भाषेप्रमाणेच संस्कृतमध्येही प्रवीण होता. कुराण नि वेद ह्यांच्यात फरक नाही हे सांगताना तो म्हणतो—

*अपौरुषेय -ग्रंथोऽस्माकं कुराणं*
*सिद्धानां वेद इत्युच्यते ।*

त्याच्या 'मज्मा-उल्-बहरीन' ह्या ग्रंथाचे 'समुद्र संगम' नामक संस्कृत रूपांतर झाले आहे. त्याने 'योग वासिष्ठ्य' इत्यादी संस्कृत ग्रंथांची फारसी रूपांतरे करवून घेतली आहेत. त्याच्या ह्या संस्कृत प्रेमावर नि धर्मातीत वृत्तीवर खूष होऊन हिंदू पंडितांनी त्याला 'विगत-शोकसंदेहः' अशी किताबत बहाल केली होती ! अशा ह्या थोर मोगल राजपुत्राचे सर्व चरित्र सांगण्याचे हे स्थळ नव्हे. पण इतके सांगितले तरी पुरे की धर्मांध कर्मठांच्या रोषासच तो अखेर बळी पडला. राजधानीत त्याची धिंड काढण्यात येऊन त्याचा शिरच्छेद करण्यात आला !

— आज सर्वधर्मसमभावाचे डिंडिम दशदिशांत घुमत असताना ३०० वर्षांपूर्वी जो उमदा युवराज स्वतःच्या आंधळ्या धर्मबांधवांच्या क्रूर क्रोधाची शिकार बनला, हिंदू-मुस्लीम ऐक्यासाठी (दोन सागरांच्या संगमासाठी !) ज्याने अक्षरशः स्वजनांचे शिव्याशाप खाल्ले नि अखेर मरण पत्करले, त्याची साधी आठवणही कोणाला होत नाही ! आज पोटात जातीयता ठेवून ओठांत सर्वधर्मसमभाव बाळगणारे कैक महाभाग मानमान्यता मिळवीत असताना, दाराशुकोहसारखा सच्चा सेक्यूलर शहीद प्रायः विस्मृतीच्या गर्तेत पडावा हे केवढे दुर्भाग्य !— म्हणूनच सर्वधर्मसमभावाचे संशोधन करणाऱ्या तरुणांना जी शिष्यवृत्ती महाराष्ट्र शासन देईल, तिचे नाव 'दाराशुकोह-शिष्यवृत्ती' असे ठेवण्यात यावे, अशी आमची कळकळीची सूचना आहे.

□

## ॥ २७ ॥ प्रतिष्ठान व अधिष्ठान !

*६ सप्टेंबर १९८१*

वृक्षावरील पिकल्या पानाच्या पतनापासून तो सिंहासनावरील सामर्थ्यशाली सम्राटाच्या अधःपतनापर्यंत, एखाद्या चिमणीच्या मृत्यूपासून तो चेंगीजखानासारख्या बलिष्ठाच्या मरणापर्यंत, एखाद्या मच्छराच्या क्षुद्र उड्डाणापासून तो गरुडाच्या गगन-भरारीपर्यंत जे काही होते ते परमेश्वराच्या मर्जीप्रमाणेच होते, अशी जुन्या काळच्या भाविक जनांची जिवंत श्रद्धा होती ! त्या सर्वशक्तिमान 'हाय कमांड'चा अथवा विश्वाच्या मुळाशी असलेल्या आदिशक्तीचा धाक दाखवूनच, त्या काळच्या साधु-संत-विचारवंतांनी मानवांना नीतिमान बनविण्याचा, धार्मिक बनविण्याचा प्रयास केला. 'अमुक अमुक नियम पाळले तर देव संतुष्ट होईल नि तमुक तमुक नियम मोडले तर तो संतापेल,' असे जन-मानसावर बिंबवून केलेला समाज-धारणेचा जो प्रयत्न, त्यालाच धर्मसंस्थापना म्हटल्यास, ते वावगे ठरू नये. ह्यामुळेच माणसे 'देवभीरू' बनली, मानवी 'प्रतिष्ठानां'पेक्षा परमेश्वरी 'अधिष्ठाना'ला महत्त्व देऊ लागली ! समर्थ रामदासांसारख्या प्रयत्नवादी संताने स्पष्टपणे सांगितले की–

*सामर्थ्य आहे चळवळीचे ।*
*जो जो करील तयाचे ।*
*परंतु तेथे भगवंताचे ।*
*अधिष्ठान पाहिजे ॥*

परंतु आता– केवढा हा अधःपात ! आमच्या बहुसंख्य 'इंदिरानिष्ठां'चे वर्तन पहा. त्यांनी जणू काही रामदासांच्या ओवीत (भक्तिभावाने नव्हे, तर स्वार्थ-भावनेने) बदल

केला आहे— 'सामर्थ्य आहे खटपटींचे । लटपटींचे-लाचारीचे। परंतु तेथे इंदिरा मातेचे । अधिष्ठान पाहिजे !'

भगवंताच्या अधिष्ठानाऐवजी 'भगवती इंदिरा गांधींचे अधिष्ठान' असा बदल आमच्या धुरीणांनी करणे अपरिहार्यच नव्हते काय? कारण, (काही थोडेसे अपवाद वगळता) रामनामाने जसे दगड तरले, तसेच इंदिरा नामाच्या जादूने ते निवडणुकीच्या तुफान दर्यातून तरून जाऊन सत्तेच्या किनाऱ्याला लागले ! निवडणुकीचे तिकीट असो, मंत्रिपद असो, मुख्यमंत्रिपद असो, राज्यपालांचे आसन असो की राष्ट्रपतींचे शानदार भवन असो, इंदिराजींची मर्जी असल्याविना ते मिळणे अशक्य आणि मिळाले तरी टिकणे अशक्य. अशा स्थितीत इंदिरा मातेचे अधिष्ठान संपादण्यासाठी लाचार शर्यत न लागली तरच नवल ! जनतेची राहोच, आपल्याच पक्षातील बहुमताची फिकीर बाळगण्याचे तरी काय कारण? कारण हे बहुमतच मुळी इंदिरादेवींच्या नामघोषाने निर्माण झालेले— अत एव देवीजींच्या हातातील खेळणे ! मग त्या खेळण्यापेक्षा, खेळणे निर्माण करणाऱ्या देवतेलाच प्रसन्न ठेवण्याची लटपट-खटपट करणे, श्रेयस्कर नव्हे काय? म्हणून तर कोणताही मुख्यमंत्री घेतला, तरी त्याचे ब्रीदवाक्य ठरलेले— 'इंदिराजींची इच्छा असेल तोपर्यंत मी ह्या उच्चपदावर राहणारच. मग तुम्ही काहीही शंख करा' जणू हे इंदिरा-कृपापुष्ट सुभेदार गर्जतात—

*जितने तारे गगनमें*
*उतने बैरी होय ।*
*कृपावती जब इंदिरा,*
*बाल न बांका होय ! ॥*

जे ब्रीद सुभेदारांचे तेच ब्रीद सुभेदारांना पक्षांतर्गत विरोध करणाऱ्या दरबारी महत्त्वाकांक्षी जनांचे (भाऊराव पाटील ह्यांच्या शब्दांत 'अस्तनींतील निखाऱ्यांचे !') ह्या अंतर्गत विरोधकांची धावही नेहमी दिल्लीच्या इंदिरा-मंदिराकडेच असते. कशासाठी? तर आपल्या विरोधाला इंदिरा-अधिष्ठान मिळविण्यासाठी ! सारांश, 'राज्यात सारे काही आलबेल आहे' हे सांगणारे सुभेदार काय अथवा 'राज्यात सारा सावळा गोंधळ माजलाय्' ही चहाडी करणारे असंतुष्ट आत्मे काय, दोन्ही गट इंदिरा-शरणच आहेत. 'आले माताजींच्या मना, तेथे कोणाचे चालेना' हीच उभयतांची खात्री !

म्हणूनच, जनाब अंतुले ह्यांना माताजींचा भक्कम पाठिंबा आहे, इंदिरा-अधिष्ठान लाभले आहे, अशी जोवर असंतुष्ट भक्तांची भावना होती तोवर अंतुले-निर्मित 'प्रतिष्ठाना'त त्यांच्या बेरकी नजरेलाही काहीही गैर दिसत नव्हते. सर्व शर्करा-सरदार (इतकेच नव्हे, तर शर्करा सम्राज्ञीही) देणगीच्या चेकसह 'वर्षा' बंगल्यावर धावत जाऊन,

सहकार्याचा वर्षाव करीत होते. परंतु काही दिवसांपूर्वीच 'माताजी श्रीवर्धनच्या शिवबांवर नाराज झाल्या आहेत' अशी कुणकुण कानी पडताच एकदम 'ट्रान्स्फर सीन' होऊ लागला ! 'हा सारा खाजगी मामला आहे, ह्याची आम्हास खबर नव्हती' असे हे बेखबर भक्त बरळू लागले. सरकारी पुस्तिकेतील एका वाक्यामुळे ह्या भोळ्या मंडळींचा गैर-समज झाला म्हणे ! आपला हा समज वा गैरसमज खरा की खोटा, ह्याची शहानिशा करून घेण्यास त्यांना फुरसतही नव्हती. त्यांनी घाईघाईने बंडाचा झेंडा उभारला. अर्थात तोही इंदिरा-अधिष्ठान ताबडतोब लाभेल ह्याच भरोशावर !

आम्हास ही प्रवृत्तीच फार भयावह वाटते. भवानी-भक्त अंतुले महाराष्ट्राच्या रायगडात राहोत वा दिल्लीच्या लालकिल्ल्यांतील नजर-कैदेत पडून— 'लगता नहीं है दिल मेरा उजडे दयार में' अशी दर्दभरी गजल गावोत, त्यांची विविध प्रतिष्ठाने शाबूत राहोत अथवा इंदिरा-अधिष्ठानाच्या अभावी मोडीत निघोत, ह्या घटना तेवढ्याशा महत्त्वाच्या नाहीत. महत्त्वाचा प्रश्न हा आहे की, आमच्या साऱ्या राजकारणाचा शामियाना एकाच खांबावर उभा असावा का? इंदिरा काँग्रेस ह्या सर्वांत मोठ्या पक्षात जर हरेक लहान-मोठ्या बाबतींत इंदिराजींनाच कौल लावण्याची नि त्यांच्यापुढे अहर्निश गोंडा घोळत आत्मस्तुती नि परनिंदा करण्याची चढाओढ प्रमाणाबाहेर वाढली, तर ह्या देशातील उरली-सुरली लोकशाही नष्ट होईल, येथे एकपक्षीय हुकूमशाही (किंबहुना एका व्यक्तीची हुकूमशाही) थैमान घालील. 'भगवंताचे अधिष्ठान पाहिजे' ही प्रामाणिक भाविक श्रद्धा समाजधारणेस उपयुक्तच आहे. पण 'भगवती इंदिरा-अधिष्ठाना'ची मतलबी अभिलाषा देशाला हानिकारक ठरेल !

□

## ॥ २८ ॥ अंतुल्यांची उन्मत्त नीति-संहिता !

*१० सप्टेंबर १९८१*

गेल्याच आठवड्यात संसदेच्या कुरुक्षेत्री केंद्रीय अर्थमंत्र्यांच्या गो-मुखातून बॅ. अंतुले यांच्या 'निरपराधीपणा'ची ग्वाही प्रकट झाल्यानंतर, खुद्द अंतुले यांच्याकडून स्वहस्ते घडलेल्या सत्तातिरेकाबद्दल आणि सत्तेचा वापर करून पैसा जमा केल्याबद्दल, दिलगिरीची भावना व्यक्त केली जाईल, अशी अपेक्षा कोणीही केली नव्हती. पण निदान 'आपल्या हातून कोणतीही कायदेशीर वा तांत्रिक चूक झालेली नाही,' असा तरी खुलासा बॅ. अंतुले बुधवारी विधिमंडळातील आपल्या निवेदनात करतील असे वाटले होते. पण अंतुले यांनी उघड उघड आपल्या प्रमादांचे समर्थनच केलेले पाहून, कोणालाही सखेद आश्चर्य वाटल्यावाचून राहणार नाही ! 'मी सत्तेचा गैरवापर केला नाही,' एवढेच अंतुले सांगते, तर ते बेधडक सत्यापलाप करीत आहेत, असे म्हणता आले असते. पण 'इंदिरा प्रतिभा प्रतिष्ठानसाठी माझ्या अधिकारपदाचा वापर करण्यात मी काहीही गैर केलेले नाही' असा धडधडीत खुलासा करून अंतुले यांनी आपण सामाजिक आणि सार्वजनिक नीतिमत्तेला कवडीमोल मानतो, हेच दाखवून दिले आहे, अथवा गैरवर्तनाची त्यांची व्याख्याच मुलखावेगळी असली पाहिजे ! आणि ही व्याख्या गृहित धरून, राज्यातील विविध सत्ताधीशांनी जर अंतुले ह्यांचाच कित्ता गिरवला, तर केवढी भयावह बजबजपुरी माजेल, ह्याची त्यांना पर्वाच नसली पाहिजे ! अधिकारपदाचा वापर करून जमा केलेल्या देणग्यांतील पैसा न् पैसा गरिबांच्या भल्यासाठीच खर्च केला जाईल, अशी ग्वाही देऊन, आपल्या सत्तेच्या दुरुपयोगाला सामाजिक उपयुक्ततेचा आणि समाजकल्याणाचा मुलामा फासण्याचा आत्मवंचक प्रयत्न अंतुले यांनी या निवेदनात केला. पण ह्या मुलाम्याने कोण

चकणार ? सध्या अंतुले महाशयांविरुद्ध चालू असलेल्या मोहिमेतील वादाचा मुख्य मुद्दा 'अंतुल्यांनी जमा केलेला पैसा ते कसा व कोणत्या कामासाठी खर्च करणार' हा नसून, त्यांनी खासगी ट्रस्टसाठी आपल्या अधिकारपदाचा वापर वा गैरवापर करून पैसा जमा केला, हा आहे.

**चिंताजनक. . .**

अशा रीतीने खासगी कामांसाठी मुख्यमंत्र्यांनी पैसा गोळा करण्यात गैर काहीच नाही, ही बॅ. अंतुले यांची भूमिका अनवस्था निर्माण करणारी आणि चिंताजनक म्हणावी लागेल. बॅरिस्टर अंतुले ह्यांनी इंदिरा प्रतिभा प्रतिष्ठान निर्माण केले, ते सरकारी प्रतिष्ठान आहे असे भासविण्यात आले, नंतर त्याविरुद्ध काहूर उठल्यावर 'ते खासगी आहे', असे पुकारण्याचा प्रयत्न झाला. त्याच्याशी प्रथम इंदिरा गांधींचे नाव जोडण्यात आले, नंतर इंदिराबाईंचे नाव काढून टाकण्यात येणार असल्याचे जाहीर करण्यात आले. म्हणजेच एका परीने हे प्रतिष्ठान खासगी, केवळ अंतुल्यांच्या अखत्यारीत चालणारे असल्याचे, सांगितले गेले. 'गरिबांचे कोटकल्याण करण्याचा ढोल वाजवून काढण्यात आलेली अन्य प्रतिष्ठाने ही केवळ अंतुले यांचा मतदारसंघ, त्यांचा जिल्हा, त्यांचे जन्मगाव, त्यांचा विभाग ह्यांच्याच हितासाठी असल्याने तीही तद्दन खासगी स्वरूपाचीच ठरतात. आपल्या अधिकारपदाचा वापर करून सरकारी यंत्रणेद्वारा आपल्या विभागाचा विकास करण्यात गैर काही नाही, असे अंतुले महाशयांनी म्हटले असते, तर ते एक वेळ समजू शकले असते. 'कराडचा विकास, इतरत्र सर्व भकास' अशी एक राजकीय म्हणच या प्रवृत्तीमुळे रूढ झाल्याचे सर्वांना माहीत आहे ! पण अंतुल्यांनी आपल्या विभागातील, मतदारसंघातील, तालुक्यातील आणि जन्मगावातील विकासासाठी वेगळा मार्ग चोखाळलेला दिसतो. सत्तेचा वापर दोन्ही ठिकाणी असला, तरी अंतुले-प्रणित मार्गामध्ये अधिकारपदाचा वापर करून धनवंतांकडून खंडणी घेण्याच्या प्रथेला राजमान्यता देण्याचा प्रयत्न आहे, आणि म्हणूनच ही प्रवृत्ती अतिशय त्याज्य आणि निषेधार्ह आहे. सिमेंट, अल्कोहोल, ना हरकत प्रमाणपत्रे आदी संबंधातील फायली सभापतींना दाखविण्याचीही अंतुले यांनी तयारी दाखविली आहे. पण ह्याने काय साध्य होणार ? या फायलींद्वारे फार फार तर 'अंतुले हे कायदेशीररीत्या निरपराध आहेत', एवढेच सिद्ध होईल. तथापि त्यांचा नैतिक अपराध त्यामुळे धुऊन निघणार नाही. अंतुले यांचे विधिमंडळातील निवेदन ध्यानात घेतले, तर हा नैतिक अपराध धुऊन निघावा असेही त्यांना वाटत नाही, असे दिसते. किंबहुना लोकशाहीमधील सर्व रूढ नीतिमूल्यांना ठोकरून लावण्यातच आपण धन्यता मानतो, अशी आढ्यताच त्यांच्या शब्दांतून दिसून येते. ही समर्थनबाजी अधिक चिंताजनक आहे.

जणू काही अंतुले ह्यांनी रूढ नैतिक कल्पनांच्या कबरीवर नव्या अफलातून नीतिशास्त्राचा सुलतानशाही महाल उभा केला आहे !

## तर्कदुष्ट नैतिक संहिता

एखाद्या चांगल्या कामासाठी पैसा जमा करण्यासाठी मुख्यमंत्रिपदाचा वापर करण्यात गैर काही नाही, हे अंतुले-नैतिक-संहितेतील कलम एकदा मान्य केले की, हे लोण कुठवर जाईल, ते सांगता येणार नाही. मग शालिनीताईंनी पूर्वी आपल्या पतिराजांच्या मुख्यमंत्रिपदाचा वापर करून, जिजामाता प्रतिष्ठाने उभारली म्हणून त्यांना दोष देण्यात काय अर्थ आहे ? शरद पवारांनीदेखील आपल्या अधिकारपदाचा असा गैरवापर केलाच की नाही, असा सवाल विचारण्यात तरी काय स्वारस्य आहे ? एखाद्या कलेक्टराने अथवा झेड. पी. च्या फण्ड-गुण्ड अध्यक्षाने आपल्या अधिकारपदाचा वापर करून आपल्या जन्मगावी एखादे 'शैक्षणिक प्रतिष्ठान' उभे केले, तर त्याला दोष कोणत्या तोंडाने देणार ? आणि एखाद्या तहसीलदाराने आपल्या गल्लीतील 'मारुती मंदिरा'साठी आपल्या छोट्याशा सत्तेचा वापर करून पैसा जमवला, तर तुम्ही-आम्ही त्याला 'लाचखाऊ' कसे म्हणणार ? कारण राज्याचा मुख्यमंत्रीच आपल्या तोंडाने, राज्याच्या भर विधिमंडळात 'अधिकाराचा वापर करून इंदिरा प्रतिष्ठानसाठी पैसा गोळा करण्यात काहीही गैर नाही' असा निर्वाळा देतो आहे ! संजय गांधीचा तरी अपराध असा काय होता ? आपल्या आईच्या अधिकारपदाचा वापर करून राष्ट्राच्या भल्यासाठी त्याने 'मारुती मोटर प्रतिष्ठान' स्थापन केले आणि काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत अनेकांकडून या प्रतिष्ठानसाठी पैसा गोळा केला. बॅ. अंतुले यांचे अजब तत्त्वज्ञान मान्य केले तर मग संजय गांधीला (किंवा त्याला आपल्या अधिकाराचा उपयोग करू दिल्याबद्दल इंदिरा गांधींना) तरी कोणत्या मुखाने दोष देणार ? अर्थात अंतुले महाशय ह्या आपल्या समानधर्मीय स्व-जनांना दोष देणारच नाहीत ! किंबहुना, हे अजब नि उद्धट नीतिशास्त्र त्यांनी संजय गांधी - इंदिरा गांधी इत्यादींच्या पुण्य-चरित्राच्या अभ्यासाच्या आधारेच उभे केले असावे ! हाच अधिकार-पद-जन्य द्रव्य-संपादनाचा अंतुले सिद्धान्त उद्या बंगालमध्ये वा अन्य ठिकाणी विरोधी पक्षीयांनी अनुसरला तर ?. . . तर 'आपले द्रव्यसंपादन ते पुण्य नि इतरांचे ते पाप' असे ह्या सिद्धान्त-शिरोमणींना म्हणता येईल काय ?. . . बाकी हा सवालच व्यर्थ आहे. कारण, इंदिरा काँग्रेसमधील बहुतेक सर्व सत्ताधाऱ्यांना (मग ते अंतुले असोत, गुंडूराव असोत वा गुण्ड-पुण्डांना पावणाऱ्या देवीजी असोत !) बहुमताची धुंदी चढली

असल्याने ते काय वाट्टेल ते म्हणू शकतात, वाट्टेल ते तर्कदुष्ट बोल बरळू शकतात. प्रत्यक्ष रुपये-आणे-पैच्या भ्रष्टाचारापेक्षा ही मानसिक भ्रष्टावस्था महाभयंकर आहे, असे जे आम्ही वारंवार बजावले आहे ते यासाठीच.

**'. . . तया नावडे साखर !'**

विरोधी पक्षांनी विफलतेच्या व निराशेच्या भावनेतून आपल्या चारित्र्यहननाची मोहीम सुरू केली व या मोहिमेला 'एक्सप्रेस टॉवर्स'मधून (म्हणजे लोकसत्ता कचेरीतून प्रेरणा मिळाली) असा आरोप अंतुले यांनी केला आहे. मुख्यमंत्र्यांच्या या आरोपाची दखल कशा प्रकारे घ्यायची, ते विरोधी पक्ष पाहून घेतील. आमच्या मते, 'एक्सप्रेस टॉवर्स'मध्ये कोण आले नि कोण येऊन गेले, हा मुद्दा अप्रस्तुतच नव्हे, तर पोरकटही आहे. 'एक्स्प्रेस-टॉवर्स'ने जो लोकशाही नीतिमूल्यांचा ध्वज उंच उचलून धरला, त्याकडे पाहण्याचे धैर्य अंतुले नि त्यांचे भाईबंद ह्यांना आहे की नाही, हा मुद्दा महत्त्वाचा आहे. एखाद्या राज्याचा मुख्यमंत्री जर आपल्या अधिकाराचा वापर करून भ्रष्टाचारासच शिष्टाचाराची राजमान्यता देऊ पाहत असेल, तर त्याच्या या वर्तनाची दखल घेणे व या प्रवृत्तीविरुद्ध जनमत तयार करणे हे तर मुळी विरोधकांचे व वृत्तपत्रांचे काम आहे. त्यामुळे विरोधकांनी ही मोहीम हाती घेण्यात काही गैर केले असे आम्हास वाटत नाही. आम्ही किंवा आमचे इंग्रजी भावंड इंडियन एक्स्प्रेस यांनी केवळ कर्तव्यबुद्धीने आणि समाजहितैषी दृष्टीनेच या प्रश्नाला हात घातला. त्यामुळे 'एक्स्प्रेस टॉवर्स'मध्ये आपल्याविरोधी कट शिजला, हा आरोप करून मुख्यमंत्र्यांनी एक्स्प्रेस पत्रसमूहांचा नकळत गुण-गौरवच केला आहे, असे आम्ही मानतो. आमच्यापुरतेच बोलायचे झाल्यास आम्ही कधीच कोणत्याही प्रश्नांमध्ये वैयक्तिक द्वेषाची किंवा निंदानालस्तीची पातळी गाठली नाही. केवळ सार्वजनिक नीतिमूल्यांची राखण करण्याच्या भूमिकेतूनच आम्ही नेहमी प्रत्येक प्रश्नाचा विचार करीत आलो. अंतुले-निर्मित प्रतिष्ठानासंबंधी आमची हीच निखळ भूमिका आहे. म्हणूनच या प्रश्नावर प्रथम लिहिताना आम्ही म्हटले होते, 'अंतुले यांचे मुख्यमंत्रिपदावरून जाणे किंवा राहणे हे महत्त्वाचे नाही. या प्रकरणात गुंतलेली सार्वजनिक नैतिकता अधिक महत्त्वाची आहे.'

. . . पण आमची ही निखळ नि तत्त्वशुद्ध भूमिका भ्रांतचित्त अंतुले ह्यांना आकलन होऊ नये, वृत्तपत्रकचेरीच्या खुल्या चव्हाट्यावरही त्यांना गुप्त कट शिजल्याचा साक्षात्कार व्हावा आणि व्यक्तिद्वेष-रहित निर्भीड टीका थोडीही सहन न व्हावी हे त्यांचे (आमचे नव्हे !) दुर्दैव होय. अंतुले ह्यांची ही अवस्था पाहून आम्हास तुकोबारायांची उक्ती

आठवते— ‘अंगी ज्वर, तया नावडे साखर !’

मुख्यमंत्र्यांनी आपल्या प्रमादशील वर्तनाचे समर्थन करण्याची लटपटपंची करून, आणि त्यांना पंतप्रधान नि अर्थमंत्री यांनी पाठीशी घालून, लोकशाही संकेतांना आपण किती कःपदार्थ मानतो हे दाखवून दिले, हे एका परीने बरेच झाले. कारण त्यायोगे लोकशाही मुखवटा धारण करून रुबाबात वावरणाऱ्या एकतंत्रवादाचे— एकपक्षीय हुकूमशाहीचे— यथार्थ दर्शन घडले !

□

॥ २९ ॥

# अभिनंदनीय निर्णय

## 'कठिण-समय येता कोण कामास येतो ?'

*३१ जुलै १९८२*

सर्वोच्च न्यायालयाच्या ताज्या निवाड्यानंतर लगोलग राज्यपाल एअर चीफ मार्शल इद्रिस लतीफ यांनी महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री अब्दुल रहेमान अंतुले यांच्यावर फौजदारी खटला भरण्यास रामदास नायक - मृणाल गोरे प्रभृतींना परवानगी देऊन, भारताच्या घटनात्मक इतिहासातील एक नवे पृष्ठ लिहिले, यात शंका नाही. दूरगामी परिणाम घडवून आणणारा हा ऐतिहासिक स्वरूपाचा निर्णय घेतल्याबद्दल राज्यपाल लतीफ हे निःसंशय अभिनंदनास पात्र आहेत. विरोधी पक्ष-नेत्यांनीही मुक्तकंठाने राज्यपालांचे अभिनंदन केले आहेच. गेल्या काही दिवसांपासून सत्ताधारी पक्षाला वा बलदंड सत्ताधीशाला वाचविण्यासाठी अशोभनीय निर्णय घेण्याची वेगवेगळ्या राज्यपालांमध्ये स्पर्धा लागलेली दिसत असताना, एअर मार्शल लतीफ यांनी अंतुल्यांना फौजदारी कोर्टात खेचण्यासाठी परवानगी दिली, हे विशेष होय. 'मंत्रिमंडळाचा सल्ला न घेता या प्रकरणी राज्यपालांनी निकाल द्यावा' असा आदेश सर्वोच्च न्यायालयाने परवाच दिला होता. त्यामुळे राज्यपालांना महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळाच्या सल्ल्यासाठी थांबण्याची गरज नव्हती. राज्यपालांनीही अनौपचारिक दृष्ट्यासुद्धा विद्यमान मुख्यमंत्र्यांना न विचारताच निर्णय घेतलेला दिसतो. कदाचित सर्वोच्च न्यायालयाचा निकाल बाहेर येण्यापूर्वीच राज्यपाल लतीफ यांनी रामदास नायक प्रभृतींना परवानगी देण्याचा निर्णय

मनोमन घेऊनही टाकलेला असावा. कारण त्यांची म्हणून जी आज्ञा गुरुवार रोजी प्रसारित झाली, तिच्यावर आदल्या दिवशीचा म्हणजे बुधवारचा २८ जुलै हा दिनांक आहे. राज्यपालांनी हा निर्णय प्रायः स्वतःच घेतलेला दिसत असला, तरी त्यासाठी त्यांना दिल्लीहून हिरवा कंदील मिळाला असला पाहिजे, हे मानण्यास भरपूर जागा आहे. विशेषतः विधान परिषदेच्या निवडणुकीत अंतुले गटाने गद्दारी केल्याचा संशय श्रेष्ठींना वाटत असल्याच्या पार्श्वभूमीवर राज्यपालांचा हा निर्णय आल्यामुळे तर दिल्लीची अनुमती या निर्णयास असावी, अशी अनेकांची खात्रीच आहे. पण ते काहीही असले व दिल्लीच्या पूर्व-संमतीनेच राज्यपालांनी हा निर्णय दिला असला, तरी त्यामुळे या निर्णयाचे महत्त्व कमी होत नाही. म्हणूनच 'भारताच्या स्वातंत्र्योत्तर इतिहासात भ्रष्टाचाराबद्दल एका माजी मुख्यमंत्र्यास कोर्टात खेचण्यास परवानगी देणारा पहिला राज्यपाल' म्हणून लतीफ यांची नोंद करावी लागेल. अंतुल्यांचे सिमेंट आणि प्रतिष्ठान प्रकरण जेव्हा प्रथम उजेडात आले, तेव्हा धैर्यधराचे उसने अवसान आणून जनाब अंतुले 'मला बदनाम करण्यासाठी हा सारा बनाव सी. आय. ए. आणि आर. एस. एस. यांनी घडवून आणला आहे' अशी हाकाटी करीत हिंडत होते. आता आपल्यावर फौजदारी खटला भरण्याची परवानगी देऊन राज्यपाल लतीफ यांनीही सी. आय. ए. शी हातमिळवणी केली, असे जनाब अंतुले म्हणणार आहेत काय? आता तरी त्यांची त्या काळची हाकाटी म्हणजे–

*इक तमाशा हुआ,*
*गिला न हुआ!*

ह्या सदरात जमा होणारी होती, हे त्यांच्या ध्यानात आले असेल काय?

## विलंबाची इष्ट फलश्रुती

राज्यपालांनी सर्वोच्च न्यायालयाचा निकाल लागेपर्यंत थांबण्याची गरज नव्हती, असे या संदर्भात कोणीतरी म्हटले आहे. पण एका परीने सर्वोच्च न्यायालयात जाऊन या प्रकरणी निर्माण झालेल्या वैधानिक मुद्द्याचा सोक्षमोक्ष लागला, हे बरेच झाले. कारण भ्रष्टाचाराच्या आरोपावरून खटला ओढवून घेण्याची पाळी येणारे बॅ. अंतुले हे काही पहिलेच मुख्यमंत्री नव्हेत– आणि शेवटचे तर नव्हेतच नव्हेत, असे सध्याचे काँग्रेस-कल्चर पाहून म्हटल्यास ते गैर ठरू नये! त्यामुळेच, भावी काळातही जेव्हा केव्हा एखाद्या मुख्यमंत्र्यावर कायदेशीर कारवाई करण्याचा प्रश्न कोणत्याही राज्यात निर्माण होईल, त्या प्रत्येक वेळी कोणाही राज्यपालांना दिल्लीच्या तोंडाकडे पाहण्याची गरज भासणार नाही. 'मुख्यमंत्र्याविरुद्ध फौजदारी खटला भरताना राज्यपालांनी

मंत्रिमंडळाच्या सल्ल्यासाठी न थांबता, स्वतःचा सारासार-विवेक वापरून निर्णय द्यावा' असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे. या विधानात मंत्रिमंडळाचा उल्लेख हा राज्य मंत्रिमंडळाला उद्देशून आहे. त्यामुळे 'दिल्लीच्या परवानगी'चे काय, असा प्रश्न विचारता येईल. पण 'राज्यपालाने स्वतःचा सारासार विवेक वापरावा' असे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्टपणे म्हटले असल्याने, यापुढे राज्यपालांना अनेक बाबतींत स्वतंत्र बुद्धीने निर्णय घेण्याची संधी सर्वोच्च न्यायालयाने प्राप्त करून दिली आहे. (अर्थात या संधीचा फायदा घ्यायचा की नाही, हे राज्यपालांच्या विवेकबुद्धीवरच अवलंबून राहील हा भाग अलाहिदा.) अंतुले-प्रकरणी निर्णय देण्यास राज्यपालांनी लावलेल्या विलंबाची ही इष्ट फलश्रुती म्हणायला हरकत नाही. कायद्याचे हे कवच आता आपले संरक्षण करण्यासाठी उपयोगी ठरणार नाही, हे एकदा लक्षात आल्यावर अंतुल्यांनी लगोलग राज्य पाटबंधारे विकास महामंडळाच्या अध्यक्षपदाचाही राजीनामा देऊन टाकला आहे. जिथे मुख्यमंत्र्यांवरही फौजदारी खटला भरण्यास राज्यपालांनी परवानगी देण्यास हरकत नाही, असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले, तेथे पाटबंधारे महामंडळाचे अध्यक्षपद आपल्या कामी येणार नाही, हे समजण्याइतके अंतुले धूर्त आहेत. सर्वोच्च न्यायालयाच्या व राज्यपालांच्या निर्णयानंतर 'लाजही राखता येत नाही व माशाही निवारता येत नाहीत' असे शेळीच्या शेपटासारखे हे अध्यक्षपद म्हणूनच बॅ. अंतुल्यांनी सोडून दिले असावे. कदाचित आपली प्रतिघाताची दर्पोक्ती पुरी करण्यासाठी मागचे सगळे दोर कापून टाकण्याचाही अंतुल्यांचा त्यामागे हेतू असेल. "आपणावर आघात झाला, तर आपण लगेच प्रत्याघात करू; निमूटपणे आघात सहन करणार नाही" असे अंतुल्यांनी अलीकडेच कुलदीप नायर यांना दिलेल्या मुलाखतीत जाहीर केले होते. त्यांची ही धमकी बाबासाहेब भोसल्यांना उद्देशून निश्चितच नव्हती. त्यांचा रोख उघडपणे इंदिरा गांधींवर होता.

### येत्या चार ऑगस्टला

आपल्या भात्यातील पहिला बाण सोडण्यासाठी बहुधा बॅ. अंतुल्यांनी येत्या ४ ऑगस्टला पत्रकार परिषद आयोजित केली असावी. या पत्रकार परिषदेचा आपला मानस ज्या शब्दांत अंतुल्यांनी व्यक्त केला आहे, तो पाहता श्रीमती गांधींशीही दोन हात करण्याचा त्यांनी आव आणलेला दिसतो. श्रीमती गांधींनाही असे उघड आव्हान पक्षामध्ये कोणी दिलेले सहन होत नाही. त्यामुळे अंतुले फार काळ इंदिरा काँग्रेसमध्ये राहतील असे वाटत नाही. अंतुले यांच्यासमवेत त्यांचे कट्टर समर्थक किती प्रमाणात बाहेर पडतील याची आज काहीच कल्पना करता येत नाही. पण काही खास कारणांसाठी अंतुल्यांना सोडणे ज्यांना अशक्यच आहे, अशी काही चारदोन मंडळी सोडली तर बहुधा दुसरा

कोणीही इंदिरा कॉंग्रेसजन अंतुल्यांना आता साथ देईल असे वाटत नाही. शुक्रवारच्या वृत्तपत्रात एका अंतुले-मित्राची प्रतिक्रिया प्रसिद्ध झाली आहे. आपले नाव जाहीर होऊ न देण्याची सावधगिरी घेताना या मित्राने सांगितले, "अंतुले माझे मित्र असले, तरी मला माझ्या भवितव्याची काळजी घेतलीच पाहिजे ना?". . . अंतुल्यांनाही 'जन हे दिल्या-घेतल्याचे' असतात याची जाणीव असावी असे दिसते. कारण 'माणूस जेव्हा एकाकी असतो, तेव्हा तो परमेश्वराच्या सन्निध असतो' असे अंतुल्यांनी वार्ताहरांना सांगितल्याचे वृत्त छापून आले आहे. आजवर त्यांची साथ केलेले त्यांचे सारे तथाकथित मित्र यापुढील काळ अंतुल्यांना अधिकाधिक परमेश्वराच्या सान्निध्यात घालवायला मिळावा, यासाठी नक्कीच हातभार लावतील आणि— 'कठिण समय येता, कोण कामास येतो?' हा त्रिकालाबाधित प्रश्न त्यांच्यापुढे उभा करतील, याबद्दल आमच्या मनात तरी शंका नाही ! ४ ऑगस्ट रोजी आपण दंभस्फोट करणार असल्याचे बॅ. अंतुल्यांनी सूचित केले आहे. ते कोणाकोणाचा दंभस्फोट करणार ते दिसेलच. त्यामुळे अंतुल्यांच्या अपराधांची तीव्रता कमी होणार नाही. पण या निमित्ताने का होईना, पण अंतुल्यांच्या चलतीच्या काळात कोणी कोणी त्यांच्या अपराधांवर पांघरूण घालण्याचा प्रयत्न केला, आणि केवळ निरपेक्ष मोहब्बतीपायी नव्हे, तर मुखलेप लाभल्यामुळेच कोणत्या मृदंगांकडून अंतुले-प्रमाद-समर्थनाचे बृहन्नाद निनादले, त्यांची नावे अंतुल्यांच्याच तोंडून बाहेर येतील, हेही नसे थोडके !

□

॥ ३० ॥

## ही ईश्वराची कृपा

*२७ जुलै १९८३*

माजी आमदार-द्वय श्री. रामदास नायक आणि श्री. पी. बी. सामंत ह्यांनी माजी मुख्यमंत्री जनाब अ. र. अंतुले ह्यांच्याविरुद्ध जे दोन फौजदारी स्वरूपाचे तक्रारअर्ज दाखल केले होते, ते न्यायमूर्ती आर. बी. सुळे ह्यांनी परवा फेटाळले. ह्यामुळे अंतुले आणि त्यांचे हमदर्द नि हमराही ह्यांना हायसे वाटणे, मानवी स्वभावाला धरूनच आहे. पण केवळ तेवढ्याने 'जितं मया, जितं मया' असे होऊन जाणे, अति-मानवी म्हणावे लागेल ! कारण, 'भारतीय दंडविधान संहितेच्या १६१,१६५, ३८४ नि ४२० ह्या कलमांच्या आधारे नि १९४७ च्या भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यानुसार जे आरोप अर्जदारांनी केले होते, त्यांच्या गुणावगुणात न्यायमूर्ती सुळे शिरलेच नाहीत. गुणवत्तेच्या निकषावर त्यांनी अर्ज फेटाळले नाहीत, तर केवळ एका तांत्रिक मुद्द्याच्या आधाराने प्रस्तुत अर्ज रद्दबातल ठरविले. अर्थात, 'हा खटला चालविण्याचा कायदेशीर अधिकारच आपणास नाही' ही न्यायमूर्तींची भूमिका असल्यामुळे त्यांनी त्या आरोपात न शिरणे क्रमप्राप्तच होते. ज्या गावाला आपण जाऊच शकत नाही, त्या गावच्या चौकशा करण्याचे कारणच काय, अशी ही भूमिका आहे. आणि म्हणूनच केवळ अर्ज फेटाळल्यामुळे श्री. अ. र. अंतुले ह्यांच्यावरील सर्व आरोपांचे निरसन होऊन ते धुतल्या तांदळासारखे स्वच्छ होऊन बाहेर आले, असे म्हणता येणार नाही.सुवर्णकाराने तांत्रिक अडचणीमुळे अग्नि-परीक्षा करण्याचेच नाकारले ! मग अमुक एक धातू बावनकशी सुवर्ण आहे की मलिन पितळ आहे, ह्याचा निर्णय लागणारच कसा ? 'प्रस्तुत खटला चालविण्याचाच अधिकार नसल्यामुळे आपण हे अर्ज फेटाळीत आहोत', असे न्यायमूर्तींनी म्हटले, याचाच

अर्थ 'अन्य स-क्षम न्यायालयात हा खटला पुनः चालू शकेल', असाच होतो. 'आपण प्रस्तुत खटला चालविण्यास अक्षम नि अनधिकारी का?' ह्या सवालाचे स्पष्टीकरण करताना न्यायमूर्ती सुळे ह्यांनी एकच महत्त्वाचा मुद्दा उपस्थित केला आहे. आणि तो म्हणजे— 'अंतुले हे आमदार असल्यामुळे त्यांच्यावर खटला भरण्यासाठी विधानसभेची पूर्व-परवानगी हवी.' प्रस्तुत न्यायालयाच्या कार्यकक्षेत हा खटला येऊ शकत नाही नि गुन्ह्यांची दखल घेऊ शकत नाही हा मुद्दा विशद करताना न्यायमूर्ती म्हणाले, "आमदार अथवा खासदार ह्यांच्यावरील खटल्याबाबत केवळ राज्यपालांची अनुमती पुरेशी नसते. कारण, राज्यपाल त्यांना— आरोपितांना— त्यांच्या प्रातिनिधिक स्थानावरून काढून टाकू शकत नाहीत. . . हा असा खटला अन्य योग्य न्यायालयात नेता येईल. . . "

## संरक्षक कवच?

या निर्णयावर भाष्य करताना आमचा एक आमदार-मित्र सानंद उद्‌गारला, "बहोत खूब! विशेषतः बहुमत-संपन्न पक्षाच्या आमदार-नामदार-खासदार मंडळींना कायद्याने हे एक संरक्षक कवचच दिले म्हणायचे! कारण, आपल्याच पक्षाच्या आमदारावर खटला भरण्यासाठी बहुमतवाला सत्तारूढ पक्ष परवानगी देणे सहसा अशक्यच नाही काय? काही आमदार तर हा गैरवर्तनाचा मुक्त परवानाच समजतील! 'भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्या'च्या तरतुदीनुसार लोकसेवकावर खटला भरण्यास अशी पूर्व-परवानगी आवश्यक असली; तरी त्या तरतुदीचा हेतू अपराध्याला क्षमा करणे वा अपराधाची तीव्रता कमी करणे हा नाही,' असे न्यायमूर्तींनी स्पष्ट केले खरे. पण या जगात सद्‌हेतूकडे पाहतो कोण? कायदेशीर तरतुदीमागील मूळ सद्‌भावना लक्षात घेणारे महाभाग किती? प्रत्यक्षात, कोणाही सत्तारूढ आमदारावर भ्रष्टाचारासंबंधी खटला भरण्यासाठी विधानसभेकडून परवानगी मिळण्याची शक्यता किती?. . . " अहो पण ह्या कायदेशीर काथ्याकूटात शिरण्याचे नि सामान्यजनांच्या प्रतिक्रिया लक्षात घेण्याचे प्रयोजन नाही. सर्वांत गहिरी स्वयं-संतोषभरित प्रतिक्रिया प्रकट झाली ती भगवद्‌भक्त अंतुले ह्यांच्या मुखातून! ते उद्‌गारले, "परमेश्वराने घेतलेल्या ह्या कठोर परीक्षेतून उत्तीर्ण होऊन मी विजयी झालो ही त्याचीच— त्या खुदाचीच— मेहरबानी (ग्रेस ऑफ गॉड)! आणि जनतेच्याच सदिच्छांचे नि आशीर्वादाचे हे फळ!. . ." जनाब अंतुल्यांची ही खुदा-परस्ती कौतुकास्पदच होय! पण पाखंडी मनात काही प्रश्न उगाच उभे राहतात.

## काफिर सवाल?

बेटे पाखंडी चिकित्सक मन विचारते— 'परमेश्वर जर एवढा मेहरबान आहे,

रहेमदिल आहे, तर त्याने मुळात भक्ताला कठोर परीक्षेचा ताप द्यावाच का? उमरखैयाम म्हणूनच शिकायत करतो–

*मुझे जो पथ करना था पार*
*बिठाये उसपर भूत-पिशाच,*
*रचाये उसपर गहरे गर्त*
*और फिर करने आया जांच।*

छे छे, हा परमेश्वर (आमच्या दिल्लीतील श्रेष्ठींप्रमाणेच–) मोठा लहरीच नव्हे काय?' खऱ्या विज्ञाननिष्ठ दृष्टीने पाहिल्यास, ह्या प्रचंड विश्वाच्या मुळाशी जी शक्ती आहे, जो पंचमहाभूतात्मक निसर्ग आहे, त्याच्या खिजगणतीतही मानवी सुख-दुःखाचे हे खटले नाहीत! निसर्गाविषयी लॉर्ड टेनिसनने जे म्हटले तेच खरे वैज्ञानिक सत्य–

*So careful of the type*
*she seems,*
*So careless of the*
*single life!*

केवळ भाबडी भक्ती अथवा घोटीव दांभिकताच त्या विश्वचालकशक्तीला लहान-सहान गोष्टींत हकनाक खेचून आणते! जनतेच्या सदिच्छा नि आशीर्वाद ह्यांनाही अंतुलेजींनी आपल्या तथाकथित विजयाचे श्रेय दिले आहे. पण पुनः काफिर चिकित्सा वृत्ती विचारील, 'अंतुल्यांचे वाभाडे जेव्हा जस्टिस लेन्टिन काढीत होते, आणि जेव्हा हा खुदाचा धाडसी, साहसी बंदा मुख्यमंत्रिपदास मुकला, त्या वेळी ही जनतेची सदिच्छा नि आशीर्वादाची रसद कुठे गायब झाली होती?... तेही असो. जगदीश्वर नि जनता-जनार्दन ह्यांच्या पाठोपाठ अंतुले ह्यांना जन-स्वामिनी इंदिरादेवी ह्यांची आठवण प्रस्तुत आनंद क्षणी झाली, हे लक्षणीय आहे. 'इंदिरा गांधी नि इंदिरा काँग्रेस ह्यांच्यावरील माझ्या निष्ठेचीही कसोटी लागली,' असे उद्‌गार त्यांच्या तोंडातून सहजगत्या परवाच्या त्या 'धन्य आनंददिनी' प्रकटले. त्याची दखल दिल्लीश्वरी देवी घेतील काय? आणि–

*फानूस बनके 'इंदिरा' जिसकी*
*हिफाजत करें।*
*वो शमा क्या बुझे?*
*खुदा जिसे रोशन किये।*

अशा अंतुले-श्रद्धेची कदर करतील काय?

□

॥ ३१ ॥

## चीनचा 'स्फोटक' पवित्रा

*११ डिसेंबर १९६८*

*"कोई नहीं साथ अबल को*
*सब कोई प्रबल सहाय*
*पवन जगावत आग को*
*दीपही देत बुझाय ॥"*

गतसप्ताहात अमेरिकेचे तीन अंतराळवीर आपली चंद्रयात्रा यशस्वी करून सुखरूप परतले, यामुळे विस्मयचकित झालेल्या जगाला लगेच दुसऱ्या दिवशी आणखी एक विस्मयाचा धक्का बसला– आणि तो म्हणजे 'माओ' च्या ७५ व्या वाढदिवशी चीनने केलेल्या ३० लाख टनी हैड्रोजन बॉम्बच्या स्फोटाचा ! शहामृगी वृत्तीच्या 'विचारवंता'ची गोष्ट सोडली तर, जगातील सर्वच राजकारणपंडितांना हा स्फोट चिंताजनक वाटला. भारताने तर शतवार विचार करावा, अशी ही घटना आहे. १६ ऑक्टोबर १९६४ रोजी चीनने पहिल्या अॅटमबॉम्बचा चाचणी-स्फोट केला. त्या वेळी ओढूनताणून चंद्रबळ आणलेला हा एक 'स्टंट प्रयोग' होय, असे मानणाऱ्या महाभागांनी खडबडून जागे व्हावे अशीच ही परवाची घटना आहे. कारण, गेल्या ४ वर्षांतील चीनचा हा आठवा बॉम्ब-स्फोट आहे. चीनमध्ये तीव्र अंतर्विरोध निर्माण झाला आहे, चिनी बुद्धिमंत नाराज आहेत, माओप्रणित सांस्कृतिक क्रांतीला चीनमध्ये ठायी ठायी विरोध होत आहे, या वार्तांना (त्या खऱ्या असल्या तरी) प्रमाणाबाहेर महत्त्व देऊन गाफिल राहण्यात अर्थ नाही, असाच इशारा हा आठवा स्फोट सुस्पष्टपणे देत आहे. ज्या वैज्ञानिकांना नि तंत्रज्ञांना 'बूर्ज्वा' म्हणून चीनमध्ये गालिप्रदान होत होते, त्यांनाच चुचकारून वा यशस्वीपणे वेठीस

धरून माओच्या राजवटीने ही आठव्या स्फोटाची विस्मयजनक किमया करून दाखविली; सुमारे ५००० शास्त्रज्ञ ह्या कार्यासाठी यशस्वीपणे राबविले, ही वस्तुस्थिती पुरेशी बोलकी आहे.

### या प्रयोगांचे प्रयोजन ?

केवळ अणुबॉम्ब वा हैड्रोजन बॉम्ब यांच्याच बाबतीत नव्हे, तर इतर अनेक सैनिकीबाबतीत चीन प्रथम श्रेणीत येण्याचा आटोकाट प्रयत्न करत आहे. उदाहरणार्थ, आरमारी सैन्यांच्या बाबतीत आज चीनचा अमेरिका नि रशियाच्या खालोखाल क्रमांक लागतो. त्याच्याजवळ १ लाख ३६ हजार आरमारी सैनिक सज्ज आहेत. आज फ्रान्ससारख्या राष्ट्राचीदेखील एवढी सैनिकी सिद्धता नाही. फ्रान्सलादेखील अणुबॉम्ब वा हैड्रोजन बॉम्ब तयार करण्याचा कार्यक्रम शिथिल करावा लागला. अशा परिस्थितीत ३० लाख टनी हैड्रोजन बॉम्बचा यशस्वी स्फोट करण्यापर्यंत चीनने जी प्रचंड झेप घेतली आहे तिचे प्रयोजन काय ? प्रयोजन हेच की, आपले शस्त्रबळ वाढवून चीन अमेरिकेच्या नि रशियाच्या मालिकेत बसण्याचीच महत्त्वाकांक्षा बाळगीत आहे. किमान आशिया खंडात तरी 'कोन्योस्ति सदृशं मया ?' असा लाजवाब प्रश्न उपस्थित करून, आशियाच्या एकमेवाद्वितीय नेतेपदाचा मुकुट मस्तकी धारण करण्याची जिद्द त्याने धरली आहे; आणि ती जवळजवळ सफळ करीत आणली आहे ! यावर कोणी म्हणतील, 'हे अतिशयोक्त वर्णन आहे; चीनच्या हैड्रोजन बॉम्बस्फोटाने दिपून गेल्याचे लक्षण आहे. कारण चीनने हैड्रोजन बॉम्बपर्यंत मजल मारली तरी तो रशिया-अमेरिकेच्या तुलनेने अद्यापि 'किस झाड की पत्ती' होय. त्याच्यापाशी हे बॉम्ब अथवा अन्य अस्त्रे दूरवरच्या अंतरावर अचूक टाकण्यासाठी आवश्यक असलेली वाहक-व्यवस्था कोठे आहे ?' पण फार तर पहिल्या स्फोटाच्या वेळी योग्य ठरण्याजोगता हा प्रश्न आता अयोग्य ठरला आहे. कारण काही निरीक्षकांच्या मते १९७५ पर्यंत, चीन आंतरखंडीय युद्धासाठी आवश्यक असलेल्या क्षेपणास्त्रात नि ती वाहून नेण्याच्या व्यवस्थेत सुसिद्ध होईल, आणि काही तज्ज्ञांचा तर असा कयास आहे की, तो आजही याबाबतीत फारसा मागे नसावा !

### तर कोण धावून येईल ?

ते काहीही असो. या नव्या स्फोटामुळे आपल्या देशापुढे गंभीर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. आधीच या देशात 'माओ'ची मौला-मंडळी नक्षलवादी-तंत्राचा प्रयोग करू पाहत आहेत. भारताच्या सरहद्दीवर असलेला पाकिस्तान तर चीनने बराच पोखरला आहे. अशा स्थितीत उद्या भारत-चीन संघर्ष पुनश्च पेटला तर ? तर चीनच्या हैड्रोजन बॉम्बपासून

भारताचे रक्षण कोण करील? अमेरिका वा रशिया आपल्या रक्षणाला धावून येतील, अशी अपेक्षा धरता येईल काय? काही दिवसांपूर्वी अमेरिकेचे परराष्ट्रमंत्री श्री. रस्क म्हणाले होते, "भारतावर चीनच्या बॉम्बचे संकट गुदरले तर भारताला वाचविण्यासाठी आम्ही सिद्ध होऊ, असे वचन अमेरिका देऊ शकत नाही. भारत अण्वस्त्रप्रसारबंदी करारावर बोट ठेवून, सुरक्षामंडळाकडे शिकायत करू शकेल." याचा अर्थ एवढाच की तशा संकटकाळात 'त्राहि निक्सन' ही भारताची प्रार्थना सफळ होईलच, अशी हमी देता येत नाही. अमेरिका काय अथवा रशिया काय, भारताच्या संरक्षणाची जबाबदारी आपल्या एकट्याच्या मस्तकी घेऊ इच्छित नाहीत. याच संदर्भात, मास्कोला शह देण्यासाठी चीन अमेरिकेशी मिळतेजुळते घेण्याचे जे पवित्रे टाकीत चालला आहे, तेही ध्यानात घेतले पाहिजेत.

## सांगोपांग संरक्षण-योजना हवी

चीनच्या या वाढत्या शस्त्रबळासंबंधी बोलताना, भारताचे संरक्षणमंत्री स्वर्णसिंग नुकतेच म्हणाले की, आमची चीनच्या युद्धतयारीकडे नि शस्त्रास्त्रवाढीकडे जागरूक नजर आहे ! ठीक आहे. पण नुसती नजर असून काय उपयोग? चीनच्या या वाढत्या सैनिकी सामर्थ्याला कसे तोंड द्यावयाचे याची सांगोपांग योजना सिद्ध पाहिजे. चीनच्या हैड्रोजन बॉम्बचा वर्षाव भारतावर होवो अथवा न होवो, त्याच्या स्फोटाने भारतातील चीनवाद्यांना जोर चढणार आहे; आशिया-आफ्रिका खंडांतील तथाकथित क्रांतिकारी उठावांना नैतिक बळ प्राप्त होणार आहे. चीनच्या या शस्त्रास्त्र-सज्जतेच्या नुसत्या दबदब्यानेच 'माओ' अर्धे अधिक युद्ध रक्ताचा एक थेंबही न सांडता, जिंकू शकेल !

*'कोई नहीं साथ अबल को । सब कोई प्रबल सहाय ॥'*

हाच पुरातन सिद्धांत लाल चीन प्रत्यक्ष कार्यवाहीत आणून, भारताभोवतालच्या राष्ट्रांना नुसत्या हुंकाराने आपल्या प्रभावाखाली आणीत असताना, आपण नुसते नजर ठेवण्याचे 'नजरबंदी' खेळ करून कसे भागेल? देशाच्या संरक्षण-सिद्धतेचा आमूलाग्र नि दूरदर्शी विचार करण्याची वेळ अगदी जवळ आली आहे.

□

॥ ३२ ॥

# भवानी तलवार कोठे आहे ?

*१६ डिसेंबर १९६८*

छत्रपती शिवाजीमहाराजांची भवानी तलवार कुठे आहे, या प्रश्नाचे एक निश्चित उत्तर हे की, 'सच्च्या भारतीयांच्या, महाराष्ट्रीयांच्या हृदयमंदिरात ती ३०० वर्षांहून अधिक काळ वास्तव्य करीत आहे !' 'आणि ती कशी आहे,' या प्रश्नाचे निश्चित उत्तर हे की, 'तिचे पुण्यदर्शन कोट्यवधी शिवभक्तांना अपेक्षित असले तरी, आमच्या नाठाळ नोकरशाहीकडून ती दुर्लक्षित आहे ! !' ५० वर्षांपूर्वीच तिच्याविषयीची जनतेची मनीषा गोविंदाग्रज गडकरी ह्यांनी व्यक्त केली होती की–

***एक सांगणे, एक मागणे, तेच लाखवार ।***
***मागुनि घ्यावी श्री शिवबांची भवानी तलवार ॥***
***स्वदेशभूषा, स्वराज्यजननी, सकळी दाखवावी ।***
***दावित दावित सौभाग्यश्री स्वदेशी आणावी ॥***

पण हाय ! पारतंत्र्यात तर ही मंगल मनीषा पुरी झाली नाहीच; पण स्वातंत्र्य मिळून २० वर्षे झाली तरी ती सफळ होण्याचे चिन्ह दिसत नाही. भारत सरकारच्या लंडन येथील आलिशान वकिलातीमधील नवाबी नोकरशहांना शिवरायांच्या भवानी तलवारीचा तलास अद्यापि लागला नाही. शिवाजीमहाराज मोगल सैन्याची नजर चुकवून गायब होण्यात फार वाकबगार होते; त्यांचा तो गुण कदाचित भवानी तलवारीनेही उचलला असेल– पण स्वजनांची नजर चुकविण्याइतकी ती निष्ठुर खास नसेल ! भारतीय जनतेला आपल्या दर्शनाने स्फूर्ती देण्यासाठी ती खचित तळमळत असावी. पण अजून तिची तळमळ फलद्रूप झालेली नाही. म्हणूनच परवा लोकसभेत खासदार आर. डी. भंडारे

यांच्या प्रश्नाला उत्तर देताना शिक्षणखात्याचे राज्यमंत्री प्रा. शेरसिंग उद्गारले, "अफसोस ! शिवरायांची भवानी तलवार कुठे आहे याची अधिकृत माहिती आम्हाला नाही. हाती आलेल्या माहितीनुसार लंडनच्या म्युझियममध्ये ती नाही. पण सरकारचे प्रयत्न चालू आहेत !"...

## ठराविक घाटाची नकारघंटा !

सरकारचे– सरकारी नोकरशहांचे– प्रयत्न ! हत्तीएवढ्या खर्चाचे पण मुंगीच्या गतीचे प्रयत्न ! कित्येकदा, आग रामेश्वरी आणि बंब सोमेश्वरी, या न्यायाने चालू असलेले प्रयत्न ! या अशा प्रयत्नांविषयी जनता आता साशंक झाली आहे. आता हेच पाहा ना– शिक्षणखात्याचे राज्यमंत्री शेरसिंग 'अधिकृत माहिती नाही' अशी ठराविक घाटाची नकारघंटा वाजवून मोकळे झाले. पण सरकार जिला अनधिकृत माहिती समजते, तिचा तरी सारांश सभागृहाला सांगावयास पाहिजे होता. कारण भवानी तलवार स्वदेशी आणण्याची मागणी म्हणजे काही एखाद्या कारकुनाची टी. ए. बिलाची मागणी करणारी अर्जी नव्हे की जिच्यावर 'अंडर कन्सिडरेशन' असा शिक्का ठोकून मोकळे व्हावे !

## इतिहास-पंडितांना विचारले असते तर ?

आमचे सरकार म्हणते– 'लंडनच्या पदार्थसंग्रहालयात भवानी तलवार नाही.' नसावयाचीच ! कारण प्रस्तुत विषयावरचे महाराष्ट्रीय इतिहास संशोधकांचे लेख जरी सरकारने काळजीपूर्वक वाचले असते; श्री. ग. ह. खरे, म. म. पोतदार, न. र. फाटक इत्यादी पंडितांकडे विचारपूस केली असती तरी केव्हाच कळले असते की लंडन म्युझियममध्ये शोध घेण्याचे कारणच नाही. फार कशाला 'लोकसत्ते'ने दि. २९ सप्टेंबर १९६८ रोजी 'शिवरायांची भवानी तलवार नि वाघनखे' कशी आहेत नि कोठे आहेत या विषयावर डॉ. रवींद्र रामदास यांचा जो अभ्यासपूर्ण लेख प्रसिद्ध केला, त्याचा मागोवा घेतला असता तरी, शिवरायांच्या त्या पुण्यप्रतापी खड्गाचा शोध कुठे केला पाहिजे, हे कळले असते ! 'लोकसत्ते'तील प्रस्तुत लेखात अनेक पुराव्यांनिशी आणि छायचित्रासह हे प्रतिपादन केले आहे की, शिवरायांची ती रणरंगिणी 'साउथ केनसिंग्टन म्युझियम'मध्ये आहे– (लंडनच्या ब्रिटिश म्युझियममध्ये नव्हे !)

## केनसिंग्टन् म्युझियमची सूची काय म्हणते ?

गोवलेकर सावंत यांच्याकडून जी फिरंग (पोर्तुगीज बनावटीची तलवार) शिवरायांना मिळाली, तीच पुढे आपल्या अद्भुत पराक्रमामुळे 'भवानी तलवार' म्हणून विख्यात

झाली; आख्यायिकांचा विषय बनली. इंग्लंडचा राजा सातवा एडवर्ड याने 'प्रिन्स ऑफ वेल्स' या नात्याने १८७५-७६ साली भारताला भेट दिली, तेव्हा कोल्हापूरच्या महाराजांनी हीच तलवार पाहुण्यांना सन्मानार्थ नजर केली, असे कै. रावबहादुर द. ब. पारसनीस व राजरत्न प्रो. माणिकराव यांनी म्हटले आहे. प्रिन्स ऑफ वेल्स यांना हिंदुस्तानात ज्या दुर्मिळ नि बहुमोल वस्तू भेटी म्हणून मिळाल्या त्यांची सूची 'साऊथ केनसिंग्टन म्युझियम'चे डायरेक्टर सी. पी. क्लार्क यांनी १८९८ मध्ये प्रसिद्ध केली असून, तीत महाराजांच्या तलवारींचे पुढील वर्णन आढळते—

'201, Sober : 'Mahratta' straight, one edged old European blade with two grooves on each side,. . . the raised steel supports at the hilt are damascened with gold in floral designs, the guarded hilt is of iron with a broad knuckle-guard and a circular pommel–encrusted with heavy open-work floral decoration of gold, thickly set with large diamonds and rubies. Presented by H. H. the Maharaja of Kolhapur as a relic of Mahratta Chief Shivaji, to whom it formerly belonged.'

ही तलवार सध्या बकिंगहॅम पॅलेसमध्ये असून, केसरीचे संपादक श्री. जयंतराव टिळक यांनी तिचे छायाचित्रही आणले आहे. 'व्हिक्टोरिया व अल्बर्ट म्युझियम'च्या अधिकाऱ्यांशी कोल्हापूरच्या श्री. वि. ह. कोडोलीकर यांचा जो पत्रव्यवहार झाला, त्यात ११ डिसेंबर १९३१ च्या पत्रात वरील म्युझियमच्या अधिकाऱ्यांनी प्रस्तुत तलवारीचा उल्लेख केला असून, शिवरायांच्या पुण्यप्रतापी वाघनखांचीही माहिती दिली आहे की— 'ही वाघनखे व्हिक्टोरिया नि अल्बर्ट म्युझियमच्या भारतीय विभागात ७ व्या खोलीतील ७०९ नंबरच्या फ्रेममध्ये ठेवली आहेत.'

**ही मोगलाई होय; शिवशाही नव्हे !**

ही सर्व हकीकत शिक्षणखात्याच्या राज्यमंत्र्यांना अथवा लंडन येथे आलिशान दूतावासात मेजवान्या झडविणाऱ्या नोकरशहांना ठाऊक नाही काय? ठाऊक नसेल तर त्यांनी यापुढे तरी या हकीकतीच्या नि संशोधनाच्या आधारे शिवरायांच्या भवानी तलवारीचा अधिक साक्षेपाने व जलदीने शोध करावा; आणि सविस्तर अहवाल लोकसभेपुढे ठेवावा. केवळ 'प्रयत्न चालू आहे' असे ठोकळेबाज उत्तर देणे ही मोगलाई झाली; नठ्ठार नोकरशाही झाली; शिवशाही नव्हे ! भारताच्या आणि विशेषतः महाराष्ट्राच्या पवित्र नि उत्कट भावनांची दखल इतक्या मंदगतीने, ढिलाईने आणि सांगकाम्या वृत्तीने

घेण्यात यावी, ही गोष्ट आमच्या सरकारला बिलकुल शोभादायक नाही. गेल्या २० वर्षांत भवानी तलवारीचा निश्चित ठावठिकाणा लागू नये ही केवढी लाजिरवाणी गोष्ट आहे ! गृहमंत्री नामदार यशवंतराव चव्हाण, मुख्यमंत्री ना. वसंतराव नाईक इत्यादी महाराष्ट्रीय धुरीणांनी, प्रस्तुत बाबतीत जो दीर्घसूत्री गबाळग्रंथीपणा आमच्या नोकरशहांकडून घडत आला आहे, तो त्वरित बंद करण्याची तजवीज केली पाहिजे. आणि महाराष्ट्रीय जनतेनेदेखील अमक्याला 'प्रति शिवाजी' नि तमक्याला 'अतिशिवाजी' अशा पदव्या देत बसण्यापेक्षा, या अशा विधायक कार्याची निकड सरकारच्या मागे लावली पाहिजे.

□

॥ ३३ ॥

# राज्यकर्ते आणि वारांगना

*३ जून १९७३*

आमचे स्नेही छबूराव बाबूराव साबुदाणे पक्के सनातनी. 'मनुस्मृति' हा त्यांचा ग्रंथसाहेब. पण कधी कधी प्रचलित घटनांवर जुन्या ग्रंथांच्या आधारे अशी काही भाष्ये सुनावतात की कुमार सप्तर्षी चाट पडावेत नि आमच्या पुरोगामी 'साहित्य-सखारामां'ना झीट यावी ! परवाच ते आम्हाला म्हणाले, "प्रेमापायी राज्यपद ठोकरणाऱ्या प्रिन्स ऑफ वेल्सचे आपण कौतुक करतो, मग वारांगनाच्या इष्कापायी मंत्रिपदाचे त्यागपत्र देणाऱ्या लॉर्ड लॅम्बटन आणि लॉर्ड जेलिको या त्यागवीरांचे कौतुक का करू नये ? लंडनच्या वारांगना-वस्तीत त्यांचे पुतळे उभारले गेले पाहिजेत !"

"अहो पण प्रिन्स ऑफ वेल्सचा इष्क होता कुलीन स्त्रीशी, अकुलीन गणिकेशी नव्हे."

"सुंदर स्त्रीबाबत तरी हा भेदाभेद आणि तोही या समता युगात बरोबर नाही ! अहो आपल्या खऱ्या खऱ्या वास्तववादी पूर्वजांनीच म्हटलं आहे 'स्त्री-रत्नं दुष्कुलादपि !' रत्न ते रत्न ! कोळशाच्या खाणीत सापडले तरी ते त्याज्य ठरत नाही !"

"हे सामान्य लोकांसाठी ठीक असेल, पण उच्चपदस्थ राज्यकर्त्यांनी वारांगनांशी घसट ठेवणं अगदी अश्लाघ्य आहे; राज्यकर्तेच असं बेबंद वागू लागले तर मोठे अनर्थ होतील !"

## राजकारणी व स्वैरिणी

छबूराव वारांगना-संस्थेबाबत जुने दाखले देत; वसंतसेना, महानंदा, पिंगला,

कान्होपात्रा इत्यादी पाक गणिकांची उदाहरणे भिरकावीत कडाडले, "काय हो, वारांगनांना इतकं हीन लेखणं तुमच्या— विशेषतः पुढारलेल्या ब्रिटिश लोकांच्या— पुरोगामित्वात बसतं का? निदान राज्यकर्त्यांनी तरी, अगदी धंदेवाईक गणिकांनाही तुच्छ लेखण्याचं कारण नाही ! कारण आपला भर्तृहरीच म्हणून गेलाय—

*'वारांगनेव नृपनीतिरनेक-रूपा !'*

वारयोषिता खोटं हसतात, खोटं बोलतात, नक्राश्रू ढाळतात, खोटे वायदे करतात. फसवी आश्वासनं देतात म्हणे ! मग या सर्व कलांत राजकारणी पुरुष काय कमी आहेत ? कांगावा करण्यात, खोटे-नाटे आळ घेण्यातही राज्यकर्ते गणिकांहून मागे नाहीत ! 'एकावरती नजर ठेवुनि। खूण करिती दुसऱ्याला' ही डिप्लोमसीही वारललनांनी राज्यकर्त्यांपासूनच उचलली असावी ! राज्यकर्ते कित्येकदा जुलूम करतात, गोळीबार करतात, हत्याकांड करतात अन् मग त्या कृत्यांबाबत तीव्र निषेध नि दुःख व्यक्त करून 'न्यायालयीन चौकशी'चं आश्वासन देतात. गणिकाही प्रेमीजनांची अशीच बरबादी करून, झटपट 'अफसोस' व्यक्त करतात. म्हणून तर कोण्या शायराला म्हणावं लागलं—

*की मेरे कत्ल के बाद*
*उसने जफा से तौबा ।*
*हाय ! उस जद पशेमां का*
*पशेमां होना ॥*

(त्या पाषाण-हृदयी सुंदरीने माझी कत्तल केल्यावर पुन्हा असा अत्याचार न करण्याची शपथ घेतली. हाय हाय ! झटपट पश्चात्ताप पावणाऱ्या त्या दांभिक बयेचे पश्चात्ताप पावणे काय विचारावे ?)

बहिरंग नि अंतरंग यांत तफावत असणं, ओठात एक नि पोटात एक ही दुटप्पी नीती अवलंबिणं, साधनांची शुचिता धाब्यावर बसविणं इत्यादी बाबतींत राजकारणी नि स्वैरिणी ह्यांच्यात फारशी तफावत नाही ! 'आणीबाणीची परिस्थिती,' 'देशावरील सार्वत्रिक संकट,' 'सर्वपक्षीय सर्वमान्य तोडगा' इत्यादी बहाणे करून राजकारणी पुरुष जनसेवेची वा ज्वलंत समस्यांची टाळाटाळ करतात, तर 'आज पायाला मेहंदीचा लेप लावलाय म्हणून संकेतस्थळी येता येणार नाही' असे चतुर बहाणे वारललना करतात ! मधुर भाषण, साहस नि दंभ ह्यांच्या आश्रयानेच उभयतांचा व्यवसाय यशस्वी होतो. . . '

## घर आणि मोरी

छबूरावांच्या या सनातनी पुरोगामित्वाचा ओघ खंडित करण्यासाठी आम्ही उद्गारलो, "छे, छे ! सर्वच राजकारणी लोक वा राज्यकर्ते असे नसतात. शिवाय राष्ट्राच्या

नि राज्याच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने राज्यकर्त्यांना वेश्यागमन निषिद्ध आहे ! ते त्यांना भूषणावह तर खचित नाही !"

"राज्यकर्त्यांनाच काय, पण कोणालाही वेश्यागमन भूषणावह नाही. एकबाणी, एकवचनी, एकपत्नी मर्यादापुरुषोत्तम रामच साऱ्या जगाला आदर्शभूत आहे ! पण. . . "

"पण काय. . . ?"

"हा उच्च आदर्श सर्वांना पेलणारा नसतो. म्हणूनच वेश्यागमनाचाही 'ख्रिश्चन मोरॅलिटी'प्रमाणे विचार न करता, आपल्या पूर्वजांप्रमाणे वास्तववादी निरोगी दृष्टिकोनातून विचार झाला पाहिजे. डॉ. श्री. व्यं. केतकर म्हणायचे, 'जोपर्यंत विवाह-संस्था आहे, तोपर्यंत 'वेश्या' हीही संस्था असणारच ! सबंध घराच्या स्वच्छतेसाठी जशी मोरी आवश्यक आहे तसाच समाजस्वास्थ्यासाठी वेश्यावर्ग जरुरी आहे. पण मोरीही प्रसन्न असावी, स्वच्छ असावी, कलात्मक असावी; वारांगनाही सुसंस्कृत नि कलानिपुण व्हाव्यात; समाजाला उपकारक ठराव्यात !' आम्रपाली, वसंतसेनेसारख्या गणिकांचाही गौरव करणाऱ्या भारतीय संस्कृतीची हीच विचारसरणी आहे."

"कबूल आहे. पण राज्यकर्त्यांवर विशेष बंधने नकोत का ?"— आम्ही.

### गरती नासवल्या नाहीत

"हवीतच. पण लक्षात घ्या, राज्यकर्ताही अखेर माणूसच असतो. लॉर्ड लॅम्बटन नि लॉर्ड जेलिको ही कितीही मोठी असली तरी अखेर स्खलनशील माणसंच ! पण तशी प्रामाणिक. त्यांनी सांगितलं की राष्ट्राच्या सुरक्षिततेला धोका पोहोचेल असं आमच्याकडून काहीही घडलं नाही. पण राज्यकर्त्यांसाठी आखून दिलेला शिस्तीचा संकेत त्यांनी पाळला नि त्यागपत्रं सादर केली ! कोणत्याही बेगडी समर्थनाची ढाल पुढे करून ते, आमच्या काही बहाद्दरांप्रमाणे, खुर्चीला चिकटून बसले नाहीत ! लॉर्ड लॅम्बटन ह्यांनी तर पत्रकारांना प्रांजळपणे सांगितलं, "गणिकेच्या इष्कात पडण्याचं कारण काय विचारता ? रुचिपालट ! पुरुषी मनाला उपजतच असलेली 'व्हरायटी'ची ओढ !" आणखी एक लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट ही की ह्या राज्यकर्त्यांनी आपल्या रुचिपालटासाठी, आपल्या मंचकपांडित्यासाठी आपलं सचिवालय दूषित केलं नाही अथवा गरती नासविल्या नाहीत. राज-मंदिरात तृप्त न झालेली वासना त्यांनी वारांगनांच्याच रंगमहालात शमविण्याची कोशिश केली !"

"कबूल. पण त्यापायी राष्ट्राची गुपिते परदेशीयांच्या हाती जाऊन, राष्ट्राची सुरक्षितता धोक्यात येण्याचा संभव नाही का ?"

## राज-गणिका

"आहेच. हा धोका ओळखूनच आपल्या शहाण्या शास्त्रकारांनी राजकर्त्यांपुढे संयमाचे उच्च आदर्श ठेवले; एकपत्नी 'रघुकुल टिळका'चा तसंच परस्त्री मातेसमान मानणाऱ्या शिवरायांसारख्या राजांचा सर्वश्रेष्ठ गौरव केला. पण राज-गणिकांचाही एक वर्ग निर्माण केला. राज्यकर्ते म्हणजे कोणी तडी-तापसी वा वेदाभ्यासजड रूक्ष पंडित नव्हे; त्यांनाही शीण घालविण्यासाठी रूपाजीवांचा मस्त मुलायम शिणगार जरुरी वाटण्याचा संभव आहे, हे लक्षात घेऊन 'नाटकशाळा' पदरी बाळगण्याची सवलत त्यांना देण्यात आली. आर्य चाणक्याचं कौटिल्य अर्थशास्त्र पहा. त्यांत 'गणिकाध्यक्ष' नामक सरकारी अधिकारी आढळेल ! उत्तमोत्तम विश्वासार्ह राजगणिका निवडणं हेही त्याचे एक कार्य. गणिकावर्गासाठी केलेले नियम अमलात आणणारा हा अधिकारी, त्या हेरगिरी वा रहस्यभेद करून राज्याला धोका पोचविणार नाहीत; उलटपक्षी शत्रूचाच रहस्यभेद कसा करतील, हे तो जागरूकतेने पाहत असे. . ."

## शहाण्या रूढी व दंडक

"हे सर्व प्रवचन ठीक आहे. छबूराव ! पण लॉर्ड लॅम्बटन् नि लॉर्ड जेलिको ह्यांचा शिस्तभंग समर्थनीय ठरू शकत नाही."

"नाहीच. म्हणून तर त्यांनी तत्परतेने राजीनामे दिले. 'पेट्रोलपंपापाशी सिगारेट ओढू नये' हा नियम मोडणारा, 'मी सिगारेट प्यायलो पण आग काही लागली नाही' या स्पष्टीकरणानं जसा बेगुनाह ठरत नाही तसंच याही बाबतीत समजा ! कारण, आज नाही, तर उद्या, 'अ'कडून नाही, तर 'ब'कडून, धूम्रपानाची तलफ पेट्रोलपंपावर भागविल्यामुळे भयानक आग लागू शकेल, ही शक्यता नियमकर्त्यांनी लक्षात घेतली आहे. म्हणूनच सर्वांनी– विशेषतः राज्यकर्त्यांनी– शहाण्या रूढी, अनुभवसिद्ध संकेत वा विचारपूर्व घालून दिलेले दंडक पाळलेच पाहिजेत."

□

॥ ३४ ॥

## सत्तानल शमवाया... !

*५ नोव्हेंबर १९६७*

ढगांची सावली, दुष्टाची मैत्री, नवीन धान्य आणि चंचल नारीचे नवतारुण्य हे किंचित कालच टिकणारे नि उपयोगी पडणारे असते, अशा अर्थाचे एक सुभाषित अनेकांना ठाऊक असेल. हा सुभाषितकार आजच्या जमान्यात जन्मला असता, तर त्याने वरील यादीत आमच्या संधिसाधू आमदारांच्या वा राजकीय पुढाऱ्यांच्या वचनाची, आश्वासनाची वा शपथेची गणना प्रथम केली असती ! आणि राजस्थान, उत्तर प्रदेश, हरियाना यांतील पक्षांतराचे सत्तापिसाट खेळ पाहून आपल्याला ही गणना पटलीही असती. हसनगड मतदारसंघातील पोटनिवडणुकीबाबत झालेल्या मतभेदाचे निमित्त पुढे करून हरियानाचे आरोग्यमंत्री महंत श्रेयोनाथ यांनी नुकताच राजीनामा देऊन विरोधी पक्षाला मिळण्याचा पवित्रा घेतला आहे, तर हरिजन-आमदार गयालाल (म्हणजे गेलेला लाल !) पुनः संयुक्त दलात परत आला आहे ! असा पक्षांतराचा खेळ हरियानात डिसेंबरच्या दुसऱ्या आठवड्यापर्यंत, विधानसभेचे अधिवेशन भरेपर्यंत चालूच राहील. तेथील राज्यपालांनी तर असे उद्वेगजनक वृत्त प्रकट केले आहे की, "ईश्वराला साक्ष ठेवून पक्ष न बदलण्याबाबत घेतलेली शपथही एका आमदाराने बेधडक मोडली आहे !"

आणि त्यात नवल कसले ?. . . कसला ईश्वर नि कसली शपथ ? हरियानातच नव्हे, तर इतरत्रही सत्ता-नारायणाच्या रथाखाली सत्य-नारायण भरडला जात आहे; स्वप्नात दिलेले वचन पूर्ण करण्यासाठी डोंबाघरी पाणी भरणाऱ्या राजा हरिश्चंद्राचा हा देश ! पण आता या देशात वचनाला नि शपथेला फारशी किंमत राहिलेली नाही.

साधनशुचितेच्या वल्गना करीत करीत दिलेली वचने नि आश्वासने सहजगत्या मोडणे हा आता येथला नियम होऊ पाहत आहे.

मोठमोठे अखिल भारतीय कीर्तीचे नेते जेथे वचनपालनाबाबत वा शपथेबाबत फारसे तत्पर नाहीत, तेथे हरियानातील चिल्लर खुर्द्यांची कथा काय?

आणि मौज ही की, शपथ मोडणे, वचन तोडणे, घटकेघटकेला भूमिका बदलणे, स्वार्थासाठी पक्षांतर करणे, या गोष्टी 'एव्हरी थिंग इज फेअर इन् लव्ह ॲन्ड वॉर' या ऐसपैस सिद्धान्ताखाली क्षम्य ठरत आहेत. अशा परिस्थितीत विश्वासघाताला 'डिप्लोमसी,' गळेकापूपणाला 'स्ट्रॅटेजी', संधिसाधू शेळपटपणाला 'तडजोड,' लाळघोट्या लाचारीला 'नम्रता' अशी गोंडस नावे प्राप्त झाली, तर आश्चर्य करण्याचे कारण नाही. दिलेल्या शब्दांची नि उच्चारलेल्या शपथेची जर पुढाऱ्यांना फारशी पर्वा नाही, तर सामान्य रयतेला तरी वचन-पालनाची मातब्बरी का वाटावी? म्हणूनच सामान्य जनांच्या दैनंदिन जीवनातही लहान-सहान क्षेत्रांतही वारांगनांना लज्जित करणारे चांचल्य नि वचनभंग दृष्टीस पडू लागला आहे! क्षुद्र सत्तास्थानासाठीही, 'शब्द पाळणे,' 'मैत्री राखणे,' 'चुगली न करणे' इत्यादी साध्यासुध्या नैतिक मूल्यांचा बळी ठायी ठायी पडत आहे! आणि जर कोणी या महाभागांना 'सत्तानल शमवाया नीचा! का न भक्षिसी गोमय ताजे?' असा प्रश्न विचारला, तर प्रश्न विचारणाराच मूर्खात जमा होऊन त्याच्यावर शेणसडा पडण्याचा संभव निर्माण झाला आहे!!

□

॥ ३५ ॥

## तिकीट-वाहिनी झिंदाबाद !

*१६ जानेवारी १९७२*

भारत-पाकिस्तान युद्ध, भारतीय सेनांचा विजय, मुक्तिवाहिनीची मर्दुमकी, बंगबंधू मुजीबुर रहेमान यांची मुक्तता नि देवदुर्लभ स्वागत हे सारे विषय आता महाराष्ट्रात— विशेषतः मुंबईत— पार मागे पडले आहेत. कारण विधानसभा निवडणूक-युद्धाचे पडघम वाजू लागले आहेत. मग 'मुक्तिवाहिनी'चे प्रयोजन काय? आता 'तिक्टि-वाहिनी'च्या गनीमी काव्यालाच महत्त्व येणे क्रमप्राप्त आहे. येत्या निवडणुकीसाठी काँग्रेसचे तिकीट मिळविण्याकरता कंबर कसलेल्या वीरांची (नि वेडेपीरांची !) फौज म्हणजेच 'तिकीट-वाहिनी' ! तिची गेल्या काही दिवसांतील धमाल काय वर्णावी? बड्या बड्या नेत्यांच्या, इंदिरा-कृपा-प्रसादार्थ वा मार्गदर्शनार्थ दिल्ली-वाऱ्या सुरू झाल्या आहेत, तर जिल्ह्या-जिल्ह्यातील शिलेदारांच्या स्वाऱ्या आपापल्या फौजफाट्यासह मुंबईत डेरेदाखल झाल्या आहेत ! जिल्हा-काँग्रेसच्या शिफारस-वारूवर स्वार झालेले तिकीट-बहाद्दर तर मुंबईत उत्साहाने आलेच आहेत; पण ज्यांच्या नावाची शिफारस जि. काँग्रेसने केली नाही असे जखमी 'नाराजेश्वर' देखील मुंबापुरीत जमले आहेत. विधानसभेचे, आमदारकीचे हे इच्छुक ! ह्यांनी लोकशाहीचे मंदिल मस्तकी बांधले आहेत; काँग्रेसनिष्ठेचे (अर्थात इंदिरा-निष्ठेचे !) बिल्ले छातीवर लटकवले आहेत; समाजवादाच्या तलवारी यांच्या कंबरेला लटकल्या आहेत- आणि कोणत्या ना कोणत्या बड्या नेत्याच्या आधाराने त्यांनी मोर्चे उभारले आहेत ! आमदार-निवासात यांची अशी काही गर्दी उसळली आहे की कित्येकांना व्हरांड्यात बिछाने पसरावे लागले आहेत म्हणतात !

तिकीटवाहिनीचे हे वीर जसे चिवट आहेत, तसेच धूर्तही आहेत. त्यांच्यापैकी बहुसंख्य मंडळी कुंपणावर बसलेली असून, 'सरशी तेथे सलाम' करण्यात तरबेज आहेत. 'साहेब, आम्ही तुमचेच ! तुम्ही शिवाजी असला, तर आम्ही तुमच्यासाठी जान कुर्बान करणारे प्रति-तानाजी आहोत' असे सर्व गटांच्या साहेबांना कुर्निसातपूर्वक सांगण्याचे चातुर्य ते दाखविल्याविना राहणार नाहीत ! सर्व गटांच्या वरिष्ठांकडे, कधी या चव्हाणांकडे तर कधी त्या चव्हाणांकडे, गुपचूप सोवळेभांडे टाकण्यास ते चुकणार नाहीत. 'दहा ठिकाणी खडा मारून पाहिला म्हणजे एखाद्या ठिकाणी तरी तो अचूक लागेल' हा हिशेब बऱ्याच जणांनी मनात धरला आहे !. . . या तिकीट-सेनेचा 'निवडणूक समिती' भोवती मोटा गराडा पडला आहे आणि शेंडी तुटो की पारंबी तुटो, या निर्धाराने तिकीट-संपादनाचे डावपेच ती लढवीत आहे. . . छे छे, हे लढाईचे रूपक बरोबर नाही. कारण, येथे लढाऊपणापेक्षा लाचारीयुक्त चातुरीचाच प्रभाव अधिक दिसतो. 'निवडणूक-समिती' ही उर्दू काव्यातील संगदिल सुंदरी मानली तर हे 'आशिके-तिकीट' तिच्या गल्लीत गोंडा घोळणारे उमेदवारच म्हणावे लागतील ! आशाळभूतपणे ते तिच्या निर्णयाची— 'आपल्या नावाचा पुकारा केव्हा होतो, आपण कृपापात्र केव्हा होतो' याची-वाट पाहत आहेत. ही त्यांची चिवट प्रतीक्षा पाहून शेर याद येतो—

*गली में यार की, वल्लाह ।*
*सब मुश्ताक बैठे हैं ।*
*खुदा जाने वहाँ सें हुक्म*
*किसके नाम आयेगा ।।*

(देवा रे देवा, त्या खटनट सुंदरीच्या गल्लींत सर्व आसक्त मंडळी लाइन लावून बसली आहे. देव जाणे, कुणाच्या नावाचा केव्हा पुकारा होईल ते !)

परंतु, तिकीट हस्तगत करण्यापेक्षा तिकिटांचे वाटप करणे अधिक मुष्किल ! कारण, एकेका जागेसाठी ५-१० अर्ज आलेले आहेत. डाव-प्रतिडाव, 'यांनाच तिकीट द्या' अशी त्या त्या भागातील 'कार्यकर्त्यां'ची निवेदने, वशिले-दडपणे यांना नुसता ऊत आला आहे.

एकोप्याच्या गोड वातावरणात सर्वमान्य इच्छुकांची यादी तयार करणे, हे एक दुःसह दिव्यच होय. एक वेळ उडदामाजी काळे-गोरे निवडता येईल; सागर-तळाशी बुडी मारून शिंपल्यांच्या ढिगाऱ्यांतून मोती निवडता येतील; वाळूचे कण रगडून त्यातून तेल बाहेर काढता येईल; पण बिलकुल कटुता न येऊ देता खेळीमेळीच्या वातावरणात सर्वसंमत तिकीटयोग्य उमेदवार निवडता येणे मुष्किल ! पण समजा, महाराष्ट्राची काँग्रेस-निवडणूकसमिती ही मुष्किल कामगिरी करू शकली तर? तर तिचा शिवाजीपार्कवर जाहीर सत्कारच करावयास पाहिजे !

—राजकीय निवडणुकीच्या क्षेत्रातच नव्हे, तर इतर क्षेत्रांतही गुणवत्तेचा निकष लावून लायक उमेदवार निवडणे कठीणच असते. म्हणूनच, प्राचीन चतुर राजकन्यांनी हत्तीच्या सोंडेत माळ देऊन, हत्ती ज्याच्या गळ्यात माळ घालील त्याला वर म्हणून निवडण्याची युक्ती अनेकदा अवलंबिली होती. निवडणूक-समितीने हीच युक्ती योजण्यास हरकत नाही अथवा नावाच्या चिठ्ठ्या टाकूनही तिकिटांचे इच्छुक निवडता येतील ! कटुता न वाढविता, खेळीमेळीच्या वातावरणात 'सर्वेषां अविरोधेन' वृत्तीने निवड करण्याचा तोच एक उपाय दिसतो ! !

□

॥ ३६ ॥

## दंगल-पीडित भागात सिताऱ्यांची सेना?

*१७ मे १९७०*

आमचा समाज नि आमचे लीडर्स कोणत्याही व्याधींवर शाश्वत नि मूलगामी उपाय योजण्यात कच्चे असले, तरी तात्पुरते वरवरचे इलाज योजण्यात नि मलमपट्ट्या लावण्यात लई हुश्यार आहेत ! भिवंडी - जळगाव - महाड - ठाणे येथील दंगलींचेच उदाहरण घ्या ना. या स्थळी दंगे उद्भवूच नयेत असे जातीय सामंजस्य नि एकोपा निर्माण करण्यात ज्या वाचाळ पुढाऱ्यांनी कधीच फारसा रस घेतला नाही, तेही या दंगलग्रस्त टापूत राखेचे ढिगारे तुडवीत नि रक्ताची थारोळी न्याहाळीत, दौरे काढण्यात मात्र मुळीच मागे नाहीत ! घरे जळाली, माणसे जखमी झाली- ठार झाली, निर्वासितांची रीघ लागली, दया, क्षमा, शांती लोप पावली; माणुसकी होरपळून निघाली, शासन-यंत्रणेने सुचतील नि जमतील ते उपाय योजले. सारे काही होऊन गेले. आणि आता पक्षोपपक्षांचे नेते— गल्लीबोळातील ग्राम-गांधी नि ग्राम-नेहरूदेखील आपल्या पदस्पर्शाने दंगलपीडित भागांना पावन करीत आहेत ! एकवेळ दंगल पुरवली पण या पुढाऱ्यांचे उपदेशाचे डोस नकोत, असे तेथील जनतेला होऊन गेले असेल !

आणि आता लीडर लोकांच्या स्वाऱ्या कमी झाल्या म्हणूनच की काय, सिनेनट-नट्यांचा तांडा घायाळ दिलांना माशूक मलमपट्ट्या लावण्यासाठी भिवंडीत डेरे-दाखल होणार आहे ! 'इम्पा' चे अध्यक्ष श्री. आय. एस. जौहर नुकतेच एका वृत्तसंस्थेला मुलाखत देताना म्हणाले, "फिल्मी ताऱ्यांची एक कायम स्वरूपाची शांती-सेना उभारण्याचा आमचा विचार आहे. प्रथमतः ही सेना भिवंडीत शांतता स्थापन करण्यास जाईल." वाहव्वा ! बहुत अच्छे ! आता दिलीपकुमार - राजकपूर - देव आनंद,

सायरा - शर्मिला - माला - मुमताज इत्यादी फिल्मी फर्जंद फौरन पुरे करणार. आणि त्यात आश्चर्य ते कसले ? ही माशूक सेना दंगल-पीडित भिवंडीत दाखल होताच तमाम मवाली मंडळी आपली घातपाती कृत्ये सोडून ह्यांच्या दर्शनार्थच गर्दी करणार नाही काय ? ह्या कलाकारांनी— विशेषतः त्यातील टंच मदनमस्त कलावतींनी 'आओ प्यार करे' हा कोरस सुरू करताच, जातीय द्वेषाऐवजी प्रेमाचेच गुलाबी वातावरण निर्माण होणार नाही काय ? या फिल्मी सिताऱ्यांचा रोंभा-सोंभा-नाच सुरू होताच जातीय वेताळांचा नंगा नाचही शरमिंदा होणार नाही का ? अहो, माला - शर्मिला - सायरा - बबिता - नंदा - लीना असे एकाहून एक बलवत्तर, मादक सौंदर्याचे हैड्रोजन बॉम्ब फुटताच, दंगलखोरांच्या हातबॉम्बची कथा काय ? दंगलबाजांचे हातबॉम्ब फार तर घरे जाळू शकतील, पण या मदनसेनेचे अणुध्वम हजारो हृदयमंदिरे मोहब्बतीच्या अंगाराने धडधडा पेटवू शकतात ! या माशूक मदालसांच्या नेत्रांच्या कट्यारी भिवंडीच्या रस्त्यारस्त्यावर चमकू लागल्या की, समाजकंटकांच्या हातातील सुऱ्या नि भाले आपोआप गळून पडतील, आणि ते आगलावे वेताळही मेणाहून मऊ होऊन त्यांना विनंती करतील— 'पुरे पुरे. तुमच्या डोळ्यांची जादूगिरी आता पुरे करा.' हिंदू मवाली म्हणतील— 'डोळे हे जुलमी गडे आग उगा लावू नका !' आणि मुस्लीम मवाली उद्गारतील—

*तिरछी नजरों से न देखो*
*आशिके दिलगीर को ।*
*कैसे तीरंदाज हो*
*सीधा तो कर लो तीर को ॥*

असे होवो, ना होवो. एवढे मात्र खरे की, या सितारा-सेनेचे भिवंडी - जळगाव - महाड इत्यादी ठिकाणी शांती-दौरे निघाले, तर लीडर मंडळींचे रटाळ दौरे फिक्के पडतील. कारण, आजमितीला 'पब्लिसिटी' नि 'पॉप्युलॅरिटी' या दोन्ही 'प' मध्ये पुढाऱ्यांहून फिल्मी कलाकारच वरचढ आहेत ! जौहर साहेब, चलो, जल्दी करो ! दंगलग्रस्त भागात तुमची सितारा-सेना लवकर घेऊन जा. हां, मात्र एक धोका विसरू नका. तुमच्या सेनेमुळे जातीय दंगल पार विझून गेली, तरी कदाचित मदनदंगल भडकण्याचा संभव आहे. म्हणूनच तुमच्या फौजेतील नट्यांना माफक मेकअप् करण्याचा आदेश द्या ! चला, त्वरा करा. भिवंडी - जळगाव - महाड येथील आगीने होरपळलेल्या, भुकेने व्याकुळलेल्या, ॲसिड बल्बने विद्रूप झालेल्या, जखमांनी तडफडणाऱ्या हजारो दुःखितांच्या कंठांतून एकसाथ घोषणा उठू द्या—

'सितारा-सेना झिंदाबाद ! फिल्मी कलाकार अमर रहे ! !'

□

## ॥ ३७ ॥ प्रतिकात्मक त्याग !

*२९ ऑगस्ट १९७१*

प्रतीक-वादात आपला देश कुणालाही हार जाणार नाही. आपल्या अनेक सणा-समारंभांत आपणास नाना परीची प्रतीके आढळतील. वर्षभर आम्ही प्रेमाने, गोडव्याने वागू किंवा न वागू, पण संक्रांतीच्या दिवशी स्नेहशील गोडव्याचे प्रतीक म्हणून तिळगुळाचे लाडू वाटल्याविना राहणार नाही ! प्रत्यक्ष संपत्ती मिळविता आली नाही तरी, दसऱ्याच्या दिवशी सुवर्ण-प्रतीक म्हणून आम्ही आपट्याची पाने खुडल्याविना राहणार नाही ! आमच्या समाजाची अशी प्रतिकात्मक कामगिरी किती सांगावी ? असे म्हणतात की, देशासाठी सर्वस्व पणाला लावून वनवासी झालेल्या राणा प्रतापाचे श्रीमंत वंशज, आपल्या मऊमऊ बिछान्याखाली गवताची लहानशी जुडी ठेवतात– का ? तर त्याच्या तृणशय्येचे, त्यागाचे प्रतीक म्हणून ! मग असाच प्रतिकात्मक त्याग आजच्या दिल्लीपतींनी केला तर काय बिघडले ?

गरिबी हटावच्या उदात्त ध्येयाने प्रेरित होऊन आमच्या केंद्रीय कॅबिनेट मंत्र्यांनी आपल्या पगारात १० टक्के आणि इतर मंत्र्यांनी ५ टक्के कपात आपखुषीने स्वीकारली. पण कौतुक दूरच राहिले, या प्रतिकात्मक त्यागाची बहुशः टवाळीच होत आहे. या टवाळखोरांचे म्हणणे असे की, मंत्र्यांना काटकसरच करावयाची होती,तर त्यांनी आपल्या आलिशान सुखसोयींनाच समाजवादी कात्री लावणे आवश्यक होते. १० टक्के नि ५ टक्के कपातीने असे कितीसे पैसे वाचणार ? कॅबिनेट मंत्र्यांचा पगार २,२५० ऐवजी २०२५ रुपयांवर येईल व उपमंत्र्याचा पगार १,७५० वरून १५८५ रुपयांवर घसरेल, आणि यामुळे दरवर्षी १ लक्ष २५ हजार सातशे रुपयांची बचत होईल एवढेच ! म्हणूनच

ही क्षुल्लक पगार-कपात करून मंत्र्यांच्या त्यागवीरत्वाचे डिंडिम वाजविण्यापेक्षा, त्यांच्या बादशाही सवलतींना नि आरामशीर राहणीलाच काट दिला पाहिजे.

केंद्रीय मंत्र्यांना भत्त्यापोटी दरमहा सुमारे ६००० रुपये मिळतात; एरवी दरमहा ३००० रुपये भाडे पडेल अशा अलिशान बंगल्यात ते राहतात, वर्षाला सुमारे ७,००० रुपये भाडे द्यावे लागेल असे चकचकीत फर्निचर व इतर सुखसोयी त्यांना फुक्ट प्राप्त होतात; माळी-चौकीदार इत्यादी त्यांच्या नोकरांचा खर्च दरसाल ५००० रुपयांचा असतो; वीज व पाणी यांच्यावर त्यांच्यापायी दरसाल २४०० रुपये सरकारी तिजोरीतूनच खर्च होतात; वर्षाला सुमारे १५ हजार मोटारखर्च, ३० हजार प्रवास-खर्च नि ६ हजार 'हॅलो हॅलो' (उर्फ टेलिफोन) खर्च ते करीत असतात. प्रवास-मोटार-टेलिफोन हे जरी मंत्र्यांचे वैयक्तिक खर्च मानले तरी त्यांच्यावर एकूण ८०,००० रुपयांची उधळण होते. (हे खर्च त्यांच्या बाबतीत करमुक्त आहेत.) याशिवाय मंत्र्याला साधारणतः २०००० रुपये 'मेन्टेनन्स'-खर्चासाठी लागतात !. . . म्हणूनच या टवाळखोर टीकाकारांचे म्हणणे असे की, पगाराऐवजी या सुखसोयीतच १० व ५ टक्के कपात केली तर दरसाल २१ लक्ष ३६ हजार रुपयांची भरघोस बचत होऊ शकेल. या देशाच्या दारिद्र्याबरोबरच मंत्र्यांचा दरडोई खर्च वाढतोच आहे. इतकेच नव्हे, तर त्यांची संख्याही फुगत चालली आहे. पहा ना; १९६१ मध्ये केंद्रात व राज्यात मिळून २९४ मंत्री होते, तर आता त्यांची संख्या ४५० वर गेली आहे !

काय म्हणावे या कृपण टीकाकारांना? अरे, राज्यकारभाराची कक्षा वाढली तर मंत्र्यांची संख्या वाढणार नाही काय? आणि मंत्र्यांची प्रतिष्ठा नि रुबाब वाढावा असे वाटत असेल तर त्यांच्या सुखसोयींत नि सवलतीत वाढ होणे क्रमप्राप्त नाही का? राजेशाही असो की लोकशाही असो, राज्यकर्त्यांनी राज्यकर्त्यांसारखेच वैभवात राहावे ! त्यांनी तडी-तापशांप्रमाणे कंबरेला वल्कले गुंडाळून पदयात्रा करण्याचे मुळीच कारण नाही ! साधी काटकसरीची राहाणी सामान्य जनांसाठी असते; असामान्यांसाठी नाही ! ज्यांनी गरिबी हटविण्याचे रणकंकण बांधले आहे, त्यांनाच गरीब करणे निव्वळ अन्यायाचे ठरणार नाही काय?

एक राजसत्ता सोडली तर राज्यकर्त्यांनी सर्व काही प्रतिकात्मकच करावयाचे असते, हे या कुत्सित टीकाकारांच्या कसे लक्षात येत नाही? पहा ना— मंत्री उद्‌घाटन करतात म्हणजे काय स्वतः दारे-खिडक्या उघडतात? नाही. ते आपल्या करकमलातील कात्रीने एक रेशमी फीत कापतात इतकेच ! मंत्र्यांचा शिलान्यासदेखील हा असाच— प्रतिकात्मक ! त्यांनीच स्वतः दगड उचलून बसवावा अशी अपेक्षा

कोणीच करीत नाही. तसाच हा ५-१० टक्के पगार-कपातीचा प्रतिकात्मक त्याग! — सर्व जनतेला खऱ्याखुऱ्या त्यागाची स्फूर्ती व्हावी म्हणूनच तो केला असतो. आता अशा प्रतिकात्मक त्यागाने प्रतिकात्मकच गरिबी हटेल, खराखुरा 'गरिबी हटाव' होणार नाही, असे कोणी खवचट लोक म्हणतील हे खरे. पण त्याकडे मंत्र्यांनी लक्ष देऊ नये हेच बरे! 'कोणी निंदा, कोणी वंदा आपुला स्व-हिताचा धंदा' असे तुकोबांनी म्हटलेच आहे!

□

॥ ३८ ॥

# आमचे विद्वान वकील

*३० एप्रिल १९७२*

राज्यकारभार सुरळीत चालावयाचा असेल, तर अ-कार्यक्षम वशिल्याची तट्टे कामाची नाहीत. योग्य स्थानी योग्य माणूस पाहिजे. हेच तत्त्व एका प्राचीन सुभाषितकाराने सांगताना दृष्टांत दिला आहे : 'न हि चूडमणि : पादे, नूपुर मूर्ध्नि धार्यते !' (कोणी शिरोधार्य रत्न पायीच्या पायपोसात बसवत नाही, अथवा नूपुर मस्तकावर धारण करीत नाही). पण अद्यापि हे तत्त्व आमच्या राज्यकर्त्यांकडून नीटसे अमलात येत नाही. शासन-यंत्रणेत उच्चपदीही भलतीच माणसे जाऊन बसतात. स्वदेशात असे क्वचित कोठे घडले, तर ते एक वेळ क्षम्य म्हणता येईल. पण परदेशातील आपल्या वकिलातीत तरी अकार्यक्षम वशिल्याची तट्टे असता कामा नयेत. त्यायोगे आपल्या महान देशाची प्रतिमा डागाळते, आणि कित्येकदा हसे होते.

नेमक्या ह्याच व्यंगावर जनसंघाचे अध्यक्ष श्री. अटलबिहारी बाजपेयी ह्यांनी परवाच लोकसभेत अचूक बोट ठेवले. ते म्हणाले, "एका युरोपीय देशातील भारतीय वकिलातीत एकदा एक 'पार्टी' आयोजित करण्यात आली होती. त्या देशातील बडी बडी मंडळी ह्या कार्यक्रमाला उपस्थित होती. बाहेर बेसुमार हिमवर्षाव होत होता. साहजिकच थंडी कडाक्याची पडली होती. अशा वेळी त्या पाहुण्यांना वकिलातीच्या अधिकाऱ्यांनी कोणते पेय दिले असेल? मद्याचा एखादा चषक? छे छे, शांतम् पापम् ! आमचे दारूबंदी धोरण भारतात जरी हातभट्टीत जळून खाक झाले असले, तरी परदेशात आम्ही त्याची गुढी उंच उभारलीच पाहिजे ! निदान आमच्या सोवळेपणाचे प्रदर्शन साहेबांपुढे केलेच पाहिजे ! म्हणूनच देश-काल-परिस्थिती न जाणणाऱ्या भारतीय अधिकाऱ्याने त्या

पाहुण्यांना चक्क लिंबूपाणी पाजले– गरमागरम चहा देखील नाही! अगदी आयुर्वेद-प्रणित लिंबूपाणी!"

असाच आणखी एक गमतीदार किस्सा बाजपेयींनी सुनावला. 'सुप्रसिद्ध हिंदी लेखक सच्चिदानंद हिरानंद वात्स्यायन एकदा विदेशदौऱ्यावर गेले असताना एका पाश्चिमात्य देशाच्या राजधानीत त्यांचा सत्कार-समारंभ आपल्या भारतीय वकिलाने आयोजित केला. पण मौज ही की ह्या वकिलाने त्यांचा परिचय करून देताना म्हटले, "हच ते 'कामसूत्र' ह्या सुप्रसिद्ध ग्रंथाचे लेखक!"– 'कामसूत्र'कर्ता महामुनी वात्स्यायन हा हजार-बाराशे वर्षांपूर्वी होऊन गेला, हेही बिचाऱ्याच्या गावी नाही! युरोपीय समाजातही वात्सायनाच्या संस्कृत कामसूत्रांची भाषांतरे खूप लोकप्रिय आहेत. तेव्हा त्या साहेब लोकांनी आमच्या ह्या वकील महाशयाच्या अकलेची केवढी तारीफ केली असेल, हे कल्पनेनेच जाणलेले बरे. असे अकलेचे तारे तोडण्यापेक्षा ह्या वशिल्याच्या इद्वान तट्टाने मौन पाळले असते तरी चालले असते.

परंतु त्या बिचाऱ्या विदेशस्थ भारतीय वकिलाच्या अज्ञानाला तरी का हसावे? आणि आपल्याला माहीत नसलेल्या विषयाबाबत मौन पाळण्याचा सल्ला त्या वकिलानेच का पाळावा? कारण आमचे अनेक लीडर नि मंत्री वाटेल त्या विषयावर वाटेल तेव्हा, वाटेल तसे बोलत नाहीत काय? 'मजीद' चव्हाण ऊर्फ लाहोरी नावाचा एक खंदा पत्रकार नि विडंबनकार शायर उर्दूत होऊन गेला. (पाकिस्तानातील कराची येथील 'नमकदान'नामक पाक्षिकाचा हा संपादक होता. आपल्या अच्युत बळवंत कोल्हटकरांप्रमाणे अथवा आचार्य अत्र्यांप्रमाणे चटकदार नि उपहासगर्भ विनोदी लेखणीचे वरदान लाभलेला हा गरीब जनतेचा लाडका लेखक) सर्वज्ञतेचा आव आणून वाटेल त्या विषयावर आपले ज्ञान पाजळणाऱ्या पुढाऱ्यांची नि मंत्र्यांची रेवडी उडविणारी एक कविता त्याने लिहिली आहे. तीत तो म्हणतो–

*मुर्गियोंपर भी मैं कर सकता हूँ*
*इजहारे खियाल*
*और सांडोंपर भी हूँ*
*महफिले-सरगर्‌मे मकाल*
*रेस के घोडों पे भी तकरीर*
*कर सकता हूँ मैं*
*अक्‌बरो-इक्‌बाल की तफसीर*
*कर सकता हूँ मैं*
*बात फूलों की हो*

*या कौमी तराने का बयान*
*चाट हो बारा मसाले की,*
*के हो उर्दू जबान*
*मुद्दुआ अन्का है अपने*
*आलमे तकरीर का*
*शौक है दिल में मगर*
*कुरआम की तफसीर का*
*जितने भी शोबे हैं,*
*उन् सबपर हूँ मैं छाया हुआ*
*हूँ मिनिस्टर मुस्तनद*
*है मेरा फर्माया हुआ*

(अहो मी कुक्कुट-पालनावर जाहीर मत-प्रदर्शन करू शकतो. आणि शेतीला आवश्यक असलेल्या वळूंवरच्या चर्चेतही मी भाग घेऊ शकतो ! रेसच्या घोड्यांवर मी बोलू शकतो, तसेच अकबरावर नि इक्बालवरही भाष्य करू शकतो ! फुलांची वा पुष्परचनेची गोष्ट असो; राष्ट्रगीताचा प्रश्न असो, 'बारा मसाल्यांचा रगडा कसा करतात' हा विषय असो की ऊर्दू भाषेच्या अभिवृद्धीची समस्या असो— सर्व बाबतींत मी ज्ञान-दीपिका पाजळू शकतो ! आमच्या भाषणात कोणाला मुद्दा सापडणेच मुष्किल. पण तरीही कुराणावर विद्वत्ताप्रचुर प्रवचने झोडण्याचाही शौक आमच्या दिलात उसळत आहे ! दुनियेतील जेवढे म्हणून विषय आहेत त्यांच्यावर माझीच छाया पसरली आहे. कारण ? कारण मी अगदी सर्टिफाईड्— प्रमाणित— मिनिस्टर आहे !)

मिनिस्टर लोकांचा हा खाक्या आमच्या वकिलांनी उचलला आणि सच्चिदानंद वात्स्यायनांना कामसूत्रकार वात्स्यायनाच्या दर्भासनावर बसविले तर काय बिघडले ! उद्या हे महाशय 'इंदिरा गांधी ह्या महात्मा गांधींची कन्या नि सरहद्द गांधींची चुलत बहीण' असे ठणकावून सांगण्याइतपत ज्ञानी न होवोत म्हणजे मिळवली !. . . आमच्या अशा वकिलांचे हे अक्टोपासून विक्टोपर्यंतचे अफाट ज्ञान पाहून, आणि आमच्या 'लीडरां'ची ही अनेक मुक्ताफळे ऐकून, पाश्चिमात्य प्रगत देशांतील लोकांची मोठी करमणूक होत असेल, यात शंका नाही.

□

॥ ३९ ॥

## 'नाही मी बोलत आता !'

*५ जानेवारी १९७५*

भारताइतपत बडबड-पटु वाचाळ देश दुसरा नसेल ! येथील ताडित, पीडित नि शोषित गरीब जनता मुक्या मेंढरांप्रमाणे असली, तरी बुद्धिजीवी 'पुढारी'— क्लास भलताच बोलघेवडा आहे. म्हणूनच 'मौन' हे दुर्मिळ नि महत्त्वाचे ! मौनाचे हे महत्त्व आचार्य विनोबाजी भावे ह्यांच्या 'मौनव्रता' च्या घोषणेने अधिकच वाढले आहे. 'आचार्यांचे वर्षभराचे मौनव्रत ही एक कठोर साधना आहे. त्यायोगे ते उच्चतर आध्यात्मिक शिखरे पादाक्रांत करणार आहेत. सर्वोच्च तत्त्वांवर त्यांची दृष्टी स्थिर होत आहे', असे जे भाष्य जयप्रकाश नारायण ह्यांनी केले, त्यावरूनही विनोबाजींच्या मौनाचे माहात्म्य लक्षात येईल.

अध्यात्म-साधनेतच नव्हे, तर व्यवहारसाधनेतही मौन फार उपयुक्त ठरते, हे आपल्या शहाण्या पूर्वजांनी ओळखले होते. म्हणूनच त्यांनी अनेक 'मौन-प्रकार' सुचविले होते. उदाहरणार्थ, मूर्खत्व झाकणारे मौन ! विद्वानांच्या सभेत अ-विद्वानांनी गप्प बसणेच श्रेयस्कर 'विभूषणं मौनम पंडितानाम् !' त्यामुळे अ-विद्वानांचे अज्ञान प्रकट न होता तथाकथित विद्वत्तेची झाकली मूठ सव्वालाखाची ठरते ! बेसूर गवय्यांना संगीत-सभेत 'गानमौन' भूषणावह ठरते. जसे सुरेल नि सुमधुर कोकिळांच्या मैफलीत कर्णकटू कावळ्यांनी 'कौ-रव' न करणेच शोभादायक !. . . अलीकडे राजकीय आजाराप्रमाणेच 'राजकीय मौन' ही बरेच प्रचारात आले आहे. पत्रकारांनी विचारलेल्या खोचक प्रश्नांना राजकीय पुढारी उत्तर देण्याचे टाळतात नि 'नाही मी बोलत आता' असे म्हणतात तेव्हा अनेक तर्क-कुतर्कांना जन्म देणारे 'राजकीय मौन' आकारास येते !

'नाही मी बोलत नाथा', असे म्हणणाऱ्या प्रणयिनीचे खोट्याखोट्या रागातील 'अनुरागमौन' तर रसिकांच्या चांगल्याच परिचयाचे आहे. प्रियकराच्या गळ्यात गळा घालून उद्यानातील निवांत कोपऱ्यात केलेल्या कुंजकूजनाहूनही, शयन-मंदिरात केलेले हे 'अनुराग मौन' अधिक लज्जतदार असते ! कारण ते प्रियकराच्या अनुनय-कौशल्याला उधाण आणते. 'नच सुंदरी करू कोपा' पासून ते— हम भी मुंह में जबान रखते हैं । काश पूछो के मुद्दुआ क्या है ॥ ह्या अर्ज-विनंतीपर्यंत शेकडो गोड गोड शब्दांचे नाजूक बुडबुडे त्याला उधळावे लागतात ! इतकेच नव्हे, तर 'पाया पडतो. राणीसरकार, दासाला क्षमा करावी अन् आपल्या साखरओठांतून साखरेहून गोड शब्द बाहेर येऊ द्यावेत.' अशी शरणागती देऊन प्रेयसीच्या चरणारविंदी मिलिंदायमान व्हावे लागते ! आणि मग ह्या लटक्या क्षणभंगुर-अबोल्याची ऊर्फ मौनाची शृंखला जेव्हा खुदकन हास्याने ताटकन तुटते तेव्हा शृंगारही उत्-शृंखल होतो ! इतका की प्रेयसी पुनश्च मुक्याचे व्रत आचरते— पण त्याचे कारण, तिच्या नाजुक ओठावर शंभर मुक्यांची अखंड बरसात होते हेच ! मग 'जे शब्देंवीण संवादिजे' असे रतिरंगनाट्य बहरास येते !. . .

विविध प्रकारांच्या ह्या मौनांची महती ठाऊक असूनही विनोबाजींच्या मौनव्रताने व्यथित झालेले लाखो लोक ह्या देशात असतील. कारण, विनोबांनी केवळ अध्यात्मसाधनेसाठी 'नाही मी बोलत आता' हा बाणा वर्षभरासाठी स्वीकारला असावा असे त्यांना वाटत नाही. आचार्य विनोबांचे सर्वोदयी विचार सर्वांना पटतील असे नाही. किंबहुना ह्या तामसीयुगात नि भोगवादी दुनियेत ते बहुतेकांना अव्यवहार्यच वाटतात. आणि तरीही ज्यांनी काही बोलावे; देशकालपरिस्थितीवर आपले मौलिक विचार मांडावेत; विचारांना धक्के देऊन विचार-प्रवर्तक भाष्य करावे, अशा मोजक्या चिंतनशील विद्वानांत त्यांचा समावेश जरूर होतो. अशा ज्ञानयोगी संतपुरुषाला प्रदीर्घ मौन स्वीकारणेच श्रेयस्कर वाटावे, हीच सध्याच्या स्वार्थग्रस्त भ्रष्ट जमान्यावर अत्यंत बोलकी टीका होय, असेच अनेकांना वाटते. 'महाभारता'चे निमति व्यासमहर्षी एके ठिकाणी वैतागाने म्हणतात.

*ऊर्ध्वबाहु विरोम्येष*
*नहि कश्चित् शृणोतु मे*

(मी बाहू उंचावून आक्रंदन करीत आहे, पण माझे कोणीही ऐकत नाही.)

व्यासमहर्षीप्रमाणेच ह्या सर्वोदयमहर्षीला वाटले असेल काय ? आणि म्हणूनच त्यांनी हे प्रदीर्घ मौनव्रत स्वीकारले असेल काय ? 'राष्ट्रपिता महात्मा गांधीकी जय' अशा घोषणा करीत कैक सत्ताधारी साधनशुचितेला पायदळी तुडवीत आहेत आणि त्यांना विरोध करणारेही कैक महात्मे 'End justifies the means' ह्या कम्युनिस्ट धोरणाचा कळत—नकळत पाठपुरावा करताहेत, केवळ प्रक्षोभाचे सनसनाटी राजकारण खेळताहेत;

तर मग कोणाला निंदावे ? कोणाला वंदावे ? कोणाला शहाणपण सांगावे ? मद्यप्यांच्या मदहोष मैफलीत सात्त्विक मार्गाचा मंत्रघोष काय कामाचा ? ह्या वैतागातूनच आचार्य विनोबांचे हे सांवत्सरिक मौन अवतरले असेल काय ? मिर्झा गालिबप्रमाणेच हा संतपुरुष मनातल्या मनात—

*है ऐसीही कुछ बात जो चुप हूं ।*
*वर्ना क्या बात करनी नही आती ? ॥*

(अशाच काही जीवघेण्या घटना घडल्या आहेत म्हणून मी चूप बसलो आहे. एरव्ही काय मला उत्तम वक्तृत्व करता येत नाही ?) असे म्हणत असेल काय ?

अहो, विनोबाच का ? ह्या देशातील हजारो सुज्ञ पुरुषांना 'मौन बरे वाटते !' बुद्धिमंतांना हतबुद्ध करणाऱ्या ह्या सत्तांध राजकारणाच्या नि भ्रष्ट अर्थकारणाच्या जमान्यात कुणाला काही शहाणपण सांगणे हाच वेडेपणा, असे खऱ्या विद्वानांना वाटू लागले आहे. हा लोकशाहीचा नव्हे, तर झुंड-शाहीचा वर्षाकाळ ! ह्या काळी कैक विद्वत्-कोकीळ स्वतःला म्हणताहेत— 'भद्रं भद्रं कृतं मौनं । कोकिळाः जलदागमे ॥' अरे, जेथे डबक्यातले बेडूक महान वक्ते बनले आहेत, तेथे कोकिळांनी आपला गळा न शिणविणेच चांगले !

□

॥ ४० ॥

## नामदारांचे बंगले !

*२० एप्रिल १९७५*

आपल्या महाराष्ट्र-गीतात म्हटले आहे, 'प्रासाद कशास? जेथ हृदय-मंदिरे !' पण जुन्या जमान्याचे हे वेडगळ मूल्य विसरा आता. हा जमाना आता 'हृदया'चा उरला नाही, 'मंदिरां'चाही नाही— निदान पुढाऱ्यांच्या, मंत्र्यांच्या बाबतीत नाही ! समाजवादी युगातील 'पुरोगामी' मंत्र्यांनादेखील सरकारी खर्चाने सजलेले प्रशस्त प्रासाद पाहिजेत. किमानपक्षी, 'एक बंगला मिले न्यारा' अशी आमदार-नामदार-खासदार मंडळींची तमन्ना असतेच असते. आणि जशी इच्छा तशी फळे ! विशेषतः 'पुरोगामी' महाभागांचे भाग्य ह्या बाबतीत विशेष फळफळलेले आढळते. म्हणूनच, अनेक 'पुरोगाम्यां'ना दिल्लीत मंत्रिपद आणि ते शोभविणारे आलीशान बंगले लाभले.

**धन्य पुरुष !**

पण 'पुरोगामी' मंडळींचे वैशिष्ट्य हे की, मंत्रिपद गेले तरी त्यांनी बंगले सोडले नाहीत. केंद्रीय गृहनिर्माण-खात्याचे राज्यमंत्री मोहन धारीया ह्यांनी मंत्रिपदाबरोबरच बंगल्यालाही सोडचिठ्ठी दिली, असा वेडेपणा ह्या 'पुरोगामी' बहाद्दरांनी केला नाही ! जणू काही भारताचे माजी संरक्षणमंत्री व्ही. के. कृष्णमेनन ह्यांचाच समाजवादी आदर्श त्यांनी डोळ्यांपुढे ठेवला होता. कृष्णमेनन मंत्री-पदावरून दूर झाले तरी अखेरचा श्वास सोडीपर्यंत त्यांनी बंगला सोडला नव्हता ! ह्याखालोखाल वास्तु-निष्ठा ज्या पुरोगामी महाभागांनी दाखविली आहे, त्यांच्या यादीतील काही धन्य-पुरुष येणेप्रमाणे— पश्चिम बंगालचे मुख्यमंत्री श्री. सिद्धार्थ शंकर रे, मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री पी. सी. सेठी, दिनेश

सिंह, के. हनुमंतैया, जयसुखलाल हाथी, भगवत झा, शेरसिंह, मोइनुल्हक चौधरी, जहाँआरा जयपालसिंग इत्यादी ! ह्या महाभागांची अधिकार-खुर्ची सुटली, तरी बंगला सुटला नाही. कोणी कुत्सित टीकाकार म्हणतील, 'हा लोभीपणा आहे.' पण नाही, जे एकदा धरले ते घट्ट धरून बसणे, हे निष्ठेचे लक्षण नव्हे काय? ह्या मंत्र्यांच्या मंगल वास्तव्यानेच त्या दगडा-मातीच्या नि सिमेंट कॉंक्रीटच्या चार भिंतींना बंगल्याचे रूप प्राप्त झाले होते. त्यांनी त्यांचा त्याग करताच मूर्तिविहीन मंदिराची अवकळा त्या वास्तूंना प्राप्त झाली नसती काय?

## पुनरागमनाची आशा ?

बंगले सोडून न जाण्याचे दुसरे कारण म्हणजे घरांची तीव्र टंचाई. एखादी चाळ कोसळली अथवा झोपडपट्टी पाडली, तर गरीब लोक फूटपाथचा आश्रय घेऊ शकतात. पण 'गरिबी हटाव'चे व्रत घेणाऱ्यांनी बंगले सोडल्यावर कुठे जावे? त्यांनी फूटपाथवर येणे म्हणजे गरिबांच्या हक्काच्या जागेवर आक्रमणच ठरणार नाही काय?. . . पण छे, हेही कारण खरे नाही. 'इंदिरादेवींच्या कृपाप्रसादाने आज ना उद्या पुनश्च मंत्रिपदाच्या अडणीवर बसूच' असा आशावाद ह्या 'पुरोगामी' महापुरुषांना वाटत असावा ! आणि मग त्या वेळी पुनश्च नवे बंगले शोधण्यापेक्षा, आहे त्याच बंगल्यात ठाण मांडून बसणे श्रेयस्कर, असा पोक्त विचार त्यांनी केला असावा. भविष्यवेत्ती दूरदृष्टी म्हणतात ती हीच !. . .

## सुखद स्मृतींची मंदिरे !

भासाच्या 'स्वप्नवासवदत्ता' नाटकात एक प्रसंग आहे. त्यातील उदयन राजा 'समुद्र-गृह' नामक प्रासादात प्रवेश करताच, वासवदत्तेच्या मधुर आठवणी त्याच्या हृदय-सागरात कल्लोळतात. 'इह तया सह हसित; इह तयासह स्वपितम्. . . ' (इथेच मी तिच्यासह हसलो, इथेच मी तिच्यासह सुखनिद्रा घेतली.) इत्यादी स्मृती त्याच्या मनात दाटतात. आमच्या ह्या मंत्री-गणांनी सत्तासुंदरीचा आस्वाद ह्याच बंगल्यात घेतला असल्याने, तिच्या यादगारीने भारलेल्या ह्या प्रशस्त वास्तू सोडण्यास ते तयार नसावेत !. . . 'ह्या इथे, ह्याच दिवाणे खासमध्ये आम्ही रात्रंदिवस खलबते केली ! इथे, ह्याच सोफ्यावर बसून आम्ही इष्ट-मित्रांना 'परमिटे' दिली ! इथे, ह्याच ओसरीवर अनेक आधुनिक चमकशास्त्री-नमकशास्त्री, अनेक क्रांतिकारक साहित्यिक, अनेक दरबारी नट-नर्तक, अनेक 'नाट्यगानकुशल कलावती' आमच्याकडे वशिला लावण्यासाठी तासन् तास तिष्ठताना पाहून आमचे नेत्र सुखावले ! इथेच, ह्या बंगल्याच्या ह्या भव्य

हॉलमध्येच (आम्ही नको नको म्हणत असताना?) आमच्या चमचेश्वरांनी आमचे वाढदिवस साजरे करून, आम्हाला हारांच्या भाराखाली गुदमरवून टाकले! इथेच, ह्या लाल मखमली गालिच्यांवर— रेड कार्पेटवर— आम्ही अनेक समाजसेविकांच्या 'शिष्ट'मंडळांचे हार्दिक स्वागत केले! इथेच, ह्या सुंदर दालनात आम्ही गणेशोत्सव वा शारदोत्सव साजरे करून, अनेक लाचार कलाकारांचे फुकट कार्यक्रम घडवून आणले अन् 'रसिकराज' ही पदवी त्यांच्याकडून मिळविली!...'

**तल्लीनतेची मद्यालये!**

'अशा एक नव्हे दोन नव्हे, तर शेकडो आठवणींशी निगडित झालेला बंगला सोडून जाणे लाजलज्जा सोडण्याइतपत का सोपे आहे? अहो, हा बंगला नाही, तर मधुर आठवणींची नशा चढविणारे मद्यालय आहे. 'यह मैकदा है, यहां बेखुदीका आलम है।' हा बंगला म्हणजे यादगारीचा शराबखाना असून, येथे आत्मविस्मृतीचे— तल्लीनतेचे— साम्राज्य पसरले आहे. आम्ही एक वेळ समाजवाद सोडू, पण हे दिलप्यार बंगले कधीही सोडणार नाही!'

□

॥ ४१ ॥

## संत आणि राजकारण !

*३० नोव्हेंबर १९७५*

नाटक-सिनेमांतील यशस्वी दुहेरी भूमिकांचे– ('डबल रोल'चे) आपण कौतुक करतो. कारण उघड आहे, एक भूमिका करणेही जेथे अवघड, तेथे एकाच व्यक्तीने दोन भूमिका वठविणे फार मुश्किल ! आणि जे फार मुश्किल त्याचे कौतुक करणे हा मानवी स्वभावच आहे. त्यातही ह्या भूमिका अगदी कमालीच्या परस्पर-भिन्न असल्या, तर कौतुकास पारावार नाही. एकाच व्यक्तीने दानशूर कर्णाची नि मखखीचूस कवडीचुंबकाची, अथवा उदारधी चारुदत्ताची नि दुष्टधी शकाराची किंवा रणपंडित पहिल्या बाजीरावाची नि पलंगपंडित रणछोडदास रावबाजीची भूमिका सारख्याच कौशल्याने उभी करणे हे काय सोपे काम आहे ? पहिल्या अंकात जिने 'रंभा' बनून मधुर रूपाने, मधुर गायनाने नि मधुर दर्शनाने आल्हाद दिला; तिनेच दुसऱ्या अंकात 'हिडिंबा' बनून प्रेक्षकांच्या अंगावर शहारे आणावेत, ही काय मामुली करामत आहे ?

### नागमोडी आणि बाळबोध

जे नाटकांत तेच जीवनात. सामान्यतः कोणत्या तरी एखाद्या क्षेत्रातील एखादीच भूमिका माणूस यशस्वी करू शकतो. अगदी परस्पर-भिन्न क्षेत्रांतील दोन विभिन्न भूमिका एकाच माणसाला सांभाळता येणे अतिशय कठीण– प्राय: अशक्यच ! उदाहरणार्थ सत्तेला प्राधान्य देणारे राजकारण नि सत्य-सदाचाराला प्राधान्य देणारे संतकारण, ही बिलकुल भिन्न क्षेत्रे. 'शठं प्रति शाठ्यम्' हे पहिल्या क्षेत्राचे ब्रीदवाक्य, तर 'शठं प्रति सौजन्यम्' हे दुसऱ्या क्षेत्राचे ध्येय ! राजकारणाची वाट नागमोडी तर संतकारणाची वाट

सरळ बाळबोध ! राजकारणाची चाल वारांगनेच्या चालीप्रमाणे चवचाल; तर संतांच्या सदाचार-क्षेत्राची वाटचाल पतिव्रतेच्या असिधाराव्रताप्रमाणेच खडतर ! अशा ह्या भिन्न भिन्न क्षेत्रांत एकच व्यक्ती सारखेच यश कसे संपादन करू शकेल ?

## दुनिया अलग अलग

संतांच्या सत्त्वगुणी 'धर्मक्षेत्रा'हून राजकारणी पुरुषांचे राजस 'कुरुक्षेत्र' हे असे मूलतःच वेगळे असल्यामुळे श्री. नानासाहेब गोरे ह्यांनी नुकतेच आपल्या पक्षकार्यकर्त्यांपुढे काढलेले उद्‌गार मनाला सहज पटतात. नानासाहेब म्हणाले, "संतपुरुष राजकारणात फार काही करू शकत नाही– शकणार नाही !" संत समाजातच वावरतात नि राजकीय पंतही समाजातच वावरतात; दोघेही प्रवचने देतात, उपदेश करतात; लोकसेवा घडावी असेच दोघांनाही वाटते; उभयतांच्या भोवती लोकांचा गराडा पडतो. पण तरीही त्यांचे रंग वेगळे, ढंग वेगळे आणि जगही एकमेकांपासून वेगळेच ! सर मुहम्मद इक्बालांचा दृष्टांत द्यावयाचा झाल्यास, असे म्हणावे लागेल की, 'शाही बाजपक्षी अन् गिधाड ह्या उभयतांचे वास्तव्य अंतराळातच असते, उभयतांना तीक्ष्ण दृष्टी, तीक्ष्ण चोच नि प्रबळ पंख विधात्याने दिले आहेत; पण तरीही त्यांची दुनिया अलग अलगच आहे !

*'शाहीं का जहाँ और है,*
*और करगज का जहाँ और !'*

## न पचेल एवढी गोळी

पण राजकारण म्हणजे स्वार्थपरायण गिधाडांचेच क्षेत्र, ही कल्पना योग्य आहे काय ? नाही, (सामान्यतः असेच दिसत असले तरी) 'राजकारण म्हणजे लुच्या-लफंग्यांचेच माहेर' ही विचारसरणी हितावह नव्हे. हे लक्षात घेऊनच कै. नामदार गोखले म्हणाले होते, 'Spiritulise the politics– राजकारणाचे अध्यात्मीकरण करा.' हाच संदेश महात्मा गांधींनी प्राणपणाने उचलून धरला आणि आचरण्याचाही प्रयत्न केला. परंतु, नामदार गोखले ह्यांच्या घोषणेचा भावार्थ एवढाच होता की, राजकारणालाही काही समाज-हितकारक नैतिक मूल्यांचे– जुन्या भाषेत सांगावयाचे झाल्यास भगवंताचे– अधिष्ठान पाहिजे ! हा भावार्थ बाजूस पडून, गांधीयुगात 'अध्यात्मीकरणा'चा अतिरेक झाला; यतिधर्म राजधर्मावर कुरघोडी करू लागला. 'आतल्या आवाजा'चे प्रस्थ माजले. गूढगुंजन नि विक्षिप्तपणा ह्यांचा भाव राजकीय क्षेत्रात वधारला. तर्कशुद्ध विचारांची जागा भोंगळ भक्तिभावाने घेतली ! धार्मिक क्षेत्रांतील विभूतिपूजेचे अवडंबर राजकीय क्षेत्रातही माजू लागले ! महात्मा गांधींचे व्यक्तिमत्त्व नि शक्तिमत्त्व ज्यांच्या ठायी नाही

असे 'प्रति गांधी', 'अति गांधी' नि 'किंचित गांधी' गल्लोगल्ली निर्माण झाले ! सारांश, संतपणाची न पेलेल, न पचेल एवढी गोळी राजकारणाने घेतली.

## दोन्ही बिनसले !

ह्याचा परिणाम असा झाला की राजकारण भरकटले नि संतकारणही बिनसले. आणि राजकीय बुवाबाजी अथवा बुवांचे राजकारण पैदा झाले ! राजकारणाचे शुद्धीकरण आवश्यकच असते आणि ते राजकारणातली वास्तवता लक्षात घेऊनच करावयाचे असते, ह्याचे भान सुटले. साहजिकच, केवळ उच्च नैतिक तत्त्वांची व्यवहारशून्य बडबड बेसुमार वाढली. कठोर परिस्थितीच्या नि वस्तुनिष्ठ व्यवहाराच्या कसोटीवर, राजकारणाचे हे बेगडी संतपण टिकणारे नव्हते, टिकले नाही. आणि तरीही त्याचे अवशेष यत्र-तत्र दृष्टीस पडतात. म्हणूनच नानासाहेब गोरे ह्यांचा अनुभवसंपन्न इशारा समयोचित ठरतो.

## संतांचे महत्त्व

ह्याचा अर्थ आम्ही संतांचे महत्त्व कमी लेखावे असा नाही. खऱ्या संतांचे महत्त्व वादातीत आहे. ज्या समाजात निर्भीड-निःस्पृह-निःस्वार्थ-निर्विकार संतपुरुष निर्माण होतात, त्यांचा नैतिक दर्जा आपोआप उन्नत होतो. आणि मग त्या उन्नत समाजाचे राजकारणही उच्च दर्जाला जाऊन पोहोचते. इतके की संतांना त्यात लुडबूड करण्याची जरुरीच भासत नाही. ज्ञानेश्वर-तुकारामादी संतांनी राजकारणात थोडाही हस्तक्षेप केला नाही. आणि तरीही त्यांच्या महत्तम कार्याचा लाभ आपोआप राजकारणाला मिळालाच ! असे असूनही खऱ्या संताला राजकारणाविषयी विचारले, तर तो नम्रतेने पण निश्चयाने एवढेच म्हणेल--

*उनका जो फर्ज है*
*अहले सियासत जाने*
*मेरा पैगाम मुहब्बत है*
*जहाँतक पहुचे*

(राजकारणी लोकांचे काय कर्तव्य आहे ते राजकारणीच जाणे. मला ते विचारू नका. 'मानवावर प्रेम' एवढाच माझा संदेश असून, तो शक्य तेवढा सर्वत्र पोहोचविणे हेच माझे जीवित-ध्येय आहे !)

□

॥ ४२ ॥

# देशहिताची दयाळू सक्ती !

*२१ मार्च १९७६*

एक काळ असा होता की, भारतात उत्पादन-क्षम शेतजमीन विपुल होती, मैलोगणती हिरवे हिरवेगार गालिचे पसरले होते, घनदाट संपन्न अरण्ये भरपूर होती आणि त्यामानाने लोकसंख्या खूपच कमी होती. यंत्रयुगाचा अवतार घडला नव्हता आणि म्हणूनच मनुष्य-बळाची नितांत गरज होती. पिढ्यान् पिढ्या एकच व्यवसाय करणाऱ्या मोठ्या एकत्र कुटुंबाचा तो काळ ! मुलेबाळे वयात येताच ती त्या कुटुंबाचा – नि त्याच्या व्यवसायाचा– भार शिरावर घेण्यास उपयुक्त ठरत. साहजिकच, त्या काळी 'अष्टपुत्र-सौभाग्यवती भव' हा आशीर्वाद योग्यच होता; कुटुंबनियोजनाची जरुरीच भासत नव्हती; मुलाबाळांच्या खिल्लाराने गजबजलेले घर हे गृहस्थाश्रमाचे वैभव मानले जाई. अव्वल आंग्लाईपर्यंत ही स्थिती फारशी बदलली नव्हती. त्या काळात सामान्य माणसाच्या सुखाची नि महत्त्वाकांक्षेची कल्पना पुढील प्रार्थनेवरून सहज येईल. एक सुखवस्तू मध्यमवर्गीय माणूस म्हणतो–

*या इलाही ! दे लुगाई*
*जिसको बच्चे हो हजार ।*
*जिनमे के दो 'डिप्टी कमिश्नर'*
*बाकीके सब तहसीलदार ।।*

## 'एक चंद्रमा पुरे'

बिचारा इलाही म्हणजे देवबाप्पादेखील, त्या काळीसुद्धा ही प्रार्थना ऐकून मनातल्या

मनात हसला असेल नि खिन्नही झाला असेल ! कारण, त्या जुन्या जमान्यातही 'कुटुंब लहान तर सुख महान' हे ओळखणारे सुज्ञ लोक बरेच होते ! 'निदान गरिबांनी तरी मुलाबाळांचे लेंढार वाढवू नये' असा इशारा देणारे विचारवंत, अगदी रामायण-महाभारताच्या काळीही या देशात होतेच. त्यांनी कंठरवाने सांगितले होते की—

*एक चंद्रमा पुरे ! कशाला—*
*मिणमिणते शंभर तारे ?*
*एक पुत्र बलवंत पुरेसा*
*नकोत दुर्बल शत पोरे !*

खुद्द श्री तुकाराममहाराजांसारख्या गृहस्थाश्रमी संतानेदेखील 'पातकांचे मूळ पोरवडा' असा इशारा दिला होता.

ह्या सदुपदेशाची गरज तेव्हा होतीच. पण विपुल जमीन, यंत्र-तंत्राचा अभाव नि सापेक्षतः अल्प लोकसंख्या असलेल्या त्या युगांपेक्षा, आजच्या अन्नधान्य तुटवड्याच्या-भडकत्या महागाईच्या-यंत्रयुगात ह्या उपदेशाची गरज हजारो पटींनी वाढली आहे ! कारण, जीवनावश्यक वस्तूंचे उत्पादन, वैज्ञानिक साधनसामग्रीने, कितीही वाढले तरी ते दर्यामि खसखस ठरावे इतक्या वेगाने लोकसंख्या झपाट्याने वाढते आहे. केंद्रीय आरोग्यमंत्री नुकतेच म्हणाले की, "भारतात दरवर्षी १ कोटी ३२ लाखांची (म्हणजे ऑस्ट्रेलियाच्या लोकसंख्येएवढी !) भर आपण घालीत आहोत. म्हणूनच स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारताची लोकसंख्या सुमारे २५ कोटींनी वाढली आहे. लोकसंख्या अशीच गणित-श्रेणीने झपाट्याने वाढत गेली, तर आमच्या विकासयोजना मातीमोल होत जातील; आणि भारताच्या ललाटीचा दारिद्र्य-लेख कधीच पुसला जाणार नाही ! लोकसंख्यावाढीच्या प्रचंड वाळवंटात प्रगतीची भागीरथी लुप्त होऊन जाईल. म्हणूनच, गेल्या २५ वर्षांत— विशेषतः गेल्या १० वर्षांत—सरकारने व समाजकार्यकर्त्यांनी 'कुटुंब-नियोजन मोहीम' चालू करून जनसंख्या-वाढीला आळा घालण्याचे नानाविध प्रयत्न केले; पण ते फारसे सफळ झाले नाहीत आणि त्यांतील उणिवा दूर केल्या तरी ते अपेक्षित उद्दिष्ट गाठू शकतील असा संभव दिसत नाही. 'लोकशिक्षणाच्या द्वारा मतपरिवर्तन' हा उपाय सर्वोत्तम खरा; पण ह्या उपायाने साध्य होणारे नियोजन आणि राक्षसी वेगाने होत असलेली लोकसंख्यावाढ, ह्यांचा मेळ बसणे आता अशक्य झाले आहे.

**जालीम मात्रेचा वळसा हवा !**

आणि म्हणूनच सक्तीचे कुटुंबनियोजन अपरिहार्य झाले आहे. ज्याप्रमाणे मरणोन्मुख

रोग्याला सौम्य औषधीने गुण येत नाही असे दिसताच, जालीम मात्रेचा वळसा देणे हेच श्रेयस्कर, त्याचप्रमाणे आता सक्तीचे कुटुंब-नियोजन अपरिहार्य झाले आहे ! हे कठोर सत्य ओळखून, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री. शंकरराव चव्हाण ह्यांनी सक्तीच्या कुटुंबनियोजनाचे विधेयक, पुरेशा विचारविनिमयानंतर, विधानसभेत आणण्याचे खंबीर अभिनंदनीय पाऊल संकल्पिले आहे.– त्यावर सध्या विचारमंथन चालू झाले आहे. आंधळ्या धर्मभावनेच्या आधारे काही महाभागांनी ह्या अभिनंदनीय विधेयकाविरुद्ध जो कोलाहल माजविला त्याला मुख्यमंत्र्यांनी दाद दिली नाही व आपली ठाम भूमिका सोडली नाही हे ठीकच झाले ! पाकिस्तानसारखे धर्माधिष्ठित राष्ट्रही कुटुंब नियोजनाप्रीत्यर्थ कोट्यवधी रुपये खर्च करते, ह्या सत्याकडे डोळेझाक करून 'इस्लामला कुटुंबनियोजन मान्य नाही', असा दावा करणारे कर्मठ लीडर्स; व्यक्ति-स्वातंत्र्याच्या भूमिकेवरून सक्तीच्या कुटुंबनियोजनाला सुरुंग लावू पाहणारे बिशप्स नि फादर्स; आणि आत्म-संयमनाच्या वाळूच्या बंधाऱ्याने लोकसंख्यावाढीच्या प्रक्षुब्ध दर्याला पालाण घालण्याचा अव्यवहार्य उपदेश करणारे संतशिरोमणी काहीही वल्गना करोत; ह्या देशात कुटुंबनियोजनाची सक्ती केल्याविना गत्यंतर नाही, हे उघडे सत्य आहे. जेथे मतपरिवर्तनाच्या युक्तीची हद्द संपते, तेथेच सत्कार्यासाठी सक्तीची जरुरी सुरू होणे क्रमप्राप्त ठरते. जशी युद्धकाळात कधी कधी सक्तीची लष्कर-भरती !– ही सक्ती कठोर असली तरी ती दयाळू कठोरता आहे, 'kind cruelty' आहे, हे लक्षात घेतले पाहिजे. परंतु आश्चर्य हे की, सक्तीच्या कुटुंब-नियोजनाला कम्युनिस्ट पक्षाच्या महाराष्ट्र राज्य कौन्सिलने विरोध जाहीर केला आहे ! उद्या, पुरीच्या शंकराचार्यांना त्यांनी आपला पक्षनेता म्हणून निवडले तरी नवल वाटावयास नको ! !

**खरा प्रश्न**

परंतु, ही मूठभर लीडर-मंडळी कठोर वास्तवतेचे आव्हान (कोणत्याही मतलबाने वा केवळ कर्मठपणाने !) स्वीकारू शकली नाही तरी, येथील सामान्य जनतेला हळूहळू पण निश्चितपणे हे आव्हान स्वीकारण्याचे धैर्य येते आहे. उदारहणार्थ, ठाणे जिल्ह्यात नसबंदी शस्त्रक्रियेचा इष्टांक २२६०० ओलांडला गेला असून, ठाणे-कल्याण-भिवंडी येथे शेकडो मुसलमान बंधूंनी शस्त्रक्रिया करून घेतली आहे ! आता ही दयाळू सक्ती, ही देशहितकारक सक्ती, वास्तव अडचणींचा सर्वांगीण विचार करून टप्प्याने नि कुशलतेने कशी कार्यवाहीत आणावयाची, हाच खरा प्रश्न आहे. प्रगत महाराष्ट्र राज्य ह्याबाबत साऱ्या भारताला उत्तेजनास्पद आदर्श घालून देईल, याची आम्हांस खात्री आहे.

□

॥ ४३ ॥

# गरजेचे राजकारण !

*११ एप्रिल १९७६*

कोट्यानुकोटी सामान्य माणसांच्या दैनंदिन जीवनाशीही आजकालचे सर्वंकष राजकारण निगडित झाले आहे. कारण असे एकही क्षेत्र नाही की, ज्याच्याशी राज्य-शासनाचा संबंध नाही. पण तरीही अष्टौप्रहर पोटापाण्याच्या विवंचनेत असलेल्या सामान्य रयतेला 'राजकारण कसे असते वा असावे ?' ह्या परिसंवादाशी कर्तव्य नाही; त्यात रस घ्यायला फुरसत नाही. सामान्य माणूस काकुळतीने एवढेच म्हणेल— 'बापहो, राजकारण कसेही करा, बेरजेचे करा अथवा वजाबाकीचे करा, त्रैराशिकाचे करा अथवा पंचराशिकाचे करा; आम्हांला दोन वेळ पुरेसे अन्न, अंगभर कपडा नि डोके टेकायला निवारा देणारे करा म्हणजे झाले !' परंतु, सामान्यजनांप्रमाणे राजकारणाची— अथवा कोणत्याही 'कारणा'ची — उपेक्षा करून बुद्धिमंतांचे ('इंटलेक्चुअल्स'चे) कसे चालेल ? अति-शहाणपणामुळे त्यांचा स्वतःचा राजकारणाचा बैल रिकामा राहिला तरी,— त्यांना स्वतःला क्रियाशील राजकारण फारसे जमले नाही तरी;— राजकारण-चर्चा हा त्यांचा खास प्रांत आहे; प्रत्यक्ष राज्य-शासन नि राजकारण करणाऱ्या मंडळींना 'गाईड लाइन्स' पुरविणाऱ्या 'यथार्थ दीपिका' उजळणे हे त्यांचे 'मिशन' (आणि कधी कधी कमिशनही) आहे ! कोणत्या तरी शिवबाचे गागाभट्ट वा रामदास होण्याची, अथवा कोण्या चंद्रगुप्ताचे आर्य चाणक्य बनण्याची तमन्ना त्यांच्या दिलाच्या दिवाणखान्यात थैमान घालीत असते !

ह्या बुद्धिमंतांतील एक पोटवर्ग आहे आम्हां पत्रकारांचा. आम्हांस जीवनातील सर्व विषयांत रस घ्यावाच लागतो— विशेषतः राजकारणात ! राज्यकर्त्यांची नि राजकारणाची 'संगत नको रे बाप्पा' असे आम्हांस म्हणताच येत नाही. शासनकर्त्यांना ऐकविणे अन्

त्यांचे ऐकणे, त्यांच्या मुलाखती घेणे, त्यांच्याशी प्रश्नोत्तरी करणे हा आमच्या व्यवसायाचाच एक भाग. म्हणूनच आमच्या एका बंधूने परवाच मुख्यमंत्री शंकररावजी चव्हाण ह्यांना प्रश्न विचारला. तो पुढीलप्रमाणे ओवीबद्ध करता येईल—

*आपले राजकारण आहे कैंचे ?*
*बेरजेचे की वजाबाकीचे ?*
*अथवा केवळ गरजेचे ?*
*हे कृपया सांगावे ॥*

ह्यावरील शंकररावांचा जबाब असा ओवीबद्ध होऊ शकेल—

*आमुचे राजकारण बेरजेचे*
*तत्त्वाचे तैसेचि व्यवहाराचे*
*म्हणोनीच ते गरजेचे*
*जाणावे गा ॥*

राजकारण गरजेचेही असते, हे शंकररावजींचे म्हणणे फार महत्त्वाचे आहे. किंबहुना, आजवरचा जगातील राजकीय उलाढालींचा इतिहास पाहता, ते प्रथमतः गरजेचेच असते, हे सहज लक्षात येईल. राजकारणात कधी कृष्णशिष्टाई-तडजोड तर कधी कुरुक्षेत्रावरील झोडाझोड; कधी समझोता तर कधी निव्वळ उगारलेला जूता ! कधी दम खाऊन कालहरण करणे, तर कधी निव्वळ दमबाजीने बाजी मारणे !- असे राजकारणाचे स्वरूप गरजेनुसार— म्हणजेच, देश-काल-परिस्थितीप्रमाणे— पालटत राहते. 'राजकारण गरजेचे' हे एकदा मान्य केले म्हणजे ते सदैव बेरजेचेच असेल, असे सांगवत नाही. ते जेवढे बेरजेचे तेवढेच वजाबाकीचे; जेवढे गुणाकाराचे तेवढेच भागाकाराचे ! राजकारण— किंबहुना कोणतेही कार्य— एकंदरीत बेरजेने; (लोकमान्य टिळकांच्या शब्दांत सांगायचे झाल्यास 'लोकसंग्रहा'ने) साध्य होते हे खरे; पण कधी कधी वजाबाकीनेही कार्यभाग उत्तम साधतो. बारा भिन्न भिन्न वाटांनी जाणाऱ्या बारभाईंच्या बेरजेपेक्षा, सुसूत्रता साधणारी वजाबाकीही केव्हा केव्हा वाजवी ठरते ! 'राखावी बहुतांची अंतरे' हा समर्थसंदेश बहुशः फलदायी असला, तरी बहुतांना विशिष्ट अंतरावर ठेवणेदेखील राजकारणात कधी कधी क्रमप्राप्त ठरते ! लोकसंग्रहजन्य संख्याबळ पुष्कळदा उपयुक्त ठरले, तरी कधी कधी दृढनिश्चयी अल्पसंख्या (डिटर्मिन्ड मायनॉरिटी) परिणामकारक ठरते. समर्थ रामदासांनी 'राखावी बहुतांची अंतरे' या आशयाचा उपदेश अनेकदा केला असला, तरी दासबोधातील 'राजकारण'-निरूपण-नामक समासात ह्याच उपदेशाला पुस्तीही जोडली आहे. 'जो बहुताचे सोसेना। त्यास बहुत लोक मिळेना।' एवढेच सांगून ते थांबले नाहीत, तर 'अवघेचि सोसिता उरेना। महत्त्व आपुले॥' अशी जोडही दिली आहे.

पुष्कळांना आपलेसे करावे हे सांगत असतानाच, 'हिरवटासी दुरी धरावे । युद्धकार्यास ढकलावे ।. . . नष्टासी नष्ट योजावे. . . । राजकारणामध्ये ॥' असाही इशारा त्यांनी दिला आहे.

सारांश, जीवनाप्रमाणेच राजकारणाचे ध्येय निश्चित ठरविता येईल. पण त्या ध्येयाच्या गरजेनुसारच उपाय योजावे लागतील; वेगवेगळ्या प्रकारे गणित मांडावे लागेल. पुष्कळदा बेरजेचे-गुणाकाराचे पण वेळप्रसंगी वजाबाकीचे नि भागाकाराचेदेखील ! राजकारणधुरंधर इंदिरा गांधींची गेली १० वर्षांची कारकीर्द डोळयांपुढे आणली तरी हे सहजच पटेल की, त्यांनी बेरजेप्रमाणेच वजाबाकीचे पाठही अनेकदा गिरविले आहेत. छत्रपती शिवरायांच्या चरित्रातही निरपवाद बेरीज अथवा निरपवाद वजाबाकी आढळत नाही. कधी शरणागती तर कधी रणागती; कधी माघार तरी कधी पुढाकार; कधी तह कधी तलवार; कधी संधी कधी विग्रह आणि कधी बेरजेचे सामर्थ्य तर कधी वजाबाकीचे चातुर्य अशी विविध परींची वळणे घेत त्यांच्या राजनीतीचा अश्व प्रगतिपथावरून ध्येयमंदिराकडे गेला !

राजकारणाची ही क्षणाक्षणाला बदलणारी वळणे. . . वळणेच ती ! तेव्हा ती वक्रच असावयाची. राजकारणाची मुसाफिरी सरळसोट धोपट मार्गाने सहसा होतच नाही. राजकारण म्हणजे एक वक्री शनी ! त्याच्या साडेसातीच्या फेऱ्याला तोंड देणे तर मुश्किलच, पण त्याचा तोंडवळा नुसता न्याहाळणेही सोपे नाही. राजकारणाचे गणित कळायला नि यशस्वीपणे सोडवायला विशिष्ट पिंड-प्रकृतीची जरुरी असते. तत्त्वज्ञ, साहित्यिक-कलावंत ह्यांच्या पिंड-प्रकृतीला सहसा ते मानवत नाही. म्हणूनच ह्या वर्गातील शहाणी माणसे राजकारणाच्या चक्रव्यूहात शिरत नाहीत. इतकेच काय, पण त्यावर भाष्य करणेही टाळतात.

□

॥ ४४ ॥

## नर्तिके ! गर्व करू नकोस !

*२५ एप्रिल १९७६*

हे यंत्रयुग आहे, धावपळीचे युग आहे, 'सारे काही झटपट' हे ह्याचे ब्रीद आहे. दीर्घ तपस्येला, अभ्यासाला, रियाजाला या युगात सहसा फुरसत सापडत नाही. म्हणूनच कलेच्या क्षेत्रात अन्य प्रकारची प्रगती कितीही झाली असली तरी, कसदारपणा-दमदारपणा बराच दुर्मिळ झाला आहे. निःसत्त्व आहाराच्या ह्या झटपट युगात महागाईने मानवाचा दम उखडत असताना त्यांच्या कलेत दमदारपणा, टिकाऊपणा येईलच कसा? तीन मिनिटांच्या हलक्याफुलक्या भावगीतांना सध्या भाव आहे. आणि अभाव आहे दीर्घ दमछाकाच्या ध्रुपद धमाराचा ! तीन मिनिटांच्या नितंब-घुसळक नाभीदर्शक थिल्लर नाचावर नाण्यांचा पाऊस पडतो आहे; दर्जेदार 'भरतनाट्यम्' वा 'कथ्थक' पाहिजे आहे कितीकांना?. . . अशा या युगात तुर्कस्तानची नृत्य-सौदामिनी सोरय्या हिने सतत ३१ तास, १ मिनिट १८ सेकंद नृत्य करून नवा जागतिक विक्रम प्रस्थापित करावा ही केवढ्या कौतुकाची गोष्ट ! हा विक्रम करताना तिचे वजन १२ पौंडांनी कमी झाले; बुटांच्या १६ जोड्या झिजल्या, शरीराला ताशी १८०० हेलकावे देत ती नाचली !. . . 'शाब्बास, नृत्यसौदामिनी शाब्बास' अशा उत्स्फूर्त गर्जनांनी तिचे रसिकांनी अभिनंदन केले. छे, पण 'नृत्य-सौदामिनी' हे विशेषण बरोबर नाही. कारण सौदामिनी म्हणजे बिजली ! ती आकाशाच्या रंगमंचावर क्षणभरच नाचते, तर ही तुर्कस्तानी सुस्तनी, ही तुर्कस्तानी नितंबिनी - ही तुर्क तरुणी सोरय्या (की सुरय्या?) अखंड ३१ तास नाचली !

### नर्तन-पटूंचा देश !

पण तुर्कस्तानी नर्तिके ! वृथा गर्व बाळगू नकोस. प्रदीर्घकाळ (पण वेगळ्या प्रकारे !) नाचण्यात हा भारत मागे नाही. ह्या देशाइतका विविध नृत्य-प्रकारांनी गजबजलेला देश क्वचितच सापडेल ! येथे कोण नाचत नाही ?

सर्वांनाच येथे नाचण्याचा शौक आहे. येथे हरिकीर्तनात दंग होऊन नाचणारे साधुसंत आहेत, तसेच दुसऱ्याचे वाटोळे झाल्याचे पाहून, आनंदित होऊन नाचणारे संधिसाधूही आहेत ! येथे साहित्यकलेच्या उच्च शिखरावर उन्मनी अवस्थेत नाचणारे साहित्यमयूर आहेत, तसेच उच्छिष्ट भक्षून साहित्य-प्रांतात उन्मत्त झालेले अंध अनुकरणपटू लांडोरही नाचताहेत !

३१ तास सतत नाचण्याची विक्रमकथा या देशाला सांगू नकोस. तुर्कस्तानी नर्तिके, 'एखाद्याच्या पुढे पुढे नाचणे' या नृत्यप्रकारात वर्षानुवर्षे अखंड मग्न असलेल्या विक्रमी स्त्री-पुरुषांची प्रचंड पलटण ह्या देशाने अलीकडे पैदा केली आहे ! ह्या नृत्यप्रकाराला 'लाचार-नाट्यम्' म्हणतात !

### लाचार-नाट्यम् !

१५ दिवसांपूर्वीच पंतप्रधान इंदिरा गांधींनी ह्या नृत्यात तरबेज असलेल्या काही बहाद्दरांची चांगलीच कान-उघाडणी केली. इंदिराजींची ती रायबरेलीतील पहिली पदयात्रा ! घरोघर जाऊन गरिबांचे दुःख समजावून घेण्यासाठी, त्यांना दिलासा देण्यासाठी योजिलेली ! पण कसले काय नि कसले काय, शे-पाचशे काँग्रेस कार्यकर्ते (?) जेथे तेथे इंदिराजींच्या भोवती ! मग जनता-जनार्दनाची व्यवस्थित भेट कशी व्हावी ? इंदिराजी अखेर वैतागल्या नि कडाडल्या, "माझ्या पुढेपुढे नाचण्याची ही आदत सोडा आणि खेड्यापाड्यात जाऊन विधायक कार्य करा !"

. . . ते पुढेपुढे करणारे लाचार-नृत्यपटू खजील झाले असतील, पण त्यांची वर्षानुवर्षांची आदत सुटेल काय ? जागोजागी मंत्र्यांच्या वा मुख्यमंत्र्यांच्या पुढे अखंड नाचून आपली स्वतःची गरिबी हटविण्याचा खटाटोप करणारी मंडळी गावोगावी पैदा झाली आहे. दीनवाणी मुद्रा, दोन्ही कर जोडणे नि कंबरेत वाकणे ही या लाचारनृत्याची मुख्य लक्षणे होत. हे नृत्य सतत ३१ तासच नव्हे, तर ३१ वर्षे करणारे नृत्यविशारद आमच्या सार्वजनिक क्षेत्रात थोडे नाहीत !

### काही राजकीय नृत्ये !

लाचार-नाट्यम् हा केवळ एक नृत्यप्रकार झाला. ह्याखेरीज अनेक नृत्यप्रकार

जगातील सर्वच राजकीय क्षेत्रांत परिणत झाले आहेत. त्यांतील काही पुढीलप्रमाणे–

राजकीय कथकली– ह्या प्रकारांत पक्षातील बड्या बड्या आसामींपुढे नाचावे लागतेच. पण शिवाय काही कल्पित 'कथा' (म्हणजे गटबाजीच्या, कटबाजीच्या वा भ्रष्टाचाराच्या अफवा !) सांगून बड्या नेत्यांत 'कली'चा संचार करविणे, त्यांच्यात कलह माजविणे, हे या नृत्याचे विशेष लक्षण.

राजकीय मोहिनी-अट्टम्– भस्मासुर मोहिनीची कथा सुप्रसिद्धच आहे. त्या कथेतील तत्त्वावर हे राजकीय नृत्य बसविले आहे. कधी कनकाचा तर कधी कांतेचा प्रयोग करून,राजकीय उच्चपदस्थाला मोहजालात फसविणे हे ह्या नृत्याचे खरे वैशिष्ट्य.

कोल्हांट-उड्डानम्– हा राजकीय नृत्यप्रकार फार अवघड असला तरी फार आवश्यक आहे. घटकोघटकी कोलांटी उडी मारून आपली भूमिका बदलणे, एका नेत्याची सोयरीक सोडून दुसऱ्याशी नाते जोडणे; सत्तालोलुप पक्षांतर करणे इत्यादींचा समावेश ह्या नृत्यात होतो. पटापट मुखवटे बदलण्याला ह्यात विशेष महत्त्व आहे. गिरक्या तर बेमालूम माराव्या लागतात.

अशा अनेक राजकीय नृत्यप्रकारांत जो पूर्णतः पारंगत झाला तोच सर्वांत महत्त्वाचे राजकीय नृत्य करू शकतो. त्याला म्हणतात–

सत्ता-तांडवम्– हातात अग्नी घेऊन व बळीला पायदळी तुडवून श्रीनटराजांनी जे सुप्रसिद्ध 'तांडव' केले, त्यावरूनच या राजकीय नृत्याची 'आयडिया' सुचली असावी ! ह्या नृत्यात सत्ताधीश राजकारणी विधायक पवित्रा सोडून विध्वंसक पवित्रा घेतो. स्व-पक्षातील विरोधही त्याला सहन होत नाही. त्याला तो पायदळी तुडवितो. मात्र ह्या वेळी उच्च तत्त्वांचा व बुलंद घोषणांचा डमरू वाजविण्यास तो चुकत नाही.

— बोल, तुर्कस्तानी नर्तिके ! ही अशी नृत्ये ३१ सेकंद करण्याची तरी तुझी छाती आहे काय ? मग नृत्यविक्रमाचा गर्व कशाला करितेस ?

□

॥ ४५ ॥

## 'मरणान्तानि वैराणि ? ?'

*१९ सप्टेंबर १९७६*

लंकापती रावण मरण पावल्यानंतर, त्याचे घोर अपराध, त्याची पातके जणू विसरून जाऊन उदारचरित प्रभू रामचंद्रांनी बिभीषणाला आज्ञा केली- "क्रियताम् अस्य संस्कारः । ह्याचे यथासांग अंत्यसंस्कार करा. आता हा जसा तुझा तसाच माझाही झाला ! कारण, माणसाच्या मरणाबरोबरच त्याचे वैरही मरण पावते, समाप्त होते, 'मरणान्तानि वैराणि !. . ." प्राचीन भारताच्या उच्च संस्कृतीचे निदर्शक असे हे राम-वचन आहे. हाडवैऱ्याचे वैर, त्याची हाडे मातीत मिळताच विसरून जायला हाडीमांसी समंजस सहिष्णु नि दिलदार संस्कृती मुरावी लागते ! प्राचीन थोर भारतीयांनी ती अनेकदा आचरली आहे. . . (परंतु, ह्या उदात्त सांस्कृतिक मूल्याचा अतिरेकही आधुनिक भारतात कित्येकदा होतो, हे 'मेल्या म्हशीला दूध फार' या म्हणीवरूनही सहज सिद्ध व्हावे. ज्या थोर पुरुषांशी जन्मभर वैर केले, त्यांची घोर उपेक्षा केली, त्यांच्या मृत्यूनंतर स्मशानसभा, दुखवट्याच्या सभा, मृत्युलेख, रेडिओ-दूरचित्रवाणीवरील वाणी-विलास ह्यांची अशी काही गर्दी उसळते की, पूछो मत ! मग आयुष्यभर ज्याला निंदेचे गोफणगोटे मारले त्याच्यावर अतिरेकी स्तुति-सुमनांची बरसात होते; तो 'प्रतिभा-संपन्न' ठरतो, 'युगप्रवर्तक' ठरतो, इतकेच नव्हे, तर त्याच्या दोषांनाही सद्‌गुणांचा मुलामा लाभतो ! अस्तु). . . 'मरणान्तानि वैराणि' ह्या उच्च सिद्धांतालाही मर्यादा आहेतच. कारण जर वैर व्यक्तिगत नसेल तर ते व्यक्तीच्या निधनाने संपुष्टात येणे शक्य नसते. विशिष्ट विचार-प्रणालीचे प्रतीक बनलेली व्यक्ती मरण पावल्यानंतर वैराची धार काही प्रमाणात बोथट होईल इतकेच. पण त्या विचारधारेशी असलेले वैर सहजगत्या समाप्त होणार नाही. तथापि, ही मर्यादा लक्षात

घेऊनही 'मरणान्तानी वैराणि' या सुसंस्कृत जीवन-मूल्याचे महत्त्व कमी ठरत नाही.

विशेषतः विरोधक निधन पावल्यानंतरही त्याची द्वेषांध विटंबना करणाऱ्या काही सुलतानांच्या पार्श्वभूमीवर हे मूल्य अधिकच उजळून निघते. वैचारिक विरोध कायम ठेवूनही माणसाची महत्ता गौरविता येते, हे द्वेषाने– सूडभावनेने– खदखदलेले रानटी मन जाणू शकत नाही. आणि म्हणूनच काही मदांध महाभागांनी वैऱ्यांना थडग्यातून बाहेर काढून त्यांची विटंबना केली आहे; मृत व्यक्तींच्या घरादारांवरून गाढवाचा नांगर फिरविला आहे; त्यांच्या स्त्रियांना आपल्या जनानखान्यात लोटून 'भोगदासी'बनविले आहे. . . अशी असंस्कृत उदाहरणे मध्ययुगीन सुलतानशाहीतच आढळतात असे नाही, तर आधुनिक काळातही आढळतात. क्रुश्चेव्ह सत्तेच्या सिंहासनावर चढल्यानंतर क्रूर-कठोर ख्रिस्तवासी स्तालिनचे जे मूर्तिभंजन नि जाहीर विडंबन झाले, ते आठवणीत आणा म्हणजे झाले. लेनिनच्या बाजूसच सन्मानपूर्वक चिरनिद्रा घेत असलेल्या त्या स्तालिनला तेथून हुसकण्यात आले; चौका-चौकातले त्याचे पुतळे उखडण्यात आले ! यमदूतांनी आधीच जगत्पटावरून हद्दपार केलेला स्तालिन स्मृतिपटावरूनही हाकलण्याचा खटाटोप झाला !

मृत्यूनंतरही विरोध नि वैर न विसरण्याचा, कटुता न सोडण्याचा, मासला अर्वाचीन चीनचा सुलतान माओ त्से तुंग ह्याच्या निधनानंतरही जगाला दिसला. आपल्या देशकालपरिस्थितीनुसार मार्क्सवादाचा वेगळा अन्वय-अर्थ लावून का होईना, कम्युनिझमचा लाल बावटा आशिया खंडात प्रथमतः उंच उभारणारा हा आधुनिक चीनचा राष्ट्रपिता ! 'चीन'ला जगताच्या राष्ट्रमालिकेत प्रथम श्रेणीत नेऊन ठेवणारा हा समर्थ कर्तबगार महापुरुष !. . . त्याच्याशी असलेले तात्त्विक मतभेद बाजूस ठेवून, त्याचे मुक्तकंठाने गुणगान रशियाला करता आले नसते काय ? पण नाही. माओची निधनवार्ता मास्कोच्या वृत्तपत्रांनी व आकाशवाणीने अवघ्या १-२ वाक्यात उडविली ! (अरे लेको, 'वर्णने किं दरिद्रता ?' हा सिद्धांत भारतीय वृत्तपत्रांपासून वा नभोवाणीपासून शिका !) हे मानसिक कृपणत्व चीनच्या मनाला कृपाणाप्रमाणे बोचले. . . मग चीनही अनुदारतेत नि असहिष्णुपणात काही कमी नाही, हे दिसून आले. आपल्या रशियन भाईंचा शोक-संदेश (कंडोलन्स मेसेज) त्याने ताबडतोब फेटाळला.

ही निधनोत्तर असहिष्णू अनुदारता केवळ हुकूमशाही राजवटीतच आढळते असे नाही, तर उर्दू गजलांच्या प्रणयोद्यानातही आढळते. कैक निष्ठुर प्रेयसी निष्ठावंत प्रियकरांना आयुष्यभर छळून त्यांना बरबाद तर करतातच, पण त्यांच्या बरबादीनंतरही त्या जराही हळहळत नाहीत. आपल्या प्रेमापायी कुर्बान झालेल्या प्रेमवीरांखातर अश्रू ढाळणे दूरच राहिले, एखादा ठरीव ठशाचा दुखवट्याचा ठरावही पास करीत नाहीत ! उलटपक्षी, आशिकाच्या प्रतिस्पर्ध्याबरोबर ज्या पुष्पशय्येवर रतिरंग केला, तिच्यातीलच २-४

चुरगळलेली फुले त्याच्या थडग्यावर वाहून त्या संगदिल सुंदरी त्याला निधनोत्तर वेदना देतात ! काही निष्ठुर नारी तर प्रियकराच्या धुळकट थडग्यावर लाथ हाणतात आणि मग—

*गर्द उडी आशिक की तुरबत से*
*तो झुंझलाकर कहा–*
*"वाह ! सर चढने लगी*
*पाँवो की ठुकराई हुई ॥"*

(आशिकाच्या थडग्यावरील पदप्रहाराने धूळ उडताच त्या झणकाऱ्याने म्हणतात- 'वा रे बेअदबी ! पायदळी तुडविलेली ह्याची धूळ मस्तकी चढू लागली तर !')

□

॥ ४६ ॥

## रा. स्व. संघाचे अग्निदिव्य !

*२७ मार्च १९७७*

*कालागरुः दहन-मध्यगतो समन्तात्*
*लोकोत्तरं परिमलं प्रकटीकरोति ॥*

अनेक आपत्तींचे प्रहार झेलीत, सतत ५३ वर्षे प्रतिपदेच्या चंद्रलेखेप्रमाणे वाढत गेलेली राष्ट्रीय स्वयंसेवक संघासारखी संघटना, भारतात तरी दुसरी नाही. सारे आयुष्य अर्पण केलेले हजारो कार्यकर्ते आणि सुमारे १० लक्ष प्रतिज्ञाबद्ध स्वयंसेवक ह्यांची ही प्रचंड संघटना! १९२५ साली डॉ. केशव बळीराम हेडगेवार ह्या प्रतिभाशाली संघटकाने नि बावन्नकशी देशभक्ताने हिचे बीजारोपण केले आणि आज ती एखाद्या बळकट अश्वत्थ-वृक्षाप्रमाणे काश्मीर ते कन्याकुमारीपर्यंत विस्तारली आहे. ही एवढी का रुजली, का विस्तारली?— हिटलरच्या युवक संघटनेचे तिने अनुकरण केले म्हणून? नाही. ह्या भूमीशी नि तिच्या उज्ज्वल परंपरांशी इमान राखणाऱ्या स्वतंत्र कार्यपद्धतीचे तिने अनुसरण केले म्हणून! डॉ. हेडगेवार, गुरुजी गोळवलकर नि आता बाळासाहेब देवरस ह्या तीन चारित्र्यसंपन्न त्यागमूर्तींच्या नेतृत्वाखाली तिच्या बाह्य स्वरूपात (खरे पुसाल तर वाजवीहून जास्त मंदगतीने—) बदल होत गेले; पण 'शुद्ध चारित्र्य, शिस्त, देशभक्ती ह्यांचे तरुण मनावर प्रतिदिन संस्कार करणारे अखिल भारतीय विद्यापीठ— ओपन एअर युनिव्हर्सिटी—' ह्या स्वरूपात कधीच बदल झाला नाही! ह्याच संस्कारकार्यक्रमाला प्राथम्य दिल्यामुळेच तर ती दैनंदिन सत्ता-राजकारणापासून अलग राहिली; कैक सामाजिक कार्यांपासूनही दूर राहिली (इतकी की तिच्यावर स्व-जनांनीही शहामृगी वृत्तीचा आरोप करावा!). . . आणि मग सत्ता-राजकारणातही प्रवेश करण्याची

वेळ आली आहे, असे वाटणाऱ्या कार्यकर्त्यांनी, डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जींच्या नेतृत्त्वाखाली 'जनसंघ' स्थापन केला. म्हणूनच ज्या अर्थाने जनसंघ हा आज जनता पक्षाचा कणा ठरतो, त्याच अर्थाने रा. स्व. संघ जनसंघाचा कणा ठरला !

रा. स्व. संघाचे हे स्वरूप सरदार वल्लभभाई पटेल, लालबहादुर शास्त्री, द्वारकाप्रसाद मिश्र, रविशंकर शुक्ल इत्यादी अनेक वस्तुनिष्ठ विचारांच्या काँग्रेस-नेत्यांनी जाणले होते. संघ-स्वयंसेवकांचा 'देशभक्त' म्हणून जाहीर गौरवही त्यांनी केला ! परंतु आधी नेहरूंच्या नि नंतर इंदिराजींच्या भोवती रुंजी घालणाऱ्या तथाकथित पुरोगाम्यांनी– सुभद्रा जोशी, शशिभूषण इत्यादींनी– ह्या शक्तिशाली युवक संघटनेच्या कपाळावर 'प्रतिगामी,' 'हिंसाचारी,' 'फॅसिस्ट,' 'जातीयवादी' अशा ठोकळेबाज नि धूर्त लांछन-मुद्रा ठोकल्या. म्हणूनच, संघाला दोन बंद्या नि दोन सत्याग्रह-आंदोलने ह्यांच्या कडक अग्निदिव्यातून जावे लागले. पहिले अग्निदिव्य गांधीवधोत्तर काळात घडले, दुसरे आणीबाणीपर्वात. ह्या दुसऱ्या अग्निदिव्यातून आता ही संघटना बाहेर पडली आणि तरीही तिच्या सरसंघचालकांचे प्रसन्न उमदे व्यक्तिमत्त्व जराही करपले नाही, हे विशेष. 'बॉम्बे युनियन ऑफ जर्नालिस्ट' तर्फे आयोजिलेल्या वार्तालापात सरसंघचालक बाळासाहेबांनी 'तुरुंगातील लोकांच्या कुटुंबियांचे कसे हाल झाले, त्यांच्यामागे पोलिसी चौकशांचा ससेमिरा कसा लागला, डी. ए. व्ही. पी. च्या माध्यमातून संघावर गलिच्छ आरोपांची राळ कशी उडविण्यात आली' इत्यादी व्यथा सांगत असतानाच– 'महाराष्ट्र शासनाकडून तुरुंगातील राजबंद्यांचा छळ एकंदरीत झाला नाही' अशी प्रांजळ कबुलीही दिली. उमदेपणा तो हाच ! एखाद्या असंस्कृत चळवळ्याने अशी दिलदारी दाखविली नसती ! आणीबाणीच्या काळात संघाच्या १ लक्ष कार्यकर्त्यांना तुरुंगवास घडला आणि त्यातील ७०-८० कार्यकर्ते तुरुंगात मरण पावले, ह्यामुळे तीव्र कटुताच व्यक्त होणे स्वाभाविक ठरले असते. पण बाळासाहेब देवरस सस्मित मुद्रेने उद्गारले– "जिच्यामुळे संघेतर राजबंद्यांशी प्रदीर्घ विचारविनिमय तुरुंगात घडला; परस्परांविषयीचे कैक गैरसमज दूर झाले; संघ-स्वयंसेवकांची हिंमत प्रगट झाली; त्या बंदीला एक प्रकारे इष्टापत्तीच म्हटले पाहिजे !". . . आपत्तींनाही इष्टापत्ती मानणे, सत्त्वपरीक्षा मानणे, हेच थोरपणाचे चिन्ह होय. ह्या आपत्काळच्या होमकुंडातच सत्त्व नि सद्गुण उजळून निघतात ! म्हणूनच– 'जाळु पाहता जळे कोळसा, उजळे सोने विसरू नको' असा उपदेश सुभाषितकारांनी केला आहे ! आगीत पडल्याखेरीज चंदनाचा लोकोत्तर सुगंध दशदिशात दरवळत नाही ! सहाणेच्या दगडावर घासल्याविना, अथवा भट्टीत तापवून घणाचे घाव घातल्याविना, शस्त्राला धार चढत नाही ! फुले उकळून काढल्याशिवाय सुगंधित अत्तर तयार होत नाही ! कठोर फाळांनी नांगरल्याशिवाय, अथवा जाळल्याखेरीज, जमीन भरपूर

पीक देत नाही ! यःकश्चित मडकेदेखील अग्निनारायणाने भाजून काढल्याखेरीज पक्के होत नसते !. . . आपत्तीच्या अग्निदिव्याचा मुख्य गुण हाच की ते कठोर आत्म-परीक्षणास उद्युक्त करते; खडतर परिस्थितीची— वास्तवाच्या विस्तवाची— जाणीव देते. आपत्तीच्या अग्नि-परीक्षेने कच्च्या दिलाची माणसं वा संस्था हतबल नि कडवट होतात, तर सच्च्या दिलाची माणसे वा संघटना प्रगत होतात, अशी इतिहासाची साक्ष आहे.

बाळासाहेब देवरसांच्या दिलखुलास 'वार्तालापा'ने असा आशावाद सूचित केला आहे की रा. स्व. संघाच्या कार्यकारिणीच्या येत्या बैठकीत प्रगतिपथावर पाऊल पडेल. साहजिकच आपल्या बलस्थानाप्रमाणे मर्मस्थानांचाही मूलगामी विचार संघाचे धुरीण करतील. 'संघ ही हिंदू फॅसिस्टांची जातीय संघटना' असा आरोप केवळ मुसलमानांना भयत्रस्त ठेवण्यासाठी काँग्रेसजन राजकीय 'मत'लबासाठीच करीत होते, असे मानले तरी, एकेकाळी खुद्द जयप्रकाश नारायण, साथी नानासाहेब गोरे, एस. एम. प्रभृती आदरणीय बिगरकाँग्रेस पुढारीही संघाबाबत तसाच समज का बाळगत होते? ह्या समजाला आपल्या कार्यपद्धतीतील काही अंगभूत दोष जबाबदार होते काय? आहेत काय? ह्या निवडणुकीत ज्या लोकशाही स्वातंत्र्याचा मंगल घोष दुमदुमला, त्याच्या संदर्भात संघाच्या अंतर्गत कार्यप्रणालीत काही बदल करावे लागतील काय? जे जे राष्ट्रव्यापी सर्वांगीण विकासाचे विधायक कार्यक्रम शासन पुढे ठेवील, त्यांत सहभागी होणे संघाला कितपत शक्य व आवश्यक आहे? अल्पसंख्यांचे— विशेषतः मुसलमानांचे— अनुनयन न करता, त्यांना कोणत्या प्रकारे राष्ट्रजीवनाशी एकात्म करता येईल? सत्ता-राजकारणापासून दूर राहूनही, (व स्वतःचे सांस्कृतिक संस्काराचे व्रत अबाधित ठेवून—) संघाचे व्यापक राजकारणाबाबत धोरण कोणते राहील— विशेषतः 'जनतापक्षा'शी? अशा अनेक प्रश्नांची निःसंदिग्ध उत्तरे रा. स्व. संघाच्या येत्या ३१ मार्चच्या कार्यकारिणीत निष्पन्न होतील अशी अपेक्षा आहे. तसे झाले तरच अग्निदिव्य पूर्णतः सार्थकी लागेल !

□

॥ ४७ ॥

# चव्हाणांचा 'संघ-फोबिया'

*४ डिसेंबर १९७७*

थोर महापुरुष नि महात्मे कोणत्याही जातीत-देशात वा पक्षात जन्म घेवोत, ते त्या जातीच्या, देशाच्या वा पंथाच्या मर्यादा उल्लंघून सार्वत्रिक होतात; अखिल मानव-जातीचे होतात. जे कोणी त्यांच्या चरित्रांतून स्फूर्ती वा उपदेश घेण्याचा प्रयत्न करतील, (मग ते काही बाबतींत भिन्न मताचे का असेनात), त्यांना हे मानवी दीप-स्तंभ प्रकाश नाकारीत नाहीत ! 'गाईची तृष्णा हरू । व्याघ्रा विष होऊन मारू' अशी तामसी भेदबुद्धी जशी गंगाजलाच्या ठायी संभवत नाही, तशीच ती या महामानवांच्या ठायीही निर्माण होत नाही ! लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, सुभाषचंद्र बोस, महात्मा फुले, डॉ. आंबेडकर, स्वातंत्र्यवीर सावरकर, डॉ. हेडगेवार इत्यादी थोर भारतीय रत्नांची कोणत्याही एखाद्या पक्षाला वा जमातीला किंवा प्रदेशाला मक्तेदारी घेता येणार नाही.

हे साधे सत्य आपल्या यशवंतराव चव्हाणांना कळत नसेल काय ? — कळत असलेच पाहिजे. तर मग, गांधीजींचे थोर सर्वोदयी वारसदार श्री. जयप्रकाश नारायण ह्यांनी जनता पक्षाला जो काही गांधीवादी स्पर्श दिला आहे, त्याचे त्यांना वैषम्य वाटावयास नको. जनता पक्ष काही गांधीप्रणित विचार वा आचार अमलात आणण्याचा प्रयत्न करीत असेल, 'गांधीयन् बेस ॲन्ड ॲप्रोच' स्वीकारीत असेल, तर 'सच्चा काँग्रेसवाला' ह्या नात्याने यशवंतरावांना आनंदच व्हायला हवा. परंतु, हाय रे नशिबा ! महाराष्ट्र काँग्रेसमधील ह्या सर्वांत बुद्धिमान नि चतुर नेत्याला 'जनता पक्ष गांधींच्या पुण्याईचे शोषण (एक्सप्लॉयटेशन) करीत आहे; गांधीजींच्या नावाचा गैरवापर करीत आहे' असे वाटते. अलीकडेच पुण्यनगरीत काँग्रेस कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात त्यांनी दिलेल्या वादळी व्याख्यानात... (वादळी व्याख्यान म्हणजे

जोरदार व्याख्यान ! आंध्रप्रदेशात मृत्यूचे नि मालमत्ताहानीचे महाभीषण थैमान घालणाऱ्या आणि तेथील काँग्रेस-शासनाच्या गलथान कारभाराच्या चिरफळ्या उडविणाऱ्या वादळाशी ह्या व्याख्यानाचा संबंध नाही !)... यशवंतराव चव्हाणांनी जनता-पक्षकृत गांधीपुण्याईच्या गैरवापराचा एक किस्सा सुनावला. किस्सा असा : दिल्ली येथे मेणबत्तीच्या एका जाहिरातीत, तेवत असलेल्या मेणबत्तीला रा. स्व. संघाचे संस्थापक डॉ. हेडगेवार आशीर्वाद देताहेत अन् त्यांच्यामागे महात्मा गांधी उभे राहून (दीप ज्योतीला) आर. एस. एस. स्टाइल प्रणाम करताहेत, असे दृश्य दाखविले होते... हा किस्सा व्यापारी वर्गाचे चातुर्य प्रकट करीत असेल, पण जनता पक्षाच्या गांधीयन गैरवापराशी ह्याचा संबंध काय ? महाराष्ट्रात शिवाजी छाप बिडी, संभाजी छाप-बिडी, सुभाष चुना इत्यादी वस्तू आहेत ना, त्याच जातीचा हा व्यापारी दिल्लीशाही प्रकार ! थोर पुरुषांची नावे वा चित्रे व्यापारी हेतूने वापरू नयेत, हा दंडक कित्येक व्यापारी पाळत नाहीत. दिल्लीच्या त्या मेणबत्तीवाल्यानेही हा पाळला नसेल... पण जनता पक्षाने गांधीजींच्या पुण्याईचा गैरवापर चालविला आहे, असे अनुमान ह्यावरून काढता येईल काय ? पण यशवंतरावजींनी हे अनुमान काढले आहे. म्हणूनच म्हणावेसे वाटते की, जे न देखे योगी संत, ते देखे यशवंत ! कदाचित, रा. स्व. संघसंस्थापक डॉ. हेडगेवारांचे महात्मा गांधींना घडलेले चित्रातले साहचर्य साहेबांना खटकले असेल— कारण 'आधुनिक चातुर्वर्ण्यात हा बाडगा 'भ्रष्टाकार' बसत नाही ! शिवाय, महात्माजींनी काँग्रेस-स्टाईल 'नमस्ते' सोडून, संघ-स्टाईल प्रणाम करावा म्हणजेदेखील केवढे अब्रह्मण्यम् ! त्याऐवजी 'सेक्युलर' सलाम-मुजरा वा सॅल्यूट केला असता तर हरकत नव्हती ? ?

आमच्या मान्यवर यशवंतरावांना अलीकडे काय झाले आहे, हेच कळत नाही. यशवंतराव हे झापड लावलेले काँग्रेस-पुंगव नव्हेत, तर विस्तृत वाचन नि अवलोकन केलेले; महाराष्ट्राच्या बुद्धिवादी डोळस परंपरेतही काही काळ रुळलेले अनुभवी नेते आहेत. गेल्या लोकसभा-निवडणुकीपासून ह्या बुद्धिमंत नेत्याला 'आर. एस. एस.— फोबिया' झालेला दिसतो. एरवी, त्यांनी आपल्या 'प्लेग-उंदीर-फेम' व्याख्यानात पुनश्च 'आर. एस. एस. म्हणजेच जनसंघ नि जनसंघ म्हणजे जनतापक्ष' हे आता कंटाळवाणे झालेले तुणतुणे वाजविलेच नसते. आणि एका जाहिरातीतील चित्रातून गांधी-पुण्याई-शोषणाचा अफलातून शोध लावला नसता ! प्रस्तुत जाहिरातचित्रात डॉ. हेडगेवार नि महात्मा गांधी एकाच पंक्तीत बसविल्याबद्दल चव्हाणांना 'अ-काँग्रेसम्' वाटणे साहजिकच आहे; पण राग येण्याचे कारण नाही. कारण, डॉक्टर हेडगेवार १९३० साली आपल्या हजारो सहकाऱ्यांसह गांधीजींच्या हाकेला ओ देऊन तुरुंगात गेले होते. त्यांचे गांधीजींशी काही मतभेद असूनही जिव्हाळ्याचे संबंध होते. म्हणूनच वर्धा जिल्ह्याच्या 'आर. एस. एस. कॅम्प' मध्ये महात्माजी आले होते. फार काय सांगावे, फाळणीपूर्व काळात दिल्लीच्या भंगी कॉलनी संघशाखेला गांधीजींनी

आपण होऊन भेट दिली होती. आर. एस. एस. च्या अनेक अधिकारी शिक्षण वर्गात सावरकरांच्या ग्रंथातील उताऱ्याप्रमाणेच गांधी-ग्रंथातील उतारेही पाठांतरासाठी देण्यात येत होते. 'हरिजन-ब्राह्मण संघ-छावणीत एकत्र जेवतात, भावाभावासारखे वागतात' ह्याची प्रशंसा पक्षातीत दृष्टी असलेल्या गांधीजींनी केली होती.

बरे, तेही असो. गांधीजींच्या नावाचा, पुण्याईचा किती भयावह गैरवापर काँग्रेसजनांनी गेल्या ३० वर्षांत केला आहे, ह्याची मोजदाद माननीय यशवंतरावांनी केली आहे काय ? गांधीजींची साधी राहणी; गांधीजींनी प्रतिपादिलेले गीतेतील अ-परिग्रहाचे नि अहिंसेचे तत्त्व; गांधीजींनी पुरस्कारलेली साधनांची शुचिता काँग्रेसजनांनी १० टक्के जरी स्वीकारली असती तरी काँग्रेसशासनात भ्रष्टाचाराचे महामेरू उभेच राहिले नसते ! पण हे लक्षात न घेता, यशवंतराव गांधी-तत्त्वज्ञानाचे 'मोनापली राइटस्' काँग्रेससाठीच राखून ठेवीत आहेत काय ? यशवंतराव काहीही म्हणोत, गांधीजींना प्रिय असलेली समाजसेवाभावी वृत्ती रा. स्व. संघाच्या स्वयंसेवकांनी अनेकदा दाखविली आहे हे त्यांच्या विरोधकांनाही मान्य करावे लागेल. फाळणीच्या वेळी बंगाल नि पंजाब येथील मृत्यूच्या जबड्यात स्वतःला झोकून देऊन संघ-स्वयंसेवकांनी जी निर्वासितांची सेवा केली, तिजबद्दल यशवंतरावांहून अधिक गांधीभक्त असलेल्या सरदार पटेलांनी जाहीर प्रशंसोद्गार काढले आहेत. सरदार पटेलांनी त्यांना 'रावण' म्हटले नाही; 'देशभक्त' म्हटले आहे !...

इतक्या दूरचे उदारहण तरी कशाला? आंध्र-तामिळनाडूमध्ये प्रलयंकर वादळाने हाहाःकार उडविला असताना; त्या प्रदेशातील बडेबडे मंत्री हताश नि हवालदिल झाले असताना, राजकारणी महाभाग आरोप-प्रत्यारोपात मशगुल झाले असताना, रा. स्व. संघाचे शेकडो स्वयंसेवक त्या विपद्ग्रस्त टापूत प्रथमतः जाऊन पोहोचले. महात्मा गांधींना प्रिय असलेल्या भंगीकामापासून ते अन्नधान्य-पुरवठ्याच्या कामापर्यंत सर्व प्रकारची कामे करण्यात मग्न झाले. 'समाचार'चे वृत्त आहे की— 'माजी पंतप्रधान इंदिरा गांधी ह्यांनी आंध्रच्या वादळग्रस्त भागाला, अनेक सन्माननीय व्यक्तींसह भेट दिली. त्या वेळी त्यांनी जे दृश्य पाहिले ते त्या सर्वांना आश्चर्यकारकच वाटले असेल ! तेथे फक्त राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक अवघड मदतकार्य करीत होते. माणसांची नि गुराढोरांची कुजलेली प्रेते पुरण्याचे जिकीरीचे काम करीत होते. काँग्रेस सेवादलाचे लोक सुरक्षित स्थळीच कार्य करीत असल्याचे एका युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्याने सांगितले. तो म्हणाला, "आमचे लोक ह्या बिकट स्थळी, बिकट कामात नाहीत, हे पाहून लाज वाटली."

— त्या युवक काँग्रेस-नेत्याला आमच्या मान्यवरांप्रमाणे 'संघफोबिया' झालेला नाही, ही समाधानाची गोष्ट आहे !

□

॥ ४८ ॥

# पाहिजे, फटाकडी पाहिजे !

*२३ डिसेंबर १९७७*

महाकवी 'दण्डी'च्या 'दशकुमारचरितां'तील यौवनमत्त राजकुमारांच्या पिसाट काम-क्रीडा आपण वाचल्या असतील. गुलाबी तरुणी नि गुलाबी वारुणी ह्यांच्या कैफात बेबंद रंगलेल्या मोगल-शाहजाद्यांच्या बे-लगाम काम-कथा आपण वाचल्या असतील. सुरा आणि सुंदरी ह्यांच्याखातर खतरनाक धुडगूस घालणाऱ्या जवान नवाबजाद्यांच्या नि संस्थानिकपुत्रांच्या उन्मत्त कहाण्या आपणांस ठाऊक असतील आणि म्हणूनच आपल्या मुखातून एक त्रिकालाबाधित सुभाषित सहज प्रकटले असेल–

*यौवनं, धन-संपत्तिः,*<br>
*प्रभुत्वं, अविवेकिता ।*<br>
*एकैकमप्यनर्थाय*<br>
*किमु यत्र चतुष्टयम् ? ॥*

तारुण्य, धन-संपदा, सत्ता आणि अविचार ह्या चौकडीपैकी कोणत्याही एका गोष्टीच्या अमर्यादिने अनर्थ ओढवतो. मग ह्या चारीही गोष्टी एकत्र आल्यास केवढी प्रचंड आपत्ती कोसळेल ? हे सुभाषित केवळ राजेशाहीत वा सरंजामशाहीतच खरे होते, असे नाही. 'न्याय-नीती', 'सामाजिक समता', 'साधनांची शुचिता' इत्यादी उच्च तत्त्वांचा जयघोष करणाऱ्या ह्या लोकशाही समाजवादी युगातही ते तेवढेच खरे आहे. 'रुक्सानाफेम', इंदिरा-कुलदीप मेनकापती संजयमहाराज ह्यांच्या अनेक कहाण्यांवरून जवानी, धनदौलत नि निरंकुश सत्ता ह्याचे मिश्रण केवढे प्रमादशील होऊ शकते, ह्याची कल्पना आपणांस आलीच आहे !. . . पण एकट्या संजयजींच्याच नावाने एवढा बोभाटा

कशाला? प्रांतोप्रांतीच्या सत्ताधीश सधन काँग्रेसवाल्यांच्या तरुण पोरांनी काही कमी पराक्रम गाजविले नाहीत! जनता-सरकारच्या 'चौकशी सत्रा'तून ह्या तरण्याबांड श्रीमंत काँग्रेसजनांच्या 'माजवादी' यौवन-लीलाही सुटणार नाहीत, असे दिसते. एका माजी काँग्रेसी मुख्यमंत्र्याच्या कुलदीपकाने सत्ता-संपत्तीच्या नि जवानीच्या धुंदीत जे रंगीन दिवे पाजळले त्यांची कहाणी एका विख्यात इंग्रजी वृत्तपत्रातून नि हिंदी वृत्तपत्रातून प्रकट झाली आहे. महात्मा गौतम बुद्धांच्या एका नावाने पुनीत झालेल्या ह्या असत्य-पथी चिरंजिवांनी आपली पुण्यपावन दैनंदिनी (डायरी) लिहून ठेवली होती. ती जनता-सरकारने घातलेल्या एका धाडीत पोलिसांना हस्तगत झाली. तिचाच काही निवडक भाग उत्तर-भारतीय वृत्तपत्रांतून प्रकाशित झाला आहे. मोठी उद्बोधक नि मनोरंजक आहे ही डायरी! ह्या डायरीत बड्या बड्या राजकीय पुढाऱ्यांचे (अर्थात काँग्रेसजनांचे), काही गुंडपुंड मस्ताना लोकांचे, भाडोत्री मवाली-सेनेशी संबंध ठेवल्याचे उल्लेख तर आहेतच; शिवाय ठायीठायी संपन्न झालेल्या मदिरा-पानांचे नि मदन-महोत्सवांचेही उल्लेख आहेत. १९७४-७५ सालातील काही रंगेल नोंदी पहा—

'४ सप्टेंबर : बरहामपूर गया। क्या अच्छी जगह है। ढेरों लडकियाँ।'

'५ एप्रिल : अय्यर के घर गया और मीरा से मिला। भरपूर छातियोंवाली खूबसूरत छोकरी है।'

'२३ एप्रिल : जल्दी ही कोई छोकरी मिलनी चाहिये। एक अच्छी छोकरी मिलनीही चाहिये। मदद करो हे माँ।' (लवकरात लवकर एखादी सुंदर तरुणी मिळालीच पाहिजे. आई जगदंबे, भुवनेश्वरी, सहाय्य कर!!)

'९ मे : नैना के साथ ओबेराय शेरटन गया। मुगल कक्ष मे बिअर पी और..'

'१६ मे : स्वीटी और डी. सी. से. प्रेसिडन्ट हॉटेलमे मिला। व्हिस्की पी। 'स्वीटी'ने शमी को बुलाया-एक छोकरी जो फिल्म में नाचती है। जोरदार थी।'

'२२ मे : बंबई मे एक पटाखा छोकरी (फटाकडी) चाहिये माँ।'

'२ जून : नीला नाम की छोकरी से मिला।'

'३ सप्टेंबर : अशोका में खाना खाया। बंबई से हशीश लाया। दिल्ली में 'भाभी' के साथ कश लगाये।'

'२८ डिसेंबर : रात को त्रिलोकिनी के साथ बिअर और हशीश पी।'

## जगदंबेला साकडे

जनताजनार्दनाला शिस्तीचे, त्यागाचे, साध्या राहणीचे नि उच्च विचारसरणीचे पाठ व्यासपीठावरून देणाऱ्या श्रीमंत सत्ताधाऱ्यांची ही जवान पोरे!... मदिरा नि मदिराक्षींच्या

पाठलागात जवानीचे सार्थक मानणारे हे ध्येयशून्य युवक-नेते ! व्यासपीठावरून हे दिवटे चिरंजीव खुशाल सदाचार बोलोत; चार भिंतींच्या आड आलिशान हॉटेलात ह्यांची अनंग-दंगल अबाधित चालूच असायची ! ज्या वयात स्वातंत्र्यवीर सावरकर, मदनलाल धिंग्रा, कान्हेरे, भगतसिंग, चंद्रशेखर आझाद इत्यादी नरवीर भारतमातेला वा दुर्गादेवीला क्रांतीची शस्त्रास्त्रे मागत होते, त्याच वयात ही सधन सत्ताधारी-जनांची कुलांगार कार्टी 'एक अच्छी छोकरी मिलनीही चाहिये' असे साकडे जगदंबेला घालीत असताना दृष्टीस पडतात ! त्यांना ध्यास एकच—'जोरदार छोकरी'चा; 'पटाखा छोकरी'चा; भरपूर छातीवाल्या फटाकडीचा ! त्यांचे नेते संजयजी नि नेत्या इंदिराजी तिकडे 'गरिबी हटाव'च्या गर्जना करीत असताना ह्या विषय-कीटक युवकांचा नारा एकच— 'छोकरी पटाव ! 'फर्माइश एकच—' पाहिजेत, पोरी पाहिजेत ! तटतटलेल्या कंचुकीचे लज्जावरण सोडून ज्यांचे निलाजरे काम-कंदुक बाहेर उसळी मारू पाहताहेत, अशा देखण्या पोरी पाहिजेत ! 'ज्यांची रसरसलेली गात्रे अधिक मादक की त्यांच्या हातांतील मद्यपात्रे अधिक उन्मादक' असा संभ्रम पाडणाऱ्या टंच पोरी पाहिजेत ! रंगतदार मुखड्याच्या, डेरेदार-अणकुचीदार उरोजांच्या, वर्तुळाकार नितंबाच्या जोरदार फटाकड्या युवती पाहिजेत ! भरपूर मदिरा पिऊन गाठी सोडणाऱ्या नि हशीश ओढून मिठी मारणाऱ्या, आणि—

*आता है साथ लेके*
*मुहब्बत की आफतें ।*
*जाता है जान लेके*
*जमाना शबाब का ॥*

अशा जोरदार शबाबाने— तारुण्याने— आधुनिक नबाबजाद्यांच्या दिलाचा कबाब करणाऱ्या पोरी पाहिजेत ! स्वतःच्या चंचल डोळ्यांत काजळ घालून ह्या सत्ताधीशांच्या संपत्तीमान चिरंजीवांच्या डोळ्यांत खोट्या इश्काची धूळ फेकणाऱ्या मदनिका पाहिजेत !..

### भरकटलेली जहाजे

ही अशी तृष्णा सत्ताधीश करोडोपतींच्या तरुण पोरांत का न निर्माण व्हावी ? 'आराम हराम है' अशा घोषणा देत ज्यांनी लक्ष लक्ष रुपयांचे गैरव्यवहार केले, त्यांच्या पैशावर— (हरामाच्या पैशावर)— विषयलंपट आरामाची इमारत का न उभी राहावी ? ज्यांनी आपल्या जन्मदात्यांची सत्ता-संपत्तीलोलुप चालबाजी जवळून पाहिली, त्या उद्दाम तरुणांच्या दिलात ही अशी उल्लू इश्कबाजी का न पैदा व्हावी ? कोणतेही ध्येयवादीत्वाचे सुकाणू नसलेले जवानीचे जहाज अखेर विषयवासनेच्या दर्यात

श्रीमंतीच्या शिडांसह भरकटतच जायचे !. . . . पण त्या माजी मुख्यमंत्र्यांच्या तारुण्यमत्त पोरालाच का हसावे? आमच्या समाजातील सुखवस्तू उच्चमध्यमवर्गीय नौजवानातदेखील धन-यौवनाची अशीच उधळपट्टी आढळत नाही काय?...

## दोष हा कुणाचा?

हा दोष केवळ जवानीचा नाही की धनसंपदेचा नाही. सत्ताधारी पुढारीवर्गाने निर्माण केलेल्या नैतिक मूल्यांच्या अधःपतनाचा हा दोष आहे. राजवैभवात लोळत असलेला सिद्धार्थ ऐन तारुण्यातही बहकत नाही, तर लक्षावधी दुःखितांना शाश्वत सुखाचा मार्ग दाखविणारा 'बुद्ध' होतो! श्रीमंत नि सत्ताधीश 'शहाजी राजां'चा छावा अव्वल जवानीतही इश्काच्या आडवाटेला जात नाही, तर हजारो युवकांना मर्दुमकीच्या वाटेने नेऊन स्वराज्याचे तोरण उभारतो!. . . परंतु, जेव्हा समाजातील कर्ता-सवरता वर्गच भ्रष्टाचारी अन् संस्कारशून्य होतो, तेव्हा यौवनाच्या अमृताचेही विष बनते!

□

॥ ४९ ॥

## सौभद्र आणि 'दळभद्र'

*९ एप्रिल १९७८*

ही बहुरूपी दुनिया बहुविधतेच्या शेकडो रंगांनी रंगलेली आहे. एकाच वेळी किती परस्पर-भिन्न घटना ह्या दुनियेत घडत असतात ! सारी दुनिया सोडाच; एखाद्या नगरातही एकाच समयी, अगदी भिन्न भिन्न गोष्टी होत असतात. एकीकडे मंगल विवाह समारंभाच्या सनईचे मंजुळ सूर, तर दुसरीकडे मयतीचा व्याकुळ आक्रोश— धाय मोकलून रडणे ! एखाद्या सभागृहात विद्वानांचा श्रवणीय परिसंवाद, तर सभागृहाबाहेरच अट्टल दारुड्यांचे कडाक्याचे भांडण ! बसच्या एकाच बाकावर एका बाजूस एखाद्या टंच युवतीच्या खूबसुरतीचा मौसमेबहार, तर दुसऱ्या बाजूस 'पिकलेले केस, पडलेले दात, अंधुकलेले डोळे, थकलेले वाकलेले शरीर' असे जख्खड वार्धक्य ! इतकी विषमता ठायी ठायी बघितल्यामुळे भर्तृहरीसारखा महापंडितदेखील बिचकून गेला आणि उद्गारला— "हा मानवी संसार अमृताने भरलेला आहे की विषाने माखलेला आहे? 'न जाने संसारः किममृतमयः किं विषमयः ?"

गेल्या सप्ताहात मुंबईत जे दोन परस्पर-भिन्न पण रंगतदार नाट्य-प्रयोग, जवळजवळ एकाच वेळी घडून आले, त्यांनी आपल्याला असेच संभ्रमात टाकले, यात शंका नाही. एक प्रयोग होता स्वरराज छोटा गंधर्व ह्यांच्या सत्कारानिमित्त झालेला, आनंदाने काठोकाठ भरलेल्या 'सौभद्र' नाटकाचा ! दुसरा प्रयोग होता म. प्र. काँग्रेसने आयोजिलेला, 'विलीनीकरणा'चा काथ्याकूट करणाऱ्या 'दळभद्र' नाटकाचा ! पहिल्या प्रयोगाला 'प्रवेश-तिकिटा'साठी धापा टाकणाऱ्या सात्विक रसिकांची हाऊसफुल्ल झुंबड उडाली होती, तर दुसऱ्या 'दळभद्र' नाटकाच्या प्रयोगालाही 'निवडणूक तिकिटा'साठी

वाट्टेल त्या खटपटी लटपटी करणाऱ्या तामसी महाभागांची गर्दी उसळली होती ! दोन्ही प्रयोग सुमारे ६ तास चालले होते. पण षण्मुखानंदमधील 'सौभद्र' माधुर्याने ओसंडत होते, तर टिळक भवन (वा 'वर्षा') येथील नाटकात कटुतेचे कर्कश ध्वनी अनेकदा निनादले होते ! म. प्र. काँग्रेस-आयोजित प्रयोगात कार्यकारिणीने रात्र पालथी घालून घडविलेल्या 'भोंगळ' ठरावात, खऱ्याखुऱ्या लोकशाहीचा उषःकाल कोठेच दिसत नव्हता; तर त्या सौदागरीय सौभद्रात 'रात्रीचा समय सरुनी येत उषःकाल हा' असे श्रीकृष्ण निःसंदिग्धपणे सांगून, भावी शुभमंगल सूचित करीत होता ! 'विलीनीकरण की ऐक्य ?' (विधिपूर्वक लग्न की नुसतीच सोयीस्कर शय्यासोबत ?) असा आत्मवंचक शब्दच्छल म. प्र. काँग्रेसच्या नाटकात अखेरपर्यंत चालला होता; तर इकडे 'सौभद्रा'त सुबोध सुस्पष्ट शब्दांतून उदात्त भावनांचे सुधाकुंभ ओसंडत होते ! 'सौभद्रां'तील समस्या होती : परस्परांचे आधीच भावनात्मक विलीनीकरण झालेल्या अर्जुन-सुभद्रेचे चिरमीलन कसे होईल ? 'टिळक-भवना'तील नाटकातही विलीनीकरणाचा नि मनोमीलनाचा प्रश्नच प्रमुख होता. पण 'येथे विलीनीकरणाचा प्रश्नच उपस्थित होत नाही' अशा भरत-वाक्याने हे नाटक गुंडाळण्यात आले.

सौभद्रातील कृष्ण नि बलराम हे परस्परांवर अतूट प्रेम करणारे, 'मूलभूत ऐक्य' असलेले जिवलग बंधू ! त्यांच्या चकमकी म्हणजे प्रेमळपणाच्या दुग्ध-सागरावर उठलेले क्षणिक कल्लोळ ; तर काँग्रेसच्या 'दळभद्र' नाटकातील ते कडवे आरोप-प्रत्यारोप, त्या कडाक्याच्या चकमकी म्हणजे खुर्चीवादी राजकारणाचे गदारोळ ! सौभद्रातील सारे घरगुती राजकारण मूलभूत सदाचारावर नि सत्प्रवृत्तीवर आधारलेले; तर काँग्रेसी नाटकात 'आचारसंहिता तयार करा, आचारसंहिता तयार करा' ह्या कंठशोषातच राजकीय दुराचाराची गर्भित कबुली ! ह्या राजकीय नाटकात आरोप-प्रत्यारोपांच्या अशा काही फैरी झडत होत्या की त्याला 'खडाष्टक' हेच नाव शोभून दिसावे ! 'सौभद्रा'त भोजनाच्या पंक्तीचे मोठे मजेदार वर्णन श्रीकृष्ण रंगवीत होता, तर इकडे प्रस्तुत काँग्रेसी नाटकात वडखळ-नाक्यावरील 'बिस्किटे' आरोपाच्या डिशमधून पुढे आलीत ! दोन्ही नाटकांत एकच विलक्षण साम्य-स्थळ होते. अर्जुनाने त्रिदंडी संन्यास घेतला होता, तर इकडे वसंतदादांनी पुनश्च एकदा राजकीय संन्यास घेण्याची भाषा वापरली ! (पण वेळ येताच, अर्जुन ज्याप्रमाणे— 'मोडुनि दंडा, फेकुन देईन, भिकार भगवी वस्त्रे !' असे गर्जला, त्याचप्रमाणे वसंतदादाही केव्हा संन्यास सोडल्याची घोषणा करतील ह्याचा नेम नाही, हेही एक साम्यस्थळ दाखविता येईल !) सौभद्र नाटकातला कलहदेखील प्रेमळ, निःस्वार्थी; तर ह्या दळभद्र-नाटकातील कलह स्वार्थाने माखलेला नि कडवा. म्हणूनच 'स्वाभिमान सोडून ऐक्य होणार नाही' ही शरदऋतूतील मेघ-गर्जना ! तेथे सौभद्रात

गर्गमुनींच्या 'हाय कमांड' पुढे बलरामदादांनी निमूटपणे मान वाकविली नि राग गिळला; तर येथे टिळक-भवनातील नाटकात वसंतदादा हायकमांडलाच व्यवहारवाद सुनावीत होते- 'जनता पक्षाच्या दगडापेक्षा इंदिरा काँग्रेसची वीट मऊ !' ह्याच नाटकात दुसऱ्या वसंतजींनी ऐक्यासाठी ३ पर्याय मांडले; तर 'सौभद्रा'त अर्जुन-सुभद्रा ह्यांच्या ऐक्याला- एकरूपतेला- पर्यायच नव्हता !

'सौभद्रा'ची सुरुवात 'राधाधर मधुमिलिंद जय जय' ह्या भगवंताच्या जयजयकाराने झाली, तर टिळक भवनातील नाटकाच्या प्रारंभी इंदिरा-पीडित यशवंताचा जयजयकार झाला ! ह्या काँग्रेसी नाटकाचे एक वैशिष्ट्य म्हणजे यशवंतराव चव्हाणांचा आवेश. नेहमीची समतोल शांतता सोडून, ते गर्जले, "दादांचे संमिश्र मंत्रिमंडळ गडगडले तरी बेहत्तर, सारी दुनिया काँग्रेस सोडून गेली तरी बेहत्तर; पण मी हा पक्ष सोडून जाणार नाही !" सौभद्रातील बलराम आवेशाने उद्गारतो-

*घालीन पृथ्वी पालथी*
*स्वर्ग पाडीन खालती*
*पाहतो जातसे कोठे–*
*दुष्ट चांडाळ तो यती !*

अगदी ह्याच चालीवर जणू यशवंतरावांचा जोश सूचित करीत होता—

*पाडीन जनता पालथी*
*स्वर्ग आणीन खालती !*
*पाहतो-इंदिरा दुष्टा*
*जातसे कोणत्या थरा !*

छे छे छे, ह्या दोन नाटकांची तुलनाच व्यर्थ आहे. षण्मुखानंद हॉलमध्ये झालेला तो सुसंस्कृत सोहळा कोणीकडे आणि हा टिळक भवनातील राजकीय कटु कोहळा कोणीकडे ! तिथे त्या साखरेहून गोड नाटकातील सुरेल अमृत-वर्षावाने जनता अत्यंत सुखावली होती, तर येथील बेसूर कर्कश चर्चेने नि भोंगळ ठरावाने कुणाचेही समाधान होणे शक्यच नव्हते ! दोन्ही ठिकाणांच्या मेळाव्यांची धारणाच वेगवेगळी. कोण्या शायराने रसिक प्रेमिक नि भांडकुदळ 'जाहिद' ह्यांची तुलना करताना जे म्हटले आहे, त्याची याद येते-

*फर्क क्या जाहिद में और आशिक में*
*हम कहे तुमको ।*
*उसकी (सारी रात) हुज्जत में कटी*
*इसकी मुहब्बत में कटी ॥*

□

शिक्षक

पत्रकार

संगीत नाटककार

अनेक भाषांचा जाणकार

ललित लेखक

सामाजिक कार्यकर्ता

राजकीय विचारवंत

ओजस्वी वक्ता

- असं महाराष्ट्राला घडलेलं
श्री. विद्याधर गोखले यांचं 'अष्टपैलू' दर्शन.
त्यापैकी पत्रकारितेच्या क्षेत्रातील
कामगिरीचं संस्कृतिविषयक दर्शन घडवणारा
हा एक साहित्यिक खंड.

मानसन्मान प्रकाशन